(**सभापतीस्थानी माननीय उप सभापती**)

<u>सभागृहातील कोरमबाबत.</u>

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहात कोरम नाही.

उपसभापती : सदस्यांनी सभागृहात उपस्थित रहावयास पाहिजे.

श्री.दिवाकर रावते : आम्हाला दर वेळेला हे सांगावे लागते.

उपसभापती : माननीय मंत्रिमहोदयांनी याची दक्षता घ्यावी. आता आपण तांत्रिक मुद्यामध्ये न जाता सभागृहाचे कामकाज सुरु करु या. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना विधेयकावर बोलायचे आहे. कृपया त्यांनी भाषणास सुरुवात करावी.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : मुंबई मोटार वाहन कर (तिसरी सुधारणा) विधेयक

L. A. BILL NO. LXXXIII OF 2006.

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY MOTOR VEHICLES TAX ACT, 1958.)

श्री. धर्मरावबाबा आत्राम (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2006 चे वि.स.वि.क्र. 83- मुंबई मोटार वाहन कर अधिनियम 1958 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास असे आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राचे राज्यपाल त्यांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, माननीय संसदीय कार्यमंत्री श्री.हर्षवर्धन पाटील सभागृहात उपस्थित आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, या सभागृहाच्या काही प्रथा, परंपरा, नियम आहेत. त्यानुसार सभागृहाचे कामकाज झाले पाहिजे. जी गोष्ट मंजूर केली नाही ती मंजूर केली असे ठरवून शासनाचे कामकाज चालणार असेल तर ते योग्य नाही. अर्थसंकल्पीय अधिवेशन दिनांक 21 एप्रिल, 2006 रोजी संपले. तो अधिवेशनाचा शेवटचा दिवस होता. त्यावेळी माननीय मुख्यमंत्री देखील सभागृहात उपस्थित होते. विधानसभेचे कामकाज संपवून ते विधानपरिषदेत "वंदे मातरम्"साठी आले होते. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी एकूण आठ विधेयके चर्चेसाठी ठेवण्यात आली होती. अधिवेशनाच्या शेवटच्या दहा मिनिटांमध्ये ही सर्व विधेयके मंजूर करावीत अशी सत्ताधारी पक्षाची विनंती सुरु होती. विधानसभेत संमत होऊन ती नुकतीच विधानपरिषदेत चर्चेसाठी आली होती. त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी पॉईंट ऑफ ऑडर्रच्या मुद्याद्वारे किमान चार दिवस अगोदर आम्हाला बील वाचावयास मिळाले पाहिजे असे सांगतले. शेवटी थोडेसे अन्डरस्टँडींग असते. शेवटी आठ पैकी चार विधेयके मंजूर करण्याचे ठरले. कोणती चार विधेयके मंजूर करावीत हेदेखील ठरले.माननीय मुख्यमंत्री म्हणाले या चार विधेयकांमध्ये परिवहनाचे 17 नंबरचे बील आहे ते आजच मंजूर करावे. आम्ही त्यांना सांगितले की, हे महत्वाचे बील आहे. आपण ते पुढच्या अधिवेशनात मंजूर करु. माननीय मुख्यमंत्री म्हणाले ठीक आहे. त्या अगोदर सन्माननीय राज्यमंत्री श्री.धर्मरावबाबा आत्राम यांनी 17 नंबरचे विधेयक मांडले होते. आम्ही विनंती केल्यानंतर त्यांनी ते मागे घेतले. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी चर्चा झाल्याप्रमाणे चार-पाच विधेयके मंजूर केली. उर्वरित विधेयकांवर चर्चा करायची होती.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

परंतु ते 17 नंबरचे बिल कुठे आहे ? या बिलावर मी मार्क करुन ठेवले होते. पुढच्या अधिवेशनामध्ये चर्चेसाठी, असे मी त्या बिलावर लिहून ठेवले होते. त्या बिलावर मला बोलायचे होते. परंतु हे बिल पुढील अधिवेशनामध्ये चर्चेसाठी न आल्यामुळे याबाबत मी माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता, हे बिल मंजूर झाले, असे मला सांगण्यात आले. याबाबतीत मी सचिव खात्यासही विचारले परंतु मला याबाबतीत खुलासा मिळाला नाही. ते बिल मंजूर झाल्याचे रेकॉर्डवर आहे. आपल्या कार्यपध्दतीवर आम्ही कसा विश्वास ठेवायचा ? आपण कोणत्या पध्दतीने कामकाज करीत आहात ? आणखीही तीन इंसिडन्स घडलेले आहेत. हे बिल मंजूर झाल्याचे प्रोसिडींगवर आहे, परंतु कॅसेटवर तसा कुठेही उल्लेख नाही. या प्रकाराबाबत मी कुठला शब्द या पवित्र सभागृहामध्ये वापरु. मराठी भाषेमध्ये "बनवाबनवी" हा शब्द वापरु की "फसवाफसवी" हा शब्द वापरू. इंग्रजी भाषेमध्ये "चिटींग" शब्द वापरु की "फ्रॉड" हा शब्द वापरु, हा प्रश्न मला पडला आहे. असेच या सदनाचे कामकाज चालणार असेल तर आपण या आसनावर कशासाठी बसला आहात ? याठिकाणी सभागृहाला कोण संरक्षण देणार ? याचा खुलासा अजूनही होत नाही. या सभागृहाच्या पावित्र्यासंबंधीच प्रश्नचिन्ह निर्माण होण्यासारखे घडले आहे. जे बिल मंजूर केले, ते फायनान्स बिल असून त्यामध्ये कर आकारणीचा विषय आहे. हे असेच चालू राहिले तर बिल याठिकाणी पटलावर दाखवून ते मंजूर केले किंवा नाही केले काय, ते रेकॉर्डवर मंजूर केले असेच लिहिले जाईल व विषय संपला जाईल. त्यावेळी विधेयकाच्या बाबतीत गोंधळ झाला असेल तर आपण समजू शकतो परंतु तसेही काही झ ालेले नाही. सन 2006 चे विधानसभा विधेयक क्रमांक 17-मुंबई मोटार वाहन कर अधिनियम,1958 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधानसभेने दिनांक 19 एप्रिल,2006 रोजी संमत केलेले आहे. परंतु हे विधेयक या सदनामध्ये मंजूर न करताही मंजूर झाले असे रेकॉर्डवर दाखवलेले आहे हा माझा प्रामुख्याने मुद्दा आहे. यासंदर्भातील खुलासा होणे आवश्यक आहे. आज याठिकाणी जी विधेयके मांडण्यात आलेली आहेत, ती चांगली आहेत. परंतु ते विधेयक याठिकाणी मंजूर न करताही ते मंजूर केल्याचे दाखविले जात असेल तर ते योग्य नाही. आम्हाला रोखण्याचे काम याठिकाणी होत आहे. म्हणून यासंदर्भातील स्पष्ट खुलासा प्रथम आपण केला तर फार बरे होईल व त्यादृष्टीने मला या बिलावर पुढील विवेचन करता येईल.

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी जो मुद्दा उपस्थित केला, त्याबाबत मी सांगू इच्छितो की, कामकाज सल्लागार समितीमध्ये ठरल्याप्रमाणे विधेयके पहिल्याच दिवशी लेईंगमध्ये ठेवावीत, असे ठरले होते. त्यानंतर त्या बिलावर सन्माननीय सदस्यांना अभ्यास करण्यासाठी...

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय वेगळीच माहिती देत आहेत. मोटार वाहन कर विधेयक आपण याठिकाणी मंजूर केले का ? याठिकाणी ते बिल मंजूर झाले नाही, परंतु ते रेकॉर्डवर मंजूर झाल्याचे दाखवले. त्यादिवशी सदनामध्ये मी उपस्थित होतो. ज्यावेळी हे विधेयक माननीय अत्राम साहेबांनी मांडले त्यावेळी आम्ही त्यांना हे विधेयक नंतर घेण्यासंबंधी विनंती केली व त्याप्रमाणे त्यांनी ते विधेयक मागे घेतले. असे असतानाही आपण रेकॉर्डवर बिल मंजूर झाल्याचे दाखवले, हे योग्य नाही. या ठिकाणी चर्चा झालेली नसतानाही बिल मंजूर झाल्याचे दाखवणे म्हणजे सभागृहातील प्रथा आणि परंपरांचे काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या संदर्भात ज्यावेळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी चर्चा झाली, त्या दिवसाचे प्रोसिडींग पाहण्याची आवश्यकता असून ही सगळी बाब तपासावी लागेल. परंतु, हे बिल मंजूर झाल्याचे मला वाटते. कारण त्यानंतर बरेच वादविवाद झाले होते. त्यामुळे याबाबतीतील सर्व प्रोसिडींग तपासावे लागेल. त्यावेळी सभागृहामध्ये पीठासीन अधिकारी म्हणून माननीय सभापती महोदय होते. त्यावेळचे प्रोसिडींग तपासून याबाबतीत नेमका कोणता निर्णय झाला ते पाहून या संदर्भातील निर्णय आपण द्यावा, अशी माझी माननीय सभापती महोदयांना विनंती आहे.

नंतर श्री.रोझेकर...

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, संबंधित खात्याचे राज्यमंत्री, सन्माननीय श्री.धर्मरावबाबा आत्राम या ठिकाणी उपस्थित आहेत त्यांनी याबाबतचा खुलासा करावा, अशी माझी विनंती आहे.

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, संसदीय कार्यमंत्री, श्री.हर्षवर्धन पाटील यांनी याबाबतचा खुलासा केलेला आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, प्रोसिडिंगची कॅसेट मी ऐकलेली आहे त्यामध्ये बिल पास झाल्याचे कुठेही आढळून आलेले नाही पण इतिवृत्तात मात्र तसे दाखविण्यात आलेले आहे. सरकार पाशवी बहुमताच्या जोरावर हे सर्व करीत आहे.

उपसभापती : ही सर्व बाब तपासून मी खुलासा करतो. आता जे बिल आपण सुरु केले आहे त्यावर सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे असल्यास त्यांनी बोलावे.

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, सन 2006 चे विधानसभा विधेयक क्रमांक 83- मुंबई मोटार वाहन कर अधिनियम, 1958 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक या ठिकाणी मांडण्यात आलेले आहे. मागच्या अर्थसंकल्पात सन्माननीय अर्थमंत्र्यांनी हा कर 4 टक्के होता तो वाढविण्याची घोषणा केली होती व हा कर 4 टक्क्यांवरुन 7 टक्के इतका वाढविण्यात आल्यामुळे या कराचा दर 12 टक्क्यांवरुन 21 टक्क्यांवर गेला होता. इतर राज्यांमध्ये बसविलेल्या कराच्या तुलनेत हा दर खूपच जास्त होता व त्यामुळे आपल्या वाहनांची नोंदणी महाराष्ट्र राज्याबाहेर करण्याकडे लोकांचा कल होऊ लागला होता. परिणामी राज्याला आपला महसूल गमवावा लागत होता. आपण जवळ जवळ 2300 गाडया रजिस्ट्रेशन करतो, हा आकडा 50 टक्क्यांने कमी झाला होता. त्यामुळे एकवार कराचा दर कमी करुन तो तिप्पटीऐवजी दुप्पट दराने करण्याचे या विधेयकांन्वये प्रस्तावित करण्यात आलेले आहे. आता हा दर 14 टक्क्यांवर येणार आहे. ही सुधारणा झाल्यानंतरही राज्याला 2 टक्के फायदा होणार आहे व अधिक गाडयांचे रजिस्ट्रेशन महाराष्ट्रात होणार आहे. बाकीच्या राज्यांची परिस्थिती बघितली तर मध्यप्रदेश राज्यात 5 टक्के, गुजरात राज्यात 12 टक्के, आंध्रप्रदेशमध्ये 9 टक्के, कर्नाटक राज्यात 9 टक्के या प्रमाणात कराची आकारणी होत असते. यादृष्टीने कर कमी करण्याबाबतची सुधारणा या बिलान्वये आणण्यात आलेली आहे. माझी सदनाला विनंती आहे की, सभागृहाने हे बिल मंजूर करावे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 व 3, अनुसूची खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

यानंतर श्री.बोरले.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) (सुधारणा) विधेयक.

L.A.BILL No. XCIII OF 2006.

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA EDUCATIOON AND EMPLOYMENT GUARANTEE (CESS) ACT, 1962.

श्री.नारायण राणे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 93- महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) अधिनियम, 1962 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असतांना मी सभागृहाच्या निदर्शनास असे आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राचे राज्यपाल त्यांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, कोकणातील सुपारी उत्पादक बागायतदारांच्या संदर्भातील कर शासनाने मागे घेतलेला आहे, ही अभिनंदनीय बाब आहे. शासनाने कर मागे घेऊन कोकणातील सुपारी उत्पादकांना दिलासा दिला आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो आणि या विधेयकाला पाठिंबा देतो.

...3/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी देखील शासनाचे अभिनंदन करण्यासाठी उभा आहे. सुपारीवरील कराच्यासंदर्भात गेल्या दोन वर्षापासून वेगवेगळया स्तरावर प्रयत्न होत होते. विधानपरिषदेचे माजी सन्माननीय सदस्य श्री.अशोक मोडक यांनी मागच्या हिवाळी अधिवेशनामध्ये दिनांक 14 डिसेंबर, 2005 रोजी यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. आज सुपारी करावरील विधेयक पास होत आहे. मी देखील यासंदर्भात पाठपुरावा केलेला आहे. सभागृहामध्ये पावसाळी अधिवेशनामध्ये मी हा मुद्दा उपस्थित केला होता. दिनांक 5 डिसेंबर रोजी हे विधेयक आले आणि आज ते विधेयक पास होत आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, वि.स.वि.क्रमांक 93- महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी (उपकर) (सुधारणा) विधेयक, 2006 हे विधेयक शासनाने आणल्याबद्दल या सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी शासनाचे अभिनंदन केलेले आहे. शासनाचे अभिनंदन केल्याबद्दल मी सन्माननीय सदस्यांचा ऋणी आहे. महाराष्ट्र शिक्षण आणि रोजगार हमी अधिनियम 1962 च्या कलम 4 (बी) प्रमाणे 16 व्यापारी पिकांवर कर लावण्यात आला होता. यामध्ये सुपारीवरही हेक्टरी 300 रुपये प्रमाणे कर लावण्यात आला होता. त्यानंतर शेतक-यांनी आणि व्यापा-यांनी सन 1985 मध्ये या करावर स्थगिती घेतली होती. 17 वर्षे ती स्थगिती होती. 17 वर्षा नंतर स्थगिती उठविण्यात आली. स्थगिती उठविल्यानंतर थकबाकीची रक्कम वसूल करण्यासाठी शासनाने 4 हप्ते पाडून दिले होते. 17 वर्षाची थकबाकी भरणे व्यापा-यांना शक्य नव्हते. काकणातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी आणि रायगडमधील सुपारी उत्पादक आणि लोकप्रतिनिधींनी हा कर रद्द करावा, अशी मागणी केली होती. त्यामध्ये विधानपरिषदेचे माजी सन्माननीय सदस्य श्री.अशोक मोडक हे प्रामुख्याने आघाडीवर होते, हे मी मान्य करतो. मी विरोधी पक्ष नेता असतांना हा कर रद्द व्हावा यासाठी प्रयत्न केले होते. सभापती महोदय, कायद्यामध्ये सुधारणा करुन सुपारीवरील हेक्टरी 300 रुपये कर या विधेयकाद्वारे रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विरोधी पक्षाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी शासनाचे अभिनंदन केल्यामुळे हे विधेयक एकमताने मंजूर करावे, अशी मी सभागृहाला विनंती करतो.

उपसभापती : मी देखील शासनाचे अभिनंदन करतो. शासनाने हा चांगला निर्णय घेतलेला आहे. आज दिनांक 12 डिसेंबर रोजी माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार आणि माननीय श्री.गोपीनाथ मुंडे यांच्या वाढदिवसाप्रसंगी आपण ही भेट दिली असे मी मानतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 व 3, अनुसूची खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

...5/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती .....

ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

यानंतर श्री.सुंबरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, 2006.

L. A. BILL NO. XCVII OF 2006.

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY VILLAGE PANCHAYATS ACT, 1958, AND THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.)

श्री. रणजित कांबळे (ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 97 - मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, 1958 आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

उपसभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 97 - मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, 1958 आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, कोणत्याही व्यक्तीला जिल्हा परिषद, पंचायत समिती तथा ग्रामपंचायतीच्या निवडणुकीमध्ये रिझर्वेशन कॅटेगरीमध्ये उभे रहावयाचे असेल तर त्यासाठी त्याला आपल्या नॉमिनेशन फॉर्म सोबत जातीचे प्रमाणपत्राची अटेस्टेड प्रत तथा सत्य प्रत जोडणे आवश्यक आहे. तसेच स्कृटिनीच्या वेळी मूळ प्रत दाखविणे देखील आवश्यक आहे. आता आम्ही या मध्ये या विधेयकान्वये असा बदल करीत आहोत की, कोणत्याही व्यक्तीला रिझर्वेशन कॅटेगरीमध्ये अशा निवडणुकीमध्ये उभे रहावयाचे असेल तर नॉमिनेशन फॉर्म सोबत जातीच्या प्रमाणपत्राची मूळ प्रत तसेच जात पडताळणी समितीचे वैधताप्रमाणपत्र देखील जोडलेले असले पाहिजे. वैधताप्रमाणपत्र जोडलेले नसेल तर त्या संबंधातील कागदपत्र जात पडताळणी समितीला वैधता मिळविण्यासाठी सादर केलेली असतील तर त्याची पावती सोबत जोडणे आवश्यक आहे आणि त्याबरोबरच एक अभिवेदन देखील देण्याची आवश्यकता आहे की, जातीचे वैधता प्रमाणपत्र तीन

..... इ 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महिन्यांमध्ये दिले जाईल. त्याप्रमाणे त्या मुदतीत त्याने वैधताप्रमाणपत्र सादर न केल्यास, आणि ती व्यक्ती सदरच्या निवडणुकीत निवडून आलेली असल्यास, तिचे सदस्यत्व आपोआपच रद्द होणार आहे. याप्रमाणे आपण सेक्शन 10(1)(अ) आणि जिल्हा परिषदेच्या कलम 12 अ मध्ये आम्ही ही दुरूस्ती करीत आहोत. तरी आपण या विधेयकास मान्यता द्यावी ही विनंती.

प्रश्न प्रस्तुत झाला.

..... इ 3 ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, खरे तर माननीय राज्यपालांनी वेळीच सही केली असती तर हे विधेयक येथे आणण्याची पाळी सरकारवर आली नसती. याचे गंभीर परिणाम आता महाराष्ट्रभर दिसणार आहेत. लोकशाहीमध्ये दिलेल्या अधिकाराप्रमाणे निवडणुकीमध्ये उभे राहण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे, हक्क आहे. त्यामध्ये जातीच्या वैधतेचा प्रश्न निर्माण झाला. आताच मध्यंतरी ज्या नगरपरिषदांच्या निवडणुका झाल्या त्यामध्ये अर्ज भरण्याची तारीख आली तरी उमेदवार जातीचे वैधता प्रमाणपत्र सादर करू शकले नाहीत. आता त्या संबंधात माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, निवडणुकीसाठी अर्ज भरताना उमेदवाराकडे जातीचे वैधता प्रमाणपत्र नसेल तर वैधता सिद्ध करण्यासाठी सदरहू समितीकडे जो अर्ज व तत्संबंधित कागदपत्रे दिली आहेत त्याची पावती तसेच ॲफिडेविट देखील अर्जासोबत जोडावयाचे आहे. म्हणजे आपण त्या व्यक्तीला निवडणुकीला उभे राहण्यापासून वंचित करीत नाही. ही आपली कृती बरोबर आहे. निवडणूक यंत्रणेचे ते काम आहे आणि त्यामध्ये सरकारची भूमिका स्पष्ट झालेली आहे की, कोणाही व्यक्तीला निवडणुकीसाठी उभे राहण्यापासून आम्ही अडवित नाही. ....

(यानंतर श्री. सरफरे .... एफ 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

त्याचा पुढील प्रवास हा ग्रामपंचायतीचा असो, किंवा नगरपालिकेचा असो, त्या उमेदवाराने तीन महिन्यात वैधता प्रमाणपत्र आणले नाही तर निवडून आलेले त्याचे पद रद्द होईल. याचा अर्थ असा की, त्याने नॉमिनेशन भरतांना मुद्दाम चुकीचे प्रमाणपत्र दाखल केले म्हणून त्याला वैधता मिळाली नाही. उद्या त्याला वैधता मिळाली व ती नाकारली, त्याचे प्रमाणपत्र अवैध ठरविले तर जनतेने निवडून दिल्यानंतर त्या उमेदवाराची निवडणूक रद्द होईल. यामध्ये असा प्रश्न निर्माण झाला आहे की, जातीच्या दाखल्याच्या वैधता प्रमाणपत्राच्या प्रकरणामध्ये ग्रामपंचायत, जिल्हापरिषदेपासून नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये हजारो उमेदवार बाद होतील. यामध्ये प्रशासकीय यंत्रणेचा भ्रष्टाचाराचा मोठा मार्ग निर्माण झाला आहे. त्या उमेदवाराला तीन महिन्यामध्ये वैधता प्रमाणपत्र आणण्यासाठी खूप धावपळ करावी लागणार आहे. तीन महिन्यात त्याने वैधता आणली नाहीतर त्याची निवडणूक बाद होईल. ती बाद होऊ नये म्हणून प्रशासकीय पातळीवर शेवटच्या दिवसापर्यंत त्याची वैधता अडवून ठेवली जाईल. आणि त्याची किंमत त्याला द्यावी लागेल. आपली कितीही इच्छा असली तरी आपले अधिकारी प्रामाणिकपणे आपले ऐकतात असे नाही. त्याचे पडसाद आपल्या रोजच्या कामकाजामध्ये दिसतात. त्यामुळे अशाप्रकारे पुन्हा पोटनिवडणुका निर्माण होतील. त्यासाठी शासनाला पुन्हा खर्च करावा लागेल, तो जनतेच्या खिशातून आणि सरकारच्या तिजोरीतून करावा लागेल. तो खर्च करण्याची जबाबदारी कुणाची आहे? एखाद्या उमेदवाराची निवडणूक अवैध ठरल्यानंतर पुन्हा होणाऱ्या निवडणुकीच्या खर्चाची जबाबदारी पेलण्याचे बंधन आपण त्यांच्यावर टाकीत नाही तोपर्यंत खोटया दाखल्याच्या आधारे निवडणूक लढवून राजकीय स्वार्थाची पोळी भाजण्याचे प्रकार थांबणार नाहीत, आणि सरकारच्या तिजोरीलाही भाव येणार नाही. म्हणून आपण या विधेयकाच्या माध्यमातून सुधारणा आणीत असतांना नगरपालिका आणि ग्रामपंचायतीच्या निवडणुकीमध्ये त्या उमेदवाराची निवडणूक अवैध ठरल्यानंतर त्या उमेदवाराकडून निवडणुकीसाठी झालेला खर्च आपल्याला वसूल करता येईल अशाप्रकारची तरतूद जोपर्यंत होत नाही तोपर्यंत हे प्रकार असेच चालू राहतील. कारण एकदा त्या उमेदवाराला अवैध ठरविल्यानंतर पुन्हा नव्याने पोट निवडणूक होईल तोपर्यंत मधल्या काळात तो कोर्टामध्ये जाऊन स्टे आणील. त्यामुळे या पोटनिवडणुका वारंवार होत राहतील, त्या बेहिशेबी असतील. माननीय राज्यपालांनी वेळीच सही न केल्यामुळे या निवडणुकीच्या प्रकरणामध्ये मोठा घोळ निर्माण झाला आहे. तेव्हा या संदर्भात शासनाची भूमिका काय आहे ते कळले पाहिजे? उद्या जर अशाप्रकारे नगरपालिकेच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ SBT/ MHM/

श्री. दिवाकर रावते...

निवडणुकीमध्ये बाद झालेल्या उमेदवारांच्या हजारो पोट निवडणुका निर्माण झाल्या तर त्या निवडणुकीच्या खर्चाची जबाबदारी पुन्हा सरकारच्या तिजोरीवर कां टाकावी? या प्रश्नासंबंधी शासनाची भूमिका काय राहणार आहे? हे या विधेयकाच्या निमित्ताने स्पष्ट केले तर बरे होईल. धन्यवाद.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत रघुवंशी (धुळे तथा नंदूरबार स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, या विधेयकाच्या निमित्ताने मी अशी विनंती करतो की, जात पडताळणी समितीसमोर त्यांनी प्रस्ताव दाखल करावा आणि त्याची पोचपावती त्यांनी अर्जासोबत जोडली तरी चालेल. तसेच जर तीन महिन्यामध्ये त्या उमेदवाराला जात पडताळणी करुन मिळाली नाही तर त्या अधिकाऱ्यावर सुध्दा कायदेशीर कारवाई केली पाहिजे. त्यासंबंधीची तरतूद या विधेयकामध्ये असली पाहिजे. जात पडताळणी प्रमाणपत्र तीन महिन्यामध्ये मिळविण्यासाठी उमेदवार येनकेनप्रकारे प्रयत्न करील. तेव्हा तीन महिन्याच्या आत ते प्रमाणपत्र देणे संबंधित अधिकाऱ्यावर बंधनकारक केले पाहिजे. त्याकरीता या विधेयकामध्ये शिक्षेची तरतूद समाविष्ट केली पाहिजे अशी विनंती करतो.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव (रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदूर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 97 मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयकावर बोलत असताना, आपल्याला पूर्वीचा अनुभव आहे की, जवळजवळ 20 हजार जात पडताळणीचे दाखले हे शासनाकडे प्रलंबित आहेत. उमेदवारांना जातपडताळणी सर्टिफिकेट आणायला सांगतो पण सर्टिफिकेट मिळविण्याकरिता आजोबाचे, वडिलांचे नातेवाईकांचा पुरावा आणावा लागतो. त्यावेळेस शाळाच अस्तित्वात नव्हत्या, त्यांच्या सात पिढ्यामध्ये शाळेमध्ये कोणी गेलेलेच नव्हते. त्यामुळे शाळेचा दाखला आणणे कोणालाही शक्य नाही. याबाबत सुप्रीम कोर्टाचे आदेश आहेत. राज्य शासनाचे आदेश नाहीत. जातपडताळणी सर्टिफिकेट मिळविण्यासाठी काय,काय करावे लागते याची आपल्याला माहिती आहे. उमेदवार निवडून आल्यानंतर त्याला जात पडताळणी समितीकडून प्रमाणपत्र मिळाले नाही तर तो उमेदवार तीन महिन्यामध्ये बाद ठरतो.. याबाबत ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी त्या उमेदवारांकडून निवडणुकीचा खर्च वसूल करण्याच्या संबंधात सांगितले. त्या उमेदवारावर खर्चाची जबाबदारी टाकून चालणार नाही कारण तो परिश्रम घेऊन निवडून आलेला असतो. त्यानंतर पुढे त्याला सहा वर्षापर्यन्त निवडणूक लढविता येत नाही अशी तरतूद आहे. शासनाने निवडणूक अर्ज भरण्याची मुदत 28 तारखेपर्यन्त ठेवण्याचा अध्यादेश काढला. तो उमेदवार निवडून आलेला आहे, त्याला लवकर जातपडताळणी समितीकडून सर्टिफिकेट मिळण्याबाबत त्यांच्यावर बंधन घालणार आहात, की उमेदवारांवर कायद्याचा बडगा उगारून त्यांना घरी पाठविणार आहात ? याचा खुलासा करणे आवश्यक आहे.

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KTG/ SBT/ MHM/

श्री.गुरूनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, अत्यंत महत्वाचे विधेयक सभागृहासमोर आलेले आहे. जात पडताळणी समितीच्या संदर्भाने आपल्याला सांगितले तर आश्चर्य वाटेल की, जात पडताळणी प्रमाणपत्र देण्यासाठी अधिकारी कोणत्या थराला जाऊ शकतात हे मी स्वत: अनुभवलेले आहे. सिंधूदूर्ग जिल्ह्यामध्ये 'ठाकर' समाजाची जातपडताळणीचे सर्टिफिकेट मिळविण्यासाठी प्रयत्न केलेला होता. मंत्री महोदयांच्या मुद्दाम लक्षात आणून देऊ इच्छितो की, 'ठाकर' समाजाच्या लोकांना एस.टी. चे सर्टिफिकेट दिलेले होते, त्या आधारावर नोकऱ्या दिलेल्या आहेत. याबाबत हायकोर्टामध्ये प्रकरण गेले, त्यानंतर सुप्रीम कोर्टात प्रकरण गेले. त्यानंतर एस.टी.ची सर्टिफिकेट देण्याबाबत बैठक बोलाविली मी आणि उपमुख्यमंत्री महोदय हजर होतो. त्यानंतर त्या ठिकाणच्या कर्मचाऱ्यांनी सुप्रीम कोर्टामध्ये ॲफिडेव्हीट दाखल केले की, मंत्री, लोकप्रतिनिधी आमच्यावर दबाव आणत आहेत. अशाप्रकारे त्यांनी न्यायालयामध्ये जाणे बरोबर नाही. सभापती महोदय, सामाजिक न्याय खात्याकडून जातीचे सर्टिफिकेट मिळविण्यासाठी रांगा लागलेल्या होत्या. सर्टिफिकेट देण्यासाठी आम्हाला काय देणार ? असे सांगून त्यांनी प्रत्येकाकडे एक हजार रुपयापासून पाच हजार रुपयापर्यन्त मागणी केली. आपले अधिकारी अशापध्दतीने सर्टिफिकेट देण्यासाठी पैशाची मागणी करत असतील तर ही व्यवस्थाच बदलली पाहिजे. ते ठराविक मुदतीमध्ये सर्टिफिकेट देणार नसतील तर त्या संबंधितांवर कारवाई करण्याबाबत कायद्यामध्ये तरदूद केली पाहिजे. एवढे बोलून माझे दोन शब्द संपवितो.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KTG/ SBT/ MHM/

श्री.विजयसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, मला खुलासा करावयाचा आहे. या संबंधात पूर्वीचा जो कायदा होता, त्यामध्ये नामनिर्देशन फॉर्म भरल्यानंतर त्याची स्क्रुटीनी करताना जातपडताळणी सर्टिफिकेट देण्याबाबतची मागणी केली जात होती, परंतु ते पडताळणी सर्टिफिकेट लगेच मिळू शकत नव्हते म्हणून तीन महिन्याची मुदत वाढविली.

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सन्माननीय सदस्य श्री.गुरूनाथ कुलकर्णी यांना जो अनुभव आला त्याप्रकारचा अनुभव मलाही आलेला आहे. जातपडताळणीचे प्रमाणपत्र असल्याशिवाय निवडणूक लढवू नये, अशाप्रकारचा कायदा केलेला होता. जातपडताळणी करण्यासाठी मुदत द्यायला माझा व्यक्तिश: विरोध आहे.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील ....

पडताळणी केल्यानंतर तीन महिन्यानंतर निवडणूक होणार असेल तर हा कायदा बनविण्याचा जो उद्देश आहे तो निष्फळ होतो. नगरपालिकेच्या निवडणुकीच्या वेळी आयत्यावेळी शासनाने अध्यादेश काढला आणि गेल्या अधिवेशनामध्ये कायद्यामध्ये अशी तरतूद केली की, जात पडताळणी झाल्याशिवाय नॉमिनेशन फॉर्म भरता येऊ नये. तोच कायदा अस्तित्वात ठेवला पाहिजे. कारण महानगरपालिकांच्या, नगरपालिकांच्या, जिल्हा परिषदांच्या ज्या पोटनिवडणुका झाल्या त्यामुळे भूर्दन्ड पडतो. आमच्या अलिबागमध्ये तीनवेळा नगरपालिकेची पोटनिवडणूक झाली. एका पक्षाने कोळी समाजाचा उमेदवार उभा केला की, दुसऱ्या पक्षाकडूनही कोळी समाजाचा उमेदवार उभा केला जातो. त्यानंतर जातीच्या दाखल्याच्या बाबतीत तक्रार केली जाते. तीन महिन्यानंतर ती निवडणूक रद्द होते. त्यामुळे जात पडताळणी झाल्याशिवाय नॉमिनेशन फॉर्म भरता येऊ नये असा जो कायदा होता तो कायदा खऱ्या अर्थाने तसाच ठेवला पाहिजे. कारण आम्ही या विरोधात हायकोर्टामध्ये गेलो होतो त्यावेळी हायकोर्टाने निर्देश दिले होते की, पडताळणी झाल्याशिवाय नॉमिनेशन फॉर्म भरु नये. सरकारने हायकोर्टामध्ये लिहून दिले आणि ते मान्य केले. या ठिकाणी जी दुरुस्ती शासन करीत आहे त्या दुरुस्तीला माझा विरोध आहे.

सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी जे सांगितले ते खरे आहे. नगरपालिकेच्या निवडणुकीच्या वेळी आम्ही सर्व आमदार मंडळी त्या ठिकाणी गेलो होतो. कोकण भवन येथे पाच हजार लोक जमले होते. तेथील लिफ्टमनही पैसे मागत होता. मी स्वत: लिफ्टमनला पैसे दिले. फाईल कोठे आहे हे सांगण्यासाठी, फाईल शोधण्यासाठी पाच पाच हजार रुपये द्यावे लागतात. त्यामुळे गरीब उमेदवार निवडणूक लढू शकणार नाही. अशा प्रकारे फॉर्म भरण्यापूर्वीच जर लाखो रुपये खर्च येणार असेल तर पडताळणी झाल्याशिवाय नॉमिनेशन फॉर्म भरता येऊ नये. तसेच जात पडताळणीसाठी कमीतकमी तीन महिन्याची मुदत अधिकाऱ्यांना दिली पाहिजे. "होय" किंवा "नाही" हे त्यांनी आधीच सांगितले पाहिजे. तेथील अधिकाऱ्यांचे आणि त्या कमिटीचे जे महत्व वाढलेले आहे ते चुकीचे आहे. ही बाब केवळ निवडणुकीपूरतीच मर्यादित नाही. प्रवेशासाठी सुध्दा विद्यार्थ्यांना जात पडताळणीचा दाखल पाहिजे असतो. कोकण भवनमध्ये त्यांची हालत पाहिली तर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ SBT

श्री. जयंत प्र. पाटील ...

डोळ्यात पाणी आणण्यासारखी परिस्थिती आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी असणारा जो शासकीय स्टाफ किंवा जे अधिकारी आहेत ते जास्त नेमावेत. 2 अधिकारी, 2 क्लार्क, 1 शिपाई एवढ्या स्टाफमध्ये पाच दहा हजार अर्जांची पडताळणी करणे शक्य नाही. पडताळणी झाल्याशिवाय नॉमिनेशन फॉर्म भरता येऊ नये अशीच तरतूद या कायद्यामध्ये ठेवावी अशी मागणी करुन मी माझे भाषण संपवितो.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, जात पडताळणीच्या संदर्भात आपल्याला कल्पना आहे की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका, अनेक महापालिकांच्या निवडणुका लागलेल्या आहेत आणि महाराष्ट्रामध्ये त्या त्या ठिकाणी म्हणजे जिल्हा परिषदेमध्ये, पंचायत समितीमध्ये आरक्षण जाहीर झालेले आहे. काही लोकांशी सहज बोलत असताना लोक असे बोलताना आढळून आले की, आम्ही जात पडताळणी समितीकडे जाऊन जातीचे सर्टिफिकेट मॅनेज केले. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी पैसे द्यावे लागतात असे सांगितले. जात पडताळणी समितीमध्ये सक्षम माणसे असली पाहिजेत. जात पडताळणी समितीचा इतिहास पाहिला तर त्यामध्ये दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे. नाही तर कोणत्याही जात पडताळणी समितीकडून हे प्रकार होतील. जात पडताळणीचा निपटारा निवडणुकीआधी होणार नसेल तर प्रश्न वेगळा आणि उत्तर वेगळे अशी परिस्थिती होईल. शासनाने आता जी दुरुस्ती केलेली आहे ती अतिशय घाईघाईने शेवटच्या क्षणी केलेली आहे. निवडणुका तोंडावर आल्यानंतर या स्वरुपाची दुरुस्ती केल्यामुळे असे प्रकार होणार. कारण लोक शेवटच्या क्षणी सर्टिफिकेटसाठी अर्ज करतील तसेच काही लोक अशा पध्दतीने दाखला आणू शकतील आणि निवडणुका डिस्टर्ब करण्यासाठी त्याचा उपयोग करतील. एवढे सांगून, या दुरुस्तीला विरोध करुन मी माझे भाषण संपविते.

...4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, जात पडताळणीचा विषय हा अतिशय गंभीर असल्याचे आताच अनेक सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे. निवडणुकीच्या संदर्भात जसे जात पडताळणी सर्टिफिकेट मिळविणे फार अवघड काम झालेले आहे तसेच विद्यार्थ्यांना, नोकरीसाठी अर्ज करणाऱ्यांना हे प्रमाणपत्र मिळविणे अवघड झालेले आहे. खरे म्हणजे नगरपालिकांच्या निवडणुकीच्या काळामध्येच हा अध्यादेश सरकारने काढला. नगरपालिकांच्या निवडणुकीनंतर त्यांचे सर्टिफिकेट रद्द होऊन काही पोट निवडणुका होणार आहेत. मला एकच मुद्दा उपस्थित करावयाचा आहे की, पुढे होणाऱ्या निवडणुकांमध्ये जे उमेदवार निवडून येतील, ज्यांना लोकांनी निवडून दिलेले आहे, त्या सदस्याच्या बाबतीत जात पडताळणीच्या संदर्भात जे अधिकारी बसलेले असतील ते एक तर मान्य करु शकतात किंवा अमान्य करु शकतात आणि पुन्हा त्यांची निवडणूक होऊ शकते.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. संजय केळकर...)

लोकांनी निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींची प्रकरणे जात पडताळणी दाखल्यामुळे प्रलंबित राहिलेली असतात. तेव्हा या जात पडताळणी समितीच्या कामामध्ये कशा प्रकारे सुधारणा करता येईल हे पाहिले पाहिजे. जात पडताळणी कार्यालयामध्ये आम्ही लोकप्रतिनिधी गेलो की, "आमच्यावर तुम्ही दबाव आणता, आणि अशा प्रकारे दबाव आणण्याचा अधिकार तुम्हाला नाही" असे आम्हाला सांगतात. जणुकाही हे कार्यालय स्वतंत्र कमिशनच असल्याप्रमाणे तेथील कर्मचारी वर्ग वागत असतो. तेव्हा जात पडताळणी दाखला मिळण्याच्या बाबतीत अनेक प्रकारच्या सुधारणा करण्याची आवश्यकता आहे अन्यथा यासंदर्भात अधिकाधिक गोंधळ निर्माण होत जाईल एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, जात पडताळणी दाखला मिळविण्याच्या संदर्भात आमदारांपासून ते सर्वसामान्य माणसापर्यन्त सर्वांनाच त्रास होत आहे. माझा अनुभव असा आहे की, ज्यांच्याकडे 1950 सालापूर्वीचे रेकॉर्ड उपलब्ध असेल त्यांना जात पडताळणी दाखला ताबडतोब मिळतो. पण ज्यांच्याकडे 1950 सालापूर्वीचे रेकॉर्ड नसते ते मग इतकडची तिकडची कागदपत्रे सादर करुन जात पडताळणी दाखले मिळविण्याचा प्रयत्न करतात आणि अशा प्रकारची प्रकरणे प्रलंबित राहातात. जात पडताळणी दाखला सादर करण्यासाठी तीन महिन्याची मुदत दिलेली आहे. परंतु या तीन महिन्याच्या अवधीमध्ये काहीही होणार नाही. उलट केऑसच निर्माण होईल. तीन महिन्यानंतर जात पडताळणी दाखला मिळू शकला नाही तर निवणूक रद्द होईल. माझे म्हणणे असे आहे की, जे राखीव मतदार संघातून निवडणूक लढवितात आणि ज्यांच्याकडे जात पडताळणीचा दाखल नसतो अशा उमेदवारांची निवडणूक नंतर रद्दबातल ठरविली जाते. खरे म्हणजे अशा प्रकरणामध्ये केवळ निवडणूक रद्दबातल ठरवून उपयोगाचे नाही तर ज्या उमेदवाराने असत्य जातीचे प्रमाणपत्र दिलेले असेल त्याला शिक्षा करण्याची तरतूद असली पाहिजे जेणे करुन तो पुनश्च निवडणुकीसाठी उभा राहू शकणार नाही. किंवा अशा प्रकारे निवडून आलेल्या उमेदवार जर अपात्र ठरला तर त्याच्या नंतर जो कोणी उमेदवार असेल तो आपोआपच निवडून आल्याचे घोषित करण्याची तरतूद कायद्यामध्ये असली पाहिजे. पंचायत समित्या, जिल्हा परिषदांचे जे राखीव वॉर्ड असतात त्याबाबतीत क्वाईट इन ॲडव्हान्स डिक्लरेशन करणे आवश्यक आहे. केवळ दीड-दोन महिने आधी नोटिफिकेशन काढून हे राखीव वॉर्ड डिक्लेअर केले जातात आणि मग जातपडताळणी दाखला मिळविण्यासाठी धावपळ सुरु होते. तेव्हा ही जी सुधारणा कायद्यामध्ये केली आहे ती योग्य नाही असे मला वाटते. सरकारने याबाबतीत विचार करावा एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेशदादा देशमुख (परभणी तथा हिंगोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, आता नगरपालिकांच्या निवडणुका झाल्या. त्यावेळी आमच्या परभणीमध्ये एकाच उमेदवाराकडे चार-चार जातीचे दाखले असल्याचे उदाहरण मला आढळून आले. मुस्लिम समाजामध्ये जे भंगी आहेत त्यांना देखील मागासवर्गीय म्हणून दाखले दिले होते. ..(अडथळा).. मी सांगू इच्छितो की, तीन महिन्याच्या कालावधीमध्ये उमेदवाराला दाखला मिळणे शक्य नाही. जात पडताळणी कार्यालयामध्ये जर एकाच वेळी अनेक लोकांनी जात पडताळणीचे दाखले मागितले तर ते तात्काळ कसे काय उपलब्ध करुन देणार ? निवडून आलेला उमेदरवार खोटे जातीचे प्रमाणपत्र दिल्यामुळे अपात्र ठरला असेल तर त्यांच्याकडून निवडणुकीचा खर्च वसूल करावा एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, एका अतिशय ज्वलंत प्रश्नावरचे विधेयक या सभागृहामध्ये चर्चेला आलेले आहे. एकूणच या जाती, उपजाती, अनुसूचित जाती या सर्वांचा तमाशा आपल्या राज्यामध्ये आणि संपूर्ण देशामध्ये चालू आहे. वैशिष्ट्य असे की, जातीचे प्रमाणपत्र सादर करण्याच्या आधी निवडणूक लढविली जाते आणि निवडून आल्यानंतर 5 वर्षांनी ती निवडणूक रद्द होते आणि सहा महिन्यासाठी पोट-निवडणूक होते अशी परिस्थिती आज आपल्या देशामध्ये आहे. निवडणूक म्हटली की, निवडणुकीला उभे राहाणारे उमेदवार ज्या ज्या मार्गाने शक्य होईल त्या त्या मार्गाने सर्टिफिकेट मिळवितात....

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.....

ते व्हॅलिड मानून निवडणूक लढवू द्यायची आणि मग पुढच्या लढाया सुरु होतात असे चित्र आहे. हे चित्र बदलण्याच्या दृष्टीकोनातून ज्या तरतुदी केल्या आहेत त्या अपुऱ्या आहेत असे माझे मत आहे. निवडणुका एकदम जाहीर होत नाहीत. मुंबई,ठाणे आणि अन्य महानगरपालिकांच्या निवडणुका होणार आहेत ही गोष्ट आज जाहीर झालेली नाही. ज्यावेळी मागील निवडणुका झाल्या त्यानंतर ठरले, पाच वर्षानंतर पुढील निवडणुका होतील. साधारणपणे मध्यंतरी कोणाची निवड रद्द झाली तर पोटनिवडणूक येते, अन्यथा पाच वर्षाच्या आत निवडणूक नाही. असे असताना ज्याला उमेदवार म्हणून उभे रहायचे आहे त्याने ही तयारी पाच वषापूर्वी सुरु करणे आवश्यक आहे. आज काय होते? त्या उमेदवाराने जातीचे प्रमाणपत्र दिले किंवा प्रतिज्ञापत्र दिले की त्या आधारे आपण त्याला निवडणूक लढवू देतो. त्यानंतर निवडणुकीचे सगळे घोळ सुरु होतात. कोण कोणत्या जातीचे प्रमाणपत्र मिळवून आणील आणि निवडणूक लढवील हे सांगता येत नाही अशी परिस्थिती आहे.

(सभापतीस्थानी तालिका सभापती डॉ.वसंत पवार)

सभापती महोदय, या विधेयकाच्या उद्देश व कारणे या निवेदनामध्ये म्हटले आहे की, "जीने हमीपत्र दिले आहे अशा व्यक्तीने हमीपत्रानुसार वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द झाली असल्याचे मानण्यात येईल." ही तरतूद कशासाठी केली आहे हे मला समजून येत नाही. याचा अर्थ खोटे प्रमाणपत्र द्या आणि निवडून या. निवडून आल्यानंतर काय व्हायचे ते होईल. लगी तो लगी नही तो दिल्लगी अशी स्थिती आहे. यातील सर्व तरतुदी पाहिल्यातर अशा प्रकारे अवैध पध्दतीने निवडणूक लढविण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या तरतुदी जास्त आहेत. अशा प्रकारे निवडणुका लढविता येणार नाहीत असे म्हणण्यासाठी कोणत्याही प्रकारचा मुद्दा यामध्ये नाही. सभापती महोदय, माझा मंत्रीमहोदयांना प्रश्न असा आहे की, आपण जर खरोखरच लोकशाहीवर प्रेम करीत असाल, सत्यमेव जयते या वाक्यावर जर आपण विश्वास ठेवत असाल तर यामध्ये अशा तरतुदी का केल्या आहेत? अवैध प्रमाणपत्र मिळवून जर कोणी निवडून आला तर त्याला आयुष्यात निवडणूक लढविता येणार नाही अशा प्रकारची कडक तरतूद का केली नाही? खोटी प्रमाणपत्रे मिळवून लोक निवडणूक लढविण्याचे धाडस का करतात? अवैध प्रमाणपत्राच्या संदर्भातील निवडणूक निकाल लागतो त्यावेळी जिंकून येणाऱ्यांना

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार.....

जशी सजा होते त्याच पध्दतीने अवैध प्रमाणपत्र निवडणूक मिळवून निवडणूक लढविणाऱ्या माणसावर सुध्दा इलाज करण्याची आवश्यकता आहे. शासनाने या तरतुदी करुन भ्रष्टाचार करण्यास मोकळीक दिली आहे. तुम्ही निवडून आल्यानंतर भविष्यात काय होईल ते तुम्ही बघा. अशा प्रकारच्या तरतुदी तुम्ही का केल्या? कोणासाठी तरतुदी करीत आहात? याचा अर्थ सत्यमेव जयतेच्या नावाखाली असत्यमेव जयतेचा कार्यक्रम करणाऱ्या सगळया लोकांना प्रोत्साहन देण्यासाठी या तरतुदी केल्या अशी माझी स्वत:ची भावना आहे.

मी या विधेयकातील आणखी एका तरतुदीचा उल्लेख करु इच्छितो. "नजिकच्या भविष्यात राज्यातील विविध जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुका होण्याची शक्यता आहे. म्हणून सन 2006 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक 35 व सन 2006 चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक 12 याद्वारे महानगरपालिका अधिनियमांमध्ये केलेल्या सुधारणांच्या धर्तीवर मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, 1958 आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, 1961 यामध्ये सुधारणा करणे इष्ट आहे असे महाराष्ट्र शासनास वाटते." आज निवडणुकांच्या तोंडावर तरतुदी सुधारणा करीत आहात. इतक्या वर्षांचा महाराष्ट्र शासनाला अनुभव आहे. साडेचार वर्षे वगळता मागील 50 वर्षे तुम्ही सत्तेवर आहात. तुम्हाला या त्रुटी समजल्या नाहीत का? ज्यांना हे संपूर्ण अधिकार मिळाले, ज्यांनी ते अधिकार वापरले, मंत्रालयाचा ताबा असताना तुमच्या लक्षात या त्रुटी येत नाहीत? अशा सुधारणा करायच्या आणि भ्रष्टाचाराला अधिक प्रोत्साहन द्यायचे, भ्रष्टाचाराला संरक्षण देण्यासाठी तरतुदी करायच्या असा हा प्रकार आहे.

सभापती महोदय, "महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, 2000 च्या तरतुदींना अनुसरुन सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र" अशी जी तरतूद केली आहे ती कशासाठी?

(नंतर श्री.गागरे....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार ..... (पुढे सुरु)

यामध्ये कोठेतरी देवाण-घेवाण होत आहे. जातपडताळणी करताना आपण भ्रष्टाचाराला प्रोत्साहन देत आहात. अधिकाऱ्यांना मॅनेज केले जात आहे, मी निवडणूक प्रक्रियेत उमेदवारांची निवड करण्याचे काम केलेले आहे. तिकीट घेताना उमेदवार बोलतात की, आम्ही जातीचे प्रमाणपत्र घेऊन येतो. ते कोणत्या आधारावर बोलतात ? ज्यांच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी झालेली नाही, अशा खोटया जात प्रमाणपत्राच्या आधारे लोकांना निवडणूक लढविता येते. यामुळे एक प्रकारे खऱ्या मागासवर्गीयावर अन्याय केला जात आहे. त्यांचे हक्क डावलले जात आहेत, हे योग्य नाही. त्यामुळे कृपया हे विधेयक मागे घेण्यात यावे, व नवीन विधेयक मांडण्यात यावे. नवीन विधेयकामध्ये खोटया जात प्रमाणपत्राच्या आधारे निवडणूकीस उभे राहणाऱ्या व्यक्तींना कडक शिक्षेची तरतूद केली पाहिजे. मी सदरहू विधेयकाला विरोध व्यक्त करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या विधेयकावर बोलत असताना मी एकच मुद्दा मांडू इच्छितो. जात पडताळणी प्रमाणपत्र देताना संबंधित कार्यालयात भ्रष्टाचार केला जात आहे. जात पडताळणी प्रमाणपत्र मिळण्यासाठी सुकर मार्ग अवलंबण्यासाठी विचार होणे गरजेचे आहे. एवढे बोलून मी आपली रजा घेतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, निवडणूकनंतर जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्याच्या संदर्भात तरतूद या विधेयकात करण्यात आलेली आहे. जात पडताळणी प्रमाणपत्र नसेल तर ते नंतर सादर करण्याच्या अटीवर निवडणूक लढविण्याची तरतूद विधेयकात करण्यात आलेली आहे. निवडणुकीपूर्वी फक्त जात पडताळणी प्रमाणपत्र समितीकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे व पुढील तीन महिन्यात त्यांनी वैध जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे, निवडणुकीनंतर तीन महिन्यात जात पडताळणी प्रमाणपत्र दिले नाही तर त्यांची निवड रद्द होणार आहे. जात पडताळणी समितीकडे अर्ज केल्यानंतर तो उमेदवार जर निवडून आला असेल तर सदरील प्रमाणपत्र मिळण्यासाठी ब्लॅकमेलींग होण्याची दाट शक्यता आहे. निवडून आलेला उमेदवार संबंधित अधिकाऱ्यांना पैसे देऊन, जात पडताळणी प्रमाणपत्र मिळवून त्याचे सदस्यत्व टिकविणार आहे. जात पडताळणी प्रमाणपत्र मिळविण्यासाठी तो वाटेल ते करण्यास तयार होईल. जात पडताळणी कायद्यातील पळवाटा शोधण्यासाठी प्रयत्न केले जातील, अधिकारीही मॅनेज होतील. या विधेयकाबाबतची चर्चा ऐकल्यानंतर एका विशिष्ट केंद्रबिंदूभोवती हे विधेयक फिरत आहे, असे वाटते. विद्यार्थ्याचे प्रवेश, कर्मचाऱ्यांच्या नवीन नेमणूका, पदोन्नती व निवडणुकीतील उमेदवार यांना जात प्रमाणपत्र पडताळणी करणे आवश्यक असून त्यांनी समितीकडे अर्ज केल्यानंतर त्यांना प्रमाणपत्र लवकर मिळणे आवश्यक आहे. कारण त्याशिवाय कर्मचाऱ्यांच्या नेमणूका किंवा पदोन्नती होत नाही. हे प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे अनेकांना सेवेतून बाहेर पडावे लागले आहे, त्यांची सर्व कागदपत्रे जात पडताळणी समितीकडे आहेत. जात पडताळणी समितीमध्ये सुधारणा करुन सक्षमीकरण करण्याची गरज आहे. सुधारणेमध्ये टाईमबाऊंड प्रोग्राम दिला पाहिजे. प्रमाणपत्रासाठी अर्ज दाखल केल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत 2-3 महिन्याच्या आत प्रमाणपत्र व्हॅलीड आहे की, इनव्हॅलीड याचा निकाल लागला पाहिजे. काही शिक्षकांच्या तक्रारी आहे की, त्यांना नेमणूका किंवा पदोन्नती मिळण्यासाठी त्यांनी जात पडताळणी समितीकडे सादर केलेली प्रकरणांचा अजूनही निकाल लागलेला नाही.

..... यानंतर श्री.सोनवणे

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

त्यामुळे दिलेली पदोन्नती काढून घेतली, मुख्याध्यापकाचे शिक्षक झाले आणि शिक्षक म्हणून जे लागले आहेत ते आज नोकरीतून बाहेर पडले आहेत आणि म्हणून या संपूर्ण विधेयकाचा केंद्रबिदू ही जातपडताळणी समिती आहे त्याचे सक्षमीकरण करण्यासाठी आपल्याला काय करता येईल ? या ठिकाणी जेव्हा कापसाचा प्रश्न निघाला तेव्हा त्यासाठी अनेक केंद्रे सुरु झाली आहेत असे आपण पाहिले अशा प्रकारे जातप्रमाणपत्र पडताळणी संदर्भामध्ये काही नवीन केंद्रे सुरु करता येतील का ? त्या ठिकाणी याचे सक्षमीकरण करता येईल का ? या सर्वांचे अर्ज तातडीने टाईम बाऊंड प्रोग्राममध्ये निकाली काढता येतील का ? आणि जर का असे झाले तर मला वाटते हे विधेयक आणण्याची सुध्दा काहीच आवश्यकता नाही. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

L-2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे (ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, कास्ट सर्टिफिकेट व्हॅलिडिटी करणे हा हायकोर्टाचा आदेश आहे आणि त्याच्यानंतर इलेक्शन कमिशनरचे आदेश आहेत आणि त्याच आधारावर आम्ही हा बदल केलेला आहे. पण आता इलेक्शन्स तोंडावर आल्या आहेत म्हणून आम्ही फक्त तीन महिन्याचा त्याला रिलीफ देण्याच्या प्रयत्नात आहोत.

श्री. दिवाकर रावते : यासंदर्भात दोन अत्यंत महत्वाच्या बाबी चर्चेतून पुढे आल्या आहेत. त्याला फार मोठे महत्व आहे. त्यासंदर्भात माननीय श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी मांडलेली भूमिका अत्यंत महत्वाची आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले आहे की, त्यासंदर्भात एखाद्या कर्मचाऱ्यांने ॲफीडेव्हीट करणे हे कसे काय शक्य आहे ? कर्मचाऱ्यांच्या बाबतीत रेग्युलेशन आहे की नाही? त्याच्यासाठी मर्यादा आहेत की नाही ? एक सामान्य कर्मचारी अशाप्रकारे वागणार असेल तर ते फार गंभीर आहे त्यासंदर्भात सरकार कोणती कार्यवाही करणार आहे याचा खुलासा झाला पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. सुरेश देशमुख यांनी या निमित्ताने अत्यंत गंभीर घटना या सदनासमोर आणलेली आहे. ती महाराष्ट्राच्या व्यापक बाबतीमध्ये मोठी आघात निर्माण करणारी आहे आणि त्याची आयोगापासून चौकशी करा. एका कुटुंबाने जर आपल्या कुटुंबातील चार लोकांसाठी वेगवेगळया जातीची सर्टिफिकेट घेतली असतील तर it is a fraud. आपण या सदनामध्ये भूमिका मांडण्यासाठी मोकळे आहोत. सभागृहामध्ये सुध्दा महात्मा गांधीजीच्या नावाने दमबाजी चालत असेल तर आपण काय करावयाचे ? याप्रकरणी माझे असे म्हणणे आहे की, सन्माननीय सदस्य श्री. देशमुख यांनी सांगितले आहे त्याप्रमाणे कुटुंबाची योग्य ती माहीती घेऊन जर ते सत्य असेल तर त्या संदर्भात सर्टिफिकेट देणारे जे अधिकारी असतील त्यांची छाननी झाली पाहिजे. जर त्या कुटुंबाने असे लाभ घेतले असतील तर ते रद्द झाले पाहिजेत एवढी गंभीर घटना आहे. जाती-जमातीची वैधता असलेला लाभ आहे त्याच्यापासून कोणीही वंचित होऊ नये म्हणून हे सगळे घटनेत आणलेले आहे. त्या माणसाला तो लाभ मिळाला पाहिजे हा त्यातील मूळ गाभा आहे आणि तो महत्वाचा असल्यामुळे त्या दोन्ही धटनेची शासन कशी नोंद कशी घेणार हे त्यांच्या उत्तरात आले पाहिजे.

श्री. मधुकर सरपोतदार : आपल्या बोलण्यातून असे नमूद झाले आहे की, हाय कोर्टाने जे जज्जमेंट दिले आणि त्याच्यामध्ये काही गाईडलाईन्स दिल्या आहेत. त्या अनुषंगाने आम्ही हे विधेयक आणलेले आहे मुंबई हायकोर्टाने यावर कोणत्या प्रकारच्या गाईडलाईन्स दिल्या आहेत त्याबद्दल आपण स्पष्टीकरण करावे अशी विनंती करतो. L-3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले आहे आहे की कास्ट व्हॅलिडीटी ॲक्ट 2000 सालापासून लागू आहे अर्थात कोणत्याही व्यक्तीला त्या कास्ट सर्टिफिकेट मुळे लाभ मिळत असेल तर त्याला व्हॅलिडीटी सर्टिफिकेट आणणे गरजेचे आहे.

यानंतर श्री. जुन्नरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे ....

सभापती महोदय, ज्या व्यक्तीला या जातीचा लाभ घ्यावयाचा आहे व ती व्यक्ती त्या जातीची असेल तर अशा व्यक्तीने जातपडताळणी प्रमाण पत्र सादर करणे आवश्यक आहे. जातपडताळणी प्रमाण पत्राचा उद्देश असा आहे की, जी व्यक्ती ज्या समाजाची आहे त्या समाजाला जे लाभ मिळतात ते लाभ त्याच समाजाच्या व्यक्तीला मिळाले पाहिजेत यासाठीच जातपडताळणी प्रमाणपत्र आवश्यक करण्यात आहे. जात पडताळणी प्रमाणपत्राची आवश्यकता ही शाळेच्या ॲडमिशनसाठी, इलेक्शनसाठी तसेच अशा इतर अनेक कामासाठी आवश्यक असते. जर एकदा सर्टीफिकेट व्हॅलिडेट केले तर त्याला ते सर्टीफिकेट पुन्हा पुन्हा व्हॅलिडेट करण्याची आवश्यकता राहणार नाही. ज्या व्यक्ती इलेक्शनसाठी उभ्या राहणार आहेत त्यांनी जातपडताळणी प्रमाणपत्र सादर करावे असे माननीय हायकोर्टाने ओदश दिलेले असल्यामुळेच आपण ही प्रोसेस करीत आहोत. या ठिकाणी सांगण्यात आलेले आहे की, जवळपास जातपडताळणीची 20 हजार प्रकरणे प्रलंबित आहेत. खरे म्हणजे 3 महिन्याचे एक्सटेंशन देण्यासाठी या ठिकाणी हे विधेयक आणण्यात आलेले आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, नजिकच्या काळात 27 जिल्हा परिषदा आणि 310 पंचायत समित्यांमध्ये इलेक्शन होणार आहे. या इलेक्शनमध्ये 626 आणि 1226 रिझर्व्हेशनची कॅटेगरी राहणार असून त्यामध्ये 1852 उमेदवार रिझर्व्हेशनचे असणार आहेत. हे उमेदवार निवडून आल्यानंतर त्यांना जातपडताळणी प्रमाण पत्र सादर करावे लागणार आहे. पूर्वी 6 जात पडताळणी समित्या होत्या परंतु आता त्यांची संख्या 13 करण्यात आलेली आहे. अगोदर एका डीव्हीजनमध्ये एक जातपडताळणी समिती होती परंतु आता एका डीव्हीजनमध्ये दोन जात पडताळणी समित्या करण्यात आलेल्या आहेत. यासंदर्भातील यादी आता सुध्दा माझ्याकडे उपलब्ध आहे. जातपडताळणीचे कामे लवकरात लवकर व्हावे म्हणून जातपडताळणी समित्यांची संख्या वाढविण्यात आलेली आहे. एस.टी. समाजासाठी प्रत्येक डिव्हीजनमध्ये एक समिती आहे. आताच्या निवडणूकीमध्ये 1850 उमेदवार रिझर्व्हेशनचे निवडून येणार आहेत त्यामुळे त्यांना जातपडताळणी प्रमाण पत्र लवकरात लवकर मिळावे यासाठीच आमचा प्रयत्न चालला आहे. आम्ही जात पडताळणी समिती सोबत चर्चा देखील केलेली आहे व त्यासंदर्भात आदेश सुध्दा झालेले आहेत.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, निवडणूकीमध्ये जर उमेदवार प्रमाणपत्र सादर करु शकला नाही किंवा उमेदवार बोगस आढळून आला तर त्यासंदर्भात शिक्षेची काय तरतूद करण्यात आलेली आहे?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, जर असा प्रकार आढळून आला तर उमेदरवाराला सहा वर्षे निवडणूका लढविता येणार नाहीत.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांना असे म्हणावयाचे होते की, तीन महिन्याच्या आत जातपडताळीण प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. उमेदवारांना 3 महिन्याच्या कालावधीत जातपडताळणी प्रमाणपत्र मिळाले नाही तर तुम्ही कोणाला जबाबदार धरणार आहात? तीन महिन्यात जातपडताळणी प्रमाणपत्र उपलब्ध करुन दिले नाही तर आपण संबंधित अधिका-याला जबाबदार धरणार आहात काय? या अधिका-याला तुम्ही कोणती शिक्षा करणार आहात?

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आपण आताच सांगितल्या प्रमाणे नजिकच्या निवडणूकीत एकूण रिझर्व्हेशनचे 1852 उमेदवार निवडून येणार आहेत. परंतु या निवडणूकीमध्ये आरक्षणाच्या जागेवर इतर उमेदवारही उभे राहू शकतील. हे उमेदवार उभे राहिल्यामुळे संबंधित जातीच्या मतांची विभागणी होऊ शकेल व त्याचा परिणाम सदर उमेदवारावर होऊ शकतो.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

श्री.विजयसिंह मोहिते-पाटील : सन्माननीय सदस्यांनी ज्या शंका उपस्थित केल्या त्याचे मी निरसन करण्याचा प्रयत्न करतो. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, नवीन कायदा आणण्याचे कारण काय ? कारण पूर्वीच्या कायद्यामध्ये नामनिर्देशनपत्र भरताना उमेदवाराला जातीचे प्रमाणपत्र द्यावे लागायचे. आपण सर्वजण राजकीय पक्षात काम करतो. बऱ्याच वेळेला आपण ऐनवेळी उमेदवार जाहीर करतो. अशावेळी त्या उमेदवारास उभे राहावयाचे असेल आणि त्याच्याकडे जात पडताळणी सर्टीफिकेट नसेल तर त्याचे नामनिर्देशनपत्र नामंजूर होते.....

श्री.दिवाकर रावते : सभपती महोदय, निवडणूक जवळ आल्या आहेत म्हणून याची आवश्यकता आहे असे सांगण्यात आले. निवडणुकीत जागांचे आरक्षण जाहीर झाले त्यास दोन-तीन महिने झाले. त्या अगोदर निवडणुका होणार आहेत हे माहीत होते. म्हणजे आपल्याजवळ किमान पाच-सहा महिन्यांचा कालावधी होता. एखाद्या ठिकाणी आरक्षण जाहीर झाल्यानंतर ज्या उमेदवाराला उभे रहावयाचे असेल त्यांनी तीन महिन्यांच्या आत व्हॅलिडीटी सर्टीफिकेट आणले पाहिजे. मला याठिकाणी सांगावयाचे आहे की, The Government is inviting the trouble. You are inviting the trouble. आपण या ठिकाणी ॲकॅडॅमिक चर्चा करीत होतो. सन्मानीय सदस्य डॉ.दीपक सांवत यांनी बरोबर मुद्दा उपस्थित केला. जर एखाद्या उमेदवाराला निवडणुकीतून बाद करायचे असेल तर कोणीही उभे राहून त्याच्या मतांची विभागणी करु शकेल. त्याचा फटका चांगल्या उमेवादास बसू शकतो. आपण राजकीय पेचप्रचंग निर्माण करण्यास वाव देत आहोत. तेव्हा या बाबतीत स्पष्टता असली पाहिजे. वाटल्यास आपण अध्यादेश काढून दुरुस्ती करु शकता. आम्ही या विधेयकाला विरोध दर्शविला आहे.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, जात पडताळणीचे काम अतिशय किचकट आणि क्लिष्ट आहे. नामसदृशामुळे अनेक गोष्टी निर्माण झालेल्या आहेत. पुणे येथील पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमध्ये "कुणबी" असे लिहिल्यामुळे विभागीय आयुक्त आणि अतिरिक्त आयुक्त यांनी वेगवेगळे निर्णय दिले. एकाचा निर्णय वैध ठरविला गेला तर एकाचा निर्णय अवैध ठरविला गेला. एक दोन महिन्यानंतर घरी गेला, तर दुसऱ्याला घरी जाण्यासाठी चार वर्षे गेली.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार.....

नामसदृशामुळे कोर्टाचे निर्णय देखील एका बाजुला एक तर दुसऱ्या बाजुला एक असे लागलेले आहेत. या किचकट कामामुळे कोणावर जबाबदारी टाकायची अशी विचित्र परिस्थिती निर्माण झालेली आहे. तेव्हा हे विधेयक पूर्ण अभ्यास करुन मांडण्यात यावे. सभापती महोदय, "बंजारा" समाजाचा महाराष्ट्रात भटक्या जातीमध्ये समावेश करण्यात आलेला आहे. त्याच जातीचा आंध्र प्रदेशमध्ये एस.सी.मध्ये समावेश करण्यात आलेला आहे . तर कर्नाटकमध्ये एस.टी.म्हणून समावेश करण्यात आलेला आहे. हा अतिशय किचकट विषय आहे. तेव्हा कोणालाही दोष देण्याचे कारण नाही. या विधेयकाचा सखोल अभ्यास करण्याची गरज आहे.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, जे उमेदवार निवाडणुकीसाठी उभे आहेत त्यांचे व्हॅलिडीटी सर्टीफिकेट तीन महिन्यांच्या आत देणे आवश्यक आहे अशाप्रकारची ऑर्डर शासनाने काढलेली आहे. त्यामुळे कोणत्याही अधिकाऱ्यांवर ॲक्शन घेण्याचा प्रश्नच नाही. आपण प्रोसेस सिम्पल करु शकतो. माझी सभागृहाला विनंती आहे की, हे विधेयक मंजूर करण्यात यावे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

यानंतर श्री.पुरी....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 7, (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.रणजित कांबळे : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 97-मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक,2006 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 97-मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हापरिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक,2006 संमत झाले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) विधेयक

L.A.BILL NO. XCII OF 2006.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA AGRICULTURAL PRODUCE MARKETING (DEVELOPMENT AND REGULATION) ACT,1963.)

श्री.हर्षवर्धन पाटील (पणन, रोजगार हमी योजना मंत्री) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या सुमतीने सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 92-महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम,1963 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

उपसभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 92-महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम,1963 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हे सभागृह प्रथा आणि परंपरेनुसार चालावे, अशी आपल्या सर्वांची इच्छा आहे. विधेयके हा अत्यंत महत्वाचा गाभा आहे. परंतु याठिकाणी मघाशी सर्व बिल मांडून झाल्यानंतर बिलाचा गाभा सांगण्यात आला, हे योग्य नाही. आपण रिव्हर्स प्रोसेसिंग कशासाठी करता, आपण सुरुवातीस बिलाची उद्देश व कारणे सांगावीत. याबाबतीत आपल्यावर कोणाचा दबाव वगैरे आहे काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या बिलाच्या माध्यमातून आपण कृषि उत्पन्न पणन संचालक मंडळाच्या बाबतीत सुधारणा आणलेली आहे. कृषि उत्पन्न बाजार समितीचे संचालक मंडळ हे 16 संचालकांचे असून त्यामध्ये ग्राम पंचायत मतदारसंघातून 4 संचालक निवडले जातात, त्यामध्ये एक मागासवर्गीयासाठी राखीव आहे, कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या विविध सोसायटयांचे जे मतदारसंघ आहेत, त्यातून 9 संचालक निवडून येतात, व्यापारी, हमाल व मापाडी यांच्यातून 3 संचालक असे एकूण 16 संचालकांचे कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे संचालक मंडळ आहे. यासंदर्भातील प्रक्रियेच्या एका सुधारणेसंबंधी मागे हायकोर्टामध्ये स्टे दिला होता. कृषि उत्पन्न

..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील...

बाजार समितीमध्ये मागासवर्गीय आणि विशेष मागासवर्गीय (ओबीसी आणि व्हीजेएनटी) अशा दोन कॅटॅगरींसाठी दोन जागा या संचालक मंडळामध्ये देण्याच्या संदर्भातील सुधारणा आपण या बिलाच्या माध्यमातून आणत आहोत. याठिकाणी मी ही गोष्ट कबूल करतो की, आपल्या राज्यातील सहकार कायद्यामध्ये बदल झालेला आहे. राज्यातील सर्व सहकारी संस्था आणि या संचालक मंडळाच्या दृष्टीने यामध्ये बदल झालेला आहे. अशा पध्दतीचे बदल कृषि उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळामध्ये समावेश करणे अभिप्रेत होते, परंतु अगोदर ती ऑर्डर पास झाली होती. त्यानंतर कृषि उत्पन्न बाजार समितीच्या बाबतीत वेगळे विधेयक मांडल्याशिवाय हे दोन संचालक, संचालक मंडळामध्ये वाढवता येणार नव्हते. म्हणून ओबीसी आणि व्हीजेएनटी या प्रवर्गातील दोन सदस्यांचा सहभाग कृषि उत्पन्न बाजार समितीच्या कामकामाजामध्ये असावा, म्हणून हे विधेयक याठिकाणी आणलेले आहे.

नंतर श्री.रोझेकर....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील.....

हे जे 2 मतदारसंघ आहेत हे विविध कार्यकारी सोसायटयांच्या माध्यमातून निर्माण करण्यात येणार आहेत.

प्रश्न प्रस्तुत झाला.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, कृषि उत्पन्न बाजार समितीचे जे बिल आणले गेले आहे त्यामध्ये साधारणपणे बाजार समित्यांच्या आर्थिक स्थितीचा विचार झालेला नाही. संचालक मंडळाची संख्या वाढते तशी खर्चाच्या तरतुदीमध्ये वाढ करण्याची गरज आहे. एवढे मोठे संचालक मंडळ सांभाळणे अतिशय कठीण आहे. या बिलातील तरतूद चांगली आहे. मोठया बाजार समित्या सक्षम आहेत आणि या बाजार समित्या मोठे संचालक मंडळ सांभाळू शकते. त्यामुळे ही तरतूद आणतांना बाजार समित्यांच्या आर्थिक स्थितीचाही विचार करणे गरजेचे होते. सेवा सहकारी सोसायटयांच्या मतदारसंघातून पूर्वी 7 आणि 2 महिला असे 9 सदस्य असावयाचे. आता 2 सदस्यांची वाढ झालेली आहे. या विधेयकामध्ये प्रक्रियेच्या माध्यमातून निवडून येणारे अधिकारी आहेत त्यांना मतदानाचा हक्क नाही. ग्राम पंचायत आणि पंचायत समित्यांचे प्रतिनिधी असतात त्यांना मतदानाचा अधिकार नाही, हे बरोबर नाही.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, वास्तविक पाहता 295 कृषि उत्पन्न बाजार समित्या आहेत त्यातील 120 पेक्षा जास्त वाढावामध्ये आहेत. प्रतिनिधी जास्त असल्यामुळे खर्च जास्त होतो असे नाही. परंतु, या कॅटेगरीला कामकाजामध्ये सहभागी करुन घेणे आवश्यक होते. प्रक्रियेच्या बाबतीत उच्च न्यायालयामध्ये याचिका प्रलंबित आहे, त्याचा निर्णय झाल्यानंतर त्याबाबत विचार करण्यात येईल.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, संचालक मंडळ वाढल्यामुळे बाजार समित्यांवर जो आर्थिक बोजा पडणार आहे त्याचा विचार झाला पाहिजे, अशी माझी सूचना आहे.

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा): सभापती महोदय, सन्माननीय पणनमंत्री यांनी या ठिकाणी सन 2006 चे वि.स.वि.क्रमांक 92 आणलेले आहे. त्यामधील तरतुदी चांगल्या आहेत. ज्यावेळी या बाजार समित्या निर्माण झाल्या त्यावेळी हे मुद्दे कुणाच्या लक्षात आले नाहीत. परिणामी या वर्गातील लोकांना इतकी वर्षे प्रतिनिधित्वापासून वंचित रहावे लागले. आज राज्यात 295 बाजार समित्या आहेत. ज्या 2 जमातींसाठी प्रतिनिधित्वाची व्यवस्था आपण या बिलाच्या माध्यमातून करीत आहोत त्यांच्याकडून याबाबत मागणी आलेली आहे काय ? हे 2 प्रतिनिधी न आल्यामुळे कोणत्या जिल्हयामध्ये या जमातीवर अन्याय झाला ? हे विधेयक मांडल्यामुळे परिणाम काय होणार आहेत ? ही सर्व माहिती मंत्रीमहोदयांनी स्पष्ट करणे आवश्यक आहे. केवळ विधेयक मांडावयाचे आणि पास करुन निघून जायचे, असे होऊ नये. विधेयकाची पार्श्वभूमी अतिशय स्पष्ट असावयास हवी. उद्देश व कारणे यामध्ये जी माहिती दिलेली आहे ती अपुरी आहे. येथे येणारे सभासद हे सगळे माहितीच्या आधारे येथे येतात, असे नाही, ते अनेक वेळा अनभिज्ञ असतात. त्यांची अनभिज्ञता दूर करण्याची जबाबदारी ही संबंधित मंत्रीमहोदयांवर असते. मी बैठकीमध्येही असे सांगितले होते की, मंत्रीमहोदय येतात, बिल वाचून दाखवितात आणि चर्चेला सुरुवात होते, ही जी पध्दत चालली आहे ती बरोबर नाही.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार .....

माननीय पीठासीन अधिका-यांना माझी विनंती आहे की, आपण कायदेमंडळ आहात. या कायदेमंडळामध्ये कोणतेही विधेयक पास करतांना सर्व सन्माननीय सदस्यांचे मत काय आहे, याची खात्री करुन, सर्वांना विश्वासात घेऊन विधेयक मंजूर व्हावयास पाहिजे. विधेयकासंबंधीची जी माहिती देणे आवश्यक आहे ती दिली तर आम्ही आपले आभारी राहू आणि ते अपरिहार्य आहे. या अधिवेशनामध्ये 20 विधेयके पास झाली. "होयचे बहुमत", "होयचे बहुमत" असे वाचून विधेयक पास केले जाते. सभापती महोदय, हे जे चालले आहे ते बरोबर नाही. कायदेमंडळाचा अवमान व्हावयास नको. जे सन्माननीय सदस्य सभागृहामध्ये हजर असतील, जे गैरहजर असतील त्यांच्याबद्दल मला काही म्हणावयाचे नाही. परंतु जे सन्माननीय सदस्य सभागृहामध्ये हजर असतील त्यांना विधेयकासंबंधीची जी माहिती देणे आवश्यक आहे ती दिली पाहिजे. विधेयकाचा उद्देश समजणे आणि होय म्हणणे यामधील अंतर नेहमी सारखेच असले पाहिजे, एवढी काळजी घेतली तर आम्ही आपले आभारी राहू.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, विधानसभेतील अनेक सन्माननीय सदस्यांनी देखील यासंदर्भात मागणी केलेली आहे. सभागृहाने हे विधेयक मंजूर करावे अशी मी आपल्याला विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3, विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 92 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : सन 2006 चे वि.स.वि. क्रमांक 92 संमत झाले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : आता सभागृहाची बैठक स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक सकाळी 11.53 ते 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री.सुंबरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी - माननीय सभापती)

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे.

तापी डायव्हर्शन कॅनाल प्रकल्प

(1) * 20334 **श्री. सुधाकर गणगणे , डॉ. एन. पी. हिराणी , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. वसंतराव खोटरे , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. जी. एल. अैनापूरे : तारांकीत प्रश्न क्रमांक 17417 ला दिनांक 17 जुलै,2006 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) तापी-गर्गा संगमाच्या खाली चिचघाट येथे धरण बांधून डाव्या तिरावरील कालव्याच्या माध्यमातून अमरावती व अकोला या जलसिंचनाचा महत्तम अनुशेष असलेल्या जिल्ह्यांचा काही अनुशेष दूर करु शकणाऱ्या तापी डायव्हर्शन कॅनाल प्रकल्पाच्या हवाई सर्वेक्षणाची सद्यस्थिती काय आहे,
(2) या सर्वेक्षणाच्या पूर्ततेसाठी किती निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे,
(3) नियोजित वेळापत्रकाप्रमाणे हे सर्वेक्षण केव्हा पुर्ण होण्याचे प्रस्तावित आहे ?

डॉ. सुनील देशमुख, श्री. अजित पवार यांच्याकरिता : (1) स्थानिक लोकांचा विरोध आहे. तापी बृहत् आराखडा अंतिम झाल्यावर याबाबत निर्णय घेण्यात येईल.
(2) प्रश्न उद्भवत नाही.
(3) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, तापी डायव्हर्शन कॅनॉल प्रकल्प हा पश्चिम विदर्भातील म्हणजे विदर्भाच्या दोन जिल्ह्यांतील एक अत्यंत महत्त्वाचा असा प्रकल्प आहे आणि हे दोन जिल्हे म्हणजे फार मोठा अनुशेष असणारे असे जिल्हे आहेत. या प्रकल्पा संबंधात या उत्तरात माननीय मंत्री महोदयांनी म्हटलेले आहे की, बृहत आराखडा अंतिम झाल्यावर याबाबत निर्णय घेण्यात येईल. तेव्हा अजून किती कालावधीमध्ये याबाबत निर्णय घेण्यात येईल ?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, या संबंधात जो अंतिम आराखडा आपण सीडब्ल्यूसीला पाठविला आहेता तो त्यांना मान्य झालेला नाही म्हणून त्यांनी आपल्याकडे परत पाठविला आहे. हा तापी खोऱ्याचा आणि विदर्भ-मराठवाड्याचा प्रश्न असल्याने अधिक व्यवस्थित आराखडा व्हावा, यातून कोणावर अन्याय होऊ नये, कोणाच्या वाट्याचे पाणी दुसऱ्या कोणाला जाऊ नये. हे सारे पाहून आराखडा तयार करण्यात येऊन तो सीडब्ल्यूसीला पुन्हा मंजुरीसाठी पाठविण्यात येईल.

..... आर 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय राज्यमंत्र्यांनी जे उत्तर दिलेले आहे त्यामुळे ते 10 पावले मागे गेलेले आहेत असे माझे मत आहे. कारण यापूर्वी हा प्रश्न दोन वेळा येथे विचारलेला आहे. वास्तविक पाहता हा जो तापी वळण कालवा आहे हा विदर्भातील अतिशय महत्त्वाचा कालवा आहे. ज्या विदर्भामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या होऊ लागल्या आहेत त्या थांबविण्यासाठी हा कालवा होणे अत्यंत आवश्यक आहे. हा कालवा उर्ध्व तापी (2) येथे होणार असून या कालव्यामुळे 284 हेक्टर क्षेत्र बाधित होत होते आणि 57 गावांचे पुनर्वसन होत होते त्यामुळे तो होऊ शकला नाही. त्याला पर्याय म्हणून हा तापी वळण कालवा होणे महत्त्वाचे आहे. हा धारणी गावाजवळ 3 कि.मी.अंतरावर आहे. ....

(यानंतर श्री. सरफरे .... एस 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 20334...

श्री. वसंतराव खोटरे...

यामुळे कोणतेही क्षेत्र कमीत कमी बाधित होते, कमीत कमी गावे बाधित होतात असे यापूर्वी उत्तर दिले होते. तसेच, असेही उत्तर दिले होते की, याबाबत हवाई सर्व्हेक्षण करुन आम्ही ताबडतोब त्यासंबंधी निर्णय घेऊ. त्याकरीता 2 कोटी आणि काही लाख रुपये मंजूर करण्यात आले होते. असे असतांना या ठिकाणी "प्रश्न उद्भवत नाही" असे उत्तर देण्यात आले आहे. शासनाने आपला कागद वाचविण्यासाठी हे उत्तर दिले आहे काय? हा प्रश्न अतिशय महत्वाचा आहे...

सभापती : माननीय सदस्यांचा प्रश्न महत्वाचा आहे, त्याकरीता तो डेव्हलप करण्यासाठी मी आपणास संधी दिली आहे. तेव्हा आपण आता स्पेसिफिक प्रश्न विचारावा.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, या कामाचे हवाई सर्व्हेक्षण हैद्राबाद येथील संस्थेमार्फत होणार आहे ते किती दिवसात पूर्ण होईल? आणि या प्रकल्पाला निश्चित किती दिवसात मंजूरी दिली जाणार आहे?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, नॅशनल रिमोट सेनसिंग एजन्सी यांचेमार्फत संपूर्ण भारतामध्ये हवाई सर्व्हेक्षण केले जाते. शासनाने त्यांना दिनांक 4.9.2006 रोजी पत्र लिहून हवाई सर्व्हेक्षण करण्यासंबंधी विनंती केली आहे. त्या भागातील स्थानिक आदिवासी लोकांचा प्रकल्पाला विरोध असल्यामुळे हवाई सर्व्हेक्षण करुन मॅपिंग करावयाचे आहे. त्याकरीता त्यांना पत्राव्दारे केलेल्या विनंतीला त्यांनी प्रतिसाद दिला आहे. परंतु त्यांचे असे म्हणणे आहे की, त्यांच्याकडे असलेल्या कामामुळे ते अत्यंत बिझी आहेत. त्यांचे हवाई सर्व्हेक्षण हे ऑक्टोबर ते मार्च या काळात होते. त्यांनी आम्हाला पाठविलेल्या पत्रामध्ये असे लिहिले आहे की, "Our prime season is October to March. We are committed to undertake the survey during the prime season in 2006-2007." त्यांना आमच्याकडून जो डाटा द्यावयाचा होता तो दिलेला आहे. त्यांना मिनिस्ट्री ऑफ डिफेन्सची परवानगी लागते त्या परवानगीची सुध्दा पूर्तता करण्यात आली आहे. त्यांचा फ्लाईंग सीझन हा ऑक्टोबर ते मार्च असून या सीझनमध्येच ते सर्व्हेक्षण करु शकतात. त्याप्रमाणे पुढील वर्षीच्या फ्लाईंग सीझनमध्ये आम्ही सर्व्हेक्षण करु असे त्यांनी म्हटले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 20334...

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, अमरावती व अकोला या दोन जिल्हयामध्ये सिंचनाचा प्रचंड अनुशेष आहे. त्या दृष्टीकोनातून हा प्रकल्प अत्यंत महत्वाचा आहे. तापी डायव्हर्शन कॅनॉल प्रोजेक्टच्या हवाई सर्व्हेक्षणासंबंधीच्या अडचणी मंत्रिमहोदयांनी याठिक्राणी सांगितल्या. या प्रकल्पाला स्थानिक आदिवासी बांधवांचा विरोध आहे. तरमग हा विरोध दूर करण्यासाठी काही विशेष प्रयत्न करण्यात आले आहेत काय? त्याची परिणती काय झाली ते सांगावे?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, स्थानिक आदिवासींचा विरोध आहे ही गोष्ट खरी आहे. याचे कारण असे की, टायगर रिझर्व्ह प्रोजेक्टमध्ये त्यांना स्थलांतर करावे लागले होते. त्यामुळे आता त्यांचा स्थलांतरणाला विरोध आहे. त्याकरीता सर्व उच्च अधिकाऱ्यांची, स्थानिक लोकप्रतिनिधी, आमदार, जिल्हा परिषदेचे सदस्य, पंचायत समिती व ग्रामपंचायतीचे सदस्य यांच्याबरोबर धारणी येथे बैठक घेण्यात आली.त्यावेळी त्यांना ग्वाही देण्यात आली की, तुमचे स्थलांतर वन क्षेत्रामध्येच करण्यात येणार आहे. याचे कारण त्यांना जर शहरामध्ये आणले तर त्यांना कंम्फर्टेबल वाटत नाही. म्हणून त्यांचे दोन किलोमीटरच्या जंगलामध्ये पुनर्वसन करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे त्यांना 2 हेक्टर इरिगेटेड जमीन देखील देण्यात येणार आहे. जेणेकरुन त्यांचा या प्रकल्पाला असलेला विरोध कमी होईल. त्यांच्याकडून रिस्पॉन्स मिळण्यासाठी मी स्वत: प्रयत्न करीत आहे. त्यांचा गैरसमज हळू हळू दूर होईल.

श्री. सुधाकर गणगणे : सभापती महोदय, स्थानिक लोकांचा या प्रकल्पाला विरोध आहे. त्या भागामध्ये जे आदिवासी लोक राहतात, त्यांचा टायगर प्रोजेक्टला सुध्दा विरोध आहे हे खरे आहे काय?

(यानंतर श्री. किल्लेदार)

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

ता.प्र.क्र.20334 (पुढे सुरू....

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, तापी टप्पा (2) चे प्रकल्पाचे काम हाती घेतलेले आहे. त्या दृष्टीकोनातून मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे 244 हेक्टर क्षेत्र बाधित होत होते. जवळजवळ 2,071 हेक्टर वन जमीन यामध्ये जात होती, असे करणे शक्य नव्हते. म्हणून त्याऐवजी धरणाचे साईट खाली घेऊन रिझर्व्ह फॉरेस्ट वाचविलेले आहे. फॉरेस्टचा विरोध होता तो कमी झालेला आहे. जेवढी वन जमीन जाणार आहे, त्याचे कॉम्पेन्सेशन म्हणून फॉरेस्टेशन करणार आहोत.

श्री.मधुकर सरपोतदार : आपण उत्तर दिलेले आहे की, "स्थानिक लोकांचा विरोध आहे. तापी बृहत् आराखडा अंतिम झाल्यावर याबाबत निर्णय घेण्यात येईल." आता उत्तर देताना सांगितले की, स्थानिक लोकांचा विरोध होत नाही. कारण त्यांना आपण पर्यायी जागा देतो आहोत. ऑक्टोबर-मार्चच्या दरम्यान मिनिस्ट्री ऑफ डिफेन्सबरोबर पत्रव्यवहार केलेला आहे. लेखी उत्तरामध्ये ही माहिती का दिली नाही ?

डॉ.सुनील देशमुख : जसा उपप्रश्न उपस्थित केला जातो, त्या अनुषंगाने अधिक माहिती दिली जाते. सर्व्हेक्षण तीन प्रकारचे होते. एक ऐरिअल सर्व्हे, दुसरा सेटलाईट मार्फत करावयाचा सर्व्हे आणि तिसरा पारंपारिक सर्व्हे. पारंपरिक सर्व्हे सुरूवातीला करण्यात आला. त्याला सुरुवातीला यश आले नाही. ऐरियल सर्व्हे हेलिकॅप्टरने आणि नॅशनल रिमोट सेन्सींग एजन्सीमार्फत सर्व्हे केला जातो, त्याप्रमाणे सर्व्हे करणार आहात काय, असा प्रश्न उपस्थित केल्यामुळे त्यास "होय" असे म्हटले. सुरुवातीपासून स्थानिक लोकांचा त्यास विरोध होता तो कमी करण्याबाबत शासन स्तरावर यंत्रणेमार्फत प्रयत्न केला. त्यांचा विरोध तसाच राहिला तर एरिअल सर्व्हे करू शकतो. या दोन्ही प्रकारे शासन स्तरावर प्रयत्न सुरू आहेत.

श्री.वसंतराव खोटरे : माझ्या माहितीप्रमाणे स्थानिक लोकांचा विरोध कमी झालेला आहे. जे क्षेत्र बाधित होते त्यामध्ये पुनर्वसन फारच कमी आहे. या प्रकल्पामुळे महत्तम अनुशेष असलेला अमरावती, अकोला या भागातील मोठयाप्रमाणात हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे. अमरावती येथील धारणी येथील 13,300 हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे त्यामुळे या प्रकल्पाला विरोध असण्याचे कारण नाही. याबाबत अधिकाऱ्यांनी तेथील लोकांना समजावून सांगितले पाहिजे. त्या भागातील लोकांचे कुपोषण होते त्यांनाही दिलासा मिळेल. जो काही पारंपरिक सर्व्हे आहे तो पूर्ण केला पाहिजे किंवा सेटलाईटमार्फत सर्व्हे करावा. लवकरात लवकर सर्व्हे पूर्ण करण्यायादृष्टीने प्रोसिजर जे काही ते पूर्ण करणार आहात काय ? (यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, मी सांगितले की, ज्यावेळी अधिकारी गेले होते त्यावेळी लोकांचा विरोध झाला. नंतर पालकमंत्री म्हणून मी स्वत: गेलो. संबंधित लोकप्रतिनिधींची बैठक घेतली आणि त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला की, असे जर केले तर त्यामुळे जास्त सिंचनाचे क्षेत्र निर्माण होऊ शकेल. त्या ठिकाणी आता एकच पीक घेतले जाते. त्या ठिकाणी सगळा उतरावरचा आणि डोंगराळ भाग आहे. पावसाळ्यामध्ये खाली पाणी येते आणि सगळे वाहून जाते. त्या ठिकाणी रब्बी पिके घेता येत नाहीत. हे सर्व समजावण्याचा प्रयत्न सुरु आहे. त्यावेळी त्यांचा विरोध होता. परंतु हा प्रकल्प रद्द होऊ नये म्हणून एरियल सर्व्हे करण्याचा आपला प्रयत्न आहे. शासन प्रामाणिकपणे हा प्रयत्न करीत आहे. त्या ठिकाणी ज्या प्रकारे सर्वेक्षण होऊ शकते तशा प्रकारे सर्वेक्षण करण्याची तयारी शासनाने ठेवलेली आहे.

सभापती : मी माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, सर्वोच्च प्राधान्याने हा हवाई सर्व्हे पूर्ण करण्याकरिता माननीय मुख्यमंत्र्यांचे पत्र माननीय पंतप्रधानांना पाठवून जर सर्वोच्च प्राधान्याने हा सर्व्हे पूर्ण झाला तर या दोन्ही जिल्ह्याच्या अनुषंगाने या सर्व्हेचे काम तातडीने पूर्ण होण्याची शक्यता आहे. त्यादृष्टीने आपण प्रयत्न करावा.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, ठीक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/

धामणगांव (जि.अमरावती) तसेच वर्धा जिल्ह्यात शेतकऱ्यांना रसायनिक खतांचा निर्माण झालेला तुटवडा

(२) * २२८०० श्री.सय्यद पटेल , श्री. नितीन गडकरी , श्री. विनोद तावडे , श्री. श्रीकांत जोशी , श्री. गुरुमुख जगवानी , श्री. रमेश निकोसे , प्रा. जोगेंद्र कवाडे , श्री. गोविंदराव आदिक , श्री. संजय दत्त : सन्माननीय कृषी मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धामणगांव (जि.अमरावती) येथे तसेच वर्धा जिल्ह्यात गेल्या काही महिन्यापासून राष्ट्रीय केमीकल्स ॲन्ड फर्टीलायझर्स हफ्को कृमको या प्रमुख कंपन्याच्या विभागाकडून शेतकऱ्यांना रासायनिक खतांचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) मागणी प्रमाणे खताचा पुरवठा करण्यासाठी शासनाने कोणती तातडीची कार्यवाही वा उपाययोजना कार्यान्वित केली आहे वा करण्यात येत आहे ?

श्री. बाळासाहेब थोरात : (१) होय अशंत: खरे आहे.

(२) मे. आरसीसीएफ या राज्यास युरिया खत पुरवठा करणाऱ्या प्रमुख उत्पादकाचे थळ येथिल प्रकल्पात स्फोट झाल्याने युरिया खताचे उत्पादन व पुरवठा यावर विपरित परिणाम झाला. त्याचप्रमाणे मे. कृभको या गुजरात स्थित रासायनिक खत उत्पादकाचे प्रकल्पात अतिवृष्टीमुळे पाणी शिरल्याने युरिया खताचे उत्पादन व पुरवठा विस्कळीत झाला होता. तसेच अतिवृष्टीमुळे रेल्वेद्वारा वहातुकीवर विपरीत परिणाम झाल्याने राज्याबाहेरुन होणरा कृभको, एनएफएल उत्पादकांचा खत पुरवठयात व्यत्यय निर्माण झाला. परिणामी अल्प काळासाठी युरिया खताचा राज्याला तुटवडा जाणवला होता, तसेच सततच्या पावसामुळे पिके पिवळी पडून वाढ खुंटली होती. माहे ऑगस्टच्या शेवटच्या आठवठयात पावसाने उघडदिप दिल्याने पिवळी पडलेल्या पिकांना युरिया देण्यासाठी अचानक युरिया खताची मागणी वाढली होती.

(३) सर्व रासानिक खत उत्पादकांची आयुक्तालय स्तरावर एकत्रीत सभा घेवून सर्व रासासनिक खत उत्पादकांना जिल्ह्याचे मागणीप्रमाणे तात्काळ पुरवठा कारणेबाबत तातडीच्या सूचना दिल्या. तसेच केंद्र शासनाकडेही सततचा प्रत्रव्यवहार करुन उत्पादकांना पुरवठा सुरळीत करण्याबाबत सूचना देण्याविषयी विनंती केली. जिल्हास्तरावर जिल्हधिकारी यांचे अध्यक्षतेखाली सनियंत्रण समिती स्थापन केली असल्याने बहुतांशी ठिकाणी पुरवठयाचे नियोजनाप्रमाणे पुरवठा सुरळीतपणे झालेला आहे. १.०० लाख मे.टन युरियाची जादा मागणी मंजूर करुन घेण्यात आली. रेल्वे खात्याच्या संबंधित विभागीय कार्यलयाशी सतत संपर्कात राहून खत पुरवठादारांना प्राधान्याने रेक व रेकपॉईट उपलब्ध करुन देवून तातडीच्या मागणीप्रमाणे पुरवठा करण्यात आला.

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, त्या काळामध्ये खताची मागणी किती होती आणि पुरवठा किती झाला ? तुटवड्याच्या काळामध्ये खाजगी व्यापाऱ्यांनी जादा दराने खते विकली काय ? त्यासंदर्भात किती व्यापाऱ्यांवर खटले दाखल झाले ? कापसाला ज्यावेळी फुलोरा येतो त्यावेळी नत्राची आवश्यकता असते. नत्र कमी झाल्यामुळे लाल्या रोग आला हे खरे आहे काय ? असे घडू नये म्हणून काय खबरदारीची उपाययोजना यापुढे करण्यात आलेली आहे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/

ता. प्र. क्र. 22800 ....

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, जादा दराने खत विक्री केलेल्या एकंदर 16 सेवा केंद्र किंवा दुकाने असतील त्यांचे परवाने निलंबित करुन त्यांच्यावर कारवाई करण्यात आलेली आहे. या वर्षाची एकंदर जी मागणी होती त्याप्रमाणे पुरवठा करण्याचा आपला प्रयत्न होता. दरवर्षी पुरवठा करण्यामध्ये सहसा 10 टक्के वाढ गृहीत धरतो. परंतु या वर्षी थोडी परिस्थिती बदलली. ऊसाच्या बाबतीत एकंदर 107 टक्के पर्यंत लागवड वाढली. कापसाची लागवड वाढली तसेच इतर पिकांच्या बाबतीत विचार केला तर खरिपाची लागवड 133 टक्केपर्यंत वाढली. खतांचा पुरवठा करीत असताना त्यामध्ये ज्या अडचणी आल्या त्या दूर करुन पुरवठा केलेला आहे. यामध्ये महत्वाची अडचण अशी होती की, आर.सी.एफ. मध्ये स्फोट झाल्यामुळे त्यांचे प्रॉडक्शन थांबले होते. कृभको या गुजरातमधील प्लँटमध्ये पाणी गेल्यामुळे आणि पूरपरिस्थिती निर्माण झाल्यामुळे आपण पोहोचू शकत नव्हतो. पाऊस जादा झाल्यामुळे नंतर मागणी आणखी वाढली. पिके पिवळी पडल्यानंतर युरियाची मागणी वाढली. सगळ्या पध्दतीने प्रयत्न करुन पूर्ण पुरवठा केलेला आहे. खत कमी पडले म्हणून लाल्या रोग आला असे नाही तर जादा पावसामुळे जमिनीतील अन्नद्रव्य खाली जाते आणि बोंड पानातील अन्नद्रव्य शोषून घेते त्यामुळे लाल्या रोग आला ही वस्तुस्थिती आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तरामध्ये सांगितले आहे की, आर.सी.एफ. मध्ये स्फोट झाल्यामुळे वितरण करण्यामध्ये विलंब झाला. आर.सी.एफ. कंपनीमध्ये कोणत्या महिन्यामध्ये स्फोट झाला. त्यानंतर आर.सी.एफ. फॅक्टरी किती दिवसामध्ये सुरु झाली. ती फॅक्टरी माझ्या तालुक्यामध्ये आहे. 15 दिवसांमध्ये ती फॅक्टरी सुरु झाली. मार्केटिंग फेडरेशन त्याचे नियोजन तीन महिने आधीच करते. तीन महिने ते माल त्या पॉइन्टपर्यंत घेऊन जातात. मार्केटिंग फेडरेशनने त्या काळामध्ये नियोजन केले नव्हते काय ? समजा त्या काळामध्ये देशामधील उत्पादन कमी झाले असेल तर परदेशातून आयात केलेले युरिया खत आपल्या राज्यामध्ये किती प्रमाणात आले ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, आर.सी.एफ. मध्ये त्यावेळी एकंदर तीन वेळा अडचण आली.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

खताचा साठा करुन तो पाठविण्यास सुरुवात झाली त्यावेळी 30 मे रोजी थळ येथील आरसीएफच्या युनिटमध्ये स्फोट झाला. त्यामुळे युरिया खत पुरवठा कमी झाला. त्यानंतर 22 जून ते 8 जुलै या कालावधीमध्ये अमोनिया गॅस सप्लायमध्ये तांत्रिक बिघाड झाल्यामुळे 20 हजार टन युरिया खताचा पुरवठा कमी झाला. त्यानंतर 7 ऑगस्ट ते 25 ऑगस्ट दरम्यान पुन्हा अमोनिया गॅस सप्लायमध्ये व्यत्यय आल्यामुळे 37 हजार टन युरिया खताचा पुरवठा कमी झाला. हा खत पुरवठा व्हावा म्हणून सर्व अधिकारी प्रयत्न करीत होते. यामध्ये रल्वेच्या देखील अडचणी आल्या. तसेच 9 टनाचा क्रशिंगचा प्रश्न निर्माण झाला. हे सर्व प्रश्न सोडविण्याचा आम्ही सातत्याने प्रयत्न केलेला आहे. युरिया खत निश्चित किती आले याची आकडेवारी आता माझ्याकडे उपलब्ध नाही.

श्री. यशवंतराव गडाख : रेल्वेच्या अडचणी, आरसीएफ मधील स्फोट ही युरिया खताचा पुरवठा कमी होण्याची कारणे माननीय मंत्री महोदयांनी सांगितली. यावेळी महाराष्ट्रामध्ये भरपूर पाऊस पडल्यामुळे खताची मागणी मोठया प्रमाणात वाढलेली आहे. शेतक-यांना वेळेवर खताचा पुरवठा केला नाही तर अन्नधान्य उत्पादनामध्ये मोठया प्रमाणावर घट निर्माण होण्याची शक्यता आहे. खताचा पुरवठा सुरळीत चालू आहे असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले त्याच्याशी मी सहमत नाही. अजूनही ग्रामीण भागामध्ये मोठ्याप्रमाणावर खताची मागणी होत आहे. तेव्हा या खताच्या मागणीच्या संदर्भात जिल्हाधिकारी स्तरावर आढावा घेऊन खताची मागणी पूर्ण करण्यात येईल काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : खरीप आणि रब्बी या दोन्ही हंगामामध्ये युरिया खताचा पुरवठा करावा लागतो. खताच्या मागणी संदर्भात जिल्हा पातळीवर कृषी अधिका-यांमार्फत आढावा घेतला जातो. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतीखाली देखील आढावा समिती नेमलेली आहे. मी स्वत: देखील आढावा घेतो. केन्द्रीय कृषी मंत्री माननीय श्री. शरद पवार यांनी देखील आढावा घेतलेला आहे.त्यांच्याशी माझ्या दोन बैठकाही झालेल्या आहेत. त्यांची याबाबतीत खूप मदत झालेली आहे. तरीही सन्मानीय सदस्यांनी सूचना केल्याप्रमाणे पुन्हा एकदा सर्व आढावा घेतला जाईल.

श्री. केशवराव मानकर : सन्माननीय मंत्री महोदय श्री. बाळासाहेब थोरात यांनी गोंदिया जिल्ह्याला युरिया खताचा पुरवठा केला त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात : नुसत्या फोनवर सांगितल्या बरोबर मी खताचा पुरवठा केलेला आहे.

श्री. केशवराव मानकर : त्याबद्दल पुनश्च एकदा धन्यवाद. विदर्भामध्ये एकूण किती युरिया खताची मागणी आहे ? तसेच प्रत्येक जिल्ह्यासाठी किती युरिया खताचा पुरवठा केलेला आहे ? युरिया खताचा काळाबाजार होतो ही वस्तुस्थिती आहे. तेव्हा ज्या शेतक-यांचे नुकसान झालेले आहे त्याना शासन काही मदत करणार आहे काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : शेतक-यांचे नुकसान होणार नाही याची पूर्ण काळजी घेतलेली आहे. खरिपामध्ये युरिया खताचे 11.15 लाख मे.टनाचे आवटन होते. पुरवठा मात्र 11.78 लाख मे.टन झालेला आहे. म्हणजे 106 टक्के पुरवठा झालेला आहे. रब्बीमध्ये 7 लाख मे.टनाचे आवटन होते.पुरवठा 3.3 लाख मे.टन म्हणजे 81 टक्के झालेला आहे. युरिया खत कमी पडून शेतक-यांचे नुकसान होणार नाही याची काळजी आम्ही घेत आहोत.

प्रा. जोगेंद्र कवाडे : युरिया खताच्या तुटवड्यामुळे शेतक-यांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे. आरसीएफ मध्ये स्फोट झाले. गुजरात येथील मे. कृभको या खत निर्मिती प्रकल्पामध्ये अतिवृष्टीमुळे पाणी शिरले. ...

...नंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / अशुद्धीसाठी नाही

रेल्वेच्या अडचणी अशा विविध प्रकारच्या अडचणी आहेत. केंद्र सरकारकडे देखील मदतीसाठी विनंती करण्यात आली. परंतु अशा प्रकारची इव्हेंच्युॲलिटी येते, इमर्जन्सी येते तेव्हा कायमची पर्यायी व्यवस्था करण्याच्या दृष्टीने आणि त्या माध्यमातून शेतकऱ्यांना योग्य वेळी योग्य प्रमाणात रासायनिक खतांचा पुरवठा होईल याकरीता मंत्रालयाकडून प्रयत्न होतील काय?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, खतांचा पुरवठा कमी पडतो म्हणून वेगवेगळया पध्दतीचे कॉम्प्लेक्स असतात त्यामध्ये बदल करुन पुरवठा करण्याचा प्रयत्न केला जातो. सन्माननीय सदस्यांच्या काही वेगळया सूचना असतील, काही करावे अशी अपेक्षा असेल तर निश्चित नोंद घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जलसिंचनाचा महत्तम अनुशेष असलेल्या अमरावती जिल्ह्यातील करजगाव प्रकल्प व शिंदी (बु.) बृहत लघु पाटबंधारे प्रकल्प या दोन प्रकल्पांना मान्यता मिळण्याबाबत

(३) * २०४२५ प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. वसंतराव खोटरे , श्री. जी. एल. अैनापूरे , श्री. राजेंद्र जैन , श्री. जितेंद्र आव्हाड : सन्माननीय जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलसिंचनाचा महत्तम अनुशेष असलेल्या अमरावती जिल्ह्यातील करजगाव प्रकल्प व शिंदी (बु.) बृहत लघु पाटबंधारे प्रकल्प या तीन प्रकल्पांना मान्यता मिळण्याबाबत सविस्तर आराखडा प्रशासकीय मान्यतेसाठी शासनाला सादर करण्यात आलेला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास उक्त आराखड्याला प्रशासकिय मान्यता केंव्हा प्रदान करण्यात आलेली आहे,

(३) मान्यता देण्यात आलेली नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ.सुनील देशमुख, श्री. अजित पवार यांच्याकरीता : (१) होय.

(२) दोन्ही योजनांच्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता प्रदान झालेली नाही.

(३) करजगांव ल.पा. योजनेचा प्रस्ताव अद्ययावत दरसूचीचे आधारे तयार करुन शासनास फेर सादर करण्याकरिता क्षेत्रिय कार्यालयास परत करण्यात आला असून शिंदी (बु.) बुहत ल.पा. योजनेच्या प्रस्तावातील त्रुटी संदर्भात क्षेत्रिय कार्यासनाकडून तपशील मागविण्यात आला आहे.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, या तीन प्रकल्पांपैकी बोर्डीनाला या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता दिल्याबद्दल शासनाला धन्यवाद देतो. उर्वरित दोन प्रकल्प लहान असून त्यावर जास्त खर्च येणार नाही. करजगाव या प्रकल्पामुळे 1510 हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे व शिंदी प्रकल्पाकरीता 57 कोटी रुपये खर्च अपेक्षित असून 1800 हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे. मागच्या वेळी अर्थमंत्र्यांनी उत्तर दिले होते की, 15 दिवसात मान्यता दिली जाईल. त्यासंबंधी अद्याप शासनाकडून पूर्तता झालेली नाही. उत्तरामध्ये म्हटले आहे की, ज्या त्रुटी आहेत त्या संदर्भात क्षेत्रीय कार्यासनाकडून तपशील मागविण्यात आला आहे. हा तपशील किती दिवसात प्राप्त होईल आणि एक महिन्यात प्रशासकीय मान्यता दिली जाईल काय?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, तीन प्रकल्प असून त्यातील बोर्डीनाला या प्रकल्पाला शासनाने प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. करजगाव लघुपाटबंधारे प्रकल्प, चांदूरबाजार या प्रकल्पाचा प्रस्ताव क्षेत्रीय अधिकाऱ्याकडून प्राप्त झाला होता. तो 2003-04 च्या दरसूचीप्रमाणे होता. शासनाने 2005-06 ची दरसूची तयार केली असल्याने तो पुन्हा परत आला. क्षेत्रीय विभागाकडून त्रुटींची पूर्तता करण्याचे काम सुरु आहे. दिनांक 13 नोव्हेंबर, 2006 च्या

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शासन निर्णयानुसार प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार क्षेत्रीय स्तरावर आल्यामुळे पुन्हा शासनाकडे प्रस्ताव येण्याची गरज नाही. त्रुटींची पूर्तता झाल्याबरोबर क्षेत्रीय स्तरावर मान्यता दिली जाईल. शिंदी प्रकल्प सध्याच्या मापदंडात बसत नाही. त्याचा विचार नंतर करण्यात येईल. करजगाव प्रकल्पला एका महिन्याच्या आत मान्यता देण्यात येईल.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पणन महासंघाच्या कर्मचाऱ्यांनी केलेला अपहार

(४) * २०८८३ प्रा. फौजीया खान , श्री. वसंतराव चव्हाण , श्री. जितेंद्र आव्हाड , श्री. सदाशिवराव पोळ : सन्माननीय पणन मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कापसाचे ३ टक्के रक्कमेचे कपात झालेले धनादेश परभणी जिल्ह्यातील पणन महासंघ कार्यालयात जमा केले आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांसाठी आलेले धनादेश बँक अधिकाऱ्यांशी संगनमत करुन पणन महासंघाच्या कर्मचाऱ्यांनीच रक्कम उचलल्याचा धक्कादायक प्रकार पणन कार्यालयात ऑक्टोबर २००६ च्या शेवटच्या आठवड्यात घडला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार संबंधितांविरुध्द काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. हर्षवर्धन पाटील : (१) होय.

(२) नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, ता.प्र.क्र.२०८३६.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मला आपल्या अनुमतीने उत्तरामध्ये दुरुस्ती करावयाची आहे. उत्तर क्रमांक-२ मध्ये "नाही" असे म्हटले आहे त्याऐवजी "नाही. तथापि खरेदी विक्री संघाच्या कर्मचाऱ्याने अनधिकृत व्यक्तीकडे ८५ धनादेश दिल्याचे आढळून आले." असे वाचावे. उत्तर क्रमांक-३ मध्ये "नाही" ऐवजी "होय" असे वाचावे. उत्तर क्रमांक-४ मध्ये "प्रश्न उद्‌भवत नाही" ऐवजी "सदर अनधिकृत व्यक्तीने चार अन्य खात्यात ८५ धनादेश जमा केले होते. याबाबत संबंधिताविरुध्द योग्य ती कारवाई करण्यात येत आहे. तसेच उपरोक्त ८५ कास्तकारांच्या रक्कमा पुनश्च त्यांच्या खात्यात वर्ग करण्यात आल्या आहेत." या दुरुस्तीसहित उत्तर वाचावे.

(नंतर श्री.जुन्नरे...

अशुद्धीत प्रत / शोधनीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 20883 .....

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, मंत्री महोदय द्वारा उत्तर दुरुस्त करने से यह स्पष्ट होता है कि पहले गलत उत्तर दिया गया था. इसलिए यह सोचने की बात है. मैं मंत्री महोदय से पूछना चाहती हूं कि परभणी जिले में जहां एक साल के अन्दर 50 किसानों ने आत्महत्या की है, वहां पर ठीक से काम नहीं हो रहा है, इसलिए जिन अधिकारियों ने उचित कार्रवाई नहीं की है, उन अधिकारियों के खिलाफ सरकार क्या कार्रवाई करने वाली है ? दूसरा प्रश्न यह है कि परभणी जिले के लिए कितना पैसा रखा गया है, कितने किसानों को चेक दिया जाना था और कितने किसानों को चेक वितरीत किए गए हैं और क्या इस तरह से परस्पर बिना किसानों को नोटिस दिए आप कर्ज के लिए उनका पैसा दे सकते है ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, परभणी जिल्हयात एकूण 93.15 कोटी रुपयांचे वाटप करावयाचे असून त्यापैकी 82 कोटी रुपयांचे वाटप शेतक-यांना करण्यात आलेले आहे. चेक वाटपामध्ये धनगर टाकळी शाखेचा शाखा अधिकारी दोषी आढळून आलेला आहे त्यामुळे या शाखा अधिका-याची एक वेतनवाढ कायमस्वरुपी रोखण्यात आलेली असून डीडीआर मार्फत विभागीय चौकशी करण्यात आलेली आहे. बाळाजी ठाकूर या व्यक्तीला शेतक-यांना देण्यासाठी 85 चेक्स देण्यात आले होते. हे चेक अकाऊंट पेई असतांना या व्यक्तीने हे चेक्स इतर शेतक-यांच्या खात्यात जमा केले म्हणून त्याच्यावर फौजदारी कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

श्री. सुरेश देशमुख : सभापती महोदय, या ठिकाणी भ्रष्टाचार झालेला आहे ही वस्तुस्थिती आहे. शासन जर संबंधित दोषी व्यक्तींवर कारवाई करीत नसेल तर ही प्रथा तशीच पुढे चालू राहील. त्यामुळे संबंधित बँकेच्या अधिका-याला निलंबित करावे, तसेच ज्या संबंधित व्यक्तीने ज्या शेतक-यांचे चेक्स दुस-या शेतक-यांच्या नावे घातलेले आहेत अशा व्यक्तीला सुध्दा निलंबित करावे अशी विनंती आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 20883 .....

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या प्रकरणात 1.25 लक्ष रुपये शेतक-यांना द्यावयाचे होते, आता हे पैसे संबंधित शेतक-यांना देण्यात आलेले आहेत. मात्र ज्या व्यक्तीने चेक्सचा दुरुपयोग करुन फसवणूक केली त्याच्यावर पोलीस कारवाई करण्यात येईल तसेच संबंधित शाखा अधिका-याची एक वेतनवाढ कायमस्वरुपी बंद करण्यात आलेली असून संबंधित बँकेला पुढील कारवाई करण्यास सांगितलेले आहे.

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, 3 टक्के कपातीमध्ये शेतक-यांना 150,200,400 रुपये मिळत असतात परंतु हे पैसे बँकेतून काढण्यासाठी मात्र बँकेत खाते उघडण्यासाठी 500 रुपये भरावे लागतात. खाते उघडल्याशिवाय बँकेतून शेतक-यांना पैसे मिळत नाहीत.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, 100 रुपयाच्या खालील रक्कम चेकने दिली जात नाही तर ती रक्कम शेतक-यांना कॅशने दिली जाते. परंतु असे असले तरी सर्व शेतक-यांनी बँकेत खाती उघडलेली आहेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, खानदेश, मराठवाडा, विदर्भातील कापूस पिकविणा-या शेतक-यांच्या दृष्टीने हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. बँकेचे अधिकारी शेतक-यांना 100,200 रुपये देतात परंतु मोठी रक्कम असेल तर हे अधिकारी आपल्या नातेवाईकांच्या नावावर शेतक-यांचे पैसे टाकतात. या घटनेमध्ये एकूण 7 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचे उघड झालेले आहे.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.20883....

श्री.दिवाकर रावते.....

हे आपल्याला माहीत आहे. आता याठिक्राणी परभणी जिल्ह्यातील प्रश्न उपस्थित झाला. यामध्ये जे अधिकारी दोषी असतील त्यांचेवर कारवाई होईल. या निमित्ताने सभागृहाला सांगू इच्छितो की, मागच्यावेळी मी भाषण करताना सांगितले होते की, हे संपूर्ण प्रकरण सी.बी.आय.कडे द्यावे. यामध्ये जवळपास 250 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. जवळपास 175 कोटी रुपयांचे चेक अधिकाऱ्यांनी आपापल्या नातेवाईकांच्या नावे काढले आहेत. सभापती महोदय, शेतकऱ्यांचे पैसे मिळावेत म्हणून आंदोलने झाली. सर्व पक्षाच्या माध्यमातून ही आंदालने झालेली आहेत. मी पणन मंत्र्यांना धन्यवाद देतो. जे काम वर्षानुवर्षे झाले नाही ते काम त्यांच्या कालावधीत झाले. कारण कोणतेही असो. सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे या भ्रष्टाचारामध्ये मोठ्या प्रमाणावर अधिकारी गुंतलेले आहेत. ही अतिशय गंभीर बाब आहे. मागील चर्चेच्या वेळी उत्तर देताना मंत्रिमहोदंयानी लक्ष दिले नाही. मी सुध्दा जास्त काही बोललो नाही. माझा प्रश्न आहे की, एकाच्या नावावर चेक असताना दुसऱ्याच्या नावे कसा काढण्यात आला याची खोलात जाऊन चौकशी करणार काय ? तसेच हे संपूर्ण प्रकरण सी.बी.आय.कडे चौकशीसाठी देण्यात येणार आहे काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, तीन टक्के व्याजाची एकूण 768 कोटी रुपये इतकी रक्कम देय होती. यामध्ये शेतकऱ्यांची संख्या जवळपास 50 लाखापर्यंत आहे. हा 28 ते 30 वर्षाचा हिशोब आहे. एकूण 768 कोटी रुपयांपैकी 704 कोटी रुपयांचे प्रत्यक्ष वाटप झालेले आहे. वारसा केस तसेच कुटुंबातील व्यक्ती दुसरीकडे राहत असल्यामुळे वाटप झाले नाही अशी रक्कम 4 कोटी रुपयांच्या आसपास आहे. मी दर आठवडयाला आढावा घेत आहे. चेक वाटपासंदर्भातील माहिती पटलावर ठेवण्यात येईल. चेक वाटपासंदर्भात माझ्याकडे सुध्दा दोन-तीन तक्रारी आलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांजवळ आणखी माहिती असल्यास त्यांनी ती मला द्यावी. त्याबाबत निश्चितपणे चौकशी करुन कारवाई केली जाईल. या संपूर्ण प्रकरणात अधिकाऱ्यांची चौकशी करण्यात येईल, जे दोषी असतील त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल्.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 20883...

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, श्री. जयंत पाटील यांना दिलेला चेक श्री.हर्षवर्धन पाटील यांच्या नावावर जमा होतो, ही अतिशय गंभीर बाब आहे. तेव्हा संबंधित अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल केला पाहिजे. महाराष्ट्रात एकूण 27 बँका आहेत, पण त्यातील ठराविक बँका घोटाळे करतात. त्यामुळे बाकीच्या बँकांचे चांगले काम असूनही त्या बदनाम होतात. केंद्र सरकारकडून ज्या विविध योजनांद्वारे पैसे मिळतात ते पैसे जिल्हा बँकेत ठेवण्यात येऊ नयेत असे निर्देश केंद्र सरकारने दिलेले आहेत. या गोष्टीचा परिणाम माझ्या बाजुला बसलेले सोलापूर बँकेचे चेअरमन यांना बसलेला आहे. परभणी बँकेत जो चेक घोटाळा झालेला आहे त्याची ॲन्टी करप्शन विभागामार्फत चौकशी शासन करणार आहे काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, श्री.जयंत पाटील यांच्या नावाचा चेक श्री.हर्षवर्धन पाटील यांच्या नावावर जमा झाला तर समजू शकतो. परंतु त्याहीपेक्षा ही वेगळी केस आहे. या प्रकरणात शाखाधिकारी दोषी आहेत. त्यांच्यावर आठ दिवसांच्या आत फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास मंडळामार्फत लाभार्थींना कर्जवाटपातील अटी शिथील करण्याबाबत

(5) * 20456 श्री. धनाजी साठे , श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद , श्री. यशवंतराव गडाख , श्री. संजय दत्त , मेजर सुधीर सावंत : सन्माननीय रोजगार व स्वयंरोजगार मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळामार्फत लाभार्थ्यांना होत असलेल्या कर्ज वाटपाबाबत असणाऱ्या अटी शिथील करण्याबाबत दि. 28/12/2005 व 21/4/2006 रोली झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार मा.मंत्री रोजगार व स्वयंरोजगार यांनी निर्देश दिले होते हे खरे आहे काय,

(2) असल्यास याबाबत मा.लोकप्रतिनिधी यांनी माहे 19 सप्टेंबर, रोजी आपणांस निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,

(3) असल्यास, कर्ज वाटपाच्या अटी शिथील करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे, व करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,

(4) अद्याप पर्यंत कार्यवाही झाली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री.सतीश चतुर्वेदी : (1) होय.

(2) श्री.मुझफ्फर हुसेन, विधान परिषद सदस्य यांनी दि.12.9.2006 रोजी निवेदन दिले आहे.

(3) "दोन सक्षम जामीनदार आणि इक्वीटेबल मार्टगेज करुन घेणे" ही अट शिथील करण्यात आली असून सदर अटीऐवजी "एक शासकीय सेवेतील जामीनदार अथवा इक्विटेबल मार्टगेज करुन घेणे" अशी सुधारीत अट विहीत करण्यात आली आहे.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.मुझफ्फर हुसैन : सभापती महोदय, हा अतिशय गंभीर प्रश्न आहे. मागील दोन वर्षापासून हा प्रश्न सभागृहात चर्चेसाठी येत आहे. तीन वेळा लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून हा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. राज्यमंत्रिमंडळाच्या बैठक्‌ीत देखील हा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता.

यानंतर श्री.पुरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.20456....

श्री.मुझफ्फर हुसेन....

नियम व अटी शिथील करण्यासंदर्भात माननीय मंत्रिमहोदयांच्या दालनात बैठक झाली होती. परंतु याठिकाणी जे लेखी उत्तर देण्यात आलेले आहे, ते बरोबर नाही. याठिकाणी उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "दोन सक्षम जामीनदार आणि इक्विटेबल मार्टगेज करुन घेणे" ही अट शिथील करण्यात आली असून सदर अटीऐवजी "एक शासकीय सेवेतील जामीनदार अथवा इक्विटेबल मार्टगेज करुन घेणे" अशी सुधारीत अट विहित करण्यात आली आहे." अशाप्रकारचे उत्तर याठिकाणी देण्यात आलेले आहे. माझ्याकडे मंडळाचे माहिती पत्रक असून त्यामध्ये "दोन जामीनदार भेटत नाहीत." असे म्हटले आहे. माननीय मंत्रिमहोदयांच्या दालनामध्ये जी बैठक झाली, त्याचे मिनिटस् माझ्याकडे आहेत. त्यामध्ये माननीय मंत्रिमहोदयांनी आश्वासन दिले होते की, यामध्ये एक सक्षम जामीनदार घेऊ.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा. आपण प्रश्न डेव्हलप करु नये.

श्री.मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांना मी एवढेच विचारु इच्छितो की, त्यांच्या दालनामध्ये झालेल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे मंत्रिमहोदयांनी कार्यवाही का केली नाही ?

श्री.सतीश चतुर्वेदी : सभापति महोदय, अट शिथिल करने के बारे में आमदारों के साथ जो मीटिंग हुई थी, उसमें शासन इस बात से सहमत था कि हमारी अट काफी कड़क हैं, हमारे कर्ज का वाटप नहीं हो पा रहा है, 90 प्रतिशत राशि लोगों को नहीं दे पा रहे हैं इसलिए अट शिथिल करने के बारे में शासन सहानुभूतिपूर्वक विचार करेगा. शासन अट शिथिल करने की कोशिश करेगा, ऐसी चर्चा मीटिंग के अन्दर हुई थी. यह कर्ज देने का मामला है, इसलिए वित्त विभाग से मंजूरी लेनी पड़ती है. वित्त विभाग ने जो अट शिथिल की है, वह हमने लिखित उत्तर में बता दी है. पहले 2 सक्षम जामीनदार और इक्वीटेबल मार्टगेज की अट थी. अब उसको शिथिल करके शासकीय सेवा का 1 जामीनदार अथवा इक्विटेबल मार्टगेज की अट लागू कर दी है. नई अट के अनुसार शासकीय सेवा का 1 जामीनदार अथवा इक्विटेबल मार्टगेज, इनमें से कोई भी एक अट पूरी करने से लोन मिल जाएगा. इसके अतिरिक्त शैक्षणिक कर्ज की सीमा को ढाई लाख से बढ़ाकर 3 लाख रुपए कर दिया गया है.

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.20456....

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, केंद्र सरकारकडून कर्ज देण्यासाठी म्हणून 40 कोटी रुपये कोणत्या तारखेला महामंडळाला प्राप्त झाले ? कर्ज घेण्याच्या दृष्टीने आत्तापर्यंत किती अर्ज प्राप्त झाले ? व त्यातून आपण किती जणांना कर्जाचे वाटप केले ?

श्री.सतीश चतुर्वेदी : सभापती महोदय, यासंबंधीची माहिती मी पटलावर ठेवतो.

नंतर श्री.रोझेकर...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, धर्माच्या आधारावर सवलती देणे योग्य नाही. येथे उलटा प्रवास सुरु आहे. मुस्लिम म्हणून सवलती देण्यात येत आहेत. अशा प्रकारच्या सवलती मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाकडून देण्यात येत आहेत. केवळ एका जामिनदाराच्या आधारे 3 लाख रुपयांचे कर्ज देणार असाल तर अशीच सवलत इतर समाजातील लोकांना देण्यात येणार आहे काय ? सर्व समाजाला सारख्या प्रमाणात न्याय देण्यात येणार आहे काय ? शासनाने अशा प्रकारे तुष्टिकरणाचा मार्ग का स्वीकारला आहे ? यामागे पोलिटिकल तुष्टिकरणाचा वास येतो आहे. अशा प्रकारची सवलत मागणे हे मुळात चुक आहे आणि सवलत द्यावयाची असेल तर सर्वांना समान सवलत दिली गेली पाहिजे. लोकशाहीमध्ये सर्व जनतेला समान हक्क असले पाहिजे. म्हणून याच धर्तीवर ज्या ज्या बँका आहेत त्यांच्या माध्यमातून सर्व समाजाला सवलती देण्यात येणार आहेत काय ?

श्री.सतीश चतुर्वेदी : सभापती महोदय, माननीय आमदार सरपोतदार जी ने जो विचार व्यक्त किए हैं अथवा जो प्रश्न पूछा है, वह उनकी विचारधारा के हिसाब से बराबर पूछा है, लेकिन हमारी जो विचारधारा है, हम उसके हिसाब से कार्य कर रहे हैं. महोदय, राज्यात आघाडीचे शासन आहे. केंद्रामध्ये आणि राज्यामध्ये आमची जी निती आहे ती धर्मनिरपेक्ष आहे व त्यानुसार राज्यामध्ये जे अल्पसंख्यांक आहेत, ज्यांना आर्थिक सवलती मिळाल्या नाहीत, समाजामध्ये ज्यांची प्रगती व्हावयाची आहे, अशा लोकांना मदत करण्याचा हा प्रयत्न आहे. धर्मनिरपेक्ष राज्यामध्ये अल्पसंख्यांक लोकांना आपल्या पायावर उभे करण्याची ही निती आहे. त्याला आपण जर तुष्टिकरण म्हणणार असाल तर धर्माच्या नावावर विरोध करण्याचा आपल्याला अधिकार आहे. आमची जी निती आहे त्यामध्ये अल्पसंख्यांक समाजातील मुस्लिम, बौद्ध, ख्रिश्चन, पारशी अशा सर्व अल्पसंख्याक समाजासाठी हे महामंडळ स्थापन करण्यात आले आहे. कुणाच्या पोटात दुखत असेल तर त्याला माझा इलाज नाही. अल्पसंख्याक लोकांचे नाव घेतले तर काही लोक पुढे येतात ही त्यांची निती आहे व ती त्यांनाच मुबारक होओ. अल्पसंख्याक समाजाच्या तरुणांना रोजगार व स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहित करण्याचे केंद्र सरकारचे धोरण आहे व राज्याचेही तेच धोरण आहे व ते सुरु राहणार आहे.

...2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, ज्यावेळी सन 1999 ला लोकशाही आघाडीचे सरकार सत्तेवर आले व त्या ठिकाणी आजचे मुख्यमंत्री, श्री.विलासराव देशमुख दोन्ही पक्षाचे नेते म्हणून निवडले गेले त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष, माननीय श्री.शरद पवार यांनी माननीय मुख्यमंत्र्यांना एक पत्र दिले होते आणि त्या पत्रामध्ये असा उल्लेख होता की, जे अन्य कार्यक्रम या शासनाने घेतले पाहिजे त्यातील एक कार्यक्रम असा घ्यावा की, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ स्थापन करावे. यानुसार दोन्ही पक्षाच्या लोकशाही आघाडीच्या सरकारने ही मागणी मान्य केली म्हणून मी लोकशाही आघाडी सरकारचे पहिल्यांदा अभिनंदन करतो. माझा प्रश्न असा आहे की, त्या ठिकाणी 60 कोटी रुपये अनुदान महामंडळाकडे असतांना सुध्दा काही जाचक अटी अशा घातल्या आहेत की त्या समाजातील लोकांना त्याचा लाभ मिळू शकलेला नाही. या अटी शिथिल करणार काय ? आणि त्यांना आर्थिक लाभ देणार काय ?

यानंतर श्री.बोरले.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.20456 .....

श्री.सतीश चतुर्वेदी : सभापती महोदय, अट शिथील करण्याबाबत मी मघाशी उत्तर दिलेले आहे. दोन जामीनदारांची अट होती. त्यातील एक अट शिथील करण्यात आली आहे. एका अटीची आवश्यकता आहे. इक्वीटेबल मार्टगेज करुन घेण्याची आवश्यकता नाही. ही अट शिथील करण्याचा आम्ही निर्णय घेतलेला आहे. आपण आम्हाला माहिती दिली म्हणून आम्ही आघाडीचा कार्यक्रम असे म्हणत आहोत. यामध्ये माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार आणि माननीय श्रीमती सोनीया गांधी आणि आमच्या सोबत जे इतर पक्ष आहेत त्यांचा समावेश झाला आहे.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, हमारे समाज की उन्नति के लिए बहुत कम मौके हैं. सच्चर कमेटी के अहवाल के अनुसार मुसलमान सब से पिछड़ा हुआ समाज है. मैं माननीय प्रधानमंत्री और इस सरकार का अभिनन्दन करना चाहती हूँ कि उन्होंने सच्चर कमेटी से सर्वे करवाया . . . .

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

सभापती : सन्माननीय सदस्या श्रीमती फोजिया खान तुम्ही प्रश्न विचारा.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, लोन लेने के लिए इसमें "एक शासकीय सेवेतील जामीनदार" की अट रखी गई है. मेरा प्रश्न यह है कि इसमें से "शासकीय" शब्द हटाकर . . ..

(व्यवधान)

सभापती : सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान तुम्हाला काही प्रश्न विचारावयाचा आहे काय ?

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्या.

सभापती : सन्माननीय सदस्या श्रीमती फोजिया खान तुम्ही प्रश्न विचारा.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, लोन लेने के लिए इसमें "एक शासकीय सेवेतील जामीनदार" की अट रखी गई है. मेरा प्रश्न यह है कि क्या इसमें से "शासकीय" शब्द हटाकर केवल "सक्षम जामीनदार" की अट रखेंगे ?

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील देशमुख : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन आहे. सन्माननीय सदस्य मधुकर सरपोतदार यांनी सांगितले की, हे मुस्लिमांचे तुष्टीकरण आहे. आजच्या सर्व वर्तमानपत्रामध्ये अशी बातमी आलेली आहे की, परमपूज्य श्री.आसारामजी बापू प्रवचनासाठी लाखो रुपये घेतात. त्यांना गुजरात सरकारने 80 कोटी रुपयांची जमीन दिलेली आहे. शेतक-यांची जमीन त्यांनी कवडीमोल भावाने विकत घेतलेली आहे. हायकोर्टाने त्यांच्या थोबाडीत मारली. श्री.आसारामजी बापू प्रवचनासाठी लाखो रुपये घेतात.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे, नाही तर मला पुढचा प्रश्न पुकारावा लागेल.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

सभापती : प्रश्नोत्तराच्या तासामध्ये मी हरकतीच्या मुद्याला परवानगी देणार नाही. माननीय श्री.सुनील देशमुख यांनी सभागृहामध्ये पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनच्या माध्यमातून जी माहिती दिली ती मी तपासून घेईन आणि आवश्यक नसेल तर ती माहिती रेकॉर्डवरुन काढून टाकीन.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, लोन लेने के लिए इसमें "एक शासकीय सेवेतील जामीनदार" की अट रखी गई है. मेरा प्रश्न यह है कि क्या इसमें से "शासकीय" शब्द हटाकर केवल "सक्षम जामीनदार" की अट रखेंगे ?

यानंतर श्री.सुंबरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.20456...

श्री. सतीश चतुर्वेदी : सभापती महोदय, सर्व गोष्टींचा विचार करूनच ही अट शिथिल करण्यात आलेली आहे. परंतु त्यावर देखील आपली सजेशन असेल तर अगोदर या बाबतीत अनुभव कसा येतो हे आपण पाहू, यातूनही अडचण काही येत आहे असे लक्षात आले तर त्याबाबत देखील विचार करण्यात येईल.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माझा मुलभूत प्रश्न असा आहे की, एक तर याला आपण धर्माची जोड देऊ नका. आपण मुस्लिमांना चांगल्या सुविधा जरूर द्याव्यात. जे हिंदुस्थानी असतील त्या सर्वांना आपण सोयी-सवलती दिल्या पाहिजेत. ...

श्री. सतीश चतुर्वेदी : हे सारे हिंदुस्थानीच आहेत.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, ज्यांचे हिंदुस्थानवर प्रेम आहे अशा मुस्लिमांना आपण जरूर सवलती द्या. पण इंग्रजीमध्ये या संदर्भात एक चांगली म्हण आहे to catch the fish and not to eat the fish. तेव्हा तुम्ही जे काही करीत आहात त्यातून त्या माणसाला सक्षम आपण करणार आहात असे नाही. आज खऱ्या अर्थाने त्या माणसांना शिक्षणाची आवश्यकता आहे. त्याबाबतीत आपण काय करणार आहात ? मदरशातून दिल्या जाणाऱ्या शिक्षणापेक्षा अधिक चांगले शिक्षण देण्यासाठी आपण काही करणार आहात का ?

श्री. सतीश चतुर्वेदी : सभापती महोदय, 35 विद्यार्थ्यांना 45 लाख रूपयांची रक्कम आपण या महामंडळामार्फत शैक्षणिक कर्ज म्हणूनही मंजूर करून दिलेली आहे.

श्री. मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, हे नियम शिथिल करण्याबाबत आपण चर्चा करीत आहोत. तेव्हा मी विचारू इच्छितो की, आपण खरोखरी हे नियम शिथिल केलेले आहेत की ते अजून कडक केलेले आहेत ? आज या समाजामध्ये खाण्याच्या, राहण्याच्या बाबतीत देखील मोठे प्रश्न आहेत, अडचणी आहेत असे असताना त्याच्या कर्जासाठी शासकीय अधिकाऱ्याने हमी द्यायची म्हणून आपण सांगत आहात हे कोठपर्यंत बरोबर आहे ? आपणास यातून काही द्यायचे नसेल तर हे मंडळ आपण बंद करून टाका आणि अशा प्रकारची चर्चाही करू नका, असे उत्तर देऊ नका असे माझे आपणास सांगणे आहे.

(उत्तर देण्यात आले नाही.)

***

..... सीसी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्जत येथील पाणी पुरवठा योजनेचे काम पुर्ण होण्याबाबत

(6) * 24099 श्री. प्रकाश शेंडगे , श्री. रामनाथ मोते , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. विनोद तावडे : सन्माननीय पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) कर्जत येथील पाणी पुरवठा योजनेचे काम 90 टक्के पूर्ण झाले हे खरे आहे काय,

(2) असल्यास, 15 वर्षा पूर्वीची ही योजना अद्यापी पूर्ण न होण्याची कारणे काय आहेत,

(3) असल्यास, नळ जोडणी आणि रस्ते दुरुस्ती या कामात समन्वय नसल्याने या योजनेतील पाणी कर्जत करांना अद्याप मिळू शकले नही हे खरे आहे काय,

(4) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय,

(5) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

श्री. रणजित कांबळे, श्री. अजित पवार यांच्याकरिता : (1) होय,

(2), (3), (4) व (5) योजनेस दिनांक 4.12.1997 रोजी प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात येवून कामास दिनांक 24.6.1998 रोजी सुरुवात केली आहे. सद्य:स्थितीत योजनेचे 98 टक्के काम पूर्ण करण्यात आले असून ऑक्टोबर, 2006 अखेर रुपये 1224.25 लक्ष खर्च झाला आहे. योजनेतील आवश्यक ती कामे पूर्ण करण्यात येवून मार्च, 2006 पासून पाणी पुरवठा सुरु करण्यात आला आहे. सद्य:स्थितीत योजनेचा लाभ नागरीकांना मिळण्याच्या दृष्टीने जून्या वितरण वाहिनीतून नविन योजनेद्वारे पाणी पुरवठा वितरीत करण्यात येत आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, कर्जत येथे ही जी पाण्याच्या टाकीची योजना आपण केली आहे त्यासंबंधात उत्तरात आपण म्हटले आहे की, 98 टक्के काम पूर्ण करण्यात आलेले आहे आणि 2 टक्के काम उरले आहे. तरीही पाणी पुरवठा सुरू करण्यात आलेला आहे, हे कसे काय ? सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, मुळात ही टाकी एका टेकडीवर बांधलेली आहे. त्या टाकीतून पाणी ओव्हरफ्लो होते त्यामुळे तेथील मातीची धूप होते आणि टेकडीवरील त्या टाकीच्या पायाचा भाग भुसभुशीत होते आणि त्यामुळे ती टाकी पूर्ण भरली जात नाही हे खरे आहे काय ? तसेच या टेकडीवर पाण्याची टाकी बांधण्याचा निर्णय ज्या अभियंत्याने घेतला आहे तो चुकीचा आहे काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, हे खरे आहे की, तेथे 98 टक्के काम पूर्ण झालेले आहे असे उत्तरात सांगितले आहे. कारण तेथे काही किरकोळ कामेच शिल्लक राहिलेली आहेत. त्यामध्ये स्टाफच्या क्वार्टर्स, फेन्सिंगचे काम, वन विभागाचे तसेच रेल्वेचे पेमेंट द्यायचे आहे. त्या व्यतिरिक्त प्युअर वॉटर ग्रॅव्हिटी साठी तेथे 25 डायमीटरचे एमएस पाईपचे काम आहे त्यांचे

..... सीसी 3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एन्कॅशलिंग, तेथे रेल्वे क्रॉसिंग करावयाचे होते ते काम शिल्लक राहिलेले आहे तसेच त्या भागातच एअर व्हॉल्वचे काम शिल्लक आहे, अशीच आणखीही काही वेगवेगळ्या स्वरूपाची किरकोळ कामे शिल्लक राहिलेली आहेत. ...

(यानंतर श्री. सरफरे .... डीडी 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 24099..

श्री. रणजित कांबळे...

आपण याठिकाणी 98 टक्के काम झाल्याचे सांगितले आहे. ही योजना नगर परिषदेकडे हस्तांतरीत झाली नसल्यामुळे जुन्या डिस्ट्रिब्युशन स्किममधून पाणीपुरवठा सुरु आहे. आणि नवीन डिस्ट्रिब्युशन पाईपलाईनचे काम पूर्ण करण्यात आले आहे. त्यांना नगरपरिषदेच्या माध्यमातून कनेक्शन देण्याचे काम चालू आहे. ज्यावेळी कनेक्शन देण्याचे काम पूर्ण होईल त्यावेळी ही योजना नवीन डिस्ट्रिब्युशन स्किममध्ये शिफ्ट करण्यात येईल.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, लेखी उत्तरात म्हटले आहे की, 24 जून 1998 रोजी कामाला सुरुवात झाली. ही योजना किती वर्षामध्ये पूर्ण होणार होती? आज 8 वर्षे झाली तरी या योजनेचे काम 98 टक्के पूर्ण झाले आहे. या कामाला दिरंगाई होण्याचे कारण काय?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, या योजनेला 1998 मध्ये मंजूरी मिळाली व त्याच वर्षी काम सुरु झाले. यामध्ये सर्वात मोठी अडचण वन विभागाच्या जमिनीची होती. वन विभागाच्या परवानगीसाठी आम्हाला भोपाळ येथील कार्यालयामध्ये प्रस्ताव पाठवावा लागला. त्यांच्याकडून आम्हाला सन 2003 मध्ये परवानगी मिळाली. त्यानंतर हे काम चालू झाले. त्याचप्रमाणे जमीन संपादनाच्या कामामध्ये अडचणी होत्या. जमीन संपादनाची प्रक्रिया दिनांक 28.1.2004 रोजी पूर्ण झालेली आहे.

श्री. संजय केळकर : आपण 1998 मध्ये कामाला मंजूरी मिळाल्याचे सांगितले. आणि 2003 पर्यंत आपल्याला वन विभागाची परवानगी मिळाली नव्हती असे सांगितले. यामध्ये विसंगती आहे ती दूर करावी?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, हा प्रकल्प खूप मोठा असून ज्या ठिकाणी वन विभागाची जमीन नव्हती त्या ठिकाणी काम चालू झाले होते. परंतु ज्या ठिकाणी वन विभागाची जमीन होती, त्याकरीता क्लिअरन्स मिळविण्यासाठी भोपाळ येथे प्रस्ताव पाठवावा लागला. त्यांच्याकडून आम्हाला परवानगी मिळाली नव्हती म्हणून आम्ही काम सुरु करु शकत नव्हतो.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझ्या अगोदरच्या प्रश्नाला मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले नाही. टेकडीवर टाकी बांधल्यामुळे जमिनीची धूप होते. त्यामुळे त्या टाकीला धोका आहे काय? दुसरे असे की, पर्यावरण विभागाची परवानगी नसल्यामुळे हे काम उशिरा सुरु झाले असे म्हटले. प्रश्न असा आहे की, 14 कोटी 13 लाख रुपये मंजूर झाले आहेत, ते प्रत्यक्षात तिकडे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/ MAP/

ता.प्र.क्र. 24099..

श्री. विनोद तावडे...

केव्हा आले? हे काम निधीअभावी अडले होते काय? पर्यावरणाच्या मंजूरीअभावी अडले होते काय?

श्री. रणजित कांबळे : हे काम चालू होते. जसजसा निधी प्राप्त झाला त्याप्रमाणे काम चालू होते. परंतु 14 कोटींचा निधी हा एकाच दिवशी मिळाला नाही, तो टप्प्याटप्प्याने देण्यात येणार आहे. दुसरे असे की, ओव्हरफ्लोमुळे टाकीला धोका आहे काय? असे विचारण्यात आले आहे. आतापर्यंत त्या टाकीला धोका असल्याचे आमच्या निदर्शनास आले नाही. तरीसुध्दा माननीय सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे पुन्हा एकदा तपासणी करण्याची व्यवस्था विभागामार्फत करण्यात येईल.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याच्या मुद्दयासंबंधी

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे...

सभापती : माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे आणि माननीय सदस्य श्री. उल्हासदादा पवार यांना उद्या औचित्याचे मुद्दे उपस्थित करण्यास मी परवानगी देईन.

पृ.शी. व मु. शी : □□द्दपत्रे सभा□हासमोर ठेव□

श्री. बाळासाहेब थोरात (कृषी मंत्री) : सभापती महोदय., मी आपल्या अ□मती□ महात्मा फुले कृषी विद्यापिठाचे सन 1998-99 व 1999-2000 या वर्षाचे वार्षिक लेखे आणि लेखापरिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : महात्मा फुले कृषी विद्यापिठाचे सन 1998-99 व 1999-2000 या वर्षाचे वार्षिक लेखे आणि लेखापरीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेव□यात आला आहे

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादितचा सन 2004-2005 चा एकोणचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.रणजित कांबळे (ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने राज्यात किती ग्रामपंचायती आहेत व त्या पैकी किती ग्रामपंचायती हागणदारीमुक्त झाल्या आहेत या विषयावरील डॉ.दीपक सावंत,वि.प.स. यांनी दिनांक 13 डिसेंबर, 2005 रोजी उपस्थित केलेल्या सन 2005-2006 च्या पूरक विवरणासंदर्भात मंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस: सोबत जोडलेली अधिक माहिती छापावी.)

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ SBT/

पृ.शी. व मु.शी. : सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सादर करणे.

श्री.अरविंद सावंत (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अंदाज समितीचा सातवा अहवाल सभागृहाला सादर करतो.

या संदर्भाने दोन बाबी मी निदर्शनास आणून देऊ इच्छितो. हा अहवाल महाराष्ट्र व औद्योगिक विकास (सिडको) यांच्या कामकाजाच्या संदर्भात अहवाल मांडतो. आजच सकाळी राष्ट्रकूल संसदीय मंडळाच्या अभ्यास वर्गाचा समारोप प्रसंगी विधानसभा अध्यक्ष माननीय श्री.बाबासाहेब कुपेकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, अनेक समित्यांचे अहवाल मांडले जातात, त्या अहवालाचे पुढे काय होते,याबाबत आपल्या भाषणामध्ये सांगितले. या संबंधाने मी जाणीवपूर्वक उदाहरणे देतो की, सभागृहाने चिंता व्यक्त करावी अशी परिस्थिती आहे.

एका प्रकरणामध्ये सिडकोने रहेजा कार्पोरेशन या बांधकाम व्यवसायिकाला वाशी स्टेशनसमोरचा भूखंड दिला. भूखंड देताना निविदा मागविण्यात आलेल्या नाहीत. सिडकोचे म्हणणे आहे की, त्यांचा नियमानुसार व्यक्तिगत अर्ज विचारात घेऊन वाटप करण्याचा अधिकार आहे. समितीच्या मते ही तरतूद अत्यंत घातक असून या तरतुदीचा फार मोठा गैरवापर होत आहे. सिडकोच्य अन्य क्षेत्रातील भूखंडांना निविदाद्वारे राखीव किंमतीपेक्षा जास्त दर मिळत असताना या प्रकरणात मात्र जवळजवळ निम्म्या दराने भूखंड देण्यात आला आहे. समितीने या प्रकरणात उच्च स्तरीय समिती नेमून, ज्या ज्या अनियमितता झालेल्या आहेत, त्याचा शोध घेऊन, त्यात जे जे जबाबदार आहेत, त्यांच्यावर कडक कारवाई करण्याची शिफारस केली आहे. अन्य एका प्रकरणात सिडकोच्या संचालकासह सतरा वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या वाहत्या गंगेत कसे हात धुवून घेतले, याचा प्रत्यय समितीला आला आहे. सिडकोने प्रथमेश सहकारी गृहानिर्माण सोसायटीला बाजारभावापेक्षा निम्म्याहून अधिक दराने भूखंड दिला. ही संस्था सिडकोच्या संचालकासह सतरा वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्थापन केलेली होती. या प्रकरणात सिडकोचे अधिकारी ,कर्मचारी यांनी स्थापन केलेल्या सोसायट्यांच्याबाबतीत घातलेल्या सर्व अटी व शर्ती धुडकावून लावण्यात आल्या आहेत. विशेष उल्लेख करण्याजोगी बाब म्हणजे सिडको व शासन यांना अशा प्रकारचा गैरवापराच्या आणि गैरव्यवहाराच्या अनेक घटनांची कल्पना होती तरीही त्यांनी याकडे दुर्लक्ष केले. या प्रकरणामध्ये भारताचे महालेखापरीक्षक व नियंत्रक यांच्या म्हणण्यानुसार प्रत्येक लाभार्थींना 19.93स लाखाचा फायदा करून देण्यात आला असून सिडकोचा सुमारे 1.62 कोटी रूपये एवढा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ SBT/

श्री.अरविंद सावंत (पुढे सुरू....

तोटा झाला आहे. आणखी एका प्रकरणात सिडकोने शेवंताबाई प्रतिष्ठान या ट्रस्टला शाळा सुरू करण्यासाठी चार हजार चौरस मिटरचा भूखंड ज्याची आरक्षित किंमत 1500 रुपये प्रति चौरस मिटर होती. त्याच्या पाच टक्के या सवलतीच्या दराने म्हणजेच रूपये 75 प्रती चौ चौरस मिटर या दराने दिली. शाळा चालविण्यासाठी 10 वर्षाचा अनुभव, मागील तीन वर्षाचा निकाल 85 टक्के पेक्षा जास्त या प्रमुख अटीकडे भूखंड वाटप करताना दुर्लक्ष करण्यात आले. जेव्हा ट्रस्टला समजले की, या अटींची आपण पूर्तता करू शकत नाही. त्यावेळी त्यांनी रयत शिक्षण संस्था व हिरानंदाने फौडेशन यांचेबरोबर जॉईंट व्हेंचर करण्याची पळवाट काढली व सिडकोनी कोणतीही खळबळ न करता ती स्वीकारली. सिडकोस जमिनीची विक्री करताना प्रचलित अटीमध्ये फेरफार करण्याचा अधिकार असला तरी यापूर्वी म्हटल्याप्रमाणे विशिष्ट प्रकरण डोळ्यासमोर ठेवून तसे करणे योग्य नाही.

यानंतर श्री.बरवड.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ...

या प्रकरणात आणखी गंभीर बाब म्हणजे सिडकोने यापूर्वी देखील जवाहरलाल नेहरु इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन (कोपरखैरणे), न्यू एज्युकेशन सोसायटी (ऐरोली), अरुणोदय एज्युकेशन सोसायटी (सानपाडा), सहजीवन एज्युकेशन सोसायटी (नेरुळ) व शिक्षण प्रसारक मंडळ (नेरुळ) यांना 2001-03 या कालावधीत शिक्षण क्षेत्राचा अनुभव नसतानाही भूखंड दिले आहेत.

सभापती महोदय, शेवटी मी सभागृहाच्या निदर्शनास आणत आहे की, सिडकोमध्ये झालेल्या भूखंड गैरव्यवहारांबाबतची चौकशी करण्याकरिता शासनाने तत्कालीन अतिरिक्त सचिव डॉ. डी. के. शंकरन यांची नेमणूक केली होती. या समितीने छाननी केलेल्या 80 प्रकरणांपैकी 52 प्रकरणांमध्ये अनियमितता झाल्याचा निष्कर्ष काढण्यात आला आहे. म्हणून समितीने अशी शिफारस केली आहे की, त्यांच्यावर तातडीने कारवाई करावी. आज सिडको जरी फायद्यात असली तरी फक्त भूखंडाचे दर वाढल्यामुळे हा फायदा दिसतो. त्यांच्या चांगल्या कामामुळे हा फायदा झाल्याचे दिसत नाही असे समितीचे म्हणणे आहे. मी आपल्या अनुमतीने हा अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

सभापती : सार्वजनिक उपक्रम समितीचा सातवा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP/

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना.

सभापती : आज ज्या नियम 93 अन्वये सूचना आलेल्या आहेत त्यामध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री दिलीपराव सोनवणे, वसंतराव खोटरे, जी.एल.अैनापुरे यांनी "6 ते 14 वयोगटातील सर्व मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण असूनही अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित असे वेगवेगळे वर्ग निर्माण केल्यामुळे शासनाच्या विविध योजनांचा लाभ मुलांना न मिळाल्यामुळे त्यांच्या मानसिकतेवर परिणाम होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. शासनाने याबाबत निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, सागर मेघे, जगदीश गुप्ता यानी " बेरोजगार शारीरिक शिक्षकांचे प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये इयत्ता 5 वी ते 7 वी च्या वर्गात नियुक्त करण्याचे आदेश अद्यापही निर्गमित झाले नसल्याने राज्यातील विविध जिल्ह्यातील शिक्षकांनी नागपूर येथील विधान भवनासमोर दि. 5.12.2006 पासून सुरु केलेले आमरण उपोषण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. शासनाने याबाबत निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते व प्रतापराव सोनवणे यांनी "भिवंडी-निजामपूर महानगरपालिका प्रशासनाने शिक्षण मंडळाच्या विविध माध्यमांच्या 75 शाळांमध्ये शिक्षकांची 105 पदे न भरल्याने सुमारे 35,000 विद्यार्थ्यांच्या होत असलेल्या शैक्षणिक नुकसानीबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. शासनाने याबाबत निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील, प्रा. शरद पाटील यांनी "गोंदिया पाटबंधारे विभागाच्या सन 1968 पासून तिरोडा उपविभागामध्ये कार्यरत असणाऱ्या पुरुषोत्तम ज्ञानीराम कापसे यांना विभागाने सेवेत नियमित न केल्याने त्यांनी 8 डिसेंबर, 2006 रोजी कार्यालयासमोर विष प्राशन करुन आत्महत्त्या करणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. शासनाने याबाबत निवेदन करावे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP/

सभापती ....

यानंतर सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी "सन 2002 मधील पात्र असलेल्या पोलीस उपनिरीक्षक पदासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण असलेल्या 517 उमेदवारांना पोलीस उपनिरीक्षक पदावर अद्यापही सामावून न घेणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. शासनाने याबाबत निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी "पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील कार्ला येथील एकवीरा माता देवस्थनातील विश्वस्त सर्वश्री रामचंद्र देशमुख, राजू देशमुख यांनी देवस्थानाच्या अध्यक्षांनी व सचिवांनी दैनंदिन खर्चासाठी स्टेट बँकेच्या कोऱ्या धनादेशावर सह्या करुन सुमारे 7 लाख 70 हजार रुपयांचा केलेला अपहार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. शासनाने याबाबत निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "चंद्रपूर जिल्ह्याच्या सावली तालुक्यातील व व्याहाड येथे दि. 11.12.2006 रोजी झालेल्या जिल्हापरिषद शाळेच्या क्रीडा सम्मेलनात शाळेच्या क्रीडा अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे शाळेच्या 42 विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या भोजनातून विषबाधा झाल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. शासनाने याबाबत निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य प्रा. शरद पाटील, सर्वश्री जयंत प्र. पाटील, कपिल पाटील यांनी "सांगली जिल्हयातील तळेवाडी, ता. आटपाडी येथील सावित्री महादेव कांबळे या इयत्ता 6 वीत शिकणाऱ्या मुलीला सर्पदंश होऊन तेथील रुग्णालयातील डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे तिचा झालेला मृत्यू. या अपघातास जबाबदार असणाऱ्या डॉक्टरांवर कारवाई करण्याची आवश्यकता व कांबळे कुटुंबियांना 1 लाख रुपयांची मदत मिळण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. शासनाने याबाबत निवेदन करावे.

----- यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याच्या मुद्यासंबंधी

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मी एक औचित्याचा मुद्दा मांडू इच्छितो. हा मुद्दा मांडण्यासाठी मी आपली परवानगी घेतलेली होती.

सभापती : आज कोणताही औचित्याचा मुद्दा मी घेणार नाही.

नियम 93 अन्वये निवेदनावरील चर्चेच्या वेळी मंत्री महोदय सभागृहामध्ये हजर नसणे

सभापती : आता नियम 93 अन्वये निवेदने घेण्यात येतील.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, निवेदनावरील उपप्रश्नांना उत्तरे देण्यासाठी संबंधित खात्याचे मंत्री महोदय सभागृहामध्ये हजर नाहीत.सभागृहाची बैठक तहकूब करावी.

सभापती : सदनामध्ये जेव्हा 93ची निवेदने घेतली जातात किंवा अन्य अशा पध्दतीचे कामकाज असते त्याची माहिती संबंधित विभागाला आणि मंत्री महोदयांना आधी उपलब्ध होत असते. आता सभागृहामध्ये संबंधित विभागाचे मंत्री हजर नाहीत. एकूणच हा प्रकार योग्य आहे असे मला वाटत नाही. सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री सभागृहामध्ये हजर आहेत. त्यांनी याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

डॉ. दीपक सावंत : शासनाला काही सिरिअसनेस नाही.

सभापती : मी माझी नापसंती सन्माननीय मंत्री महोदय प्रा. वसंत पुरके यांच्या माध्यमातून शासनाकडे पोहोचविलेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : आदिवासी उपयोजना क्षेत्रातील माध्यमिक शाळांना वेतन व वेतनेतर अनुदान मंजूर न करणे

मु.शी : आदिवासी उपयोजना क्षेत्रातील माध्यमिक शाळांना वेतन व वेतनेतर अनुदान मंजूर न करणे याबाबत श्री. व्ही.यू. डायगव्हाणे, प्रा.बी.टी. देशमुख, सर्वश्री. वसंतराव खोटरे व जी.एल.अैनापुरे, वि.प.स.यांनी दिलेली नियम नियम 93 अन्वये सूचना

प्रा. वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, श्री. व्ही. यू.डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख, सर्वश्री वसंतराव खोटरे व जी.एल.अैनापुरे, वि.प.स. यांनी "आदिवासी उपयोजना क्षेत्रातील माध्यमिक शाळांना वेतन व वेतनेतर अनुदान मंजूर न करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथेसोबतचे निवेदन छापावे.)

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंतराव खोटरे : राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील शाळांना गेल्या दोन वर्षामध्ये टप्प्या-टप्प्याने अनुदान मिळालेले आहे. आदिवासी आणि बिगर आदिवासी शाळांच्या आणि तुकड्यांच्या संदर्भात जी.आर. निघालेला आहे. आदिवासी भागातील अनेक तुकड्यांना अनुदान मिळालेले आहे. अमरावती विभागातील मेळघाट आणि यवतमाळ जिल्हयातील ज्या 6 आदिवासी शाळा आहेत त्या निकषाप्रमाणे पात्र ठरलेल्या असून केवळ या 6 शाळांनाच अनुदान मिळालेले आहे. बाकीच्या शाळांना अनुदान मिळालेले नाही. डिसेंबर ते जानेवारी अशा तीन महिन्यांचे आणि जुलै ते जानेवारी अशा 7 महिन्याचे थकीत वेतन मिळालेले नाही. हे वेतन किती दिवसात मिळेल ?

प्रा. वसंत पुरके : आदिवासी भागातील माध्यमिक शाळा आणि तुकडयांसाठी जी थकबाकी देण्याची गरज होती त्यासाठी कालच्या पुरवणी माण्यामध्ये 13.66 कोटीची तरतूद केलेली असून आवश्यक निधी निश्चितच वितरित केला जाईल.

श्री. वसंतराव खोटरे : अमरावती विभागातील केवळ 6 शाळांनाच अनुदान मिळालेले आहे. बाकीच्या शाळांना अनुदान मिळालेले नाही.

प्रा. वसंत पुरके : त्याची देखील मी दखल घेतो.

श्री. रामनाथ मोते : शाळांना आणि तुकड्यांना अनुदान मिळण्यासंबंधीचा हा प्रश्न आहे. 5 वी ते 7वीचे वर्ग माध्यमिक शाळांना जोडलेले आहेत. साधारणत: 5वीची तुकडी 20 टक्के अनुदानावर आली की 6वी आणि 7वीच्या तुकड्यांना अनुदान मिळत नाही. 5वीची तुकडी 40 टक्क्यावर आली की 6वीच्या तुकडीला 20 टक्के अनुदान मिळते आणि 7वीच्या तुकडीला काहीही अनुदान मिळत नाही. 5वीची तुकडी 40 टक्के अनुदावर आली की 6वीच्या तुकडीला 40 टक्के आणि 7वीच्या तुकडीला 20 टक्के अनुदान मिळते. याप्रमाणे अनुदान देण्याचे शासनाचे धोरण आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

अशा परिस्थितीतही रायगड जिल्हा किंवा मराठवाड्यातील अनेक तुकडयांना 2003-04 पाचवीच्या वर्गाना मान्यता दिली. सहावी व सातवीच्या वर्गांना अनुदान अद्याप दिलेले नाही. ते अनुदान शासन देईल का?

प्रा.वसंत पुरके : या पर्टिक्युलर शाळांचे मी स्वत: निवेदन घेईन. त्याच्या अनुदानासाठी निश्चित तरतूद करु.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, चार हजार तुकडयांना मागील वेळी अनुदान दिले. शिक्षण उपसंचालक आणि शिक्षणाधिकारी यांच्या दुर्लक्षितेमुळे अमरावती विभागातील 250 तुकडया अनुदानापासून वंचित राहिल्या. त्यांना ताबडतोब अनुदान दिले जाईल का आणि शासन निर्णय काढण्यात येईल काय?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, काही शाळा आणि काही तुकडया अनुदानास पात्र ठरण्याच्या बेतात असताना देखील जाणीवपूर्वक प्रस्ताव आले नसतील तर मी अधिकाऱ्यांना बोलावून त्या 250 तुकडयांची माहिती घेईन.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : शाळा हस्तांतरण होऊनही कर्मचाऱ्यांना सेवेत न घेणे.

मु. शी. : शाळा हस्तांतरण होऊनही कर्मचाऱ्यांना सेवेत न घेणे याबाबत सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, प्रतापराव सोनवणे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा.वसंत पुरके (शालेय शिक्षणमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, प्रतापराव सोनावणे यांनी "शाळा हस्तांतरण होऊनही कर्मचाऱ्यांना सेवेत न घेणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, शाळेच्या हस्तांतरणाचा प्रश्न आहे. एका संस्थेने आपली शाळा दुसऱ्या संस्थेला हस्तांतरित केली आहे. हस्तांतरण करताना साधारणत: जी संस्था आपली शाळा हस्तांतरित करते त्या शाळेमध्ये काम करणाऱ्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसह हस्तांतरित व्हावयास हवी. हस्तांतर करताना जे कर्मचारी सेवेत होते, त्यांना तेथील शाळेत न घेता नवीन संस्थेने नवीन कर्मचारी हस्तांतरिताच्या यादीमध्ये दाखविले आणि ज्या संस्थेने शाळा हस्तांतरित केली त्या संस्थेने कर्मचाऱ्यांची यादी दिली होती. ती मात्र यादी वगळण्यात आली आहे. शिक्षणाधिकाऱ्यांचा सुध्दा चुकीचा अहवाल आलेला आहे. तातडीने या संदर्भात चौकशी करुन मंत्रीमहोदय निर्णय घेतील काय?जे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी हस्तांतरणापूर्वी सेवेत होते, त्यांचे रेकॉर्ड उपलब्ध आहे, परीक्षेचे पेपर्स उपलब्ध आहेत त्या सगळयांची माहिती घेऊन त्या सर्व कर्मचाऱ्यांना संरक्षण देणार आहात काय?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, दिनांक 3 एप्रिल, 2001 व 10 एप्रिल, 2001 ची ही बाब आहे. हस्तांतरण करणाऱ्या आणि हस्तांतर करुन घेणाऱ्या दोन्ही संस्थांची सुनावणी झाली, दोघांच्या संमतीने हस्तांतरण झाले. सन्माननीय सदस्य म्हणतात त्या सर्व 10 कर्मचाऱ्यांना सामावून घेतले आहे. ज्यावेळी हे हस्तांतर संस्थेने केले त्यावेळी या कर्मचारी पदांना मान्यता नव्हती म्हणून ते राहिले. जाणीवपूर्वक कोणावर अन्याय होणार नाही. त्यावेळी मान्यता दिली असेल तर त्यांना निश्चित सामावून घेतले जाईल.

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, शिक्षणाधिकाऱ्यांनी ती शाळा नवीन संस्थेला हस्तांतरित करीत असताना कर्मचाऱ्यांची यादी तपासून मान्यता दिली का?

प्रा.वसंत पुरके : दोन्ही संस्था चालकांच्या संमतीने ही शाळा हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरु झाली. ज्या पदांना मान्यता होती ती जी यादी होती, त्या सगळयांना सामावून घेतले आहे.

श्री.रामनाथ मोते : चुकीची माहिती दिली जात आहे. उत्तर दिले की, हस्तांतर करताना जे नवीन कर्मचारी तेथे दाखविले आहेत त्यांना सुध्दा मान्यता नव्हती. जे प्रत्यक्ष काम करीत होते त्यांना सुध्दा मान्यता नव्हती. दोन्ही संस्थांनी जे कर्मचारी दाखविले त्यापैकी कोणत्याही पदाला मान्यता नव्हती. कारण शाळा विनाअनुदानित होती. संस्थेच्या अध्यक्षांनी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केली आहे. जी यादी दिली होती त्या कर्मचाऱ्यांना डावलून अन्य कर्मचाऱ्यांना घुसविण्यात आले आहे. याची तातडीने दखल घ्यावी. मंत्रीमहोदय, विसंगत उत्तर देत आहेत.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके : सरळ उत्तर देण्याचा माझा मानस आहे. कर्मचाऱ्यांवर अन्याय झाला असे वाटत असेल तर मी स्वत: सुनावणी लावतो आणि दोन्ही लोकांना बोलावतो व योग्य तो न्याय देतो.

(नंतर श्री.जुन्नरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जी.एल.अैनापुरे : सभापती महोदय, शाळा हस्तांतरीत करण्याचा नवीन उद्योग आता महाराष्ट्रात सुरु झालेला आहे. सातारा जिल्हयातील औंध तालुक्यातील शाळा दुध संघाच्या एका संचालकाने विकत घेतलेली आहे. या शाळेमध्ये जे शिक्षक आहेत त्यांना मात्र त्या गावात रहाण्यास घर मिळू दिले जात नाही, त्यांना गावात येऊ दिले जात नाही. अशा रितीने या शिक्षकांनी त्या शाळेत हजर होऊच नये यासाठी तो सर्वकाही प्रयत्न करीत आहे. शिक्षक शाळेत हजर होत नाही म्हणून या संचालकाने नोटीस देखील काढलेल्या आहेत. अशाच रितीने हा संचालक अजून 3-4 शाळा विकत घेण्याच्या भानगडीत आहे. तसेच या संचालकाने असा उद्योग सुरु केला आहे की, सातारा, सांगली तालुक्यातील काही शाळा विकत घेत असून तो कोकणातील शाळा देखील विकत घेत आहे. सांगली, सातारा येथील शिक्षक कोकणात जाऊ नये यासाठी हा संचालक त्रास देत आहे. या प्रकरणामध्ये शिक्षण अधिकारी आणि डेप्युटी डायरेक्टर यांचे हात गुंतलेले आहेत त्यामुळे या प्रकरणाच्या संदर्भात आपण काही बंदी घालणार आहात काय?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, कधी कधी शिक्षकांच्या त्रासामुळे हा संचालक कंटाळला असावा. अनेक प्रकारच्या सम्राटांना माझी विनंती आहे की, त्यांनी असे प्रकार करु नये. आता मी शाळा हस्तांतरांच्या संदर्भात नवीन धोरण ठरविणार असून या धोरणात ठराविक अंतरावर शाळा हस्तांतरीत होणार नाही याची दखल घेतली जाणार आहे.

सभापती : 93 च्या निवेदनावर जास्तीत जास्त दोन उपप्रश्न विचारले जात असतात परंतु मी आज 5 उप प्रश्न विचारण्याची संधी सन्माननीय सदस्यांना दिलेली असतांना सुध्दा सदस्यांचे समाधान झालेले दिसत नाही.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, मला यासंदर्भात केवळ एकच प्रश्न विचारावयाचा आहे. माननीय शिक्षण मंत्र्यांनी 15 दिवसात शिक्षण अधिकारी, गट शिक्षण अधिकारी आणि दोन्ही संस्थेचे पदाधिकारी यांच्याबरोबर बैठक आयोजित करुन न्याय दिला जाईल काय?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, बैठक कधी घ्यावयाची यासंदर्भात थोडे मागे पुढे होईल. परंतु योग्यवेळी संबंधितांना बोलाविण्यात येईल.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. :जळगाव जिल्हयातील भुसावळ नगरपालिकेच्या विशेष सभेत हरकत नोंदविण्याच्या कारणावरुन झालेली दंगल.

मु. शी. : जळगाव जिल्हयातील भुसावळ नगरपालिकेच्या विशेष सभेत हरकत नोंदविण्याच्या कारणावरुन झालेली दंगल याबाबत सर्वश्री गुरुमुख जागवानी, नितीन गडकरी, प्रतापराव सोनवणे व विनोद तावडे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री गुरुमुख जागवानी, नितीन गडकरी, प्रतापराव सोनवणे व विनोद तावडे, यांनी "जळगाव जिल्हयातील भुसावळ नगरपालिकेच्या विशेष सभेत हरकत नोंदविण्याच्या कारणावरुन झालेली दंगल." या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुमुख जागवानी : सभापति महोदय, मैं आपके माध्यम से सभागृह को बताना चाहता हूँ कि यह बहुत ही गंभीर मामला है. ऐसा लगता है कि भुसावल शहर महाराष्ट्र का नहीं, बल्कि बिहार का हिस्सा है. ऐसा मालूम होता है कि वहां पर पुलिस का कोई कानून ही नहीं है. भुसावल नगरपालिका की बैठक बुलाई गई थी. जब यह बैठक समाप्त हो गई तो उसके बाद राष्ट्रवादी कॉंग्रेस के लोगों ने स्पेशल मीटिंग बुलाई. इस बैठक में नगराध्यक्ष उपस्थित नहीं थे, फिर भी मीटिंग ली गई. इस मीटिंग में दूसरी पार्टी के नगरसेवकों के साथ मारहाण की गई. इसके बाद में आमदार संतोष चौधरी के घर पर और शहर में दूसरे स्थानों पर तोड़-फोड़ की गई. मैं पूछना चाहता हूँ कि इनके ऊपर कितने केस हैं. मेरी सरकार से एक ही मांग है कि क्या इस पूरे मामले की ज्युडिशियल इन्क्वायरी की जाएगी ?

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी झाली पाहिजे असा प्रश्न उपस्थित केला. मी त्यांना सांगू इच्छितो की, हे प्रकरण न्यायालयातच जाणार आहे. तेव्हा न्यायालयीन चौकशीची गरज नाही. सन्माननीय सदस्यांच्या तीव्र भावना लक्षात घेता या प्रकरणात उच्च स्तरीय, आय.जी.लेव्हलवर चौकशी करण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, हे प्रकरण न्यायालयात जाणार आहे, तेव्हा न्यायायलीन चौकशीची गरज नाही असे मंत्रिमहोदयांनी सांगितले. त्यांचे हे उत्तर बरोबर नाही. सभापती महोदय, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कारभार हा लोकशाहीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा विषय आहे. तेव्हा मंत्रिमहोदयांनी राजकीय दृष्टीकोनातून विचार करु नये. नगरपालिकांचा कारभार लोकशाहीच्या पवित्र भूमिकेतून चालावा असे आपणास वाटत असेल तर या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी झाली पाहिजे. यामध्ये कोणत्या पक्षाचे उमेदवार आहेत याचा विचार न करता नि:पक्षपातीपणे चौकशी झाली पाहिजे. ज्यांना तडीपार करण्यात आले होते, त्यांचे तडीपार रद्द करण्यात आलेले आहे. नगरपालिकच्या सभेत जर असे प्रकार होत असतील तर आपण लोकशाहीचे संरक्षण केले पाहिजे. या प्रश्नाच्या अनुषंगाने मी पुन: मागणी करीत आहे की, या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करण्यात यावी. जेणेकरुन यातील वास्तव लोकांपुढे येईल. सभापती महोदय, निवेदनात म्हटले आहे की, या प्रकरणात काही व्यक्तींना अटक करण्यात आलेली आहे. माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, ज्या व्यक्तींना तडीपाराची नोटीस दिली होती ती रद्द का करण्यात आली ? त्याची कारणे काय आहेत ? हा सर्व प्रकार पूर्वनियोजित होता, तेव्हा या प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करण्यात येईल काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, तडीपार रद्द का करण्यात आले आणि त्याचे कारण काय असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला. एखाद्या व्यक्तीला तडीपार करायचे किंवा कसे हे ठरविण्यासाठी एक कमिटी आहे. ती कमिटी निर्णय घेते. त्यामुळे कोणत्या कारणांमुळे तडीपार रद्द करण्यात आला याची माहिती आम्हाला नाही. ती माहिती पटलावर ठेवण्यात येईल. दुसरे असे की, या प्रकरणाची चौकशी करण्यास शासन सक्षम आहे. मी सुरुवातीलास सांगितले की, या प्रकरणाची आय.जी.लेव्हला चौकशी केली जाईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, ज्या 157 गाड्यांवर नंबर प्लेट नव्हत्या. त्यावर फक्त अे.सी. अनिल चौधरी, संतोष चौधरी असे लिहिले होते. त्यांच्यावर आतापर्यंत किती गुन्हे दाखल झालेले आहेत व ते कोणत्या कलमाखाली दाखल झालेले आहेत ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, 157 गाड्यांवर नंबर प्लेट नव्हत्या, फक्त अेसी आणि नाव लिहिले होते. याबाबत चौकशी करण्यात येईल. जर बोगस गाड्या वापरण्यात आल्या असतील तर संबंधितांवर कारवाई करण्यात येईल. श्री.संतोष चौधरी यांच्यावर किती व कोणत्या कलमाखाली गुन्हे दाखल झालेले आहेत याची माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. ती पटलावर ठेवण्यात येईल.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

सभापती :मी मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, आपण ज्यावेळी एखादे निवेदन वितरीत करतो तेव्हा त्या संबंधातील पूरक बाबीची माहिती स्वत:जवळ उपलब्ध असणे गरजेचे आहे. एखादी माहिती नसेल तर ती पटलावर ठेवणे समजू शकतो.

यानंतर श्री.पुरी...

अशुध्दीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

सभापती....

मला असे वाटते की, माननीय मंत्रिमहोदयांकडे माहिती उपलब्ध नसेल तर हे निवेदन आपण राखून ठेऊ व उद्या किंवा परवा यासंबधी परत निवेदन करावे, असे मी निदेश देतो.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, ठीक आहे.

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : कु.अंबिका आसाराम डुकरे या महाविद्यालयीन विद्यार्थीनीचा बलात्कार करुन निघृण हत्या होणे

मु. शी. : कु.अंबिका आसाराम डुकरे या महाविद्यालयीन विद्यार्थीनीचा बलात्कार करुन निघृण हत्या होणे यासंबंधी सर्वश्री यशवंतराव गडाख, संजय दत्त,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. यशवंतराव गडाख (अहमदनगर प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मौजे रस्तापूर, ता. नेवासे, जि. अहमदनगर या गांवी दिनांक १ सप्टेंबर, २००६ रोजी कु.अंबिका आसाराम डुकरे या महाविद्यालयीन विद्यार्थीनीचा बलात्कार करुन निघृण हत्या होणे, पोलीसांच्या सदोष व कुचकामी तपास यंत्रणेमुळे आरोपीचा तपास न लागणे, जनतेकडून गावोगावी बंद पाळला जाणे, शाळा बंद ठेवणे, रास्ता रोको केला जाणे, या घटनेमुळे जनतेचा मोठा प्रक्षोभ होणे, सोनई पोलीस स्टेशनवर आरोपींना तात्काळ अटक करावे या मागणीकरीता मोठा जनसमुदाय जाणे, जमावाला शांततेचे आवाहन करणाऱ्या १३ प्रमुख कार्यकर्त्यांवर पोलीसांनी गुन्हे दाखल करणे, हे सर्व घडूनही अद्याप आरोपीला अटक न होणे, या सर्व घटनांमुळे सर्व सामान्य जनतेत पसरलेली असुरक्षिततेची भावना, महिला व मुलींमध्ये पसरलेले भीतीचे वातावरण या सर्व बाबींवर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.यशवंतराव गडाख : सभापती महोदय, माननीय गृह राज्यमंत्र्यांना उत्तरामध्ये काही दुरुस्ती करावयाची आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, नाही.

श्री.यशवंतराव गडाख : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांना उत्तरामध्ये काही दुरुस्ती करावयाची नाही, असे त्यांनी आत्ताच सांगितले. परंतु याठिकाणी लेखी उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "संशयीत आरोपीने जबरी संभोग करुन खून केल्याचे तपासात निष्पन्न झाले," त्यानंतर त्या भागामध्ये उद्रेक होऊन रास्तारोको करण्यात आला व बंद पाळण्यात आला. परंतु निवेदनात पुढे असे म्हटले आहे की, "सदर घटनेमुळे रास्तारोको करण्यात आलेला नाही व बंद देखील पाळण्यात आलेला नाही. सदर घटनेतील आरोपी अटक करण्यासाठी येत असलेल्या कारवाईमुळे जनतेत प्रक्षोभ नाही. तसेच मोर्चाला शांत करणा-या व आरोपीच्या अटकेची मागणी करणा-या कोणत्याही इसमाविरुध्द पोलिसांनी गुन्हा दाखल केलेला नाही." सभापती महोदय, मी ज्या गावामध्ये राहतो त्याच्या बाजूच्या रस्तापूर येथे ही घटना घडली. त्याठिकाणच्या सोनई पोलीस स्टेशनवर मोर्चा आलेला आहे. परंतु याठिकाणी जर अशा पध्दतीची असत्य उत्तरे देण्यात येत असतील तर या सर्वाच्च सभागृहाचा अवमान व या सभागृहाची चेष्टा करण्याचा प्रयत्न माननीय मंत्रिमहोदय करत आहेत, त्यामुळे त्यांना आपण समज देण्याची गरज आहे. तसेच, माननीय मंत्रिमहोदयांना ज्या अधिकाऱ्यांनी अशाप्रकारची खोटी माहिती दिली, त्यांच्यावरही माननीय मंत्रिमहोदयांनी कारवाई केली पाहिजे. घटना घडल्यानंतर लोकसत्ता, सकाळ, लोकमत, सार्वमत, पुढारी, प्रभात या वृत्तपत्रांमध्ये या घटनेविषयी बातम्या छापून आलेल्या आहेत. ही सर्व वृत्तपत्रांची कात्रणे मी आपल्याकडे पाठवतो. कु.अंबिका डुकरेच्या घटनेबाबत अशा बातम्या आल्या की, "साडी-चोळीचा आहेर देत पोलीस ठाण्यास टाळे ठोकले", चांदा परिसरातील 7 गावांमध्ये बंद, ग्रामस्थांचा सोनई पोलीस ठाण्याला टाळे ठोकण्याचा इशारा," "आरोपीच्या अटकेसाठी मुलांनी केले "शाळा बंद" आंदोलन," "अंबिकाच्या आईचे मुलांसह स्थलांतर", "रस्तापूर माणुसकीत हरले", "जिल्हाधिकारी कचेरीस कुलूप ठोकणार, मराठा महासंघाचा इशारा," "अंबिका खून तपासात दिरंगाई कलेक्टर कचेरीस टाळे ठोकणार" या सदराखाली बातम्या छापून आलेल्या आहेत. आज

..4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.यशवंतराव गडाख...

त्या गावातील अंबिकाची आई ते गाव सोडून गेलेली आहे. त्यामुळे अशाप्रकारची असत्य उत्तरे जर सभागृहात येत असतील तर त्या घटनेचा मी तीव्र निषेध व्यक्त करतो. कु.अंबिका डुकरे ही 12 वीमध्ये शिक्षण घेत होती. तिच्या साखरपुडयाचा कार्यक्रम असल्यामुळे ती गावामध्ये आली होती. अशावेळी तिच्यावर आरोपीने बलात्कार करुन तिची निघृण हत्या केली. त्यानंतर आरोपी सापडत नाही म्हणून संपूर्ण तालुक्यामध्ये बंद पाळण्यात आला. शाळांतील मुलांनी मोर्चा काढला. हा आरोपी गेल्या 5-6 महिन्यांपासून त्या गावात राहत नव्हता, तो पॅरोलवर सुटलेला आरोपी आहे. पोलिसांना तो गेल्या तीन वर्षापासून सापडत नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. त्याने रस्तापूरमध्ये अशाच दोन-तीन घटना केलेल्या असून त्याठिकाणी त्याने महिलांची छेडछाडही काढलेली आहे. त्याविरुध्द त्या गावातील लोकांनी तेथील पोलीस स्टेशनचे पी.एस.आय., श्री.इनामदार यांच्याकडे तक्रार केली. परंतु त्या पी.एस.आय.ने आरोपीला त्याच्याविरुध्द तक्रार आल्याची माहिती देऊन त्याच्याकडून पैसे घेऊन त्याला सोडून दिले. त्यानंतर अंबिकाची घटना घडली. याबाबतीत त्या भागात मोर्चा काढण्यात आला, त्याठिकाणी जे 20-25 संमजस कार्यकर्ते होते, त्यांनी त्या मोर्चाला शांत केले.

नंतर श्री.रोझेकर...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.यशवंतराव गडाख.....

त्या ठिकाणी मी स्वत: गेलो होतो. ज्या 17 लोकांवर आरोपपत्र दाखल केले त्यामध्ये 50, 60 वर्षाचे लोक आहेत. त्यामध्ये 4 महिलाही आहेत, त्यातील एका महिलेचे वय 70 वर्षाचे आहे. केवळ गुन्हे दाखल करण्यासाठी म्हणून हे केलेले आहे. अशा पध्दतीने जमावाला शांत करणा-या लोकांवर गुन्हे दाखल करणे, आरोपीचा तपास न लागणे याबाबत मी मंत्रीमहोदयांना विचारु इच्छितो की, ज्या पी.एस.आय.ने दुर्लक्ष केले आणि त्यामध्ये निष्पाप बालिकेचा बळी गेला त्या पी.एस.आय.ला निलंबित करणार काय ? ज्यांनी मोर्चाला शांत करण्याचा प्रयत्न केला अन्यथा पोलीस स्टेशन जळाले असते अशा लोकांवर दाखल केलेले गुन्हे मागे घेणार काय ? तसेच, अंबिका डुकरे हीची आई रोजगार हमी योजनेवर काम करते, विधवा आहे, तिला शासन 1 लाख रुपयांची मदत करणार आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी पी.एस.आय.ला निलंबित करण्याविषयी विचारणा केलेली आहे. या प्रकरणाची उच्चस्तरीय अधिका-याकडून चौकशी करण्यात येईल व जे दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

(काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

सभापती : सदनाचे ज्येष्ठ सदस्य, श्री.यशवंतराव गडाख यांनी या निवेदनावर ज्या पध्दतीने भावना मांडल्या त्या लक्षात घेता पॅरोलवर सुटलेला अत्यंत बेफाम, गुंड प्रवृत्तीचा मनुष्य यापूर्वी सुध्दा काही गुन्हयांमध्ये असतांना आणि एका अत्यंत सज्जन तरुण मुलीवर अघोरी कृत्य केल्यानंतर सुध्दा अशा पध्दतीने वावरत असतांना जी प्रतिक्रिया आली त्यानुसार महाविद्यालयातील व शाळेतील विद्यार्थ्यांनी बंद पाळला, निषेध व्यक्त केला. परंतु, निवेदनात असे म्हटले आहे की, अशा पध्दतीने झालेले दिसत नाही. माननीय राज्यमंत्र्यांना माझी विनंती आहे की, याबाबत तुम्ही सखोल चौकशी करावी. माननीय महसूल मंत्र्यांना काही सांगावयाचे आहे त्यांना मी अनुमती देतो.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, सदनाचे ज्येष्ठ सदस्य, श्री.यशवंतराव गडाख यांनी अतिशय महत्वाचे प्रश्न या ठिकाणी उपस्थित केले आहेत. त्यांनी सुरुवातीला प्रश्न विचारीत असतांना या निवेदनामध्ये काही त्रुटी आहेत किंवा संबंधित इसमाविरुध्द जी कारवाई व्हावयास हवी होती ती या निवेदनात झालेली दिसत नाही, असे लक्षात आणून दिलेले आहे. या प्रश्नासंबंधी

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे.....

सभागृहाच्या भावना अतिशय तीव्र आहेत. ही बाब लक्षात घेता व आपणही आता जी माहिती सदनासमोर ठेवली आहे त्या भावना लक्षात घेता अधिकची माहिती घेऊन यासंबंधी योग्य ती कारवाई निवेदनात अंतर्भूत होईल याची काळजी घेऊन हे निवेदन मागे घेण्याची परवानगी आपण द्यावी. याच आठवडयात संपूर्ण माहितीसह पुन्हा निवेदन करण्यात येईल.

श्री.यशवंतराव गडाख : सभापती महोदय, मागच्या आठवडयात या विषयावर लक्षवेधी सूचना मांडण्यात आली होती. त्यावेळी सुध्दा संबंधित खात्याकडे माहिती नव्हती. यामध्ये आता आणखी माहिती येण्याचे काही कारण नाही. आरोपीने गुन्हा केलेला आहे हे सिध्द झालेले आहे व तसे निवेदनातच म्हटले आहे.

सभापती : या निवेदनात जे म्हटले आहे की, मोर्चा निघाला नाही. परंतु, ही वस्तुस्थिती निवेदनात येणे महत्वाचे आहे.

श्री.यशवंतराव गडाख : सभापती महोदय, मोर्चा निघाला किंवा नाही वगैरे मुद्दे आता गौण आहेत. मी केवळ ते निदर्शनास यावेत म्हणून सांगितले आहे. महत्वाचा प्रश्न असा आहे की, संबंधित पी.एस.आय.ला निलंबित करणार काय ? निष्पाप लोकांवर जे गुन्हे दाखल केले आहेत ते मागे घेणार काय ? तसेच, त्या मुलीच्या आईला शासन आर्थिक मदत करणार की नाही ? याबाबत शासनाने खुलासा करावा.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, अधिका-याला निलंबित करण्याचा प्रश्न आहे व मृत मुलीच्या आईला मदत करण्याचा प्रश्न आहे. सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाख यांनी उपस्थित केलेले तिन्ही प्रश्न महत्वाचे आहेत. त्यासाठी जी चौकशी करणे आवश्यक आहे ती चौकशी एका दिवसामध्ये पूर्ण करुन परवा हे सुधारित निवेदन पुन्हा सदनाला सादर करण्यात येईल व तशी परवानगी आपण द्यावी, अशी मी आपल्याला विनंती करतो. सन्माननीय सदस्यांना व सभागृहाला अभिप्रेत असलेली कारवाई व्हावयास हवी म्हणूनच मी अशी विनंती करतो आहे.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाख यांनी तीन प्रश्न उपस्थित केलेले आहेत. कु.अंबिका डुकरे हिच्यावर बलात्कार करुन हत्या करण्यापूर्वी आरोपीने स्त्रियांची छेडछाड केली होती व ज्या आरोपीवर पूर्वी गुन्हे दाखल होते तो आरोपी आता फरार आहे, पॅरोलवर सुटलेला आहे. यासंदर्भात सोनई गावातील लोक पोलीस चौकीवर तक्रार करण्यास गेले असतांना त्याची दखल घेण्यात आली नाही. सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाख यांनी सांगितले की, आरोपीकडून पैसे घेण्यात आले व त्याला अटक करण्यात आली नाही. त्यामुळे ही अतिशय दुर्दैवी घटना घडलेली आहे. संबंधित अधिका-याला निलंबित करण्यासाठी हे सबळ कारण आहे, असे मला वाटते. घटनेची इतर चौकशी आपण नंतर करा. परंतु संबंधित पी.एस.आय.ला प्रथम निलंबित करावे, अशी माझी विनंती आहे.

सभापती : माननीय महसूल मंत्र्यांनी याबाबत आताच निवेदन केले आहे. एकंदरीत ही अत्यंत गंभीर घटना आहे. खरे म्हटले तर ही समाजाला काळीमा फासणारी घटना आहे एवढेच नव्हे तर ठरवून केलेली घटना आहे. ज्याने बदमाशी केली तो अद्याप पोलिसांना सापडलेला नाही. त्यामुळे सन्माननीय महसूल मंत्र्यांचे असे म्हणणे आहे की, या प्रकरणातील सर्व बाबी विचारात घेऊन परिपूर्ण निवेदन आजच्या ऐवजी 14 तारखेला केले तर यासंदर्भातील सन्माननीय सदस्यांना अभिप्रेत असलेली कारवाई होऊ शकेल.

श्री.यशवंतराव गडाख : सभापती महोदय, दिनांक 14 व 15 तारखेला मी सभागृहामध्ये उपस्थित राहू शकणार नाही. त्यामुळे माझी माननीय महसूल मंत्र्यांना, गृह राज्यमंत्र्यांना आणि आपल्याला अशी विनंती आहे की, त्या गावातील लोकांनी घटना समक्ष बघितलेली आहे व मी ही सर्व माहिती स्वत: घेतलेली आहे. असे असतांना सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या माहितीवर सरकारचा विश्वास नसेल तर हे खेदजनक आहे.

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सभागृहामध्ये दिलेली माहिती सत्य समजण्यात येते, अशी सभागृहाची प्रथा आहे.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाख यांनी त्या गावातील वस्तुस्थिती सभागृहाच्या नजरेस आणून दिलेली आहे. सभागृहाची अशी परंपरा आहे की, एखाद्या सन्माननीय सदस्याने सभागृहाला माहिती दिली असेल तर ती ग्राहय धरुन आपण निर्णय घेत असतो. घटनेचे गंभीर स्वरुप पाहता संबंधित पोलीस अधिका-याला निलंबित करण्यात येईल. तसेच, ज्या केसेस दाखल केल्या आहेत त्या काढण्यासंबंधी शासन निर्णय घेईल. दुर्दैवी अंत झालेल्या कु.अंबिका डुकरे हिच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री निधीतून मदत करण्यात येईल.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाअंतर्गत असलेली सर्व प्रकरणे विभागीय आयुक्तांकडे वर्ग करण्याचा घेतलेला निर्णय.

मु. शी. : महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाअंतर्गत असलेली सर्व प्रकरणे विभागीय आयुक्तांकडे वर्ग करण्याचा घेतलेला निर्णय यासंबंधी सर्वश्री जितेंद्र आव्हाड, राजेंद्र जैन, लक्ष्मण जगताप, जोगेंद्र कवाडे, श्रीमती फौजीया खान, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री जगन्नाथ शेवाळे, सदाशिवराव पोळ, वसंतराव चव्हाण, वसंत पवार, रणजितसिंह मोहिते-पाटील, भास्कर जाधव, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.जितेंद्र आव्हाड (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"शासनाने महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण बंद करुन या न्यायाधिकरणाअंतर्गत असलेली सर्व प्रकरणे संबंधित विभागीय आयुक्तांकडे सुनावणीसाठी वर्ग करण्याचा घटनाबाह्य घेतलेला निर्णय, सदर न्यायाधिकरणाच्या कक्षेत कूळ कायदा, आदिवासी कायदा, शेतजमीन विषयी सिलींग कायदा, खाजगी वने कायदा, इ. सर्वसामान्यांच्या निगडीत प्रश्नांवर मागील अनेक वर्षापासून निर्णय घेण्यात आलेले नसल्याने, यासंदर्भातील ठप्प असलेले कामकाज, सदर न्यायाधिकरण पुर्ववत सुरु करण्याची होत असलेली मागणी, न्यायाधिकरण सुरु करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील गोरगरीब शेतकरी, आदिवासी यांच्यावर होत असलेला अन्याय, त्यांच्यामध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, प्रशासकीय दृष्ट्या विभागीय आयुक्तांच्या कामाचा प्रचंड व्याप लक्षात घेता, सदर न्यायालयीन कामांकडे लक्ष देणे अशक्य होणार असल्याने व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या संगनमताने सर्वसामान्यांच्या हिताच्या विरोधात बेकायदेशीर निर्णय घेतले जाण्याची शक्यता लक्षात घेता, यासंदर्भात लवकरात लवकर निर्णय घेण्याची अत्यावश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती / उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

यानंतर श्री.सुंबरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(लक्षवेधी सूचनेवरील माननीय महसूल मंत्र्यांच्या निवेदनानंतर ...)

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, हा अतिशय महत्त्वाचा विषय मी आपल्या माध्यमातून या सभागृहापुढे आणला आहे. जवळ जवळ पाच वर्षे झाली आहेत हे एमआरटीएस म्हणजे महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण बंद आहे आणि शासनाने विभागीय आयुक्तांकडे हा अधिकार देण्याचा प्रयत्न केला त्याला हायकोर्टाने स्थगिती दिली आहे. गेली पाच वर्षे हे न्यायाधिकरण बंद असताना जवळपास 5 लाख खटले आज विविधी जिल्ह्यांतून तुंबून पडलेले आहेत. त्यामुळे प्रचंड आर्थिक ओढाताण किंवा शेतकऱ्यांवर प्रचंड दबाव आलेला आहे, येतो आहे. अनेक प्रयत्न करूनही हे न्यायालय नाही, अधिकार नाही आणि त्यामुळे न्यायही मिळत नाही अशी परिस्थिती शेतकऱ्यापुढे निर्माण झालेली आहे. आता या ठिकाणी केलेल्या निवेदनामध्ये आपण म्हटले आहे की, यासाठी 2 कोटी रूपये खर्च येतो. तेव्हा 2 कोटी रूपये महत्त्वाचे आहे का ? या ठिकाणी त्यामुळे कायदा श्रेष्ठ की माणूस श्रेष्ठ हा निर्णय शासनाला घ्यायचा आहे. आज यामुळे ज्या अडचणींना शेतकरी सामोरा जातो आहे ती परिस्थिती लक्षात घेता हे न्यायाधिकरण आपण पुन्हा सुरू करणार आहात का ? नसेल तर नवीन प्राधिकरणाची निर्मिती करून नवे अधिकारी नेमून वा अन्य अधिकाऱ्याकडे हे काम सोपविणार आहात काय ? जे काही करणार असाल तर त्या सगळया प्रक्रिया किती महिन्यात आपण पूर्ण करणार आहात ?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, यामुळे लाखोंनी केसेस प्रलंबित आहेत अशी जी माहिती सन्माननीय सदस्यांनी दिली आहे तशी वस्तुस्थिती नाही, तर 6031 केसेस प्रलंबित आहेत. परंतु शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा प्रश्न असल्याने महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण हे जे बंद केले आहे ते पुन्हा चालू करण्याचा निर्णय एक महिन्यात घेण्यात येईल.

***

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : शासकीय रूग्णालय,रत्नागिरी येथे डॉक्टर्स नसणे.

मु.शी. : शासकीय रूग्णालय,रत्नागिरी येथे डॉक्टर्स नसणे यासंबंधी सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, मधुकर चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : अध्यक्ष महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

" दिवसेंदिवस उद्भवणाऱ्या साथीच्या रोगांनी राज्यातील जनता विशेष करून रत्नागिरी जिल्ह्यातील जनता बेजार होणे, त्यातच जिल्हा शासकीय रूग्णालय, रत्नागिरी येथे डॉक्टर्स उपलब्ध नसणे, शासनामार्फत डॉक्टरांच्या नेमणुका न करणे, रूग्णालयामध्ये अत्याधुनिक मशिनरी उपलब्ध असूनही केवळ तज्ज्ञ डॉक्टर नसल्याने मशिनरी धूळ खात पडून असणे, या सर्व बाबींमुळे जनतेत पसरलेले चिंतेचे व असंतोषाचे वातावरण, यावर शासनाने करावयाची उपाय योजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.रणजित कांबळे (आरोग्य राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..... एनएन 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(लक्षवेधी सुचनेवरील मा. आरोग्य राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर ...)

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, रत्नागिरी जिल्ह्यातील आरोग्यासंबंधात मी आपले लक्ष वेधू इच्छितो. या ठिकाणी गेल्या आठवड्यामध्येच या संबंधात चर्चा काही प्रमाणात झाली आहे आणि त्यातूनही कोकणातील आरोग्यासंबंधात हे शासन कसे उदासीन आहे, शासनाचे त्याकडे कसे दुर्लक्ष आहे हा गंभीर विषय या ठिकाणी मी आपल्यासमोर आणलेला आहे. या संबंधात शासनाने केलेल्या निवेदनामध्ये जी आकडेवारी दिलेली आहे ती सगळी चुकीची आहे. या ठिकाणी प्रशासनाने दिलेली जी आकडेवारी आहे ती एक सांगते आहे आणि आपण या निवेदनातून दिलेले उत्तर दुसरेच काही तरी सांगत आहे. तेव्हा एकंदर 28 पदे आहेत त्यातील 17 पदे रिक्त आहेत, त्यात वर्ग 2 मधील तसेच वर्ग 1 मधील डॉक्टरांची पदे आहेत. एकंदर 62 पदांपैकी 38 पदे निरनिराळ्या हॉस्पिटल्समधून रिक्त आहेत. मी रत्नागिरी जिल्ह्यातील अनेक हॉस्पिटल्सना भेटी दिल्या आहेत आणि या बाबत माहिती घेतली आहे. दापोली येथील हॉस्पिटलला भेट दिली असता ते हॉस्पिटल अत्यंत सुसज्ज असल्याचे दिसून आले पण तेथे डॉक्टरच नव्हते. तेथे सर्व यंत्रसामग्री आहे पण डॉक्टर्स नाही अशी दुर्दैवी परिस्थिती मला दिसून आली. त्यामुळे तेथील असलेल्या स्टाफ वर त्याचा ताण पडत असला तरी रूग्ण सेवा सुरू आहे म्हणून सांगितले जाते. या संदर्भात मी स्वत: प्रत्यक्ष रत्नागिरी जिल्ह्यातील डॉक्टरांची भेट घेतली असता त्यांनी मला सांगितले की, आता आमचे आरोग्य बिघडायला लागले आहे. रात्री 3-3 वाजेपर्यंत आम्हाला काम करावे लागते. डॉक्टरांच्या अनेक जागा रिक्त आहेत पण शासन भरती करीत नाही. अपंगांची भरती करण्यासंबंधात कोर्टाचा स्टे असल्याने ही भरती करता येत नाही असे शासनाचे म्हणणे आहे. यापूर्वीदेखील तीच अवस्था होती त्यामागील कारण काय होते ? सभापती महोदय, सगळ्याच कोकणातील, विशेषत: रत्नागिरी जिल्ह्यातील सगळ्या मंत्री महोदय स्वत: भेट देतील काय आणि तेथील लोकांची दु:खे ऐकून घेतील काय ? हा माझा दुसरा प्रश्न आहे.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, आपल्या राज्यात डॉक्टर्सची कमतरता आहे. आम्ही हे केव्हाही नाकारलेले नाही. मी नेहमीच येथे स्पष्टपणे सांगितले आहे की, आपल्याकडे वर्ग 1 आणि वर्ग 2 च्या डॉक्टरांची कमतरता आहे. त्यासाठी आम्ही एमपीएससी कडे देखील 1200 डॉक्टरांची मागणी केलेली आहे. त्यादृष्टीने 2 तारखेलाच

..... एनएन 4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कांबळे ....

लेखी परीक्षाही झालेली आहे आणि आता त्यांचेकडून यादी आल्यानंतर आपण ताबडतोब त्यांची भरती करू. मी स्वत: केंद्रीय आरोग्य मंत्र्यांशी या संदर्भात बोललो आहे. आता याबाबतीत आपल्या राज्याने असा निर्णय घेतलेला आहे की, एक वर्षासाठी प्री-पीजी आणि पोस्ट-पीजी असलेल्यांना शासकीय सेवा सक्तीची करणे आवश्यक आहे. ....

(यानंतर श्री. सरफरे .....ओओ 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे...

त्याप्रमाणे जी.आर. काढला. परंतु सन्माननीय केंद्रीय मंत्र्यांना मी सांगितले आहे, आणि एम.ई.आर. सी. बरोबर चर्चा झाली आहे. प्री पी.जी. व पोस्ट पी.जी. असे कंपल्सरी करावयाचे आहे. त्यामध्ये बॉंडेड किंवा शासकीय कॉलेजचा समावेश नसावा, परंतु खाजगी कॉलेजचा त्यामध्ये समावेश केला पाहिजे. विशेषकरुन ग्रामीण भागामध्ये जाऊन डॉक्टर काम करीत नाहीत याकरीता कंपल्सरी करण्यात येणार आहे. कॉंट्रॅक्ट बेसिसवर किंवा ऑनररी बेसिसवर डॉक्टर्सची नेमणूक करण्यासाठी आम्ही जाहीरात दिली, परंतु तरीसुध्दा डॉक्टर येत नाहीत. म्हणून जे डॉक्टर्स कॉंट्रॅक्ट बेसिसवर होते त्यांना परमनंट करण्यासंबंधी एम.पी.एस.सी. ला सांगितले असता, एम.पी.एस.सी. ने त्यांची लेखी परिक्षा घेतली पाहिजे. जोपर्यंत हे डॉक्टर लेखी परिक्षा देणार नाहीत तोपर्यंत त्यांना एक्सटेंशन देता येत नाही असे एम.पी.एस.सी.ने सांगितले आहे. त्यामुळे एम.पी.एस. सी. ची परिक्षा झाल्यानंतर आपल्याला काही पदे मिळणार आहेत. त्यांना एक वर्षाचे प्री पी.जी. आणि पोस्ट पी.जी. कंपल्सरी करण्यासंबंधीचा जी.आर. काढण्यात आला आहे. 15 जानेवारी रोजी आम्ही नव्याने भरती करणार आहोत. त्यामध्ये जेवढी शक्य असतील तेवढी रिक्त पदे भरण्यात येणार आहेत.

डॉ.दीपक सावंत : महाराष्ट्रामध्ये डॉक्टर्सची कमतरता आहे हे मंत्रिमहोदयांनी प्रामाणिकपणे कबूल केल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. प्रश्न असा आहे की, 3 तारखेला एम.पी.एस.सी. ची परीक्षा झाली. त्या परीक्षेचा निकाल लागला, उमेदवारांच्या तोंडी व लेखी परीक्षा होऊन एक महिना पूर्ण झाला. आपल्याकडे जेवढे डॉक्टर्स येतात त्यातील 30 टक्के डॉक्टर्स जॉईंट होतात हे आपल्याकडील रेकॉर्ड सांगते. माझी आपल्याला विनंती आहे की, आपण एकीकडे केंद्र सरकारकडे जाऊन यासंबंधीचा निर्णय करुन घेणार आहात. आज जे अस्थायी सेवेत असलेले 10 ते 12 हजार डॉक्टर्स आहेत. त्यांची 10 वर्षे सेवा झाल्यामुळे सुप्रिम कोर्टाच्या निर्णयानुसार त्यांना रुजू करुन घेणार आहात. परंतु 3 ते 10 वर्षे असलेले जे डॉक्टर्स आहेत, आणि जे परीक्षेमध्ये पात्र ठरलेले आहेत अशा डॉक्टर्सना आपण सेवेमध्ये रुजू करुन घेणार काय? दुसरा प्रश्न असा की, खाजगी मेडिकल कॉलेजमधील डॉक्टर्सना आपण इंटर्नशीप कंपल्सरी करणार काय? . आजपर्यंत आपण शासकीय मेडिकल कॉलेजमधील डॉक्टर्सना इंटर्नशीप कंपल्सरी केले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MHM/ KTG/

डॉ. दीपक सावंत...

आहे. परंतु दिवसें दिवस प्रायव्हेट मेडिकल कॉलेजची संख्या वाढत आहे. म्हणून त्याकरीता प्रायव्हेट मेडिकल कॉलेजमधील सर्व डॉक्टर्सना अशाप्रकारे सेवेत सामावून घेण्यासाठी आपण केंद्र सरकारकडे जाऊन परवानगी घेणार काय?

श्री. रणजित कांबळे : मी अगोदरच्या उत्तरामध्ये सांगितले आहे की, एम.पी.एस.सी. कडे शासनाने विनंती केली होती की, जे टेंपररी डॉक्टर्स आहेत त्यांना सेवेत सामावून घ्यावे. परंतु जे डॉक्टर्स असे आहेत की, ज्यांची 5 ते 6 वर्षे झाली आहेत ते out of touch with their books त्यांना कदाचित एक्सपरियन्स आहे. तरीसुध्दा एम.पी.एस.सी.ने सांगितले आहे की, आपल्याला असे करता येणार नाही. त्याव्यतिरिक्त आपण अगोदर म्हटल्याप्रमाणे प्री पी.जी. व पोस्ट पी.जी. हे खाजगी कॉलेजसाठी कंपल्सरी केले आहे. याबाबत मी माननीय केंद्रीय मंत्र्यांबरोबर स्वत: बोलणी केली आहे. हा प्रश्न फक्त महाराष्ट्रापुरता मर्यादित नाही तर संपूर्ण देशामधील ग्रामीण भागामध्ये डॉक्टर्सचा तुटवडा आहे. त्यामुळे या प्रश्नाकडे केंद्र शासन लक्ष देत आहे. याबाबत धोरणात्मक निर्णय घेणे सोपी गोष्ट नाही. एम.ई.आर.सी. च्या या संदर्भात काही अडचणी आहेत. त्यांच्याबरोबर चर्चा करुन आम्ही निर्णय घेणार आहोत. तरीसुध्दा मी सभागृहाला सांगू इच्छितो की, जेव्हा जेव्हा मी दिल्ली येथे जाईन, त्यावेळी माननीय केंद्रीय मंत्र्यांबरोबर या संदर्भात भेटून त्यांच्याकडे स्वत: पाठपुरावा करीन.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मला दोन वाक्य अधिक बोलण्यास परवानगी द्यावी. हे खरे आहे की, ग्रामीण रुग्णालयात डॉक्टर मिळत नाहीत. आमच्या मण्डणगड, दापोली येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये डॉक्टर मिळत नाहीत. त्यामुळे तेथील साथीच्या रोगाचा लोड जिल्हा रुग्णालयामध्ये वाढलेला आहे. जिल्हा रुग्णालयामध्ये डॉक्टरांची बरीचशी पदे भरलेली नसल्यामुळे त्या ठिकाणी असणारे डॉक्टर 18-18 तास काम करतात. तेथील डॉक्टर कामाच्या ताणामुळे राजीनामा देण्याच्या मन:स्थितीत आहेत. माझ्याकडे या संबंधातील लेटेस्ट आकडेवारी आहे. साथीच्या रोगामध्ये लेप्टोपायरस हा रोग आला तर अशावेळी रुग्णालयामध्ये पुरेसे डॉक्टर नसतील तर इतर जिल्ह्यातील डॉक्टरांना बोलाविण्यात येते आणि साथ आटोक्यात आणली जाते. तशी त्या ठिकाणी तात्पुरती व्यवस्था करणार आहात काय ? त्याचबरोबर जिल्हा रुग्णालयामध्ये 3 लाखाचे सिटी स्कॅनचे मशीन धुळखात पडलेले आहे. त्याच्याशी संबंधित टेक्निशियन नाही म्हणून ते 7 महिने पडून आहे. काही मशिन स्पेअर पार्टस् मिळत नाहीत, म्हणून बंद आहेत. माजी आमदार श्री.बाळ माने यांनी रत्नागिरी येथील रुणालयाला भेट दिलेली आहे. त्या ठिकाणची मशिनरी धूळ खात पडल्याचे निदर्शनास आल्याचे त्यांनी कळविलेले आहे. परंतु निवेदनामध्ये लेखी उत्तर दिलेले आहे की, जिल्हा रुग्णालयातील मशिनरी धुळखात पडलेली नाही, ती चालू आहे. त्या ठिकाणी अनेस्थेशिया, गायनॉकॉलॉजी डॉक्टरांची पदे रिक्त आहेत. कोर्टाने प्रथम अपंगांची पदे भरण्याबवषयी आदेश दिलेले आहेत. आपण अपंगांची पदे भरली नाहीत, म्हणून कोर्टाने तसे आदेश दिले. अपंगांची 2 टक्केच पदे भरावयाची आहेत. ती पदे भरायचीच आहेत. ज्या डॉक्टरांच्या 50 टक्के जागा रिकाम्या आहेत त्या भरलेल्या नाहीत. कोकणामध्ये साथीचे रोग येतात, लोक दगावतात, याबाबतची पदे युध्द पातळीवर डॉक्टरांची पदे भरण्याच्यादृष्टीने आपण कोणती विशेष योजना आखणार आहात ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाचे उत्तर असे की, सीटी स्कॅनचे मशिन सन 2003 मध्ये नादुरुस्त झालेले होते. त्यानंतर कोणकोणत्या महिन्यामध्ये नादुरुस्त झालेले आहे त्याच्या तारखा सांगतो. दिनांक 26-1-2006, 15-2-2006, 10-4-2006, 2-6-2006 असे मधेमध्ये दोन-दोन महिन्यामध्ये बंद होते. रेडिओलॉजिस्टचे पद भरलेले आहे, क्लास वन चे टेक्निशियन आहेत. सन्माननीय सदस्यांनी रिक्त पदे भरण्याच्या दृष्टीने काय उपाययोजना करणार आहेत ? मी सांगू इच्छितो की, ही पदे भरण्याबाबत कोर्टाकडे परवानगी मागितलेली आहे. मला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/ KTG/

श्री.रणजित कांबळे (पुढे सुरू...

खात्री आहे की, लवकरात लवकर ही पदे भरण्याच्यादृष्टीने पॉझिटिव्ह निर्णय देतील. अपंगांची पदे भरावयाची आहेत, तीही भरण्याच्यादृष्टीने पाठपुरावा करेन. त्याचबरोबर ही सर्व पदे लवकरात लवकर भरली जातील, एवढे मी सांगू इच्छितो.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, रिक्त पदांवर किती लोकांची भरती झालेली आहे ? किती लोक बदली करून निघून गेलेले आहेत ? याबाबत माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे.

श्री.रणजित कांबळे : डॉक्टरांचे 11 महिन्याचे कॉन्ट्रॅक्ट असते, त्यानंतर डॉक्टर सोडून जातात. आता त्या ठिकाणचे किती डॉक्टर सोडून गेले, याबाबतची आता माझ्याकडे माहिती नाही परंतु ती सभागृहासमोर ठेवता येईल.

--

<u>लक्षवेधी सूचनेसंबंधी</u>

सभापती : लक्षवेधी सूचना क्रमांक चार आणि पाच पुढे ढकलण्यात येत आहेत.

--

यानंतर श्री.बरवड....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : उरण तालुक्यातील खोपटा गावामध्ये समुद्राच्या उधाणाच्या भरतीमुळे बांधबंदिस्ती उद्ध्वस्त झाल्याने निर्माण झालेली परिस्थिती.

मु. शी. : उरण तालुक्यातील खोपटा गावामध्ये समुद्राच्या उधाणाच्या भरतीमुळे बांधबंदिस्ती उद्ध्वस्त झाल्याने निर्माण झालेली परिस्थिती यासंबंधी श्री जयंत प्र. पाटील, प्रा. शरद पाटील, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय खारजमीन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"उरण (जि.रायगड) तालुक्यातील खोपटा गावामध्ये समुद्राच्या उधाणाच्या भरतीमुळे बांध बंदिस्त उद्ध्वस्त झाल्याने समुद्राचे पाणी गावात शिरल्याने ग्रामस्थ भयभीत होणे, त्यामुळे समुद्राचे खारे पाणी शेतामध्ये शिरल्याने लागवड केलेली शेतीही नापीक होणे, तसेच कोप्रोली-खोपटा ग्रामपंचायत हद्दीतील धसाखोशी या गावांना देखील समुद्राच्या पाण्याचा निर्माण झालेला धोका, खोपटा पुलाखालून कोप्रोली उघाडीपर्यंत असलेला बांध कमकुवत झाल्याने या बांधबंदिस्तीची तातडीने दुरुस्ती करण्यासाठी नागरिकांनी वेळोवेळी केलेली मागणी, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका.

ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर (खारजमीन व बंदरे राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, शासनाने निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, या खांडी पावसाळ्यात पडल्यामुळे खांडीतून आत येणारे पाणी हे निमखारे स्वरुपाचे असल्यामुळे लाभक्षेत्र खारट झालेला नाही. समुद्रामध्ये गोड पाणी कधी निर्माण झाले आणि शासनाने त्याची पाहणी कधी केली ?

ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, त्या ठिकाणी अतिवृष्टीमुळे काही प्रमाणात धूप झाली होती तसेच योजनेच्या बांधाला खांडी पडल्या त्यामुळे लाभक्षेत्रात पाणी घुसल्यामुळे पाण्यामध्ये असा बदल झालेला आहे. याबाबतीमध्ये ....

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, साधारणत: 7 कि.मी. लांबीचा हा बंधारा आहे. त्याचे बांधकाम 1955-56 साली झाले. 1991 ला पुन्हा त्याचे नूतनीकरणाचे काम करण्यात आले. ज्यावेळी 5 ऑगस्टला पाऊस आला त्यावेळी आपण त्या विभागात नव्हता. त्या कालखंडामध्ये 4 मीटरच्या 2 आणि 5 मीटरची एक अशा 3 खांडी पडल्या. त्यावेळी अतिवृष्टी सुरु झाली होती. वरुन पाणी येत होते. खारे पाणी आत टिकू शकत नाही. क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी त्याची पाहणी केली.

श्री. जयंत प्र. पाटील : खारे पाणी जमिनीत गेले तर तीन वर्षे शेतीचे उत्पन्न येऊ शकत नाही याची जाणीव शासनाला आहे काय ? असे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासन तीन वर्षासाठी नुकसानभरपाई देईल काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : या प्रकरणामध्ये तशी आवश्यकता नाही. कारण अतिवृष्टीचा पाऊस इतका होता की ते पाणी तातडीने बाहेर जात होते. त्यानंतर तातडीने लाभधारकांची मदत घेतली आणि त्या खांडी बुजविल्या त्यामुळे त्या क्षेत्रात नुकसानीची पाळी आली नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : त्या खांडीवर शासनाच्या वतीने किती खर्च करण्यात आला ? त्या ठिकाणी कोणाला कॉन्ट्रॅक्ट देण्यात आले की, ज्यांनी या खांडी तातडीने बुजविल्या ?

श्री. बाळासाहेब थोरात : यामध्ये पध्दती अशी आहे की, लाभधारकांच्या माध्यमातून त्या खांडी बुजविण्याचे काम किंवा दुरुस्त करण्याचे काम केले जाते. हे काम ग्रामपंचायतीला द्यावे अशी सुध्दा पध्दत आहे. हे सर्व मातीकाम झालेले आहे. साधारणत: सव्वादोन कि.मी. क्षेत्रामध्ये या तीन खांडी पडलेल्या होत्या. त्या तीन खांडीचे बळकटीकरण पूर्ण करुन घेत आहोत. त्याकरिता 5 लाख

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ KGS/

श्री. बाळासाहेब थोरात ...

रुपयांचे एस्टीमेट झालेले आहे. हे काम आम्ही पूर्णपणे ग्रामपंचायतीला देणार आहोत. ग्रामपंचायतीने हे काम केले नाही तर ठेकेदाराचा प्रश्न येतो परंतु ही ग्रामपंचायत हे काम स्वीकारण्यास तयार आहे. लाभार्थ्यांनी सुरुवातीला माती टाकण्याचे जे काम केले त्याचे पेमेंट द्यावयाचे असेल तर ते या 5 लाख रुपयातून देण्यात येईल.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ KGS/

विशेष उल्लेख

पृ. शी. : आयात केलेला अत्यंत निकृष्ट दर्जाचा व मानवी आरोग्याला अपायकारक गहू राज्यातील जनतेला रेशन कार्डावर वितरित करण्यात येणे.

मु. शी. : आयात केलेला अत्यंत निकृष्ट दर्जाचा व मानवी आरोग्याला अपायकारक गहू राज्यातील जनतेला रेशन कार्डावर वितरित करण्यात येणे याबाबत श्री. गोपीकिसन बाजोरिया, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

सभापती : मा□□□य सदस्य श्री. गोपीकिसन बाजोरिया यां□ए□ विशेष उल्ले□ची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. गोपीकिसन बाजोरिया (अकोला तथा वाशिम तथा बुलढाणा स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडतो.

"आयात केलेला अत्यंत निकृष्ट दर्जाचा व मानवी आरोग्याला अपायकारक असा गहू राज्यातील जनतेला रेशन कार्डावर वितरित करण्यात येणे, सदर गव्हाच्या पोळ्यांचे तुकडे, परदेशातून आयात केलेला गहू हा तेथे तो डुकरांना खाद्य म्हणून घालण्यात येणे, सदर आयात केलेला निकृष्ट दर्जाचा गहू राज्य शासनाने स्वीकारुन केलेली मोठी चूक, सदर खराब गहू रेशनिंगवर देण्यात येत असल्याने या गव्हाचे वितरण तात्काळ थांबविण्याबाबत शासनाने दुर्लक्ष केल्याने जनतेमध्ये निर्माण झालेला आरोग्याचा धोका, याबाबत शासनाने तात्काळ निवेदन करावे."

माननीय सभापती महोदय, आज आदरणीय श्री. शरद पवार साहेबांचा वाढदिवस आहे. मी त्यांना शुभेच्छा देतो. सभापती महोदय, त्यांनी भारतात आयात केलेला गहू आपल्या निदर्शनास आणून देण्यासाठी मी सभागृहात आणलेला आहे. तो मी आपल्याकडे पाठवतो. सभापती महोदय, परदेशातील हा लाल गहू रेशनकार्डावर वितरित करण्यात येत आहे. हा गहू विदेशात डुकरे सुध्दा खात नाहीत. अशी याबाबतीत शोकांतिका आहे. हा लाल गहू पूर्ण राज्यामध्ये ...

सभापती : मी सन्माननीय सदस्यांना एवढे सांगू इच्छितो की, सदनामध्ये कोणतीही वस्तू आणण्याच्या बाबतीत बंदी आहे किंवा नियम आहे. असा प्रकार आपल्या सारख्या सदस्याकडून होऊ नये. याची आपण गांभीर्याने नोंद घेणे गरजेचे आहे. आपण जेष्ठ सदस्य आहात. असा प्रकार आपण टाळावा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ KGS/

श्री. गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, ठीक आहे. या लाल गव्हाच्या बाबतीत लोकांचे असे म्हणणे आहे की, चिकुनगुनिया जो मोठ्या प्रमाणावर या देशामध्ये आलेला आहे त्यामध्ये या लाल गव्हाचा भाग आहे.

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. गोपीकिसन बाजोरिया)

सभापती महोदय मी वर्तमानपत्राच्या आधारे बोलत आहे. लोक आजारी पडत आहेत.

(सत्ताधारी आणि विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, सभागृहामध्ये वस्तू घेऊन न येण्यासंबंधीचे निर्देश आपण दिलेले आहेत. या लाल गव्हाच्या पोळ्यादेखील मी सोबत आणलेल्या होत्या. त्या पोळया खाण्यालायक नाहीत.

(सत्ताधारी आणि विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.

उपसभापती : सन्माननीय सदस्य जेव्हा विशेष उल्लेखावर बोलण्यासाठी उभे असतात त्यावेळी अन्य सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भाषणामध्ये बिलकूल हस्तक्षेप करु नये. त्यांना जे काही बोलायचे असेल ते बोलू द्यावे. काही आक्षेपार्ह विधान सन्माननीय सदस्यांनी केले असेल तर त्यांचे बोलणे संपल्यानंतर त्यासंबंधीचा मुद्दा उपस्थित करण्यास मी परवानगी देईन. परंतु सन्माननीय सदस्य भाषण करीत असताना त्यामध्ये व्यत्यय आणणे इष्ट नाही. सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री. गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, या गव्हाबाबत संपूर्ण देशाला माहिती आहे. सर्वसामान्य लोकांनी या गव्हाच्या चपात्या रस्त्यावर फेकल्या, इतका निकृष्ट दर्जाचा हा गहू आहे. सभापती महोदय, या निमित्ताने मी आपल्या एक गोष्ट निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, आज महाराष्ट्रातील गोडाऊनमध्ये 4 लाख क्विंटल ज्वारी पडून आहे. अकोल्याच्या गोडाऊनमध्ये 1 लाख 56 हजार 700 क्विंटल ज्वारी पडून आहे. अकोल्यातील शेतक-याने आपल्या शेतामध्ये पिकविलेली ही ज्वारी आज अकोल्यातील जनता मागत असताना ही गोडाऊनमध्ये पडून असलेली 1 लाख 56 हजार 700 क्विटंल ज्वारी त्यांना दिली जात नाही. मात्र आयात केलेला सडका लाल गहू दिला जातो. एवढेच मला शासनाच्या निदर्शनास आणून द्यायचे आहे. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : बंजारा समाज परिवर्तन अभियान व महाराष्ट्र भटके विमुक्त हक्क संरक्षण महासंघ यांच्या मागण्यांची पूर्तता करण्याबाबत

मु.शी. : बंजारा समाज परिवर्तन अभियान व महाराष्ट्र भटके विमुक्त हक्क संरक्षण महासंघ यांच्या मागण्यांची पूर्तता करण्याबाबत प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

उपसभापती : माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो. या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून आपल्या राज्यातील 3 कोटी भटक्या विमुक्त समाजाच्या न्यायपूर्ण मागण्यांकडे शासनाने लक्ष द्यावे आणि त्यांच्या न्यायपूर्ण मागण्या मंजूर कराव्यात अशी मी शासनाला विनंती करतो.

"महाराष्ट्र भटके विमुक्त हक्क संरक्षण महासंघाने भटक्या विमुक्त समाजाच्या अत्यंत न्यायपूर्ण मागण्या केलेल्या आहेत. पुरोगामी महाराष्ट्राने राज्यातील 3 कोटी भटक्या विमुक्त समाजाच्या न्यायपूर्ण मागण्याचा गंभीरपणे विचार करुन त्या तातडीने मंजूर कराव्यात अशी माझी आग्रही मागणी आहे.

1. हरितक्रांतीचे उद्गाते राज्याचे माजी मुख्यमंत्री दिवंगत मा. वसंतराव नाईक यांचे नाव परभणीच्या कृषी विद्यापीठास देण्यात यावे.
2. वसंतराव नाईक व संत सेवालाल महाराजाविरुध्द बदनामीकारक लिखन करणा-या लेखक व प्रकाशकावर गुन्हा दाखल करुन फौजदारी कारवाई करण्यात यावी.
3. तांडा विकास योजनेचा वार्षिक निधी 100 कोटी करण्यात यावा.
4. वसंतराव नाईक भटक्या जाती-जमाती आर्थिक विकास महामंडळाचा निधी वाढवून 500 कोटी करण्यात यावा.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा. जोगेंद्र कवाडे....

5. बंजारा तांड्यांना महसुली दर्जा देवून स्वतंत्र ग्रामपंचायती निर्माण करण्यात याव्यात.
6. भटके विमुक्त जमातीमधील 10 लाख ऊसतोड मजूर व 25 लाख इमारत बांधकाम मजुरांचे पुनर्वसन करुन त्यांना कामगार म्हणून मान्यता देण्यात यावी.
7. वरिष्ठ महाविद्यालयातील भ.वि.अधिव्याख्याता पदासाठी लागणारी अर्हता 50 टक्के आणि नेट-सेट करिता 40 टक्के करण्यात यावी.

बंजारा समाज परिवर्तन अभियान सर्व महाराष्ट्राचे भटके-विमुक्त हक्क संरक्षण महासंघ यांनी केलेल्या अत्यंत न्यायोचित मागण्याची त्वरित पूर्तता करण्याच्या दृष्टीने शासनाने कारवाई करावी. "

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

सभापती महोदय, राज्यातील 3 कोटी भटक्या विमुक्त समाजाच्या विकासासाठी ज्या मागण्या केल्या आहेत त्या मागण्यांचा पुरोगामी शासनाने गंभीरपणे विचार करावा आणि तातडीने मागण्या मंजूर कराव्यात अशी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी मागणी करतो.

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : हातपंप व विद्युत पंप दुरुस्ती कर्मचाऱ्यांना वेतन न मिळणे.

मु. शी. : हातपंप व विद्युत पंप दुरुस्ती कर्मचाऱ्यांना वेतन न मिळणे याबाबत श्रीमती उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□□य सदस्या श्रीमती उषा दराडे यां□ ए□ विशेष उल्ले□ची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्रीमती उषाताई दराडे (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडते :-

"महाराष्ट्रात एकूण 1,22,951 हातपंप, 19323 विद्युत पंप आहेत. पंप दुरुस्तीसाठी लागणारे कर्मचारी जिल्हा परिषदेने नेमून दिलेल्या त्यांच्या वेतन व भत्त्याचा खर्च, पंप दुरुस्तीचे सुटे भाग यांचा खर्च जिल्हा परिषदेने स्वत:च्या उत्पन्नातून भागवावा असे निर्देश आहेत.

शासनाने सदर योजनेसाठी नियमित लेखाशिर्षातून कायमस्वरुपी अनुदान उपलब्ध करुन न दिल्यास जिल्हा परिषदांना ही योजना बंद करावी लागेल.

हातपंप व विद्युत पंप दुरुस्तीपोटी होणाऱ्या वार्षिक वर्गणीच्या वसुलीची ग्रामपंचायतीकडे कोट्यावधी रुपयांची थकबाकी आहे व त्याची पंचायत राज समितीने गंभीर दखल घेतली आहे. ग्रामीण पाणी पुरवठा दुरुस्ती व देखभाल निधीची अत्यंत वाईट स्थिती निर्माण झाली आहे.

राज्यात एकूण 82 कनिष्ट अभियंता, 378 हातपंप यांत्रिकी, 101 वीजतंत्री, 356 मदतनीस, 31 वाहनचालक इ.कर्मचारी आहेत. त्यांच्या वेतन भत्त्यापोटी 11 कोटी रुपये लागतात. वेतन व भत्ता वर्गणीतून खर्च केला जाऊ शकत नाही. कारण त्यातूनच ग्रामीण विकास निधीच्या कर्जाची देयके, दूरदर्शन संच इ.रकमा वळत्या करुन घेण्यात येतात.

त्यासाठी त्रिस्तरीय योजनेंतर्गत काम करणा-या हातपंत/विद्युतपंप दुरुस्ती योजनेसाठी त्यामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी राज्य शासनाने नियमित लेखाशिर्षातून कायमस्वरुपी अनुदान जिल्हा परिषदांना उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, शासन निर्णयाप्रमाणे काही अपवादात्मक जिल्हे वगळल्यास बहुतेक जिल्हे आर्थिकदृष्टया दुर्बल असल्याने हातपंप आणि विद्युतपंप कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा खर्च भागवू शकत

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे.....

नाहीत. अशा जिल्हयामध्ये आमच्या जिल्हयाचा समावेश होतो. 3-4 महिने वेतन देऊ शकत नाहीत. शासनाने सदर योजनेसाठी नियमित लेखाशिर्षातून कायमस्वरुपी अनुदान उपलब्ध करुन दिले तर हा प्रश्न सुटू शकतो. शासनाच्या निर्देशाप्रमाणे ग्रामपंचायतींनी वसुली करुन त्यामधून हा खर्च भागवावा असे निर्देश दिले आहेत. शासन निर्णयानुसार प्रती हातपंप 500 रुपये, प्रती विद्युतपंप 2500 रुपये अनुदान दिले जाते. याठिकाणी उल्लेख झाला की, 1000 व 5000 रुपये अनुदान देण्यात यावे. तरी सुध्दा 1,22,951 हातपंप व 19323 विद्युतपंपाची 100 टक्के वसुली झाली तरी वेतन देण्याइतकी वसुली होत नाही. हा प्रश्न जर सोडवायचा असेल तर काही गोष्टींचा विचार करावा लागेल. भूवैज्ञानिक कर्मचारी, सुरुंग पथकाचे कर्मचारी आणि हातपंप कर्मचारी अशी त्रिस्तरीय योजना आहे. या योजनेतील भूवैज्ञानिक कर्मचारी शासनामार्फत, सुरुंग पथकाला अत्यंत कमी काम असूनही वेतन दिले जाते. हातपंप व विद्युतपंप दुरुस्ती करणाऱ्या कर्मचाऱ्यांना जिल्हा परिषदेने ग्रामपंचायतीमार्फत वसुली करावी व त्यातून वेतन द्यावे अशी तरतूद असल्यामुळे घोटाळा निर्माण झाला आहे. संबंधित मंत्र्यांना वेळोवेळी निवेदने दिली. मंत्रीमहोदयांनी सूचना देऊन माहिती घेण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु कॉंक्रिट निर्णय अद्याप झालेला नाही. या प्रकरणी कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांनी एक पत्र पाठविले आहे. त्यामध्ये त्रिस्तरीय योजनेंतर्गत हातपंप देखभाल व दुरुस्ती योजनेमध्ये नेमलेल्या कर्मचाऱ्यांची माहिती मागविण्याबाबत ऑक्टोबर, 2001 मध्ये सर्व जिल्हा परिषदांच्या सी.ई.ओ.ना पत्र पाठविले आहे.

(नंतर श्री.गागरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे ..... (पुढे सुरु)

13 मार्च 2001 चे जे पत्र आहे, परंतु अद्यापपर्यंत हे प्रपत्र का पाठविले नाही ? याबाबत पुढे काय कार्यवाही झाली यासंबंधीची काही माहिती मिळत नाही. कर्मचाऱ्यांचे हाल व ग्रामीण भागात हातपंपाची व विद्युतपंपाची असलेली गरज ही परिस्थिती लक्षात घेऊन या प्रकरणी शासनाने या कर्मचा-यांना पगार देण्याच्या दृष्टीने पावले उचलली पाहिजेत असे निवेदन मी करत आहे.

उपसभापती : सदस्यांनी आपली विशेष उल्लेख सूचना कमी वेळेत मांडावी.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : विद्युत मंडळातील कर्मचारी, अभियंते व अधिकारी यांच्या पेंशनच्या मागणी बाबत.

मु.शी. : विद्युत मंडळातील कर्मचारी, अभियंते व अधिकारी यांच्या पेंशनच्या मागणी बाबत श्री सय्यद कमरुझ जामा, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : माननीय सदस्य श्री सय्यद कमरुझ जामा यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री सय्यद कमरुझ जामा (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित):सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"वीज कर्मचारी, अभियंते, अधिकारी यांची संयुक्त कृती समिती द्वारा दिनांक 12 डिसेंबर, 2006 रोजीच्या शून्य तासापासून 72 तासांचा संप जाहीर करण्यात आला आहे. विद्युत मंडळातील कर्मचारी, अभियंते व अधिकारी यांच्या पेंशनच्या मागणी संदर्भात दिनांक 12 एप्रिल, 2006 रोजी विस्तृत पत्र देऊन सुध्दा माननीय उर्जा मंत्री यांच्या कार्यालयातर्फे उदासीनता दाखविण्यात आली. 31 मे, 2005 च्या वाटाघाटीत माननीय उर्जा मंत्री यांनी फक्त एका महिन्याचा अवधी मागून घेऊन सुध्दा काहीच पाऊले उचलेली नाहीत. उर्जा क्षेत्रातील कर्मचा-यांनी त्यांच्या एकूण जमा असलेल्या गंगाजळीचा वापर करण्याची मान्यता शासन व व्यवस्थापनाला देऊन त्या ऐवजी पेंशन मागतले तरी सुध्दा या शासनाने ते मान्य केलेले नाही. महाराष्ट्रातील सरकारी नोकरांना पेंशन आहे मात्र विद्युत मंडळातील कर्मचा-यांना पेंशन पासून डावलणे सुरु आहे. सदर कृती समितीने पेंशनच्या मागणी वर सन्माननीय तोडगा न निघाल्यास औद्योगिक कलह कायद्याच्या तरतूदीनुसार संपाची नोटिस देण्यात येणार आहे. अत्यंत महत्वपूर्ण अशा उर्जा क्षेत्रातील कर्मचा-यांच्या असंतोषला वाचा फुटावी, याकरिता हा विषय मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून उपस्थित करु इच्छितो.

उपसभापति महोदय, विद्युत मंडल के कर्मचारियों की दृष्टि से यह बहुत ही महत्वपूर्ण विषय है. विद्युत मंडल के कर्मचारियों को पेंशन की सुविधा प्राप्त नहीं है. चार-पाँच साल से विद्युत मंडल के कर्मचारी पेंशन शुरु करने की मांग कर रहे हैं. विद्युत मंडल के तीन भाग हो गए

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद कमरुझ जामा .....

हैं. विद्युत मंडल के कर्मचारियों को पेंशन देने के संबंध में वर्ष 2005 से बैठक हो रही है. दिनांक 12 अप्रैल, 2006 को भी विद्युत मंडल के कर्मचारियों के सभी संगठनों के साथ बैठक हुई थी. लेकिन पेंशन के संबंध में कोई निर्णय नहीं हुआ. 17 नवंबर को विद्युत मंडल के कर्मचारियों के संगठनों ने 72 घंटे हड़ताल करने की नोटिस दी थी. लेकिन सरकार के प्रतिनिधियों ने इस संबंध में कल तक कोई उत्सुकता नहीं दिखाई थी. लेकिन कल ही मंत्री महोदय ने कर्मचारियों के संगठनों से अनुरोध किया कि हमें विचार करने के लिए कुछ समय दिया जाए, जिसकी वजह से हड़ताल टाल दी गई. नहीं तो आज से हड़ताल शुरु हो जाती. मेरा मंत्री महोदय से अनुरोध है कि विद्युत कर्मचारियों की पेंशन की मांग पर गंभीरता से विचार किया जाए. राज्य सरकार के कर्मचारियों, केन्द्रीय सरकार के कर्मचारियों और पब्लिक सेक्टर के कर्मचारियों को पेंशन दी जा रही है. इसका मतलब यह है कि सरकार ने पेंशन का सिध्दांत मंजूर किया है. ऐसी स्थिति में विद्युत मंडल के कर्मचारियों की पेंशन की मांग स्वीकार करने के लिए विलंब क्यों किया जा रहा है ? इसलिए मेरी मांग है कि इस विषय में जल्द से जल्द निर्णय लेकर विद्युत मंडल के कर्मचारियों की पेंशन की मांग को स्वीकार किया जाए. इतना कहते हुए मैं अपना भाषण समाप्त करता हूं.

.....

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : लक्ष्मीबाई धुर्वे या महिलेचे अर्भक हॉस्पीटलच्या प्रतिक्षालयातून कुत्र्याने पळवून नेल्याबाबत.

मु.शी. : लक्ष्मीबाई धुर्वे या महिलेचे अर्भक हॉस्पीटलच्या प्रतिक्षालयातून कुत्र्याने पळवून नेल्याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ.नीलम गोऱ्हे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) :सभापति महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

" दिनांक 12.8.2006 रोजी शासकीय वैद्यकीय रुग्णालय नागपूर येथे प्रसुतीसाठी दाखल झालेली लक्ष्मीबाई धुर्वे या महिलेचे अर्भक, सदर हॉस्पीटलच्या प्रतिक्षालयातून कुत्र्याने पळवून नेऊन ते एक्स रे विभागाजवळ सापडणे, या गंभीर बाबीची तक्रार केल्यावर तब्बल चार महिन्यानंतर तेथील वैद्यकीय अधिकारी व परिचारिकांवर कलम 304 अन्वये अजनी पोलिसांनी नोंदविलेला गुन्हा, शासनाच्या हॉस्पीटलमधून नवजात अर्भक भटक्या कुत्र्यांनी पळवून नेणे म्हणजे तेथील सुरक्षा यंत्रणेत असलेल्या त्रुटी, याबाबत शासनाने तात्काळ निवेदन करावे "

सभापती महोदय, दिनांक 12.8.2006 रोजी शासकीय वैद्यकीय रुग्णालय नागपूर येथे प्रसूतीसाठी दाखल झालेल्या लक्ष्मी धुर्वे या महिलेचे अर्भक सदरील हॉस्पीटलच्या प्रतिक्षालयातून कुत्र्याने पळवून नेले. हॉस्पीटलच्या एक्स-रे रुमच्या जवळ हे बालक कुरतडलेल्या अवस्थेत सापडले. बालक कुत्र्याने पळविले आहे हे तेथील सुरक्षा रक्षकांच्या मध्यरात्री लक्षात आले. या घटनेमध्ये प्रसूतीसाठी आलेल्या महिलेच्या व अर्भकाच्या संरक्षणाची जबाबदारी हॉस्पीटलवर असताना चार महिन्यानंतर संबंधितावर गुन्हा दाखल झालेला आहे. म्हणून हा विशेष उल्लेख करीत आहे. स्त्रियांची महाराष्ट्रामध्ये जी परवशता आहे याकरीता खास करुन नवप्रसूत मातांच्या व बालकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून रुग्णालयात व्यवस्था केली पाहिजे. वैद्यकीय अधिकारी आणि संबंधितावर 304 अन्वये कारवाई करुन भटक्या कुत्र्यांचांही बंदोबस्त करण्यात यावा, अशा प्रकारे मानवी अधिकाराकडे मी लक्ष वेधित आहेत. हया गुन्हेगारांचा बंदोबस्त करावा अशी भावना व्यक्त करीत आहे. याबाबत कारवाई होण्यासाठी मी लक्ष वेधत आहे.

पृ.शी. : बर्ड फ्ल्यू रोगामुळे पोल्ट्रीफॉर्म नष्ट झाल्याने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पोल्ट्रीफॉर्म धारकांना नुकसान भरपाई मिळणेबाबत.

मु.शी. : बर्ड फ्ल्यू रोगामुळे पोल्ट्रीफॉर्म नष्ट झाल्याने
पोल्ट्रीफॉर्म धारकांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत
श्री.चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स. यांनी दिलेली
विशेष उल्लेखाची सूचना

उपसभापती : माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.चंद्रकांत रघुवंशी (धुळे तथा नंदुरबार स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

" नवापूर (जि.नंदूरबार) परिसरात माहे फेब्रूवारी, 2006 रोजी कोंबडयांना झालेल्या बर्ड फ्ल्यू रोगाचा फैलाव होऊ नये म्हणून शासनाने लाखो कोंबडया मारल्या (नष्ट) केल्या. यामुळे सर्व पोल्ट्रीफॉर्म नष्ट झाल्याने सर्व पोल्ट्रीधारकांचा व्यवसाय नष्ट झाल्याचे आढळून आले. काही पोल्ट्रीधारकांचा कोंबडयांना उपरोक्त रोगाची लागण न झालेली असतानाही अनायसे सर्व पोल्ट्री फॉर्म धारकांबरोबरच स्वत:चे नुकसान सोसावे लागले. पोल्ट्रीफॉर्म धारकांवर मोठे संकट येऊन त्यांच्यावर उपासमारीची पाळी आलेली आहे. बर्ड फ्ल्यू मुळे झालेल्या नुकसानीची नुकसान भरपाई मिळण्याबाबत महसूल विभागात नोंद करुनही अद्यापही नुकसान भरपाई पोल्ट्रीधारकांना देण्यात आलेली नाही त्यामुळे त्यांच्यात निर्माण झालेला तीव्र असंतोष आणि संताप. पोल्ट्रीधारकांना तातडीने नुकसान भरपाई मिळण्याची आवश्यकता याकरिता मी सभागृहात विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

सभापती महोदय, फेब्रूवारी महिन्यामध्ये नंदूरबार जिल्हयातील नवापूर तालुक्यात बर्ड फ्ल्यूची लागण झाली, लाखो कोंबडया मृत्यमुखी पडल्या. कोंबडया मेल्या ही बातमी पोल्ट्रीफॉर्म चालकांना मिळाली त्यांनी सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून हया कोंबडया खड्डयामध्ये पुरल्या आहेत.

.....यानंतर श्री.सोनवणे.

अशुद्धारित प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत रघुवंशी....

बर्ड फ्लू आहे प्रशासनाने त्या भागातील सर्व पोल्ट्री फार्म सिल केले. शासनाच्या वतीने सर्व कोंबडया मारल्या त्यानंतर त्यांनी पशु खाद्याचा मोबदला पोल्ट्री फार्म धारकांना दिला त्यामुळे मी शासनाचे अभिनंदन करतो पण सुरुवातीला जेव्हा या बर्ड फ्लूची लागण झाली तेव्हा नंदुरबार जिल्हयातील खासकरुन नवापूर तालुक्यातील पोल्ट्री धारकांच्या व आदिवासी बांधवाच्या कोंबडया मेल्या त्यासंदर्भात शासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा करुन सुध्दा त्यांना मदत दिलेली नाही. प्रशासनाकडे सुरुवातील बर्ड फ्लूची लागण झाल्यामुळे ज्या कोंबडया मेल्या त्यांची संख्या आहे. तसे रेकॉर्ड सुध्दा झालेले आहे. पंचनामे झालेले आहेत. ज्या पोल्ट्री धारकांच्या व आदिवासींच्या कोंबडया मेल्या त्यांचा मोबदला शासनाने द्यावा अशी मी शासनाला विशेष उल्लेखाद्यारे विनंती करतो.

.....

UU-2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याच्या मुद्याबाबत

श्री. दिवाकर रावते : श्रीमती इंदुमती नाकाडे यांनी केलेल्या उपोषणासंदर्भात शासनाने निवेदन करावे अशा प्रकारचे निदेश आपण दिले होते परंतु त्या संदर्भात शासनाने निवेदन केलेले नाही त्यांनी उपोषण सोडले असेल तर आमची काही हरकत नाही. प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर लगेचच आपण असे निदेश दिले होते की त्यांच्या मागण्या मान्य करा व त्यांचे उपोषण सोडवा तसेच उद्या दुपारपर्यंत यासंदर्भात शासनाने निवेदन करावे त्यांच्या मागण्या मान्य कराव्यात परंतु त्यासंदर्भात काहीही कळलेले नाही.

उपसभापती : कालच मी यासंदर्भात निर्देश दिले होते की, श्रीमती इंदुमती नाकाडे या विधानपरिषदेच्या माजी सदस्या होत्या त्यांच्या भागातील मागण्यांच्या संदर्भात त्या कालपासून उपोषणाला बसलेल्या आहेत. शासनाच्या वतीने त्यांची भेट घेऊन त्यांच्या ज्या काही मागण्या असतील त्या मागण्यांची पूर्तता करण्यासंबंधी कार्यवाही करण्यात येईल.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, महाराष्ट्राचा एक ज्वलंत प्रश्न आहे आणि आपल्यासमोर तो विषय आलेला आहे आणि त्यासाठी न्याय देण्याचा आपण पूर्ण प्रयत्न केलेला आहे. झुणकाभाकरच्या संदर्भात मध्यंतरी मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की कोणत्याही प्रकारची कारवाई करु नका, शासनाचे धोरण पूर्ण होईपर्यंत परिस्थिती तशीच ठेवा. मुंबईतून आत्ताच आमच्याकडे माहिती आली आहे मुंबईतील जे वॉर्ड ऑफीसर आहेत त्या लोकांनी नोटीसेस द्यावयाला सुरुवात केली आहे. शेवटी माणुसकी आणि बेरोजगारी या दोन गोष्टीवर उपाय म्हणून महाराष्ट्र शासनाने त्याविषयी प्राधान्याने विचार करुन त्यांना दिलासा द्यावा अशी आमची मागणी आहे.

श्री. दिवाकर रावते : आपण सांगितल्याप्रमाणे ते सगळे स्थगित झालेले होते. पण कलेक्टर हट्टाला पेटले आहेत आणि आम्हाला मुख्यमंत्र्याचे लेखी निवेदन पाहिजे. अशी त्यांची मागणी आहे. परंतु मी माहिती घेतली असता तो प्रस्ताव कॅबीनेट पुढे गेलेला आहे त्यानंतर त्याचा निर्णय होईल. कॅबीनेटचा निर्णय होईपर्यंत त्याला स्थगिती द्यावी. आपण माननीय मंत्री महोदय श्री. तटकरे व मुख्यमंत्री महोदयांबरोबर यासंदर्भात चर्चा करावी.

UU-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : ठीक आहे, झुणकाभाकरच्या सदर्भामध्ये जेव्हा चर्चा झाली तेव्हा असे स्पष्ट निर्देश देण्यात आलेले होते की, यासंदर्भामध्ये झुणकाभाकर केंद्रे पुनश्च ताब्यात घेण्यात येऊ नयेत आणि यासंदर्भातील निणर्य कॅबीनेटमध्ये घ्यावा व पुढील कार्यवाही करावी. परंतु काही ठिकाणी माझ्या असे निदर्शनास आले आहे की, काही ठिकाणी अधिकारी हे आडमुठेपणाने आम्हाला स्थगिती आदेश पाहिजेत अशी मागणी करतात. शेवटी या लोकशाहीमध्ये सभागृह हे सर्वश्रेष्ठ आहे, सभागृहामध्ये जे आदेश दिलेले जातात हे शासनावर सुध्दा बंधनकारक असतात. एखादा आदेश किंवा निर्देश चुकीचा असेल तर तो आमच्या लक्षात आणून दिला जातो. परंतु स्थानिक प्रशासन झुणकाभाकर केंद्र ताब्यात घेत आहे, ही कृती अत्यंत चुकीची आहे. या सभागृहात दिलेल्या निर्देशाची योग्य ती अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. इतकेच नव्हेतर या सभागृहामध्ये सदस्यांनी व्यक्त केलेल्या भावना आणि शासनाने या ठिकाणी दिलेले आश्वासन या गोष्टी जर प्रशासन पाळत नसेल तर मला असे वाटते की, प्रशासनाची ही कृती अत्यंत अयोग्य आहे.

यानंतरी श्री. जुन्नरे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती .....

त्यामुळे यासंदर्भात मी आता स्पष्ट निर्देश देणार आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी माहिती दिल्याप्रमाणे, सदर प्रस्ताव कॅबिनेटच्या समोर विचारार्थ असला तरी त्याचा निर्णय होई पर्यंत या स्थगिती आदेशाची त्वरीत अंमलबजावणी व्हावी आणि आजच्या आज राज्यातील सर्व, ज्या ज्या ठिकाणी झुणका-भाकर केंद्रे आहेत, तेथील स्थानिक प्रशासनाला, मुंबई सह या आदेशाची त्वरीत अंमलबजावणी करण्याच्या संदर्भात सूचना देण्यात यावी.

श्री. बाळासाहेब थोरात : नोंद घेण्यात आलेली आहे.

उपसभापती : सभागृहाची बैठक आता मध्यंतरासाठी 3.00 वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.30 वाजता, दुपारी 3.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण झुणका भाकर केंद्र सुरु ठेवण्याबाबत निर्देश दिले, परंतु ते आदेश निगर्मित होतील की नाही अशी शंका येते. श्रीमती इंदुमती नाकाडे यांच्या संदर्भात दिलेल्या निर्देशाबाबत चांगला अनुभव आलेला नाही.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, आपण झुणका भाकर केंद्र सुरु ठेवण्याबाबत जे निर्देश दिले होते त्याप्रमाणे जिल्हाधिकारी, मुंबई आणि महाराष्ट्रातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना हे आदेश कळविण्यात आलेले आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या सदनात उल्हासनगर आयुक्तांच्याबाबत निर्देश दिले होते. ते करीत असलेल्या मनमानी कारभाराबाबत आपण निर्देश दिले होते. त्या संदर्भात अजून कार्यवाही झालेली नाही. त्याबाबत मला आजच सकाळी फोन आला होता. आपण निर्देश दिल्यानंतर त्याबाबत कार्यवाही व्हावी अशी अपेक्षा होती. परंतु तसे झालेले नाही. तेव्हा या शासनाच्या बाबतीत कोणता निर्णय घेणार आहे ?

उपसभापती : मी काल या संदर्भात निर्देश दिले होते ही वस्तुस्थिती आहे. त्या नगरसचिवांना कामावर रुजू करुन घेण्यात आलेले आहे. त्या संदर्भातील लेखी निवेदन माझ्याकडे आलेले आहे. तें मी मंत्रिमहोदयांकडे पाठविणार आहे. घटना अशी घडली की, काल त्या नगर सचिवांना आयुक्तांनी त्यांच्या कार्यालयात बोलावून घेतले आणि बॅकडेटेड तारीख म्हणजे 8 तारीख टाकून ऑर्डर इश्यू केली व त्या तारखेची सही करण्यास सांगितले. त्यांनी त्या गोष्टीस नकार दिला. त्यांनी ऑर्डरवर 11 डिसेंबरची तारीख व वेळ टाकून ऑर्डर स्वीकारली. त्यांनी 8 तारीख टाकून सही करावी म्हणून त्याच्यावर भरपूर दबाव आणला. दुसरी एक बाब मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, आताचे जे विद्यमान आयुक्त आहेत ते मधल्या काळात रजेवर होते. त्यांच्या रजा कालावधीत कल्याणचे ॲडीशनल आयुक्त यांच्याकडे कार्यभार सोपविण्यात आला. त्यांनी कार्यभार स्वीकारल्यानंतर जी प्रलंबित प्रकरणे होती किंवा ज्या फाईल्स होत्या, तसेच लोकांची गाऱ्हाणी ऐकून विकास कामांचे प्रस्ताव होते ते मंजूर केले. त्यानंतर रजेवर गेलेले आयुक्त परत आले.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय उपसभापती .....

त्यांनी अगोदरच्या आयुक्तांनी ज्या प्रकरणांना मान्यता दिली होती त्यास स्थगिती दिली. वास्तविक असे होत नाही. याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांना अवगत करण्यात येत आहे. एखाद्या विकास कामांना मंजुरी दिल्यानंतर त्यास स्थगिती दिली जात नाही. प्रशासनातील वादाचा जनतेच्या कामांवर विपरित परिणाम होऊ नये म्हणून माननीय मुख्यमंत्र्यांना अवगत करण्यात येईल व संबंधितांवर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सन 2006-2007 च्या पूरक मागण्यांवर चर्चा.

उपसभापती : पूरक मागण्यांवरील चर्चेचा आजचा शेवटचा व दुसरा दिवस आहे. कार्यक्रमपत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवर चर्चा आज दिनांक 12 डिसेंबर,2006 रोजी घेण्यात येत आहे. पूरक मागण्या आणि त्याखालील बाबी यासंबंधीची माहिती सदस्यांना पत्रक भाग दोनद्वारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्याने भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरणपत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. चर्चा संबंधित बाबी पुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही हे सदस्यांना सांगावयास नकोच. कार्यक्रम पत्रिकेवरील दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवरील चर्चा व उत्तर आजच पूर्ण करावयाचे आहे हे सदस्यांनी कृपया ध्यानात घ्यावे.

<u>विविध मंत्र्यांच्या विभागांच्या मागण्या पूरक मागण्या.</u>

उपसभापती : खालील मंत्र्यांच्या विभागाच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यात येतील.

1. मुख्यमंत्री - मागणी क्रमांक ए-1, ए-2, ए-4, ए-5, ए-6, एफ-2, एफ-3, एफ-5, जे-1 जे-2, क्यू-3.
2. महसूल मंत्री -मागणी क्रमांक सी-1, सी-4, सी-5, सी-6, सी-7,सी-10, बी-3,
3. वित्त व नियोजन मंत्री - मागणी क्रमांक - जी-1, जी-5,ओ-7, ओ-9, ओ-10.
4. ग्रामविकास व पर्यटन मंत्री - मागणी क्रमांक- बी-7, एल-2, एल-3, एल-5,
5. उद्योग व खनिकर्म, सांस्कृतिक कार्य व राजशिष्टाचार मंत्री - मागणी क्रमांक- के-7, के-10, एन-1, एन-2.
6. राज्य उत्पादन शुल्क, पर्यावरण व कामगार मंत्री - मागणी क्रमांक- के-4.
7. ऊर्जा (अपांरपारिक ऊर्जा वगळून) वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री- मागणी क्रमांक- के-6, के-11, एस-1, डब्ल्यू-2, डब्ल्यू-3, डब्ल्यू-4, डब्ल्यू-6.
8. सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री - मागणी क्रमांक- एन-3, एन-4.
9. अन्न व औषधे प्रशासन व विशेष सहाय्य मंत्री- मागणी क्रमांक - एन-3.
10. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री- मागणी क्रमांक - एम-2.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चेसाठी किती वेळ देण्यात आलेला आहे हे आपण सांगितलेले नाही.

उपसभापती : आपण 4.30 पर्यंत मागण्यांवरील चर्चा संपवू या.

यानंतर श्री.पुरी.....

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन 2006-2007 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 11, पान क्रमांक 1-सामान्य प्रशासन विभागावर मी बोलणार आहे. याठिकाणी एक सदस्य चौकशी आयोगाचा कालावधी वाढविण्यासाठी रुपये 18 लाख 55 हजार रुपयांची तरतूद केली आहे. आपण बीड जिल्हयातील निवृत्तीवेतनाचा दावा सांगणाऱ्या 354 स्वातंत्र्य सैनिकांची पडताळणी करणार आहात. हा अतिशय महत्वाचा विषय आहे. सन 1947 सालानंतर जन्माला आलेली माणसेही आम्ही स्वातंत्र्यसैनिक होतो, असे सांगत आहेत. स्वातंत्र्यास 50 वर्षे होऊनही आत्तापर्यंत स्वातंत्र्य लढयामध्ये कोण सहभागी होते, याबाबतची सूची तयार होत नसेल तर ही चिंतेची बाब आहे. निवृत्तीवेतनाची पडताळणी करण्यासाठी एक सदस्यीय पालकर आयोग नेमला गेला. तो केव्हा नेमला ? त्याला किती वर्षे झाली ? हा आयोग निवृत्ती झाल्यानंतर कोणाची तरी व्यवस्था करण्यासाठी आहे का की, लाल दिव्याची गाडी मिळण्यासाठी की, चांगल्या प्रकारच्या सोयी मिळण्यासाठी आहे की, खरेच चांगल्या प्रकारे काम करण्यासाठी केलेली आहे. याबाबत मानीनय मंत्रिमहोदयांनी उत्तर द्यावे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 18, पान क्रमांक 12 वर मी बोलणार आहे. "दिलखुलास" मालिका कार्यक्रम तयार करण्यासाठी आपण 12 लाख 61 हजार रुपयांची तरतूद केली आहे. विविध व्यक्तिच्या मुलाखतीवर आधारित "दिलखुलास" मालिका कार्यक्रम तयार करण्याचे आपण ठरविले आहे. सभापती महोदय, मलाही थोडीशी चित्रपट निर्मितीची माहिती असून त्याबाबतीत मलाही थोडासा अनुभव आहे. या मालिकांचे एपिसोड किती आहेत ? त्यामध्ये डायरेक्टर कोण आहे ? ते कोणाला दिले आहे ? या सर्व प्रश्नांची उत्तरे माननीय मंत्रिमहोदयांनी द्यावीत. कारण, माननीय श्री.गोविंद स्वरुप ज्यावेळी या क्षेत्रामध्ये काम करीत होते, त्यावेळी यामध्ये ठराविक लोकांची मोनोपॉली चालत होती. ज्यांचे कला क्षेत्रामध्ये काम नाही, अशी माणसे त्याठिकाणी येऊन या क्षेत्रामध्ये, विभागामध्ये काम मिळवत होती व अशाप्रकारे पैसे मिळवून निकृष्ट दर्जाच्या मालिका व कार्यक्रम निर्माण करीत होती. त्यामुळे याठिकाणी जे 12 लाख 61 हजार रुपये लागणार आहेत, त्याचे ॲपिसोड किती ? त्याचा विषय काय ? याची माहिती द्यावी.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण...

सभापती महोदय, बाब क्रमांक 106, पान क्रमांक 69 बाबत मी बोलणार आहे. वैशिष्टयपूर्ण कामासाठी मराठवाडयामधील नगरपरिषदांना सहायक अनुदान म्हणून 25 कोटी रुपये ठेवले आहेत. त्यामध्ये वैशिष्टयपूर्ण काम कुठले ? त्याचे नामनिर्देशन करणे अत्यंत आवश्यक आहे. ज्या गोष्टीसाठी आपण 25 कोटी रुपयांची मागणी करीत आहोत, यामध्ये वैशिष्टपूर्ण काम कोणती ? याची माहिती मंत्रिमहोदयांनी द्यावी.

सभापती महोदय, बाब क्रमांक 111, पान क्रमांक 70 वर मी बोलणार आहे. जुळया शहराच्या विकासासाठी ठाणे, पनवेल व उरण तालुक्यात जमीन संपादन करणे, चालू वित्ती वर्षात जुळया शहरांच्या विकासासाठी ठाणे, पनवेल व उरण तालुक्यातील जमीन संपादित करण्यासाठी महसूल विभागामध्ये 12 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. ठाणे, पनवेल, उरण या शहरांचे आपण जुळे शहर करा, त्यांचा विकास करा, आधुनिक काळास अनुरुप सगळया सुखसोयी उपलब्ध करुन द्या. परंतु जे ठाण्यातील एक प्रकरण मी अर्धा तासाच्या माध्यमातून मांडले आहे, त्यासंबंधी मी सांगू इच्छितो की, ठाणे महापालिका क्षेत्रातील कोस्टल रेग्यूलेटरी झोनसंदर्भात सेंटर ऑफ ऑर्थसायन्स याठिकाणी मुंब्रा परिसरातील गायमुखीपासून ऐरोली हद्दीपर्यत काही जमीन होती, रेतीबंदर ते मुंब्रा-कवसाहद्दीतील रहेजा बिल्डर्सची काही जमीन, मुंब्रा परिसरातील खाडीलगतची मित्तल बिल्डर्सची जमीन अशाप्रकारची त्याठिकाणची सगळी जमीन सीआरझेडमध्ये होती. परंतु त्याठिकाणचे सगळे मॅनग्रोव्ह कापून टाकण्यात आले व त्याठिकाणी आफ्रिकन गवत लावण्यात आले. त्याबाबतीत सांगण्यात आले की, याठिकाणी मॅनग्रोव्ह नाहीत. वास्तविक पाहता, जी खारी जमीन असते तेथे नैसर्गिकरित्या खारफुटीचीच वाढ होत असते. यामध्ये कोटयावधी रुपयांचा भ्रष्टाचार ठाण्यामध्ये झालेला असून याची कोणीही चौकशी करत नाही. याठिकाणची पाहणी एका कमिटीने केली व त्या कमिटीने सांगितले की, येथे खार जमीनच आहे आणि कोस्टल सीआरझेडमध्ये रिझर्व्हेशन आहे. त्यामुळे याची चौकशी होणे अत्यंत आवश्यक आहे. ठाणे परिसरातील सगळया लोकांनी, लोकप्रतिनिधींनी या विरोधात आवाज उठवूनही काही निर्माण झालेले नाही. शेतीचा आभास निर्माण करण्यासाठी त्याठिकाणी आफ्रिकन गवताची पैदास करण्यात आली. ठाणे

..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.....

परिसरामध्ये मोठया प्रमाणात ठेंब्रीज, कचरा, घाण टाकण्यात येत आहे. या बाबीसाठी व ठाणे, पनवेल, उरण या परिसराचा विकास करण्यासाठी आपण 12 कोटी रुपयांची तरतूद केली आहे, ती आपण ठेवा. त्याचबरोबर या गंभीर विषयाकडे शासनाने गांभीर्याने पाहणे अत्यंत आवश्यक आहे.

नंतर श्री.रोझेकर...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.....

सभापती महोदय, वित्त विभाग, पान क्रमांक 71 वरील बाबीसंबंधी बोलण्यापूर्वी मला हे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, माननीय वित्तमंत्र्यानी सभागृहाबाहेर इलेक्ट्रॉनिक मिडिया व प्रिंट मिडिया यांना मुलाखत देतांना पुरवणी मागण्यांचा उल्लेख केलेला आहे. या अर्थसंकल्पाला काहीही अर्थ राहिलेला नाही. त्यामध्ये सामान्य प्रशासन विभागामध्ये मूळ मागणीची रक्कम सन 2004-2005 मध्ये 254.97 कोटी होती, पुरवणी मागणी 148.57 कोटी म्हणजे पुरवणी मागणीचे मूळ मागणीशी प्रमाण हे 58 टक्के आहे. मूळ मागणी 42 टक्के व पुरवणी मागणी 58 टक्के आहे. ही बाब अतिशय गांभीर्याने घेणे आवश्यक आहे. सन्माननीय महसूल मंत्री, श्री.नारायण राणे यांनी देखील याचा उल्लेख केलेला आहे. त्याचबरोबर सामान्य प्रशासन विभागाची सन 2005-2006 मध्ये मूळ मागणी 20869.89 होती व पुरवणी मागणी 1357 कोटी रुपये होती. अनुषंगिक कामे असतील, नैसर्गिक अडचण निर्माण झाली असेल तर त्यासाठी पुरवणी मागणी केली जाते. सामान्य प्रशासन विभागाच्या मूळ मागणीचे पुरवणी मागणीशी प्रमाण 47 टक्के आहे. माझ्या माहितीप्रमाणे पुरवणी मागण्यांवरील चर्चेला आणि बिलाच्या चर्चेला वेळेचे बंधन नसते. स्वयंबंधन घालून घेणे हा भाग वेगळा. कायदा करणारे प्रस्ताव आणि राज्याचा अर्थसंकल्प यावर चर्चा करण्यासाठी 74 ते 80 टक्के सन्माननीय सदस्यांनी सहभागी व्हावयास हवे. परंतु येथे मागण्यांवर चर्चा होत नाही. मूळ अर्थसंकल्पाच्या 50 टक्के प्रमाणे पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून अर्थसंकल्प येत असेल आणि त्यावर चर्चा होत नसेल तर ही गंभीर बाब आहे. कालही हा मुद्दा मी उपस्थित केला होता परंतु सन्माननीय अर्थ राज्यमंत्र्यांनी उत्तर दिले नाही. आज या चर्चेच्या अनुषंगाने उत्तर मिळणे आवश्यक आहे. सन 2002-2003 साली मूळ मागणी 64564 कोटी रुपयांची होती, पुरवणी मागणी 10897 कोटी रुपयांची होती आणि एकूण खर्च 61 हजार कोटी झाला होता. 64 हजार कोटी रुपयांची मागणी आणि खर्च 61 हजार कोटी रुपये म्हणजे मूळ मागणीएवढाही खर्च केला नाही. सन 2003-2004 मध्ये मूळ मागणी होती 70140 कोटी रुपये, पुरवणी मागणी होती 19834 कोटी रुपये आणि खर्च झाला 71 हजार कोटी रुपये. मूळ मागणीपेक्षा 1 कोटी रुपये खर्च जास्त केला होता. सन 2004-2005 मध्ये मूळ मागणी 79215 कोटी रुपयांची, पुरवणी

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.....

मागणी 25736 कोटी रुपयांची आणि खर्च केला 76506 कोटी रुपये. मूळ अर्थसंकल्पात मागणी होती 79 हजार कोटी रुपयांची आणि खर्च केला होता 76 हजार कोटी रुपयांचा. मूळ मागणीपेक्षा 3 हजार कोटी रुपये खर्च कमी केलेला आहे. ही अतिशय चिंतेची बाब आहे.

सभापती महोदय, गृहनिर्माण विभागाची बाब क्रमांक 262, पान क्रमांक 189 अंतर्गत राजीव गांधी ग्रामीण गृहनिर्माण योजनेकरिता निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांच्या अधिपत्याखाली गृहनिर्माण खाते आहे. या खात्याने वेगळी गृहनिर्माण योजना जाहीर केलेली आहे. फक्त मुंबई शहरातील एफ.एस.आय.वाढविण्यात आला आहे. 1 एफ.एस.आय.होता तो 1.50 करण्यात आला आहे. उपनगरासाठी 0.75 होता तो 1 करण्यात आला आहे. म्हाडाला 4 एफ.एस.आय.आहे तर सरकारला 4 एफ.एस.आय.का नाही ? कारण आपण जुन्या चाळी पाडून पुर्ननिर्माण करीत असतो आणि मोफत घरे देऊन उरलेल्या जागा लोकांना देत असतो.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण .....

परंतु या नवीन गृहनिर्माण योजनेमध्ये सरसकट 4 एफ.एस.आय. सुचविण्यात आला आहे, 7 एफ.एस.आय. सुचविण्यात आला आहे. माननीय राज्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत. मुंबई शहर हे बेट आहे. एक इंचही जमीन तुम्ही तेथे वाढवू शकत नाही. शास्त्रज्ञांच्या मते मुंबई शहरामध्ये 65 लाख लोक राहू शकतात. सर्व नागरी सुखसोईंनी उपयुक्त असे शहर जर करावयाचे असेल, पायाभूत सुविधा द्यावयाच्या असतील तर या बाबीचा गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. शासनाने जाहीर केलेली मुंबई शहराची लोकसंख्या 1 कोटी 35 लाख आहे. मुंबई शहरामध्ये तुम्ही एफ.एस.आय. वाढविणार आहात. मुंबई शहरामध्ये तुम्ही फॉरेन इन्व्हेस्टमेंट आणणार आहात. मुंबई शहरामध्ये उड्डाण पूल बांधले तरी वाहतुकीची समस्या निर्माण झाली आहे. मुंबई शहरामध्ये लोकांना पदपथावर चालण्यासाठी जागा नाही. मुंबई शहरामध्ये पार्किंग नाही, मुंबई शहरामध्ये खेळाची मैदाने नाहीत, मुंबई शहरामध्ये मनोरंजनाची मैदाने नाहीत (...अडथळा...) डान्सबारची आम्हाला आवश्यकता नाही. तुम्हाला त्याची आठवण का आली ? शिवसेनेच्या मातोश्री कल्बमध्ये वाईट कामे चाललेली नाहीत. तेथे चांगली कामे चालतात. नियम पाळून तेथे सर्व कामे केलेली आहेत. त्या कल्बचा वापर चांगला आहे.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण मुंबई महानगरपालिकेचे सदस्य होते. त्यांना डी.सी. रुल्सची माहिती आहे. डी.सी. रुल्स प्रमाणे अमुक इतक्या लोकसंख्येला मैदान लागते, हॉस्पिटल लागते, वाचनालय लागते या सर्वांची डी.सी. रुल्समध्ये तरतूद आहे. मुंबई शहरामध्ये मैदाने आहेत, क्रीडांगणेही आहेत. अमुक क्षेत्रफळाच्या बिल्डींगमध्ये कार पार्किंग आवश्यक आहे, ही डी.सी. रुल्समध्ये तरतूद आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांना याबाबतची माहिती आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय महसूल मंत्री श्री.नारायण राणेसाहेब देखील अनेक वर्षे मुंबई महानगरपालिकेच्या सभागृहामध्ये होते. सन 1984 मध्ये मुंबईचे डेव्हलपमेंट प्लॅन बदलण्यासाठी जी समिती स्थापन करण्यात आली त्या समितीने कोणते दिवे लावले हे त्यांनाही माहीत आहे आणि मलाही माहीत आहे. किती भूखंड मोकळे केले गेले ? समजा एखादा बंगला असेल तर तेथे गार्डनचे आरक्षण टाकायचे आणि गार्डनचे आरक्षण टाकल्यानंतर सिटी इंजिनिअर, नगरविकास विभागामध्ये फे-या मारायला लावायच्या आणि नंतर

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.....

प्रत्येक चौरस फुटावर सौदा करायचा आणि मग ते रिलीज करायचे. सभापती महोदय, परचेस नोटीस द्यायची, 6 महिने पर्चेस करायचे नाही, तो ॲटम सभागृहामध्ये येऊ द्यायचा नाही आणि मग आपोआप ते सर्व रिलीज करायचे. माझा मुद्दा तो नाही. नगर विकास खात्याने नवीन गृह निर्माण योजना काढलेली आहे. माझी अशी मागणी आहे की, मुंबई शहरामध्ये आता गिरण्याच्या 1/3 जमिनी म्हाडाच्या ताब्यात आल्या आहेत. म्हाडाच्या ताब्यामध्ये असलेल्या जमिनींवर गिरणी कामगारांना घरे बांधून देणार आहोत. आता एकही गिरणी शिल्लक नाही. सर्व गिरण्या 10-20 वर्षापूर्वी बंद पडलेल्या आहेत. गिरणी कामगार देशोधडीला लागलेले आहेत. मग तेथे कोणाला आणणार ? कोणाची नावे नाहीत. म्हणून माझी अशी विनंती आहे की, मुंबई शहरामध्ये एफ.एस.आय. वाढवू नका. उलट आता मुंबई शहरामध्ये 1.33 एफ.एस.आय. आहे तो सुद्धा कमी केला पाहिजे. कारण मुंबई शहरामध्ये 600 दशलक्ष लिटर पाणी कमी मिळते. सुमारे 4 हजार दशलक्ष लिटर पाण्याची आवश्यकता असतांना मुंबई शहरामध्ये 3400 दशलक्ष लिटर पाणी मिळते. मुंबई शहरामध्ये लालबाग, परळ, शिवडी, भायखळा हा जो कामगार एरिया आहे त्या कामगार एरियामध्ये असा दैवदुर्विलास आहे की, उंच टोलेजंग इमारती उभ्या राहिलेल्या आहेत. तेथे प्रत्येक घरातील किचन आणि वॉश बेसिनला पाणी आहे. परंतु त्याच्याच बाजूच्या ज्या चाळी आहेत लालबाग, शिवडी, माटुंगा, सायन, भायखळा, चिंचपोकळी, नागपाडा, गिरगाव या सर्व ठिकाणी तीन फुटावर नळाचा पाईप असेल तर तो खाली आणून तोटी लावून पाणी काढावे लागते. माझी अशी मागणी आहे की, जोपर्यंत मुंबई शहरातील मूळ माणसाला पूर्ण नागरी सुविधांचा फायदा मिळत नाही, उपलब्ध होत नाही तोपर्यंत मुंबई शहरामध्ये टोलेजंग इमारती बांधण्यास परवानगी देऊ नये. मी पुन्हा सांगतो की, मुंबई शहर हे बेट आहे. You canot incrize one inch of land तुम्ही एक इंचही जमीन वाढवू शकत नाहीत. फायर ब्रिगेडच्या दृष्टीने फक्त 22 मीटर पर्यंत पोहोचणा-या शिडया आहेत. जर 30, 40, 50 व्या माळयावर आग लागली, काही अकल्पीत प्रसंग निर्माण झाले तर तुम्ही नागरिकांचे संरक्षण कसे करणार आहात ? तुम्ही फक्त एफ.एस.आय. वाटणार आहात. म्हणून माझी अशी विनंती आहे की, नवीन गृहनिर्माण योजनेतील काही कलमे चांगली आहेत. परंतु यानंतर जर तुम्ही कोणाला वापरायला जमीन देणार असाल तर त्यातील 50 टक्के गृहनिर्माण योजना मध्यमवर्गीयांसाठी केल्या पाहिजे.

यानंतर श्री.सुंबरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

साडेचारशे चौ.फूटापेक्षा जास्त क्षेत्रफळाचे फ्लॅटस् कोणीही बांधू नयेत आणि त्याला 50 टक्के जो सेलेबल एफएसआय असेल तो कोठल्याही प्रकारे बांधता यावा. त्याचप्रमाणे या मुंबईमध्ये जी एसआरए योजना अमलात आणली गेली आहे त्या संदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, या योजनेतून एफएसआय घेतला गेला. त्यातून सेलेबल इमारत बांधली पण तरीही ट्रांझिट कॅम्पमध्ये आमचे लोक अजूनही राहात आहेत. तो एक त्या ठिकाणी भाग आहे. सभापती महोदय, स्व.राजीव गांधींचा येथे उल्लेख केला गेला. राजीव गांधी यांनी 1987 साली मुंबईच्या हौसिंग बोर्डाला 100 कोटी रूपये दिले होते. त्यातून राजीव गांधी निवारा प्रकल्पाच्या इमारती बांधल्या गेल्या. पण धड ना त्या हौसिंग बोर्डाच्या ताब्यात दिल्या गेल्या, ना त्या रिपेअर बोर्डाच्या ताब्यात दिल्या गेल्या. परिणामी 7 कोटी 80 लाख रूपये भाडे कोणी वसूलच करीत नाही. आपले राज्य कर्जबाजारी आहे असे आपण म्हणता ना ? नुसती तुम्ही प्रामाणिकपणे आपला महसूल किंवा अन्य मार्गाने येणारी येणी वसूल करण्याचे ठरविले तरी निम्मे कर्ज या वर्षभरामध्ये आपण फेडू शकाल. सभापती महोदय, या ठिकाणी माझी पुन्हा आग्रहाची मागणी आहे. सन्माननीय महसूल मंत्री श्री.नारायण राणे हे येथे उपस्थित आहेत, त्यांना मी सांगू इच्छितो की, आपण देखील याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. माननीय महसूल मंत्री मालवण मधून निवडून आले असले तरी त्यांच्या राजकीय जीवनाची सुरूवातच या मुंबईमध्ये झालेली आहे. या मुंबई शहरातील मूळ माणसे आज या मुंबईतून देशोधडीला लागली आहेत आणि यापुढे लागणार आहेत. मुंबईतील मराठी माणूस आज देशोधडीला लागणार आहे. आज आपण नवीन इमारती उभ्या करता आहात, नवीन चाळी बांधता आहात, 7-7 मजली इमारती बांधता आहात आणि त्यांना लिफ्ट आहे. त्यामुळे त्याचे मेंटेनन्सचे होणारे अडीच ते तीन हजार रूपये तो गरीब, मध्यमवर्गीय मराठी माणूस कोठून देणार आहे ? जो चाळीतील माणूस, 50-100 रूपये, जास्तीत जास्त 200 रूपये भाडे देत होता तो एवढे मेंटेनन्सचे पैसे देऊ शकणार आहे का ? आमच्या मुंबई शहरामध्ये कंडक्टर, ड्रायव्हर, शाळा मास्तर, पोलीस, पोस्टमन हा या मुंबई शहरामध्ये यामुळे यापुढे राहू शकणार नाही. कारण या नवीन गृहनिर्माण योजनेच्या माध्यमातून तुमची पॉलिसीच अशी येणार आहे की, त्यामुळे गर्भश्रीमंतांना मुंबईमध्ये घर घ्यायला मिळणार आहे आणि सामान्य माणसाला, मूळच्या मुंबईकराला तुमच्या या योजनेमुळे घर घेणे शक्य होणार नाही. आता गृहनिर्माण खात्याला नवीन राज्यमंत्री

..... 3ए 2 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....

आलेले आहेत. त्यांना माझी विनंती आहे की, आपण त्या ठिकाणी जाऊन ट्रांझिट कॅम्पची स्थिती काय आहे ती बघा. आपण मुंबई शहरामध्ये 1960 नंतर एकही कॉलनी निर्माण केलेली नाही. मोतीलाल नगर असेल, जवाहर नगर असेल, अभ्युदय नगर असेल अशी कोठलीही नगरे आपण या शहरात निर्माण केलेली नाहीत. पण त्यावेळच्या कॉंग्रेस पक्षाच्या सरकारने सामान्य माणसासाठी काही चांगली कामे केली होती हे मी प्रामाणिकपणे मान्य करतो. अर्थात त्याचे कारणही तसेच होते. त्याचे मुख्य कारण म्हणजे श्री.वसंतराव नाईक हे 11 वर्षे या राज्याचे मुख्यमंत्री होते. एखादा त्या ठिकाणी गृहनिर्माण मंत्री आला वा शिक्षण मंत्री आला तर तो पाच वर्षे त्या पदावर रहायचा. पण आज तुमचा मुख्यमंत्रीच किती काळ मुख्यमंत्री राहील याची कोणाला खात्री देता येत नाही. त्यामुळे एकाने धोरण आखल्यानंतर पुढच्याकडून ते त्याप्रमाणेच राबविले जाईल याची शाश्वती नसते. आता सन्माननीय श्री.म्हस्के साहेब गृहनिर्माण मंत्री असताना त्यांनी काय योजना आखल्या होत्या आणि कोठल्या कामांना अग्रक्रम दिला होता, त्याला आता नवीन आलेले गृहनिर्माण राज्यमंत्री तोच अग्रक्रम देतील असे नाही. आपण त्या फाईल्स बाजूला ठेवणार आणि आपल्या समोर आपल्या माध्यमातून आपले जे काटे-चमचे आपल्या कार्यालयात येणार आणि ते जे आपल्याला सांगणार त्यांच्याच माध्यमातून आपण कामे करणार. म्हणून मागील गृहनिर्माण मंत्र्यांनी काय आश्वासने दिलेली आहेत ती देखील आपण पाहिली पाहिजेत. शेवटी जाता जात मला असे वाटते की, या मुंबई शहरामध्ये गृहनिर्माण खाते हे अतिशय टची आहे. आज म्हाडा दलालांचा अड्डा झालेला आहे. तेथे एखादा गरीब माणूस गेला तर त्याला कित्येक दिवस दाद दिली जात नाही. त्याला तेथे बाहेर उभे केले जाते. मी आपल्याला उदाहरण देतो. आपल्या अधिकाऱ्यांकडे एखादा नागरिक गेला आणि त्याने सांगितले की, साहेब मला एखाद्या जवळच्या ट्रांझिट कॅम्पमध्ये जागा द्या, माझी जागा लालबागला आहे., तुम्ही मला सायनला पर्यायी जागा द्या. तर तुम्ही त्याला सांगणार की, अशी जागा मिळणार नाही, तुला बोरीवलीला जावे लागेल. तो माणूस लगेच बाहेर आला की, त्याच साहेबाचा शिपाई त्याला म्हणणार की, तुम्हाला सायनला जागा पाहिजे आहे का ? मी तुम्हाला ती मिळवून देतो. त्यासाठी 5 हजार साहेबांचे आणि 5 हजार रूपये माझे असे 10 हजार रूपये द्यावे लागतील. मी मंत्री महोदयांना सांगेन की, तुम्ही वाटल्यास वेष बदलून यावे, कदाचित त्यासाठी आपल्याला आपली मिशी वगैरे काढावी लागेल, कारण आज ती तुमची ओळख

..... 3ए 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे, त्यामुळे तुम्ही लगेच ओळखले जाल. मी हे मजेचा विषय म्हणून सांगत नाही. म्हाडाला तुमच्याच अधिकाऱ्यांनी आणि दलालांनी लुटलेले आहे. त्याला तुमच्या प्रमुख अधिकाऱ्यांनी बदला म्हणून सांगितले तरी मंत्रालयातील तुमचे अधिकारी त्याला बदलत नाहीत. सभापती महोदय, मी या निमित्ताने एक गोष्ट आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, मुंबई शहरामध्ये 289 भूखंड हे रिकामे आहेत, ते नॅरो असल्याने रिकामे आहेत. 1999 साली तत्कालीन म्हाडाच्या मुख्याधिकारी श्रीमती खुल्लर मॅडम यांनी प्रधान सचिव, गृहनिर्माण यांना पत्र लिहिले की, हे सारे नॅरो प्लॉटस् आहेत, ते डीसी रूल्समध्ये बसत नाहीत. शासनाने हा सगळा एफएसआय घ्यावा आणि त्याच्या बदल्यात आम्हाला फायदा द्यावा. पण त्यांच्या त्या पत्राचे अद्यापपर्यंत उत्तर देखील दिले गेलेले नाही. एका आयएएस अधिकाऱ्याने चांगली योजना मंत्रालयात दिली तर 1999 पासून आज 7 वर्षात त्याला साधे उत्तरही दिले जात नाही. सभापती महोदय, या पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून माझी अशी विनंती आहे की, गृहनिर्माण खाते हे अतिशय संवेदनशील खाते आहे, तेव्हा नवीन योजना आखताना त्यातून सर्वसामान्य माणसाला घर कसे मिळेल, त्याला परवडणाऱ्या पैशामध्ये घर कसे मिळेल अशाच प्रकारे योजना आपण आखावी. सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री स्वत: उपस्थित झाले आहेत त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. आपणच त्या ठिकाणी सर्व लोकांच्या सूचना केल्या आणि गृहनिर्माण योजना आखावयास सांगितली. ...

(यानंतर श्री. सरफरे .... 3बी 1 ..

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण....

मी आपले यासाठी अभिनंदन करतो की, आपण एका प्रामाणिक अधिकाऱ्याला श्री. स्वाधीन क्षत्रिय यांना त्याठिकाणी आणले आहे. माझी आपणास विनंती आहे की, आपण नेहमी म्हणता की, अधिकाऱ्यांना तीन ते चार वर्षे आपण त्याठिकाणी ठेवतो. परंतु श्री. कुंटे यांच्यासारखे चांगले अधिकारी 8 महिने राहिले. त्यांना आपण बदलले असे मी म्हणणार नाही, त्यांना प्रशासनाने बदलले. आपण त्याठिकाणी चांगले अधिकारी आणले आहेत. तेव्हा आपली जी काही स्वप्नदर्शी योजना असेल व ती आपल्याला कार्यान्वित करावयाची असेल तर त्यांना आपण एक चौकट आखून द्यावी. आणि त्या चौकटीमध्ये त्यांनी मुक्तपणे, योजनेचे भान ठेवून प्रभावी अंमलबजावणी करावी. योजना भान ठेवून आखावी आणि तिची अंमलबजावणी बेभान होऊन करावी. तसे केले तरच प्रगतीची फळे लवकर आणि विवक्षित वेळेमध्ये आपल्याला चाखायला मिळतील. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकोसे (नामनियुक्त) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेतांना बाब क्रमांक 109, 110 व 111 व पृष्ठ क्रमांक 69, 70 वरील मागण्यासंबंधी माझे विचार मांडणार आहे. आज मुंबई शहरामधील गिरण्या बंद झाल्या आहेत, त्याठिकाणी मोठमोठया इमारती उभ्या राहिल्या आहेत. खेळाचे मैदान शिल्लक राहिले नाही. विरार आणि वसईच्या खेडेगावामध्ये राहणाऱ्या लोकांना त्या भागामध्ये नवीन उद्योग सुरु झाले पाहिजेत म्हणून 16 वर्षापासून ते मागणी करीत आहेत. त्याकरीता मंत्रालयातील संबंधित विभागाच्या प्रधान सचिवांना वारंवार भेटून ते थकून गेले. त्यांनी त्या भागामध्ये औद्योगिक बेल्ट तयार करावे म्हणून मागणी केली. ठाणे जिल्हयामध्ये ज्या ज्या गावामध्ये पठारी जागा असेल तेथील शेतकरी आपल्या जमिनी उद्योग सुरु करण्यासाठी देत आहेत, त्यांना शासनाने मंजूरी दिली पाहिजे. ज्या जमिनीमध्ये काहीही उगवत नाही. डांबराच्या रस्त्यावर गव्हाचे पिक घ्यावयाचे काय? आमच्या जमिनीवर उद्योग सुरु करण्याकरीता परवानगी नाही परंतु तबेले बांधण्यासाठी शासनाने परवानगी दिली आहे, फ्लॅट बांधण्यासाठी परवानगी दिलेली आहे. जर त्याठिकाणी उद्योगधंदे सुरु केले नाहीत तर त्या ठिकाणी बांधण्यात आलेल्या फ्लॅटमध्ये कोण रहावयास जाणार आहे? हा प्रश्न शासनाकडे 16 वर्षापासून प्रलंबित आहे. म्हणून जर आपल्याला तेथील लोकांच्या शेतीचा विकास करावयाचा असेल तर त्यांच्या प्रश्नामध्ये लक्ष घालावे अशी विनंती करतो. आज तरुण बेरोजगारांना नोकऱ्या नाहीत म्हणून ते आमदार निवासामध्ये येऊन रहातात. जर त्या भागामध्ये उद्योगधंदे सुरु झालेतर बेरोजगारांना नोकऱ्या मिळतील व त्याचा फायदा स्थानिक लोकांना व बेरोजगारांना होईल.

सभापती महोदय, महसूल विभागाच्या बाब क्रमांक 52, 53 व 54 वर आणि पृष्ठ क्रमांक 31, 32, 33, 34 व 35 वर बोलणार आहे. नाशिक मधील मालेगाव येथे झालेले बॉम्बस्फोट आणि दिनांक 11 जुलै 2006 रोजी मुंबईमध्ये झालेले बॉम्बस्फोट, मुसळधार पाऊसामुळे नैसर्गिक आपत्तीमध्ये जीवितहानी झाली, पावसाच्या पाण्यामध्ये टेंम्पो आणि रिक्शा वाहून गेल्या. अशावेळी शासनाने त्यांना मदतीचा हात दिलेला आहे. त्याकरीता पुरवणी मागण्यांव्दारे मागितलेली रक्कम ही रास्त व योग्य आहे असें मला वाटते. त्याबाबत मी शासनास धन्यवाद देतो. त्यानंतर बाब क्र. 47 व पृष्ठ क्रमांक 32 वर कोतवालांच्या भरतीसाठी निधी लागणार आहे. याबाबत माझा असा प्रश्न आहे की, नागपूर विभागामध्ये उपजिल्हाधिकारी, तहसिलदार, नायब तहसिलदार यांची बरीच पदे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकोसे...

रिक्त आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांची कामे वेळेवर होत नाहीत. त्याकरीता शासनाने ही रिक्त पदे त्वरीत भरण्याची कार्यवाही करावी.

सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण विभागाच्या बाब क्रमांक 285, 286, 287 व 288 आणि पृष्ठ क्रमांक 212, 213 व 214 वरील मागण्यांवर माझे विचार मांडणार आहे. नागपूर येथे आशियातील सर्वात मोठे एक सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल आहे. त्याठिकाणी डॉक्टर्स नाहीत. प्रामुख्याने किडनी तज्ज्ञ, हृदय रोग तज्ज्ञ डॉक्टर्स नाहीत. पुरेशी नर्सेसची व्यवस्था नाही. चार वर्षापासून आम्ही सारखी मागणी करीत आहोत, परंतु त्याठिकाणी पाहिजे तशी मशिनरी दिलेली नाही.

(यानंतर श्री. किल्लेदार)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश निकोसे (पुढे सुरू...

अतिशय दु:खाची गोष्ट आहे की, आयुर्वेद महाविद्यालयामध्ये पाचच पेशंट आहेत. 40 लिटर दूध त्या ठिकाणी मिळते. हे सगळे दूध त्या ठिकाचे डॉक्टर आपल्या घरी घेऊन जातात. उरलेले दूध विकतात. त्या ठिकाणी औषधाची व्यवस्था नाही. संबंधित माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, आपण माझ्या सोबत त्या ठिकाणी भेट द्यावी आणि निरीक्षण करावे. शासकीय आयुर्वेद महाविद्यालय नागपूर या ठिकाणी डॉ. श्रीमती विजया मोडक या मागासवर्गीय डॉक्टर काम करतात. त्यांनी त्या ठिकाणचा भ्रष्टाचार उघडकीस आणला त्यामुळे त्यांना निलंबित केलेले आहे. त्यांना कामावर घेण्यात आलेले नाही. आयुर्वेदिक संचालक श्री.अब्दुल वहिद आणि डॉ. जॉन हे गेली 14 वर्षे एकाच ठिकाणी आहेत. तेच भ्रष्टाचाराला जबाबदार आहे. आयुर्वेद महाविद्यालयामध्ये फक्त पाचच पेशंट आहेत. माझी विनंती आहे की, त्या ठिकाणच्या डॉक्टरांना इतर ठिकाणच्या रुग्णालयामध्ये पाठवावे, ही व्यवस्था दुरुस्त करावी. डॉ. विजया मोडक यांना जाणूनबुजून निलंबित करण्यात आलेले आहे. नागरी सेवा शर्तीप्रमाणे विभागीय चौकशी आपण करीत असतो. सहा महिन्याच्या आत चौकशी करावी असा जी.आर. आहे. त्या दोषी असतील तर त्यांचे एक वेतनवाढ रोखून त्यांना कामावर घ्यावे. काल मी या विषयावर बोललेलो आहे. या विभागाचे सचिव डॉ. सिंग यांनाही मी भेटून आलो. मंत्री महोदय म्हणतात की, हे माझ्या कक्षेत येत नाही, ते सार्वजनिक आयोग्य विभागाकडे आहे. असे असले तरी त्याबाबतची नोंद घ्यावी. डॉ. विजया साळवी या जिल्हा हिपताप अधिकारी आहेत. त्यांनी परिपत्रकाप्रमाणे रिक्त पदे भरली म्हणून कारवाई केली. रिक्त पदे भरली नाही तर फौजदारी कारवाई होईल अशाप्रकारचा जी.आर होता त्याप्रमाणी हिवताप कर्मचाऱ्यांची भरती करण्यात आली. अकोला, रायगड, सिंधुदूर्ग, रत्नागिरी, सांगली, सातारा, जळगाव, अमरावती इत्यादी ठिकाणी भरती झाली. संबंधित संचालक, उपसंचालक यांनी ज्या नियुक्त्या केल्या त्या बरोबर होत्या. महाराष्ट्रामध्ये दोनच मागासवर्गीय महिला डॉक्टर्स आहेत. त्यातील डॉ. विजया मोडक यांना सस्पेंड केले. त्यांचा बी.पी. वाढला. त्या सकाळी माझ्याकडे आल्या आणि माझ यासाठी काही तरी करा, सहा महिने झालेले आहेत, मी दोषी नाही असे त्या म्हणाल्या. त्यांनी अर्ज दिलेला आहे. श्री. सिंग साहेबांना विनंती केली की, याबाबत विचार करावा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ KGS/ MHM/ KTG

श्री. रमेश निकासे .....

सभापती महोदय, यानंतर गृह विभागाच्या पृष्ठ क्रमांक 191 वरील बाब क्रमांक 262 बाबत मी बोलू इच्छितो. भंडारा जिल्ह्यामध्ये माझी सासुरवाडी आहे. श्री. ताराचंद साकरे यांची जमीन म्हाडाने 20 वर्षाच्या अगोदर हस्तांतरीत केली. शासनाकडें पैसे जमा केले. ते पैसे त्याने घेतलेले नाहीत. त्या जागेवर आता अतिक्रमण होत आहे. झोपड्या बांधलेल्या आहेत. सव्वा एकर जमीन शिल्लक आहे. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाप्रमाणे ही जमीन त्याला देता येत नाही.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकोसे ....

येथील विभागीय अधिकाऱ्यांनी लिहिले की, याच्या अगोदर श्री. बांबोर्डे नावाच्या इसमाला जमीन परत करण्यात आली आहे त्याच नियमाप्रमाणे यांना परत करण्यात यावी. मी श्री. क्षत्रिय साहेबांना धन्यवाद देतो. मी त्यांच्याकडे गेलो. त्यांनी विचारले की, त्यांनी पैसे घेतले आहेत काय ? त्यांनी पैसे घेतलेले नाहीत असे मी त्यांना सांगितले. त्यांनी सांगितले की, कर्नाटकच्या बाबतीत सुप्रीम कोर्टाचा जो आदेश आहे तो ज्यांनी पैसे घेतले असतील त्यांच्यासाठी आहे. ज्यांनी पैसे घेतले नसतील त्यांच्यासाठी तो आदेश लागू नाही. त्यांनी पुन्हा हे प्रकरण तपासणीसाठी पाठविले. मी त्यांना धन्यवाद देतो. वेळ कमी असल्यामुळे जास्त बोलता येत नाही. सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपल्या धन्यवाद देतो आणि एक शेर सांगून मी माझे दोन शब्द संपवितो. मैं एक गरीब व्यक्ति हूं. महाराष्ट्र के मुख्यमंत्री ने (जोहरी ने) मुझे पहचाना और इस गरीब इंसान को महाराष्ट्र की विधान परिषद में बैठाया.

वक्त की आँधी में जहॉ बदल जाता है,
उम्र की राह में इंसान बदल जाता है
कसूर मैंने नहीं किया, रोटी की कसम,
इस भूख की दुनिया में ईमान बदल जाता है.

उपसभापति महोदय, मैंने ईमान नहीं बदला. आपने मुझे हमेशा ही बोलने के लिये ज्यादा समय दिया है. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी से मैं एक ही तो सदस्य बोलता हूं.

उपसभापति : माननीय श्री निकोसे जी, आपने इतना अच्छा शेर सुनाया. मैं यहां बैठा हूं इसलिए मुझे भी लगा कि मैं भी एक शेर सुनाऊं.

यारों किसी कातिल से कभी प्यार न मांगो
अपने ही गले के लिए तलवार न मांगो.

श्री. रमेश निकासे : सभापती महोदय, वेळे अभावी मी माझे भाषण येथेच थांबवितो. धन्यवाद.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील (सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, या पुरवणी मागण्यांवर बोलण्याची आपण मला संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

परिवहन विभागाच्या बाब क्रमांक 35 बाबत मी बोलणार आहे. सोलापूर शहरातील प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या इमारतीसाठी जवळपास दीड कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. ते काम मार्च, 2007 अखेर पूर्ण करावे असे आदेश होते. ते काम जानेवारी महिन्यातच पूर्णत्वास येणार आहे. रस्ते, इमारत ही सगळी कामे पूर्ण झाल्यानंतर फर्निचरसाठी थोडासा निधी आवश्यक आहे. फर्निचर पूर्ण झाल्याशिवाय त्या ठिकाणी कार्यालय कार्यान्वित होऊ शकणार नाही. मी आपल्यामार्फत शासनाला विनंती करतो की, फर्निचरसाठी 50-51 लाख रुपयांचा निधी आवश्यक आहे. तो निधी देऊन ते काम पूर्णत्वास न्यावे अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

...3...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, या पुरवणी मागण्यांच्या संदर्भात अत्यंत अल्प वेळेमध्ये मी माझे म्हणणे व्यक्त करणार आहे. पृष्ठ क्रमांक 8 वरील बाब क्रमांक 9 यामध्ये महाराष्ट्राचे सुप्रसिध्द कवी व गीतकार दिवंगत ग. दि. माडगुळकर यांचे स्मारक त्यांच्या सांगली जिल्ह्यातील शेटफळे या जन्मगावी उभारण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. हे स्मारक लवकरात लवकर व्हावे आणि आपणा सर्वांच्या उपस्थितीमध्ये लवकरात लवकर त्याचे उद्घाटन व्हावे अशी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 9 वरील बाब क्रमांक 10 यामध्ये नागपूर उड्डाण क्लब पुन्हा सुरु करण्याच्या संदर्भात तरतूद केलेली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांना माहीत आहे की, पूर्वी नागपूरमध्ये फ्लाईन्ग क्लब होता. कालांतराने तो क्लब बंद पडला. तो क्लब का बंद पडला याची कल्पना नाही. आता त्या फ्लाईन्ग क्लबचे पुनरुज्जीवन करण्याचा निर्णय माननीय मुख्यमंत्र्यांनी घेतलेला आहे. त्यासाठी जी पदे लागणार आहेत ती कंत्राटी पध्दतीने घेणार आहेत. त्यासाठी 81 लाख 60 हजार रुपयांची तरतूद केली आहे त्याबद्दल शासनाला धन्यवाद देतो.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 11 वर बाब क्रमांक 16 मध्ये स्वातंत्र्य सैनिकांना निवृत्तिवेतन देण्यासाठी अतिरिक्त तरतूद करण्यासाठी पुरवणी मागणी करण्यात आलेली आहे. स्वातंत्र्य सेनानी पद्मविभूषण गोविंदभाई श्रॉफ यांच्या नावाने औरंगाबादमध्ये प्रतिष्ठान निर्माण करण्यात आले आहे. या संस्थेतर्फे समानता व स्वातंत्र्य या मूल्यांच्या जपणुकीच्या दृष्टीने कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहे. त्यासाठी औरंगाबाद शहरामध्ये मराठवाडा विकास विषयक अभ्यास संस्था स्थापन करण्याचे ठरविले आहे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यासाठी 10 लाखाची तरतूद करण्यात आलेली आहे. त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो, शासनाचे अभिनंदन करतो.

नगरविकास विभागाच्या पृ.क्र.69 वरील बाब क्रमांक 108 मध्ये खानदेश विकास कार्यक्रमांतर्गत योजनांतर्गत वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी, नगरपरिषदांना मदत करण्यासाठी, विकासकामे करण्यासाठी 8.51 कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. पण आमच्या खानदेशातील नगरपरिषदांची संख्या आणि विकासाची आवश्यकता लक्षात घेतली तर 8.51 कोटीची तरतूद पुरेशी नाही असे मला वाटते. त्यामध्ये आणखी वाढ करण्यात आली तर खानदेशातील जेवढ्या नपगरपरिषदा आहेत त्यांना उत्कृष्ट कामे करता येतील.

सभापती महोदय, विधी व न्याय विभागाच्या पृ.क्र. 139 वरील बाब क्रमांक 182कडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो. मुंबईतील उच्च न्यायालय आणि औरंगाबाद खंडपीठ याठिकाणी काही सुविधा करण्यासाठी जी पूरक मागणी करण्यात आलेली आहे ती अत्यंत योग्य आहे. मी यापूर्वीही या सभागृहामध्ये सांगितलेले आहे की, औरंगाबाद उच्च न्यायालयामध्ये श्री. माधव सरोसे आणि श्री.लांडगे हे दोन मागासवर्गीय तरुण लिपिक म्हणून कामाला होते. परंतु त्यांच्या जागा अतिरिक्त ठरवून त्यांना सेवेतून मुक्त करण्यात आले. नंतर ते मॅटमध्ये गेले. मॅटने असा निर्णय दिला की, जेव्हा जागा निर्माण होतील तेव्हा या दोघांना कामावर घ्यावे. त्यानंतर जागा निर्माण झाल्या असूनही अद्यापपर्यन्त त्यांना कामावर घेण्यात आलेले नाही. हे दोन दलित वर्गातील तरुण बेरोजगार झालेले आहेत. त्यांच्या तोंडातील भाकरी हुसकावून घेण्यात आलेली आहे. तेव्हा श्री.माधव सरोसे आणि श्री. लांडगे या तरुणांना परत सेवेमध्ये घेण्यासंबंधी ताबडतोबीने कार्यवाही करावी अशी मी माननीय मुख्यमंत्री महोदयांना विनंती करतो.

गृहनिर्माण विभागाच्या पृ.क्र.191 वरील बाब क्रमांक 262 अंतर्गत राजीव गांधी ग्रामीण गृह निर्माण योजना कार्यक्रमासाठी 1.35 कोटीची तरतूद केलेली आहे. दारिद्र्य रेषेखालील, कमी उत्पन्न गटातील आणि अनुसूचित जातीच्या व्यक्तीसाठी प्रत्येक लाभार्थीला 28500 रु. इतकी अनुदानाची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे दारिद्र्य रेषेखालील, कमी उत्पन्न गटातील, अनुसूचित जातीमधील जी गरीब मंडळी आहेत त्यांना निश्चितच लाभ मिळेल आणि त्यांना चांगली

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

घरकुले प्राप्त होऊ शकतील. शासनाने हा जो कार्यक्रम हाती घेतलेला आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो.

महसूल व वन विभागाच्या पृ.क्र. 41 वरील बाब क्रमांक 67 अंतर्गत वन पर्यटनाच्या संदर्भात करण्यात आलेली पूरक मागणी अत्यंत महत्वाची आहे. आपल्या राज्यामध्ये वेगवेगळ्या पर्यटन स्थळांचा विकास करण्याची आवश्यकता आहे. मग ती धार्मिक पर्यटन स्थळे असोत वा वन पर्यटन स्थळे असोत. राज्यातील वन पर्यटनास उत्तेजन देण्यासाठी नागझिरा आणि भिमाशंकर अभयारण्यात विविध विकास कामे करण्यासाठी तरतूद केलेली आहे. एकूणच राज्यातील वन पर्यटनास उत्तजेन आणि चालना देण्यासाठी अशा प्रकल्पांकडे शासनाने लक्ष देण्याची गरज आहे.

नियोजन विभागाच्या पृ.क्र. 186 बाब क्रमांक 260मध्ये वैधानिक विकास मंडळाने मान्यता दिलेल्या इमारती, रस्ता व पूलांच्या बांधकामासाठी अतिरिक्त तरतूद करण्यात आलेली आहे. विदर्भ वैधानिक विकास मंडळाच्या माध्यमातून इमारती, रस्ते, हॉस्पिटल्स अशा प्रकारच्या विकास कामासाठी 7 कोटी 53 लाख 6 हजार रु.ची तरतूद करण्यात आलेली आहे. मराठवाडा वैधानिक विकास मंडळासाठी 2 कोटी 36 लाख 80 हजाराची तरतूद करण्यात करण्यात आलेली आहे. या दोन्ही वैधानिक विकास मंडाळासाठी एकूण 9 कोटी 89लाख 86 हजार रु.ची तरतूद करण्यात आलेली आहे. ही तरतूद पुरेशी नाही. या तरतुदीमध्ये वाढ करण्याची आवश्यकता आहे.

ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या पृ.क्र.157 वरील बाब क्रमांक 207 अंतर्गत विदर्भ पाणलोट विकास मिशन स्थापन करण्यासाठी 100 कोटीची पूरक मागणी करण्यात आलेली आहे.

.....नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

ज्याप्रमाणे स्वतंत्र विदर्भ पाणलोट विकास मिशन स्थापन करण्यासाठी तरतूद केली आहे त्याप्रमाणेच आमच्या कोकणासाठी देखील अशा प्रकारचे विशेष पाणलोट विकास मिशन स्थापन करण्याचा विचार व्हावा, याकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो.

सभापती महोदय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, पृ.क्र.175, बाब क्र.235 पुरातत्वशास्त्र व वस्तू संग्रहालय विभागाच्या आस्थापनेवर नवीन पदे निर्माण करण्यासाठी तरतूद केलेली आहे. संस्कृती, साहित्य, कला, राजकारण, समाजकारण, शिक्षण या सर्व दृष्टीने हा विभाग अत्यंत महत्वाचा आहे. त्यादृष्टीने केलेली तरतूद निश्चितच योग्य आहे. त्या माध्यमातून पुरातत्वशास्त्र व वस्तू संग्रहालयाचे उत्कृष्ट पध्दतीने जतन व विकास होईल असे मला वाटते.

सभापती महोदय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, पृ.क्र.147, बाब क्रमांक 192 अन्वये बाल कामगार प्रथेचे उच्चाटन करण्यासाठी कामगार आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एका कृती दलाची निर्मिती करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. बाल कामगारांना मुक्त करणे, त्यांचे पुनर्वसन करणे, त्यांच्या निवासाची व भोजनाची व्यवस्था करणे यासाठी टास्क फोर्स निर्माण करण्यात येणार आहे, याची अत्यंत आवश्यकता आहे. या तरतुदीमुळे हा टास्क फोर्स अधिकाधिक सक्षम होईल, मुंबईतील नव्हे तर संपूर्ण राज्यातील बाल मजुरांची अवस्था अत्यंत दुर्दैवी आहे. त्या प्रथेला आळा घालण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, पृ.क्र.147, बाब क्र.193 मध्ये गोंदिया जिल्हयातील विडी कामगारांसाठी केंद्र सरकारने पुरस्कृत केलेल्या घरकुलांचे बांधकाम करण्यासाठी सुधारित एकात्मिक गृहनिर्माण योजना अत्यंत महत्वाची आहे. भंडारा आणि गोंदिया जिल्हयामध्ये, विशेषत: भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि नागपूर जिल्हयामध्ये विडी वळण्याचे काम मोठया प्रमाणात करणाऱ्यांची स्थिती आरोग्याच्या दृष्टीने, राहण्याच्या दृष्टीने अत्यंत दयनीय आहे. विशेषत: मागासवर्गीय, दलित, अल्पसंख्याक, आदिवासी समाज या व्यवसायामध्ये आहे. गरीब मागासवर्गीय समाज असल्यामुळे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत आहे अशी भावना निर्माण होते. केंद्र सरकारने ही योजना आणली. त्या माध्यमातून राज्य सरकार गोंदिया जिल्हयातील विडी कामगारांसाठी चांगल्या प्रकारची घरे निर्माण करणार आहे त्याबद्दल शासनाचे अभिनंदन करतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.....

सभापती महोदय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग पृ.क्र.176, बाब क्र.237 अन्वये कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्वाभिमान योजनेंतर्गत अनुसूचित जाती, दारिद्र्य रेषेखालील शेतकऱ्यांना पॉवर ट्रीलरचा पुरवठा करण्यासाठी 100 टक्के सहाय्य अनुदान देण्याकरीता पूरक मागणी सादर करण्यात आली त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो.

पृ.क्र.177, बाब क्रमांक 240 अन्वये व्यावसायिक पाठ्यक्रमामध्ये सरकारी कोट्यातून प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांची फी, परीक्षा फी यांची पूर्ती करण्यासाठी तरतूद केली आहे. ही तरतूद स्वागतार्ह आहे. मी आपल्या माध्यमातून राज्याचे प्रमुख माननीय मुख्यमंत्री यांच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व ओबीसी समाजाच्या विद्यार्थ्यांना शाळा कॉलेजमध्ये प्रवेश घेताना अगोदर त्यांच्याकडून फी वसूल केली जाते. फ्री शीपचा फॉर्म भरल्यानंतर फी वसूल केली जाते. परंतु ते विद्यार्थी गरीब असल्यामुळे फी देऊ शकत नाहीत. संस्था चालक सांगतात की, ग्रँट आल्यानंतर फी परत केली जाईल. परंतु ग्रँट आल्यानंतर सुध्दा फी परत केली जात नाही. यासाठी सरकारी कोट्यातून प्रवेश देताना कोणतीही फी घेतली जाणार नाही, कारण शासन रिएम्बर्स करीत असल्यामुळे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व ओबीसी समाजाच्या विद्यार्थ्यांची प्रवेश फी घेतली जाऊ नये यादृष्टीने दक्षता घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, पृ.क्र.178, बाब क्र.243 अन्वये क्रांतीवीर लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाला 31 मार्च, 2007 पर्यंत मुदतवाढ देण्यासाठी तरतूद केलेली आहे त्याबद्दल मी अभिनंदन करतो. क्रांतीवीर लहुजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाच्या माध्यमातून मातंग समाजाच्या ज्या समस्या आहेत त्या सोडविण्यासाठी निश्चित मदत होईल. हा निर्णय घेतल्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो.

(नंतर श्री.जुन्नरे...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.जोगेंद्र कवाडे ..... (पुढे सुरु)

माननीय सभापती महोदय, मी आपल्यामार्फत सामाजिक न्याय विभागाच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, महात्मा फुले- राजर्षि शाहू- डॉ.बाबासाहेब आंबेडकर ग्रंथ प्रकाशन समिती ही ग्रंथांचे प्रकाशन करत असते, त्याकरिता दरवर्षी बजेटमध्ये किंवा पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद केली पाहिजे. या पुरवणी मागण्यामध्ये तरतूद केलेली दिसत नाही, या समितीची अवस्था वर्णन करण्यासारखी नाही. तरीसुध्दा ही समिती चांगले काम करीत आहे. कोणत्याही प्रकारच्या अलाऊंसेसची अपेक्षा न करता काम करीत आहे. माझी सूचना आहे की, महात्मा फुले, राजर्षि शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ग्रंथ प्रकाशनासाठी अगोदर वेगवेगळया समित्या होत्या, सर्व ग्रंथ प्रकाशन समित्या वेगवेगळया होत्या. या सर्व समित्यांना क्लब करण्यात आले असून महात्मा फुले, राजर्षि शाहू महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर ग्रंथ प्रकाशन समिती कायम करण्यात आली आहे. या समितीचे स्वरुप कायम असले पाहिजे. विशिष्ट प्रकारच्या निधीची तरतूद दरवर्षी बजेटमध्ये करण्याची गरज आहे. त्या दृष्टीने ही बाब आपल्या निदर्शनास आणू देत आहे.

पृष्ठ क्रमांक 181, बाब क्रमांक 252 : ही आपल्या राष्ट्राच्या दृष्टीकोनातून अत्यंत महत्वाची तरतूद आहे. आपल्या राज्यामध्ये निराश्रीत वृध्द व्यक्ती आहेत. ग्रामीण भागामध्ये भूमिहिन वृध्द शेतमजूर आहेत, त्यांना वार्धक्य वेतन देण्यासाठी भारत सरकारने 97 कोटी 44 लाख रुपये राज्यशासनाला दिलेले आहेत. या संदर्भात मला एवढे सांगावयाचे आहे की, राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या वतीने शासनाच्या मदतीतून आम्ही विशिष्ट अभ्यास दौऱ्यासाठी स्वित्झर्लंड येथे गेलो होतो. तेथे 60 वर्षाच्या वरील जेष्ठ नागरिकांच्या पालन पोषणाची जबाबदारी सरकारची असते. त्यांना कोणाकडे हात पसरावा लागत नाही. आपल्याकडे वेगळया अडचणी आहेत. प्रश्न लोकसंख्येचा नाही. लोकांची व सरकारची नियत चांगली पाहिजे. राज्यसरकारचे धोरण उत्कृष्ट आहे. आपल्या राज्यातील निराश्रीत आणि वृध्द व्यक्तींना शासन मदत करील अशी अपेक्षा व्यक्त करतो व वरील बाबींसाठी शासनाने तरतूद करावी अशी मागणी करतो.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जोगेंद्र कवाडे ..... (पुढे सुरु)

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 167 बाब क्रमांक 228 : अन्न व नागरी पुरवठा विभाग, ग्राहक संरक्षण विभाग यामध्ये अंत्योदय अन्न योजनेच्या संदर्भात जी तरतूद करण्यात आली आहे, ती अत्यंत महत्वाची आहे. अंत्योदय अन्न योजनेतील तुट भरुन काढण्यासाठी आहे. ही केंद्र सरकारने पुरस्कृत केलेली योजना आहे. या योजनेअंतगर्त अत्यंत गरीब व्यक्तींना, कुटुंबांना तीन रुपये प्रतीकिलो या दराने तांदूळ आणि दोन रुपये प्रतिकिलो दराने गहू देण्यात येत आहेत. आमच्या राज्यातील गरीब जनतेला निश्चितपणे या योजनेचा चांगला उपयोग होईल असे मला वाटते. एवढे बोलून मी आपली रजा घेतो व आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल धन्यवाद.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : बाब क्रमांक 111 पान क्रमांक 70 यामधील मोजक्या बाबीवर बोलणार आहे. जुळया शहरांच्या विकासाठी योजनेचा उल्लेख केला आहे. ठाणे, पनवेल, उरण भागातील जमीन संपादनासाठी 12 कोटींची तरतूद करण्यात आली आहे. सभागृहात एस.ई.झेड. बाबत चर्चा झालेली आहे. या जमीन संपादन करण्याच्या खर्चासाठी महसूल व वन विभागाखालील 2059 सार्वजनिक बांधकामे या खालील केलेल्या खर्चाच्या समायोजनाच्या प्रयोजनार्थ अतिरिक्त नियतव्यय मंजूर करण्याचे ठरविण्यात आले आहे.

..... यानंतर श्री.जुन्नरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

सभापती महोदय, एसईझेडसाठी आपण जी जमीन घेत आहात ती जमीन आपण नक्की कोणत्यचा कामासाठी घेत आहात याचीही माहिती या ठिकाणी देण्याची आवश्यकता आहे. आपण मागच्या दाराने चोर वाट शोधून त्यासाठी 12 कोटी रुपयांची तरतूद कशासाठी केलेली आहे हे आम्हाला काही समजत नाही. मूळ एसईझेडमध्ये 65 टक्के व्यवसाय हे कोअरसाठी होते तर 35 टक्के व्यवसाय हे नॉन कोअरसाठी होते परंतु यामध्ये आपण बदल करुन आता 65 टक्के व्यवसाय नॉन कोअरचे तसेच 35 टक्के व्यवसाय कोअरसाठी केलेले आहेत. शासनाने ही भूमिका का बदलली हे आम्हाला काही समजत नाही. त्यामुळे यासंदर्भात उत्तर देण्याची आवश्यकता आहे. यामध्ये धोरणात्मक बदल करण्यात आलेला असल्यामुळे याची माहिती सभागृहाला मिळण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, मी आता बाब क्रमांक 190, पृष्ठ क्रमांक 142 वरील विधि व न्याय विभागाच्या संदर्भात माझे विचार व्यक्त करणार आहे. धर्मादाय आयुक्तांच्या कार्यालयात वाहन चालकांची 6 पदे निर्माण केली जाणार आहेत. माझ्याकडे यासंदर्भात हायकोर्टाचे आदेश आहेत. मला आश्चर्य वाटते की, मुंबईमध्ये आजमितीस धर्मादाय संस्थे अंतर्गत मुंबई कायदा 1950 नुसार एकूण 4,17,240 न्यास नोंदणीकृत आहेत. सभापती महोदय, 1860 च्या कायद्यान्वये 3,48,371 नोंदणीकृत न्यास झालेले आहेत. शासनाच्या प्रचलित निकषानुसार एका निरिक्षकाने 12 निरीक्षणे आणि 7 चौकशा करणे आवश्यक आहे. सभापती महोदय, 1993 मध्ये 1,497 तसेच 1994 मध्ये 32,413 प्रकरणे प्रलंबित होती. सद्यस्थितीत 81,329 प्रकरणे प्रलंबित आहेत. धर्मादाय संस्थांमध्ये वाहन चालकांची किमान 88 पदे भरावित यांसदर्भात माननीय हायकोर्टाने 28 सप्टेंबर रोजी निर्देश दिल्यानंतर सुध्दा आज तागायत 88 वाहन चालकांची पदे भरण्याच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची तरतूद करण्यात आलेली नाही. या ठिकाणी केवळ अधिका-यांच्या सहा वाहनावरील चालकांसाठीच तरतूद करण्यात आलेली आहे. अधिका-यांच्या वाहनांना चालक मिळू नये असे आमचे म्हणणे नाही. परंतु मळ जे काम आहे त्या कामासाठी आवश्यक त्या चालकांची पदे भरणे आवश्यक असतांना त्याकडे शासन दुर्लक्ष करीत आहे. म्हणून माझी विनंती आहे की, शासनाने न्यायाच्या कामासाठी जी 88 पदे आवश्यक आहेत, तसेच 88 वाहन चालकांची पदे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

भरण्याच्या संदर्भात हायकोर्टाने जे आदेश दिलेले आहेत त्या आदेशा प्रमाणे वाहन चालकांची पदे भरावीत अशी विनंती आहे.

सभापती महोदय, मी आता बाब क्रमांक 194, पृष्ठ क्रमांक 149 वरील, सवलतीच्या दराने वीज पुरवठा यासंदर्भात माझे विचार व्यक्त करणार आहे. सवलतीच्या दराने वीज पुरवठा करण्यासाठी शासनाला 1706 कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागतो. 1706 कोटी पैकी 1100 कोटी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, मुळा -प्रवरा, वीज सहकारी संस्था, श्रीरामपूर, मुंबई वीज पुरवठा व परिवहन कंपनी आणि रिलायन्स एनर्जी लि. हया यंत्रमाग व कृषिविषयक ग्राहक यांना सवलतीच्या दराने विजेचा पुरवठा करतात म्हणून 1706 कोटी रुपये एवढया रकमेचा तोटा झालेला आहे असे म्हटले आहे. परंतु मला सांगावयाचे आहे की, आमचे शासन असतांना मुळा, प्रवरासाठी 300 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले होते. त्यामुळे या 4 संस्थाना प्रत्यक्षात किती रक्कम देण्यात येणार आहे?

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.विनोद तावडे)

श्री.अरविंद सावंत.....

यातील रिलायन्स आणि बेस्ट कोणत्या कृषि व यंत्रमाग संस्थांना सहाय्य करतात त्याची माहिती मंत्रिमहोदयांनी उत्तरामध्ये द्यावी. खास करुन ज्या ठिकाणी रिलायन्स वीज पुरवठा करते त्याठिकाणी कृषि व यंत्रमाग संस्था किती आहेत याची माहिती मंत्रिमहोदयांनी द्यावी.

बाब क्रमांक 227- पृष्ठ क्रमांक अन्न व नागरी पुरवठा विभाग - दारिद्रय रेषेखालील योजने अंतर्गत तांदूळ व गहू देण्यात येतो. सभापती महोदय, आपण कोकणातील आहात. आपणास कोकणातील लोकांच्या व्यथा माहीत आहेत. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यात करण्यात येणारा केरोसीनचा पुरवठा शासनाने कमी केला म्हणून काल देवगड तालुक्यात अनेक नागरिक, शेतकरी केरोसीनसाठी आंदोलन करीत होते. सिंधुदुर्ग जिल्ह्यात फक्त 70 टक्के केरोसीनचा पुरवठा केला जातो. केरोसीनचा पुरवठा कमी केल्यामुळे वैभववाडी आणि देवगड तालुके भरडून निघाले आहेत. देवगड आणि वैभववाडी येथे कोणतीही गॅस एजन्सी नाही. तेथील नागरिकांना घरगुती वापरासाठी पूर्णपणे केरोसीनवर अवलंबून रहावे लागते. देवगड तालुक्यात जंगलसुध्दा नाही. तेथे आंब्याच्या बागा आहेत. तेथील लोकांनी साखळी उपोषणास सुरुवात केली आहे. मी या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांशी बोललो. त्यांनी तात्पुरती एक लीटरची वाढ केलेली आहे. सध्या माणशी दोन लीटर रॉकेल देण्यात येते आणि कार्डावर आठ व्यक्तींपेक्षा जास्त व्यक्ती असतील तर चौदा लीटर रॉकेल देण्यात येते. पूर्वी माणशी तीन लीटर रॉकेल देण्यात येत होते व कार्डावर आठ व्यक्तींपेक्षा जास्त व्यक्ती असतील तर वीस लीटर रॉकेल देण्यात येते होते. तेव्हा माझी शासनास विनंती आहे की, जी तात्पुरती वाढ केलेली आहे ती कायम स्वरुपी ठेवण्यात यावी. कारण त्याठिकाणी कोणतीही गॅस एजन्सी नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत.....

बाब क्रमांक 357, पृष्ठ क्रमांक 267 - मान्यताप्राप्त प्राप्तानुदानित अशासकीय महाविद्यालयांना सहाय्यक अनुदानाच्या प्रदानाकरिता अतिरिक्त तरतूद. मी अतिशय गंभीरपणे या विषयावर माझी मते मांडणार आहे. पुणे हे विद्येचे माहेरघर आहे हे आपण सर्वजण जाणता. सभापती महोदय, आपले शिक्षण पुणे येथे झालेले आहे. या पुणे शहरात विनाअनुदानित आणि खाजगी विद्यापीठांची लाट उसळली आहे. त्याठिकाणी उच्च व तंत्र शिक्षणामध्ये एम.बी.ए., मॅनेजमेंटचे कोर्सेस शिकविले जातात. पुणे येथे नारखेड संस्थेने अशाप्रकारचे कोर्सेस सुरु केले आहेत. पूर्णवेळेकरिता हे कोर्सेस आहेत. तेथे बाहेरील राज्यातील अनेक विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. पाच-पाच लाख रुपये डोनेशन भरुन त्यांनी प्रवेश घेतला. कॉलेज सुरु झाले तेव्हा फूल टाईम कोर्स ऐवजी पार्टटाईम कोर्स सुरु केला. यासंदर्भात मी पुणे विद्यापीठाचे व्हाईस चान्सलर श्री.जाधव यांचेकडे तक्रार केली. त्यांनी सांगितले की, पुणे विद्यापीठाकडून अशा कोर्सेसना मान्यता देण्यात आलेली नाही. तसेच कॉलेजची इमारत एम.आय.डी.सी.च्या प्लॉटवर उभारण्यात आलेली आहे. या गैरप्रकाराबाबात भारतीय विद्यार्थी सेनेने आंदोलन सुरु केल्यानंतर संचालकांना अटक करण्यात आली. आता त्याठिकाणी एम.डी.कोर्सेस सुरु आहेत. त्यास सुध्दा ऑल इंडिया इन्स्टीटयुटची मान्यता असावी लागते. मी या संदर्भात तेथील वरिष्ठ पोलीस अधिक्‍ाऱ्यांशी बोललो. त्यांनी मला सांगितले की, पुणे येथे 40 टक्के बोगस शिक्षण संस्था सुरु आहेत. एकीकडे आपण सिंहगड इंटरनॅशनल स्कूल काढत आहोत तर दुसरीकडे जिल्हापरिषदेच्या शाळेत एकही मुलगा जात नाही.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत...

म्हणून यानिमित्ताने माझी मागणी आहे की, पुणे शहराला जे कलंक लागण्याचे काम होत आहे, त्याबाबतीत आपण लक्ष देऊन त्याठिकाणी असलेल्या साऱ्या शिक्षण संस्थांचे व्हेरिफीकेशन करुन त्यांची चौकशी करावी. पुण्याला आपण विद्येचे माहेरघर म्हणतो, परंतु आज त्याठिकाणी फारच वाईट स्थिती आहे. आज त्याठिकाणच्या मुलांचे वाट्टोळे होत आहे. त्याठिकाणी एम.डी.सारखे कोर्सही बोगस आहेत. त्यामुळे त्याठिकाणच्या सगळया संस्थाची आपण चौकशी करावी व त्याचा अहवाल यासभागृहाला सादर करावा. त्याठिकाणी किती विद्यापीठ आहेत, किती कॉलेज आहेत याची माहिती आपण याठिकाणी द्यावी, अशी माझी मागणी आहे. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

धन्यवाद !

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत रघुवंशी (धुळे तथा नंदुरबार स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन 2006-2007 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 196 व 197, पान क्रमांक 148 वर मी बोलणार आहे. याबाबतीत माझी माननीय मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, धुळे जिल्हयातील उद्योजकांना सन 1997-98 पासून आत्तापर्यंत अर्थसहाय्य देण्यात आलेले नाही, त्याबाबतीतील रक्कम आपण वाढवून द्यावी, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 225, पान क्रमांक 164 वर मी बोलणार आहे. प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी दोन वर्षापूर्वी नंदूरबार जिल्हयासाठी फक्त एकदाच निधी देण्यात आला. परंतु त्यानंतरच्या वर्षापासून याबाबतीतील रक्कम नंदूरबार जिल्हयाला मिळत नाही, ती बंद करण्यात आलेली आहे. नंदूरबार जिल्हा परिषदेची गेल्या दोन वर्षापासून प्रादेशिक असमतोल दूर करण्याच्या दृष्टीने देयके प्रलंबित आहेत. त्यामुळे याकडे आपण लक्ष देऊन नंदूरबार जिल्हयाला जास्तीची रक्कम उपलब्ध करुन द्यावी, ही विनंती.

सभापती महोदय, बाब क्रमांक 233 व 234, पान क्रमांक 175 वर मी बोलणार आहे. बंदिस्त नाटयगृहासाठी आमच्या नंदूरबार नगरपालिकेस आपण निधी उपलब्ध करुन दिला, त्याबद्दल मी आपले आभार मानतो. परंतु त्याठिकाणच्या बंदिस्त नाटयगृहाच्या शेवटच्या टप्प्यामध्ये आलेल्या कामाच्या बाबतीत आपण निधीची तरतूद केल्याचे दिसत नाही, तेवढी रक्कम आपण नंदूरबार नगरपालिकेस उपलब्ध करुन द्यावी, ही विनंती. तसेच, धुळे जिल्हयासाठी बंदिस्त नाटयगृह जाहीर होऊनही, याबाबतीतील मंजुरी प्रक्रियेमध्ये असंख्य अडचणी येत आहेत. याबाबतीत कोकण विभागाच्या टेक्निकल सँगशनचा प्रस्ताव प्रलंबित असल्यामुळे त्यांच्याकडून मान्यता मिळत नाही. त्यामुळे याबाबतीत माझी मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, याबाबतीतही आपण भरीव अशी तरतूद करावी व धुळयाचा प्रस्ताव मंजूर करावा.

सभापती महोदय, बाब क्रमांक 108, पान क्रमांक 69 वर मी बोलणार आहे. याठिकाणी आत्ताच माननीय प्रा.कवाडे सरांनी सांगितल्याप्रमाणे, खानदेश विकास कार्यक्रमासाठी फक्त 8.51 कोटी रुपयांचीच तरतूद ठेवण्यात आली आहे, ती फारच अल्प आहे. खानदेश विभागामध्ये 22-23 नगरपालिका असून त्यातील 4 नगरपालिका हया आदिवासी क्षेत्रातील आहेत. त्यामुळे याठिकाणी फारच अत्यल्प तरतूद ठेवण्यात आलेली आहे, ती आपण वाढवून द्यावी, ही विनंती.

..3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत रघुवंशी....

सभापती महोदय, बाब क्रमांक 226, 227 व 228, पान क्रमांक 167 वर मी बोलणार आहे. आमच्या जिल्हयातील अंत्योदय अन्न योजनेच्या याद्या तालुका, जिल्हा व शासन स्तरावर प्रलंबित आहेत. या योजनेच्या माध्यमातून गरीब माणसाला अजूनही शासकीय दराने 2-3 रुपयाने धान्य मिळत नाही. यासाठी त्यांना तहसिल कार्यालयामध्ये सारखे खेटे मारावे लागतात. याद्यांचा प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित असून त्यास आपण तातडीने मंजुरी द्यावी, अशी माझी मागणी आहे. एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद !

नंतर श्री.रोझेकर....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्रमांक 2, पान क्रमाक 6 अंतर्गत लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघाच्या पुनर्रचनेसाठी 75 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. विधानसभा आणि लोकसभेच्या जागांच्या सीमा ठरविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबत अंतिम निर्णय कधी होणार आहे याची कल्पना शासनाकडून आम्हाला मिळालेली नाही. हा विषय जरी राज्य शासनाच्या अखत्यारितील नसला तरी राज्य शासनाने केंद्र सरकारकडे याबाबत विचारणा करुन ही माहिती सर्वसामान्यांना देणे आवश्यक आहे. मतदारसंघ पुनर्रचनेबाबतची माहिती 3 वर्षे आधी जनतेला कळली पाहिजे.

सभापती महोदय, सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, बदल्यांच्या संदर्भात कायदा तयार करण्यात आलेला आहे. परंतु, कायद्याची अंमलबजावणी होत नाही. या कायद्यामध्ये 3 वर्षापेक्षा जास्त काळ कर्मचारी, अधिकारी एका जागेवर राहणार नाही, याची तरतूद करण्यात आलेली आहे. परंतु, कायद्याची अंमलबजावणी प्रत्यक्षात होत नाही. तीच माणसे त्याच ठिकाणी सातत्याने काम करीत असतात. त्यामुळे ठराविक लोकांची मोनोपॉली झाली आहे. याच दृष्टीकोनातून या सभागृहामध्ये चर्चा करुन शासनाला आपण कायदा करण्यास भाग पाडले होते. परंतु, या कायद्याची ख-या अर्थाने अंमलबजावणी होत नाही. या कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे झाली पाहिजे. तसेच दरवर्षी यासंबंधीचा अहवाल सर्वसामान्य जनतेला मिळाला पाहिजे. संबंधित अधिकारी किती वर्षे होता, किती वर्षानंतर बदली होणे अपेक्षित आहे, याची माहिती जनतेला मिळाली पाहिजे.

सभापती महोदय, पर्यटन विभागाच्या बाब क्रमांक 39, पान क्रमांक 21 बाबत बोलतांना मला असे लक्षात आणून द्यावयाचे आहे की, पर्यटनाच्या दृष्टीकोनातून शासन मोठया प्रमाणात घोषणा करीत आहे. कोकणामध्ये वेंगुर्ला, मालवण येथे गोव्याच्या धर्तीवर विकास करण्याचे ठरविण्यात आले आहे. परंतु, मुंबई हे आंतरराष्ट्रीय शहर असून परदेशी पर्यटक मुंबईमध्ये येत असतात. मुंबईच्या आजुबाजूला ठाणे, रायगड, अलिबाग, मुरुड या ठिकाणी जे समुद्र किनारे आहेत त्यांचा विकास करण्याची आवश्यकता आहे. ही मागणी मी अनेक वेळा सभागृहात केलेली आहे. यासंदर्भात देखील शासनाने जरुर विचार करावा, अशी माझी विनंती आहे.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

सभापती महोदय, ॲग्रिकल्चर टुरिझम या व्यवसायाला ख-या अर्थाने मान्यता दिली तर मुंबईतील अनेकांना खेडयामध्ये राहून खेडयामधील निसर्ग, खेडयांचे सुख उपभोगण्याची संधी मिळणार आहे आणि अनेक मुंबईकर यासाठी उत्सुक आहेत. यादृष्टीकोनातून ॲग्रिकल्चर टुरिझमला सवलती देणे आसवश्यक आहे. पर्यटन विभागाने अशा प्रकारचा प्रस्ताव मंत्रीमंडळापुढे आणावा. यासाठी शासनाला कोणत्याही प्रकारची आर्थिक तरतूद करण्याची आवश्यकता नाही. याअतर्गत विद्युत बिलामध्ये सवलत, सेल्सटॅक्समध्ये सवलत, वाहतुकीमध्ये सवलत अशा प्रकारच्या सवलती दिल्या तर या पर्यटनाला प्रोत्साहन मिळू शकेल. यादृष्टीकोनातून शासनाने निर्णय घ्यावा, अशा प्रकारची विनंती मी करतो.

सभापती महोदय, जलवाहतुकीचे धोरण आम्ही पेपरमध्ये वाचतो. प्रत्यक्षात अंमलबजावणी का होत नाही ? याची आम्हाला माहिती नाही. जलवाहतुक वाढविली तर निश्चितपणे आपण परदेशी ग्राहकांना आकर्षिक करु शकू.

सभापती महोदय, महसूल विभागाच्या बाब क्रमांक 55, पान क्रमांक 35 अंतर्गत नैसर्गिक आपत्तीसाठी तरतूद करण्यात आलेली आहे. नैसर्गिक आपत्तीग्रस्त व्यक्तीला मदत करण्यासाठी अनेकवेळा जाहीर केले जाते. गेल्या मागणीच्या वेळी मी यासंदर्भात बोललो आहे. परंतु, अद्यापपर्यन्त कर्जत, महाड, पोलादपूर या भागामध्ये मदत जाहीर करुन सुध्दा ती मिळालेली नाही.

यानंतर श्री.बोरले.....

अशुधारित प्रत / परिपृच्छासाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील .....

मागच्या वेळी सभागृहामध्ये चर्चा झाली की, पेण तालुक्यामध्ये 10 कोटी रुपयांचे वाटप केले गेले. एका गावामध्ये 2 कोटी रुपयांचे वाटप झाले. पनवेलमध्ये 40-50 कोटी रुपयांचे वाटप झाले. मी माननीय महसूल मंत्र्यांना विनंती करतो की, पनवेलचे तहसिलदार श्री.सानप यांची आपण चौकशी करावी. मागच्या वेळी मी या सभागृहामध्ये सांगितले होते की, श्री.सानप हे पुरग्रस्तांचे पैसे खातात. त्यांच्याकडे एवढे पैसे मिळाले की, ते पैसे मोजण्यासाठी तीन दिवस लागले. त्यांच्या घरामध्ये साडेचार कोटी रुपयांची कॅश मिळाली. हिरे, माणिक मिळाले. श्री.सानप यांच्याकडे मिळालेले सर्व पैसे पुरग्रस्तांचे होते. पुरग्रस्तांना पैशांचे जे वाटप करण्यात आले त्यासंदर्भात मागच्या हिवाळी अधिवेशनामध्ये चर्चा झाली. त्यावेळी मी ही माहिती दिली होती. परंतु शासनाने गंभीरपणे घेतले नाही. मागच्या सहा महिन्यांपूर्वी या तहसिलदाराकडे करोडो रुपये मिळाले. त्यावेळी महसूल विभाग तेथे खाली मान घालून काम करीत होते. त्याची त्यांना लाज वाटली. पुरग्रस्तांना जी आर्थिक मदत देण्यात आली, त्यामध्ये भ्रष्टाचार झालेला आहे.

सभापती महोदय, मी फक्त दोन-तीन बाबींवर बोलणार आहे. माननीय महसूलमंत्री कोकणातील आहेत. मी पुरग्रस्तांच्या आणि धरणग्रस्तांच्या बाबतीत बोलणार आहे. नदीच्या किनारी जे प्रवाह आहेत तेथे संरक्षण भिंत बांधणे गरजेचे आहे आणि त्यासाठी तुम्हाला वेगळे हेड निर्माण करावे लागेल. मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो की, कोकणातील नदी किना-यालगत जी वस्ती आहे तेथे संरक्षक भिंत बांधण्यासाठी हेड निर्माण करावे. कोकणामध्ये संरक्षक भिंती बांधण्यात आल्या पाहिजेत जेणे करुन पुराचे आणि पावसाचे पाणी गावामध्ये येणार नाही. आज कोकणामध्ये धरणग्रस्तांच्या बाबतीत भयानक वाईट परिस्थिती आहे. त्यांना म्हणावी तशी मदत शासनाकडून मिळत नाही.

बाब क्र.111, पृष्ठ क्र.70, नगरविकास विभागासंबंधी मी बोलणार आहे. सभापती महोदय इ ोपडीचा कायदा मुंबईसाठी आहे. परंतु अन्य भागातील जे नगरपालिका क्षेत्र आहे तेथे पुनर्वसनासाठी वेगळा कायदा आहे. किमान मुंबईच्या आजुबाजूला 50 ते 100 किलोमीटरमध्ये ज्या नगरपालिका आहेत, जेव्हा आपण औरंगाबाद, नाशिक शहरे आंतरराष्ट्रीय दर्जाची करावयास मागतात तेव्हा मुंबईच्या आजुबाजूचा ठराविक एरीया ठरवून पुनर्वसन कायद्यान्तर्गत पुनर्वसनाबाबत अंमलबजावणी केली पाहिजे. सभापती महोदय, अलिबाग शहरातून मी निवडून येतो. अलिबाग

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ MAP/ KGS/ प्रथम श्री.रोझेकर 16:15

श्री.जयंत प्र.पाटील .....

शहराचा पट्टा 450 एकराचा आहे. त्या ठिकाणी झोपडपट्टीच्या भागाची पुर्नरचना आणि पुनर्वसन करणे आवश्यक आहे. शासनाचा निर्णय मुंबईला लागू आहे. तो नियम ग्रामीण भागातील नगरपालिकांना लागू केला पाहिजे. मुंबईचे शांघाय आपण जरुर करा. असे होऊ नये की आमच्या भागात झोपडपट्टया होतील आणि येथे मुंबईचे मात्र शांघाय होईल, हे बरोबर नाही. त्यादृष्टीकोनातून नगरविकासाच्या कायद्यामध्ये बदल केला पाहिजे.

यानंतर श्री.सुंबरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील ....

सभापती महोदय, पृष्ठ 180, बाब क्र.251 - सामाजिक न्याय विभाग या संबंधात मी माझे विचार मांडणार आहे. सभापती महोदय, रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यामध्ये मूकबधीर निवासी शाळा आहे. या शाळेला 1999 पासून अनुदान मिळालेले नाही. ही एक चांगली संस्था आहे. जाणून बुजून या संस्थेचे अनुदान बंद केलेले आहे ते चालू करण्याबाबत मी या निमित्ताने आपल्याला विनंती करतो.

सभापती महोदय, पृष्ठ 272, बाब क्रमांक 373, उच्च व तंत्र शिक्षण विभाग या संबंधात बोलताना मी आपल्याला सांगू इच्छितो की, नवीन तालुक्यामध्ये एक तरी तंत्रशिक्षण देणारी औद्योगिक प्रशिक्षण संस्था देण्याचे शासनाचे धोरण आहे. रायगड जिल्हयामध्ये तळा हा नवीन तालुका झालेला आहे. तेव्हा या तालुक्यामध्ये औद्योगिक संस्था आपण निर्माण करावी अशी मागणी मी या निमित्ताने करतो. सभापती महोदय, मला आपण बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मनापासून आपल्याला धन्यवाद देऊन मी भाषण संपवितो.

****

..... 3एम 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवर बोलताना केवळ 2-3 मुद्यांवर माझे विचार मी येथे मांडणार आहे. पृष्ठ क्र.40, बाब क्र.63 या खाली वनीकरण आणि वन्यजीवन याकरिता पूरक मागणी केलेली आहे. या ठिकाणी संत तुकाराम वन ग्राम योजनेसाठी तरतूद केलेली आहे. खरोखरी ही एक चांगल्या प्रकारची योजना हाती घेतल्याबद्दल मी शासनाचे मनापासून अभिनंदन करतो. मध्यप्रदेश, कर्नाटक, ओरिसा, आंध्रप्रदेश या राज्यांमध्ये वनउपज जमा करण्यासाठी महामंडळ स्थापन झालेले आहे. त्याच धर्तीवर आपल्या राज्यात देखील एक स्वतंत्र महामंडळ स्थापन झाले तर जंगलामध्ये असलेल्या गावांतील आदिवासींना वनउपज मिळविण्याच्या दृष्टीने प्रशिक्षण देणे आणि त्याद्वारा त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी तातडीने वनसंजीवनी योजना आपण हाती घ्यावी आणि याबाबतची घोषणा या अधिवेशन काळामध्ये शासनाने करावी अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

सभापती महोदय, पृष्ठ क्र.267, बाब क्र.357 - उच्च व तंत्रशिक्षण विभाग या संबंधात बोलताना मी आपल्याला सांगू इच्छितो की, या ठिकाणी महाविद्यालयांना अनुदान देण्यासाठी आपण 107 कोटी 89 लक्ष 93 हजाराची तरतूद केलेली आहे. सर्व महाविद्यालयांना अनुदान देण्यासाठी ही तरतूद आपण केली आहे त्याबद्दल आपले अभिनंदन. परंतु शासनाने हा धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे आणि अनेकवेळा माननीय मंत्री महोदयांनी जाहीरदेखील केलेले आहे की, ग्रामीण भागामध्ये प्रत्येक तालुक्यामध्ये एक तरी अनुदानित महाविद्यालय असेल. परंतु त्याची अमलबजावणी होत नाही. आमच्या कल्याण तालुक्यामध्ये गोविली नावाचे गाव आहे. त्या भागामध्ये सर्व आदिवासी आणि शेतकरी राहतात. कल्याण पासून 15-16 कि.मी. अंतरावर हे गाव आहे. येथील मुले शिक्षणापासून वंचित राहत होती त्यामुळे एका संस्थेने पुढाकार घेऊन तेथे विनाअनुदानित महाविद्यालय सुरू केले. आज या महाविद्यालयामध्ये 1200 पेक्षा अधिक मुले शिक्षण घेत आहेत आणि ही सगळी मुले आदिवासी तसेच कष्टकरी शेतकऱ्यांची मुले आहेत. त्यांचे पालक पैसे खर्च करून आपल्या मुलांना शिक्षण देत आहेत. कारण ते महाविद्यालय अनुदानित नाही. सभापती महोदय, कल्याण तालुक्यात एकही महाविद्यालय नाही की ज्याला अनुदान मिळते आहे. शासनाच्या धोरणात्मक निर्णयानुसार या महाविद्यालयाला, ते ग्रामीण भागातील महाविद्यालय आहे म्हणून त्याला अनुदान देण्याबाबत आपण विचार करावा अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

..... 3एम 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोते .....

सभापती महोदय, पृष्ठ 267, बाब क्र. 359 - उच्च व तंत्रशिक्षण विभाग - उच्च शिक्षण संचालनालयाचे संगणकीकरण करण्यासाठी 61 लाख रूपयांची तरतूद आपण येथे केलेली आहे. आपल्या सर्व कार्यालयांचे संगणकीकरण व्हावे म्हणून आपण वेळोवेळी मागणी करतो. सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाच्या मंत्र्यांच्या पुरवणी मागण्या काल या ठिकाणी चर्चेला होत्या. पण मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, ज्याप्रमाणे उच्च शिक्षण संचालनालयाचे, कार्यालयाचे आपण संगणकीकरण करीत आहोत त्याप्रमाणे शालेय शिक्षण विभागाने देखील आपल्या सर्व कार्यालयांचे संगणकीकरण करण्यासाठी योजना करावी.

सभापती महोदय, पृष्ठ 269, बाब क्र. 365 - नक्षलग्रस्त आदिवासी भागामध्ये काम करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्गाला प्रोत्साहनपर भत्ते देण्यासाठी यामध्ये आपण तरतूद केलेली आहे. ...

(यानंतर श्री. सरफरे ..... 3एन 1 ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

सभापती महोदय, खरे म्हणजे या संदर्भातील आदेश राज्यसरकारी कर्मचारी किंवा अनुदानीत संस्थेमध्ये काम करणारे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जसेच्या तसे लागू आहेत. 6 ऑगस्ट 2002 रोजी हा आदेश निघाला. त्यानुसार नक्षलग्रस्त भागामध्ये काम करणारे किंवा अति संवेदशनशील भागामध्ये काम करणारे शासकीय कर्मचारी किंवा अनुदानीत संस्थेत काम करणारे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना मूळ वेतनाच्या 15 टक्के प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय आहे. अशा स्थितीमध्ये आज माध्यमिक शिक्षण क्षेत्रामध्ये आणि उच्च माध्यमिक शिक्षण क्षेत्रामध्ये काम करणारे, एम.सी.व्ही.सी. क्षेत्रामध्ये काम करणारे कर्मचारी आहेत, जे कर्मचारी गोंदीया, भंडारा व चंद्रपूर या नक्षलग्रस्त भागामध्ये काम करतात. ते अन्य सुविंधांपासून वंचित आहेत, म्हणून त्यांना 15 टक्के प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय आहे. परंतु अनेक संस्थांना अनेक डिपार्टमेंटकडून त्यांचा 15 टक्के प्रोत्साहन भत्ता देण्यात येत नाही. आज याठिकाणी 1 जानेवारी 2007 पासून आपण 705 शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी तरतूद केली आहे. परंतु यासंदर्भात शासनाचा निर्णय 6 ऑगस्ट 2002 रोजी झाला असून तेव्हापासून ही योजना राज्यामध्ये लागू झाली आहे. याबाबत वित्त विभाग काय म्हणत आहे, त्यापेक्षा आपल्या कर्मचाऱ्यांवर किती अन्याय होत आहे याकडे आपण बघत नाही. हा प्रोत्साहन भत्ता त्यांना मिळणे हा त्यांचा हक्क आहे. वित्त विभाग जर अडचण निर्माण करीत असेल तर त्यांना आपण कन्वींस करावे. तेव्हा एकाला एक न्याय आणि दुसऱ्याला दुसरा न्याय असे आपण करु नका. नक्षलग्रस्त भागामधील शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना 15 टक्के प्रोत्साहन भत्ता देण्यासंबंधी आपण निर्णय घ्यावा. सभापती महोदय, 6 ऑगस्ट 2002 च्या शासन निर्णयामध्ये एकस्तर पदोन्नतीची तरतूद आहे,, त्याप्रमाणे शासकीय कर्मचाऱ्यांना एकस्तर पदोन्नती लागू केली. परंतु शिक्षण क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्रिस्तरीय वेतनश्रेणी मिळते. नक्षलग्रस्त भागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना एकस्तर वेतनश्रेणी मिळत नाही. अति संवेदनशील भागामध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना एकस्तर पदोन्नती श्रेणी मिळत नाही हा त्यांच्यावर एकप्रकारे अन्याय आहे यासंबंधी शासनाने विचार करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 365 आणि पृष्ठ क्रमांक 269 17 जानेवारी 2004 च्या शासनादेशानुसार वेतनातील थकबाकी देण्यासाठी सुमारे 30 कोटी 71 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मात्र मागील अधिवेशनामध्ये असे आदेश काढण्यात आले होते की, शाळेमध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

काम करणारे जे शिक्षक आहेत त्यांना त्रिस्तरीय वेतनश्रेणी शासनाच्या आदेशानुसार लागू झाली होती. मागील अधिवेशनामध्ये त्यावर बरीच चर्चा झाली. आणि दिनांक 24.3.2006 रोजी माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले की, शासन निर्णयामध्ये चूक झाली असून त्या संदर्भात सुधारीत आदेश काढण्यात येत आहेत. सभापती महोदय, गटनिदेशकांना रु.6500 ची वेतनश्रेणी देणारे सुधारीत आदेश दि. 20.2.2006 ला निर्गमित करण्यात आले. परंतु सभागृहामध्ये आश्वासन दिले होते की, 17 जानेवारी 2004 च्या निर्णयामध्ये बदल केला असून 20.3.2006 ला सुधारीत आदेश निघाले. त्यानुसार निदेशकांना 7450 वेतनश्रेणी होती ती 7500 करण्यात आली. त्याबाबतचे आदेश तात्काळ काढण्यात आले. त्यानुसार त्यांना 7450 ऐवजी 7500 वेतनश्रेणी देण्यात आली ती नंतर रद्द करण्यात आली. त्यामुळे पुन्हा सुधारीत आदेश काढून त्यांना परत ती वेतनश्रेणी देण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. या संदर्भात शासनाने जे काही आदेश काढले आहेत ते मागे घेऊन पुन्हा सुधारीत आदेश काढण्याचा विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 177 व बाब क्रमांक 242 मध्ये सामाजिक न्याय विभागामार्फत माध्यमिक शाळेमध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय मुलांना शिष्यवृत्ती देण्यासाठी तरतूद केली आहे. शासनाने या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये वाढ करण्याचा अत्यंत स्तुत्य निर्णय घेतला. त्याबद्दल या विभागाचे आणि शासनाचे मनापासून अभिनंदन करतो. त्यानुसार इयत्ता 5 वी ते 7 वी च्या विद्यार्थ्यांना 20 रुपयांऐवजी 50 रुपये आणि इयत्ता 8 वी ते 10 वी च्या विद्यार्थ्यांना 40 रुपयांऐवजी 100 रुपये मिळणार आहेत. यानिमित्ताने मी शासनाला आणि सामाजिक न्याय मंत्र्यांना विनंती करतो की, आपला निर्णय अत्यंत चांगला आहे. आपण विद्यार्थ्यांच्या हिताचा अत्यंत चांगला निर्णय घेतला आहे. या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांना शिक्षण प्रवाहामध्ये टिकून राहण्यासाठी चांगला निर्णय घेतला असतांना शिष्यवृत्तीची रक्कम खरेच त्या विद्यार्थ्यांना मिळेल काय? हे आपण पहाणे अत्यंत गरजेचे आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते (पुढे सुरु...

अनेक संस्थांच्या शाळांमध्ये ही रक्कम विद्यार्थ्यांना मिळत नाही. विद्यार्थ्यांच्या सह्या घेतल्या जातात आणि रक्कम दिली गेलेली आहे असे कळविले जाते. याबाबतचे निरिक्षण होत नाही, विद्यार्थ्यांना पैसे मिळत नाहीत. लाभार्थींना लाभ मिळत नसेल तर या योजनांवर होणारा शासनाचा खर्च अनाठायी आहे. विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्तीची रक्कमही मिळत नाही. यामध्ये भ्रष्टाचार होण्याची शक्यता कमी करण्यासाठी चेकने रक्कम देता आली तर निश्चित स्वरुपामध्ये तो चांगला निर्णय होऊ शकेल, खऱ्याअर्थाने लाभार्थ्यांना त्याचा फायदा मिळू शकेल.

त्यानंतर पान क्रमांक 178, बाब क्रमांक 244 या संबंधाने बोलायचे आहे. 11 वी, 12 वी च्या व्ही.जे.एन.टी. आणि विशेष मागास वर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यासठी 1कोटी 65 लाख, 10 हजाराची मागणी केलेली आहे. याबाबत मी मनापासून शासनास धन्यवाद देतो, शासनाचे अभिनंदन करतो. त्यानंतर पान क्रमांक 178, बाब क्रमांक 248, 249, 250 यामध्ये अंध, अपंगांच्या शाळांना अनुदान देण्यासाठी मागणी केलेली आहे. अंध, अपंगांच्या शाळांच्याबाबतीत शासनाचे धोरण अत्यंत चांगले आहे. खूप चांगल्या प्रकारची मदत या शाळांना होत आहे. परंतु या शाळांमध्ये काम करणारे शिक्षक,शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्याबाबतीत आणि काही प्रशासकीय अडचणींच्या संबंधाने तातडीने निर्णय होणे आवश्यक आहे. अंध,अपंग शाळेच्या विद्यार्थी संख्या वाढीच्या प्रस्तावाबाबत नागपूरच्या अधिवेशनामध्ये माननीय मंत्री महोदयांच्या बंगल्यावर विभागाच्या आयुक्तांना भेटलो, त्यांनी आश्वासन दिले की, मी पुण्याला गेल्यानंतर याबाबतचा प्रस्ताव पाठवितो. परंतु पुढे काही झाले नाही. मी शिक्षक असल्यामुळे रागावून बोलू शकत नाही, मला मर्यादा आहेत. आपल्या माध्यमातून मंत्री महोदयांना विनंती करणार आहे की, उल्हासनगर येथील साईबाबा अंध, अपंगांच्या शाळेला मान्यता देण्याबाबत दोन वर्ष मी प्रयत्न करत आहे, त्याचा विचार करावा. अंध,अपंग शाळांमधील सर्व शिक्षकेतरांना कालबध्द पदोन्नती दिलेली नाही. शिक्षकांना रजा प्रवास सवलत मिळत नाही, वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती मिळत नाही .निदेशकांना त्रिस्तरीय वेतनश्रेणी देण्यात यावी. दरवर्षी अनुज्ञप्ती घ्यावी लागते. माझी विनंती आहे की, ज्या चांगल्या संस्था चालतात,त्यांना दरवर्षी अनुज्ञप्ती घ्यावी लागण्याऐवजी पाच वर्षाची आनुज्ञप्ती देण्यास हरकत नसावी, याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी विनंती करतो. त्याचबरोबर इमारत भाड्यामध्ये वाढ

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/ SBT/ MAP/

श्री.रामनाथ मोते (पुढे सुरू.....

करावी. 500 रुपये निर्वाह भत्ता मिळतो. महागाई वाढल्यामुळे अनेक बाबीमध्ये वाढ करत आहात. यादृष्टीने चांगले निर्णय घेत आहात. त्याचबरोबर अपंग शाळा आहेत, त्यांच्या निर्वाह भत्त्यामध्येही वाढ करणची आवश्यकता आहे. मी सन्माननीय मंत्री महोदयांना विनंती करणार आहे की, अपंगांच्या शाळेमधील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रशासकीयदृष्टया अडचणी निर्माण झालेल्या आहेत त्या संबंधात एकदा एकत्र बसलो तर बरेचसे प्रश्न मार्गी लागतील, प्रश्न सुटतील. सभागृहामध्ये यासंबंधातील माहिती तर द्यावीच त्याचबरोबर अधिवेशन संपल्यानंतर आम्हाला तास-दोन तासाचा वेळ देऊन आमच्याशी चर्चा करावी. चर्चेच्या माध्यमातून काही मार्ग निघू शकेल, अशी सन्माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो आणि माझे भाषण संपवतो. आपण मला बोलण्यासाठी वेळ दिल्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो.

यानंतर श्री.बरवड.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धोंडीराम राठोड (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी प्रथम सामाजिक न्याय विभागाच्या बाब क्रमांक 238 बाबत बोलणार आहे. माननीय सामाजिक न्याय मंत्री यांनी चांगला अर्थसंकल्प दिला त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. बाब क्रमांक 238 मध्ये वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या निर्वाह भत्त्यासाठी 25 कोटी 46 लाख रुपयांची पुरवणी मागणी केलेली आहे. वसतिगृहाला 60 टक्के निर्वाह भत्ता हा प्रथम सत्रामध्ये अग्रीम स्वरुपामध्ये द्यावयाचा असतो. परंतु दरवर्षी अर्थसंकल्पामध्ये योग्य प्रकारे आर्थिक तरतूद न केल्यामुळे वसतिगृहांचा निर्वाह भत्ता वेळेवर मिळत नाही. विशेषत: वि.जा.भ.ज.च्या एकाही वसतिगृहाला अद्याप 60 टक्के अग्रीम अनुदान मिळालेले नाही. शासनाच्या जी.आर.मध्ये असे म्हटले आहे की, प्रथम सत्रामध्ये 60 टक्के अग्रीम अनुदान अदा झाले पाहिजे. गेल्या दोन वर्षापासून संबंधित खात्याचे मंत्री, सचिव आणि संचालक यांच्याकडे मी स्वत: लेखी स्वरुपात आणि प्रत्यक्ष भेटून ही बाब निदर्शनास आणून दिलेली आहे की, वि.जा.भ.ज.चे बजेट तयार होत असताना त्याला योग्य नियतव्यय मिळत नसल्यामुळे वि.जा.भ.ज.च्या या सगळ्या योजनांना वेळेवर पैसे मिळत नाहीत. आता आपण पुरवणी मागणी केलेली आहे. ती मान्य झाल्यानंतर जानेवारी महिन्यामध्ये म्हणजे तब्बल आठ महिन्यानंतर आपण 60 टक्के अग्रीम अनुदान देण्याची कार्यवाही करणार. शासनाचे अनुदान न मिळता संस्था चालवू शकतील एवढ्या या सगळ्या संस्था सक्षम नाहीत. या सगळ्या संस्था आठ आठ, नऊ नऊ महिने शासनाचे अनुदान न मिळताही चांगल्या प्रकारे संस्था चालवत असतील असे मला वाटत नाही. कर्मचाऱ्यांचे पगार वेळेवर होत नाहीत. इमारतीचे भाडे वेळेवर मिळत नाही. निर्वाह भत्ता सुध्दा वेळेवर मिळत नाही अशी वि.जा.भ.ज.च्या वसतिगृहांची वाईट अवस्था झालेली आहे. याकडे शासनाने लक्ष द्यावे आणि पुढच्या वर्षी असे घडणार नाही याची काळजी घ्यावी.

सभापती महोदय,यानंतर मी बाब क्रमांक 246 बाबत बोलणार आहे. "तांडा वस्ती सुधार योजना" या योजनेच्या नावात शासनाने दुरुस्ती करुन "तांडा सुधार योजना" असे नाव ठेवले परंतु आज या पुरवणी मागण्यांच्या पुस्तकामध्ये "तांडा वस्ती सुधार योजना" असा शब्दप्रयोग केलेला आहे. या विभागाचे अधिकारी झोपलेले आहेत असे मला वाटते. या योजनेसाठी आपण 12 कोटी रुपयांची पुरवणी मागणी केलेली आहे. ही योजना तांड्यातील लोकांच्या प्राथमिक गरजा पूर्ण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धोंडीराम राठोड ....

करण्यासाठी आलेली आहे. वर्षानुवर्षे त्यांच्या प्राथमिक गरजा पूर्ण न झाल्यामुळे शासनाने ही योजना मान्य केली परंतु या योजनेसाठी अल्प आर्थिक तरतूद केलेली असल्यामुळे त्या तांड्यातील लोकांना योग्य न्याय मिळत नाही. एकट्या मराठवाड्यामध्ये 25 लाखापेक्षा जास्त बंजारा समाजाचे लोक राहतात. त्यांच्या तांड्यांची संख्या तसेच महाराष्ट्रातील एकूण तांड्यांची संख्या लक्षात घेता या योजनेसाठी जास्तीची आर्थिक तरतूद उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे असे मला वाटते. वि.जा.भ.ज. कल्याण विभाग माननीय मुख्यमंत्र्यांकडे आहे. बंजारा समाजाची त्यांना खडा न खडा माहिती आहे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. धोंडीराम राठोड..

मला याठिकाणी माननीय मुख्यमंत्री महोदयांना विनंती करावयाची आहे की, तांडा-वस्ती सुधार योजनेसाठी भरीव तरतूद करण्याची आवश्यकता आहे. तसेच वसंतराव नाईक विमुक्त जाती/ भटक्या जमाती विकास महामंडळासाठी देखील भरीव तरतूद करण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, आम्हाला नेहमीच कमी नियतव्यय दिला जातो. अद्याप विमुक्त जाती भटक्या जमातीच्या वसतिगृहांना एक रुपया देखील मिळालेला नाही हे मी या ठिकाणी नमूद करु इच्छितो. मी या निमित्ताने माननीय मुख्य मंत्र्यांना विनंती करतो की, मागे काय झाले ते सांगत राहाण्यापेक्षा पुढच्या अर्थसंकल्पामध्ये आम्हाला लोकसंख्येच्या प्रमाणात आणि योजनांच्या प्रमाणात नियतव्यय उपलब्ध करुन द्यावा.

महसूल विभागाच्या पृ.क्र. 35 आणि 36 वरील बाब क्रमांक 54, 55 आणि 56कडे मी शासनाचे लक्ष वेधित आहे. नैसर्गिक आपत्ती आणि अतिवृष्टीमुळे नुकसान पोहोचलेल्या व्यक्तींना आर्थिक मदत दिल्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. परंतु पूर परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या अनेक अडचणी अद्याप दूर व्हायच्या आहेत. त्यासाठी आर्थिक तरतूद करण्याची आवश्यकता आहे. आदिवासी भागातील ग्रामीण रस्ते हे रहदारीसाठी योग्य राहिलेले नाहीत. अधिक निधी उपलब्ध करुन दिल्या शिवाय हे रस्ते दुरुस्त होऊन रहदारीस योग्य होणार नाहीत. राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे नद्यांना आलेल्या महापुरात नदीकाठचे अनेक ट्रान्स्फॉर्मर वाहून गेलेले आहेत. विद्युत लाईन्स वाहून गेलेल्या आहेत. ह्या गोष्टी अद्याप पूर्ववत झालेल्या नाहीत. भरपूर पाणी उपलब्ध असूनही विजेअभावी शेतीला देता येत नाही. पिण्याच्या पाण्याच्या योजना पूर्ण झालेल्या आहेत. परंतु विजेअभावी लोकांना पिण्याचे पाणी मिळत नाही. पिण्याच्या पाण्यासाठी त्यांना वणवण करावी लागत आहे. पिठाच्या चक्क्या बंद असल्यामुळे ग्रामस्थांना दूरच्या गावी जावे लागत आहे. तेव्हा या समस्या दूर करण्यासाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन देण्याची गरज आहे. जालना जिल्ह्यातील गोदवरी आणि पूर्णा काठावरील विद्युत लाईन्स वाहून गेलेल्या आहेत. त्या अजून पूर्ववत झालेल्या नसल्यामुळे तेथे वीज मिळत नाही. तेव्हा मी उपस्थित केलेले मुद्दे शासनाने विचारात घ्यावेत एवढे बोलून आणि या मागण्यांना पाठिंबा देऊन मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील (मुंबई शिक्षक) : सभापती महोदय, सन 2006-07 च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सामान्य प्रशासन विभागाच्या पृ.क्र. 8 वरील बाब क्रमांक 9 अंतर्गत दिवंगत ग.दि.माडगुळकर यांचे स्मारक उभारण्यासाठी तरतूद करण्यात आली ही अभिनंदनीय बाब आहे. त्याचप्रमाणे कै. बाबा कदम हे पहिले कादंबरीकार होऊन गेले. ते थोर समाजसुधारकही होते. त्यांच्या कबरीचे पुनरुज्जीवन करुन तेथे स्मारक उभे करावे अशी मी या निमित्ताने शासनाला विनंती करतो.

1857च्या बंडाची 150वी जयंती आपण साजरी करीत आहोत. जेथे जेथे स्वातंत्र्य संग्रामाच्या घटना घडल्या ती ठिकाणे संरक्षित करण्यासाठी माननीय पंतप्रधानांनी मोठा निधी उपलब्ध करण्याचे जाहीर केलेले आहे. आपल्या देशाच्या स्वातंत्र्य चळवळीमध्ये मुंबईतील आझाद मैदानावर एक हिंदू आणि एक मुस्लिम अशा दोन तरुणांना तोफेच्या तोंडी देण्यात आले होते. तेव्हा पासून त्या मैदानाला आझाद मैदान असे नाव देण्यात आलेले आहे. हे आझाद मैदान स्वातंत्र्य संग्रामातील एक आदर्श ठिकाण म्हणून जतन करण्यासाठी शासनाने निधी उपलब्ध करावा आणि केन्द्र शासनाकडून देखील निधी आणावा.

गृहनिर्माण विभागाच्या पृ.क्र. 191 वरील बाब क्रमांक 262 अंतर्गत राजीव गांधी ग्रामीण गृहनिर्माण योजनेसाठी तरतूद करण्यात आलेली आहे. या योजनेंतर्गत गरीब माणसाला घर देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. या निमित्ताने मी शासनाचे एसआरअेच्या प्रश्नाकडे लक्ष वेधू इच्छितो. आपण गरीब माणसाला पुनर्विकासाच्या माध्यमातून घर देतो. मुंबई, ठाणे या सारख्या शहरांमध्ये ज्या शाळा आहेत त्या शाळांसाठी मात्र या पुनर्विकास योजनेमध्ये जागा मिळत नाही. पर्यायी चांगली शाळा मिळत नाही. परिणामी त्या शाळांना अन्य ठिकाणी विस्थपित व्हावे लागते. आज मुंबई शहरातील जवळ जवळ 200 शाळा या एसआरअे योजनेच्या टाचेखाली आहेत. या शाळांना जर 5 एफएसआय दिला तर त्याठिकाणी चांगल्या प्रकारच्या शाळां बांधल्या जातील आणि त्या शाळांतील मुलांना एका चांगल्या पर्यावरणामध्ये शिक्षण मिळेल. तेव्हा याबाबतीत निर्णय घ्यावा अशी मी या निमित्ताने माननीय मुख्यमंत्री महोदयांना विनंती करतो.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. कपिल पाटील...)

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या पृ.क्र. 266 वरील बाब क्रमांक 356 मध्ये मुंबई विद्यापीठाला शतकोत्तर सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करताना प्रशिक्षण् अकादमी सुरु करण्यासाठी 10 कोटीची तरतूद केलेली आहे. त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. परंतु मुंबई विद्यापीठाची सद्य:स्थिती ही अत्यंत लाजिरवाणी अशी आहे. मागील निवडणुकीच्या वेळी 361या नियमाचे उल्लंघन झाले.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील.....

चुकीची नावे गाळली गेली, त्यातून निवडणुका राज्यपाल महोदयांनी रद्दबातल ठरविल्या. 17 नव्याने आलेल्या शिक्षकांना बाहेर जावे लागले. पुन्हा निवडणुका होऊ घातल्या आहेत. पुन्हा त्याच चुका कुलगुरुंकडून होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शिक्षकांमध्ये असंतोष आहे, याची नोंद घेऊन दुरुस्ती केली पाहिजे आणि चौकशी झाली पाहिजे.

सभापती महोदय, पृ.क्र.268, बाब क्र.361 व 362 संबंधी बोलत असताना या राज्यात किमान कौशल्यावर आधारित अनेक सर्टिफिकेट कोर्सेस देणारी केंद्रे सुरु झालेली आहेत. याठिकाणी प्रवेश घेणारी मुले ही अत्यंत गरीब, मागासवर्गीय, शेतमजूर, कष्टकऱ्यांची मुले असतात. त्यांना ही सुविधा मोफत उपलब्ध झाली पाहिजे. शिष्यवृत्ती योजना लागू केली पाहिजे. ही सगळी मुले शिकली तर हा सगळा वर्ग किमान व्यवसाय शिक्षण घेऊन स्वत:च्या पायावर उभा राहू शकेल, त्यांना ताकद मिळू शकेल. याच पध्दतीने खाजगी आयटीआयना अनुदानावर आणले तर हा गरीब वर्ग शिकू शकेल असे मला वाटते. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2006-07 च्या वर्षातील हिवाळी अधिवेशनात मांडलेल्या पूरक मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, मी प्रामुख्याने 2-3 बाबी या ठिकाणी मांडणार आहे. माननीय मुख्यमंत्री याठिकाणी बसले आहेत ज्यांचा या बाबीशी संबंध आहे. माननीय महसूल मंत्री देखील बसले आहेत हा चांगला योग आहे. त्यातील पहिली बाब क्र.5, पृष्ठ क्र.7 दोन मतदारसंघातील पोटनिवडणुकीसाठी 45.50 लाख रुपयांचा खर्च झाला आहे त्यासाठी पूरक मागणी सादर करण्यात आली आहे. मला शासनाला प्रश्न विचारावयाचा आहे की, 2004 साली सार्वत्रिक निवडणुका झाल्या. त्यानंतर आमदार निवडून आले. निवडून आलेले आमदार एका पक्षातून दुसऱ्या पक्षात राजीनामा देऊन जाणार असतील, निश्चितच कोणते तरी प्रलोभन, प्रोत्साहन भत्ता मिळतो म्हणून ते असा निर्णय घेतात. पण हा जो खर्च आहे तो त्यांच्याकडून किंवा ज्यांच्याकडून प्रोत्साहन दिले जाते त्यांच्याकडून वा शासनाकडून का केला जाऊ नये? पोटनिवडणुकीचा हा खर्च महाराष्ट्राच्या जनतेवर कशासाठी लादला जातो? दोन मतदारसंघातील पोटनिवडणुकांसाठी 45 लाख रुपये म्हणजे कमी खर्च झाला असे माझे मत नाही. महाराष्ट्रातील अनेक गरीब लोकांचे आज अन्नाशिवाय प्राण जात आहेत, कोणत्याही सुविधा त्यांच्यापर्यंत पोहोचल्या नाहीत. सभागृहात झालेल्या सर्व चर्चा काळजीपूर्वक ऐकल्या असता असे दिसून येईल की, निरनिराळया प्रकारच्या हत्या होत आहेत, काही हत्या अशा झालेल्या आहेत की, ज्यांचा शोध पण लागू शकत नाही. महाराष्ट्र शासन जर जनतेचा पैसा अशा फुटकळ बाबीवर खर्च करीत असेल तर ते कितपत उचित आहे? एवढाच माझा प्रश्न आहे. भविष्यकाळात असे घडणार असेल तर कोणत्याही पक्षाबाबत असो, मी केवळ आमच्या पक्षाबाबत बोलत नाही, कोणत्याही पक्षातून कोणताही आमदार दुसऱ्या पक्षात जाणार असेल तर त्यांना अट घातली पाहिजे, स्वत:च्या बळावर जा. पोटनिवडणूक आली तर स्वत:च्या बळावर निवडणुकीला सामोरे जा. अन्यथा हा खर्च शासनाने करावा. परंतु याचा बोजा जनतेवर लादू नये. ही सूचना मी मागील अधिवेशनात देखील केली होती, परंतु त्याकडे लक्ष दिले गेले नाही. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी याची नोंद घेऊन भविष्यकाळात या खर्चावर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न करावा.

(नंतर श्री.गागरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : गृह निर्माण विभागामार्फत मी आपल्याला एक पत्र पाठविलेले आहे पण त्याची पोच आपल्याकडून आलेली नाही. फक्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असे आहेत की त्यांना जर एखादे पत्र पाठविले तर त्या पत्राची पोच मिळते. आता नव्याने मंत्रीमंडळात आलेले राज्यमंत्री श्री. प्रीतमकुमार शेगावकर यांना मी पत्र पाठविलेले आहे. मुंबईमध्ये एसआरए च्या स्कीम मध्ये प्रचंड घोटाळे चालू आहेत. त्याची चौकशी करुन त्यात आपण लक्ष घालावे. पण आता नवीन टेंडर पध्दती येत आहे अशाप्रकारची माहिती मिळाली आहे म्हणजे रोगापेक्षा इलाज जालीम अशी परिस्थिती होणार आहे. यासंदर्भामध्ये नीट माहिती घेऊन सूचना मागवाव्यात. 31 डिसेंबर पर्यंत आम्हाला जे योग्य वाटतील त्या संदर्भातील सूचना आमच्याकडून दिल्या जातील. धन्यवाद.

तालिका सभापती : अजून तीन-चार सदस्य बोलणार आहेत तरी त्यांना लवकरात लवकर आपले म्हणणे मांडण्याची संधी द्यावी.

.....

3T-2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी या पुरवणी मागण्यांवर बोलताना नैसर्गिक आपत्तीच्या संदर्भामध्ये बाब क्रमांक 54, पृष्ठ क्रमांक 32 संबंधी प्रथम विचार व्यक्त करतो. 26 जुलै 2005 रोजी अतिवृष्टी झाली. अतिवृष्टीमुळे मुंबई बरोबर संबंध महाराष्ट्रासह ठाणे जिल्हयाला बऱ्याच प्रमाणात तडाखा बसला, नुकसान झाले, या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले, घरांचे नुकसान झाले, दुकानाचे नुकसान झाले, इ ोपडपट्टीवासीयांचे नुकसान झाले. या नुकसानभरपाईच्या माध्यमातून करोडो रुपयांचे वाटप देखील झाले आहे. परंतु शासन नियमांचे अवडंबर माजवून बदलापूर सारख्या ठिकाणी जे दुकानदार आहेत आणि जे मूल्यवर्धीत कर भरतात त्यांनी काही कागदपत्रे दिली नसल्याने त्यांना नुकसानभरपाई मिळालेली नाही. ठाणे जिल्ह्यात अनेक झोपडपट्टया अशा आहेत की तेथील याद्या आम्ही कलेक्टर ऑफीसला सादर केल्या होत्या परंतु त्यांनाही नुकसानभरपाई दिलेली नाही. आणि त्याच्यामुळे या सगळया गरीब मंडळींना नुकसानभरपाई मिळालेली नाही. त्यामुळे शासनाने याचा देखील याचा विचार केला पाहिजे. या ठिकाणी आणखी एक मुद्दा मी उपस्थित करु इच्छितो, मुंबईच्या धर्तीवर माननीय मुख्यमंत्री महोदयांनी माधवराव चितळे समिती नेमली व त्यांनतर त्यांनी अहवाल दिला. ठाणे जिल्हयात श्रमशक्ती आहे ती मुंबईकडे जाते. ठाणे जिल्हा असा आहे की त्या ठिकाणी सहा महापालिका आहेत अजून एक महापालिका होऊ घातली आहे. अतिवृष्टीमुळे नुकसान झाले आहे त्यासंबंधी आम्ही माननीय मुख्यमंत्री महोदयांना पत्र दिले होते त्याचा फॉलोअप देखील केला होता. मुंबई प्रमाणे ठाणे जिल्ह्यात देखील माधवराव चितळे समिती नेमली तर त्या ठिकाणी नेमकी काय कारणमिमांसा आहे हे आपल्याला कळून येईल. अनेकप्रकारची अतिक्रमणे झाली त्यामुळे ज्या ठिकाणी पूर येत नव्हते त्या ठिकाणी पूर आले आहेत आणि आपण एखादी योजना ज्यावेळी बनवितो त्यावेळेला अशाप्रकारच्या अतिवृष्टीमुळे काय काय धोके निर्माण होऊ शकतात, ते अशाप्रकारच्या समितीच्या माध्यमातून जर कळले तर त्याचा उपयोग पुढच्या जिल्ह्याच्या विकासाकरिता निश्चितपणे होऊ शकतो आणि त्याच्यामुळे माझी पुन्हा एकदा विनंती आहे की, माननीय मुख्यमंत्री महोदयांना दोन तीन पत्रे सर्वपक्षीय सह्यांची पाठविलेली आहेत, जर अशा प्रकारची समिती नेमली तर निश्चितपणे त्याचा या ठिकाणी उपयोग होऊ शकतो. पृष्ठ क्रमांक 21 बाब क्रमांक 39 मध्ये या ठिकाणी पर्यटनाच्या संबंधामध्ये ठाणे किंवा कोकण हा एक महत्वाचा भाग आहे. त्या ठिकाणी अनेक शेकडो ज्ञात आणि अज्ञात पर्यटनाची स्थळे आहेत. त्या ठिकाणी रस्त्याची सुविधा किंवा पिण्याच्या पाण्याची, निवासाची व्यवस्था या माध्यमातून केल्या गेल्या तर त्या ठिकाणी मोठया प्रमाणात शासनाला महसूल मिळू शकेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. जुन्नरे....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या ठिकाणी मोठया प्रमाणात रेव्हेन्यू उपलब्ध होऊ शकतो. हा पर्यटनाच्या दृष्टीने एक महत्वाचा भाग आहे. येथे शेकडो अज्ञात पर्यटन स्थळे पर्यटकांना आकर्षित करीत आहेत. परंतु येथे जाण्या येण्यासाठी रस्त्यांची सुविधा नाही. या ठिकाणी मोठया प्रमाणात पर्यटक आले तर प्रचंड प्रमाणात रोजागर निर्माण होऊ शकातो, त्यामुळे यादृष्टीनेही विचार व्हावा अशी विनंती आहे. गेल्या दोन वर्षापासून माथेरान येथील ट्रेन बंद पडलेली आहे. या ठिकाणी वर पर्यंत जाणारी ट्रेन सुरु झाली तर पर्यटक येऊन येथील रोजगार वाढू शकतो. ही ट्रेन सुरु करण्यात अजून यश आलेले नाही. या ठिकाणची ट्रेन बंद पडल्यामुळे पर्यटकांमध्ये नाराजीची भावना आहे. माथेरान शहरातील घोडे मालकांवर लीदकर लादलेला असल्यामुळे हा कर अन्यायकारक आहे. हा लीदकर मागे घेतल्यास माथेरान परिसरात घोडयांच्या संख्येत लक्षणीय वाढ होऊन पर्यटकांची संख्या देखील वाढू शकते.

सभापती महोदय घरापुरीची लेणी (एलीफंडाकेव्हज) येथे बोटीने जाणा-या पर्यटकांना कोणत्याही प्रकारची व्यवस्था पुरविण्यात आलेली नाही. या ठिकाणी जर सुव्यवस्थीत व्यवस्था पुरवली गेली तर पर्यटकांच्या संख्येत वाढच होईल. त्यामुळे यादृष्टीने लक्ष द्यावे अशी विनंती करतो.

सभापती महोदय, मी आता बाब क्रमांक 39 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत पर्यटनाच्या विकासाकरिता 8 कोटी रुपये एवढया पूरक मागणीची बाब अंतर्भूत करण्यात आली आहे. परंतु विदर्भातील पर्यटनाच्या दृष्टीने विदर्भ क्वीन या पर्यटन गाडीचे काम निधीअभावी रखडले आहे. ही अत्यंत गंभीर बाब आहे. विदर्भातील पर्यटनाच्या दृष्टीने शासनाने घोडाझरी आणि ताडोबा या पर्यटन स्थळांना भेटी देण्यासाठी विदर्भ क्वीन ही गाडी सुरु करण्याची घोषणा केली होती. या गाडीचे कोच बनविण्याचे काम मोतीबाग यार्डमध्ये सुरु असून पर्यटन विभागाने निधी न दिल्याने काम अर्धवट स्थितीमध्ये पडलेले आहे. याकरिता त्वरीत निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. विदर्भातील पर्यटनाचा विकास होण्याच्या दृष्टीने "इको-टुरिझम पॉलीसी" सुरु करण्याच्या दृष्टीने शासनाने त्वरीत उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.

तसेच नागपूर शहरातील सुप्रसिध्द "श्री रेणुका देवी संस्थान", हिंगणा रोड, नागपूर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर....

येथील संस्थांनास दि. 24.8.2004 रोजी शासनाने "क" वर्ग तीर्थक्षेत्र म्हणून मान्यता दिलेली आहे. या ठिकाणी भाविकांची सोय करण्याच्या दृष्टीने पर्यटन विभागाकडून विकासाचा आराखडा तातडीने तयार करण्यात येवून विशेष बाब म्हणून आर्थिक तरतूद करण्यात यावी अशा तीन प्रकारच्या सूचना करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई पदवीधर) : सभापती महोदय, मी बाब क्रमांक 282, पृष्ठ क्रमांक 208 वरील वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभागाच्या संदर्भात माझे विचार व्यक्त करणार आहे. वैद्यकीय शिचण फी च्या प्रतिपूर्तीसाठी तरतूद करण्यात आलेली आहे. यासंदर्भात माझी मागणी अशी मागणी आहे की, सन 2003- 2004, 2004-2005 आणि 2005-2006 या तीन वर्षात मागास वर्गीय आणि आर्थिकदृष्टया मागासवर्गाच्या विद्यार्थ्यांना फी दिली गेली नव्हती. त्यामुळे शासनाने या गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी फी दरवर्षी देणे आवश्यक आहे. या गरीब विद्यार्थ्यांना त्यांच्या खिषातून फी भरणे शक्य नसल्यामुळे माझी शासनाला विनंती आहे की, या गरीब विद्यार्थ्यांची फी दरवर्षी भरली तर या मुलांना आपले शिक्षण पूर्ण करता येईल.

दुसरे असे की, कॉन्स्टेबल आणि हवालदारांची मुले जर मेडीकल, इंजिनिअरींग किंवा उच्च शिक्षण घेत असतील तर शासनाने कॉन्स्टेबल आणि हवालदारांच्या मुलांची फी माफ करण्याच्या दृष्टीने विचार करावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, मी आता बाब क्रमांक 283, पृष्ठ क्रमांक 208 , वर माझे विचार व्यक्त करणार आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, संभाजीनगर यांच्याकरिता नवीन 120 पदांची निर्मिती करण्यासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, संभाजीनगर यांची प्रोदेशिक विकास कार्यक्रमाअंतर्गत दर्जावाढ करण्याच्या दृष्टीने या रुग्णालयाच्या आस्थापनेवर 120 पदांची निर्मिती करण्याचे ठरविण्यात आलेले आहे. या ठिकाणी अपंग व्यक्तींची हृदय रोगाची चिकित्सा पुरविली जाते त्यामुळे माझी शासनाला विनंती आहे की, आपण जीवनदायी योजना राबवित आहोत. या योजनेमध्ये बायपास,एंजिगोग्राफी,एंजिओप्लास्टी शस्त्रक्रिया घेत असतो.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

डॉ.दीपक सावंत.....

त्याची माहिती देण्यात यावी.

सभापती महोदय, शासनाने मराठवाडा विकास कार्यक्रम घेतला. त्याच धर्तीवर शासन विदर्भ विकास कार्यक्रम होती घेणार आहे काय ? मागील अधिवेशनात शासनाने जे.जे. रुग्णालयासाठी 100-150 कोटी रुपये देण्याचे आश्वासन दिलेले आहे. त्याचप्रमाणे नागपूर मेडिकलला आर्थिक मदत देणार काय ? तसेच नागपूर मेडिकल कॉलेजला एम्सचा दर्जा देणार का ?

बाब क्रमांक 285, पृष्ठ क्रमांक 212, आयुर्वेदिक व युनानी संस्थाकरिता सहाय्य अनुदाने इ हे केंद्र सरकारकडून अनुदान येते. यामध्ये होमिओपॅथिक व आयुर्वेदिक कॉलेजकरिता अनुदान मिळते. मात्र या निधीचा विनियोग चांगल्याप्रकारे केला जाता नाही. या निधीचा उपयोग प्रयोगशाळेतील उपकरणांसाठी किंवा लायब्ररीसाठी केला जात नाही. मागील तीन वर्षात ज्या ज्या कॉलेजेस्, हॉस्पीटल्सना केंद्र सरकारकडून व राज्य सरकारकडून निधी मिळालेला आहे त्याचा विनियोग कोणत्या कारणांसाठी करण्यात आला याची चौकशी करावी. यातील गौडबंगाल आपल्याला समजून येईल. तेव्हा याची चौकशी करण्यात यावी अशी मंत्रिमहोदयांना विनंती आहे.

बाब क्रमांक 353, पृष्ठ क्रमांक 265- दक्षिण-पूर्व आशियाई भाषेत संस्कृत शब्दकोश तयार करणे- सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी पुणे शहरातील बोगस संस्थेची माहिती याठिक्राणी दिली. उदारीकरणाच्या क्षेत्रामध्ये अनेक फॉरीन युनिर्व्हसिटीज येथे येत आहेत. आपल्या पाल्याला चांगल्याप्रकराचे शिक्षण मिळावे म्हणून पालक त्यांना चांगल्या संस्थेत दाखल करतात. परंतु काही ठिकाणी मोठ्या प्रमाणावर बोगस संस्था आहेत. त्याची लिस्ट शासनाने वेबसाईटवर द्यावी. जेणेकरुन पालकांना आणि विद्यार्थ्यांना त्याबाबत माहिती मिळू शकेल व त्यांची फसवणूक होणार नाही. राय युनिर्व्हसिटीसारखे स्कॅन्डल होणार नाही. माझ्या सूचनांचा शासनाने गांभीर्याने विचार करावा. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, सन 2006-2007 च्या पूरक मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभी आहे.

बाब क्रमांक 118, पृष्ठ क्रमांक शासनाने यापूर्वी आश्वासन दिलेले आहे की, महाराष्ट्रात 22 कुटुंब न्यायालये सुरु करणार आहोत. पंरतु त्या संदर्भातील तरतुदींना वेग मिळालेला दिसत नाही. केंद्र सरकारने डोमेस्टीक व्हायलन्स ॲक्ट लागू केलेला आहे. त्याची अंमलबजावणी महाराष्ट्रात सुरु झाली आहे असे केंद्रीय महिला व बाल विकास मंत्री श्रीमती रेणुका चौधरी यांनी सांगितले. त्या संदर्भातील पुढील कार्यवाही विधी व न्याय विभागाकडून केली जाणार आहे की महिला व बाल कल्याण विभागामार्फत केली जाणार आहे याची माहिती देण्यात यावी. केंद्र सरकारने हा कायदा लागू करुन एक महिना झालेला आहे, पण त्याबाबत पुढील प्रगती झालेली नाही.

बाब क्रमांक 52 व 53, पृष्ठ क्रमांक 34- बॉम्बस्फोटामध्ये मृत झालेल्या व जखमी झालेल्या लोकांसाठी निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. बॉम्बस्फोटामध्ये जे जखमी झाले होते त्यांना भेटल्यानंतर आमच्या लक्षात आले की, बॉम्बस्फोटामध्ये जे किरकोळ जखमी झालेले आहेत 50 हजार रुपयांची मदत करण्यात आलेली आहे. ज्यांच्या हातापायांना मोठ्या प्रमाणावर जखम झली असेल त्यांना देखील 50 हजार रुपयांची मदत करण्यात आलेली आहे. काही दिवसांच्या उपचारानंतर आर्थिक मदतीची आवश्यता असते. तसेच त्यांचे हातपाय निकामी होण्याची देखील शक्यता असते. त्यांच्या कुटुंबातील एकाला नोकरीत सामावून घेतले जाईल असे रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले असले तरी त्याची पत्नी ग्रॅज्युएट असली तरी तिला फोर्थ ग्रेडचे काम दिले जाते. तेव्हा त्यांच्या पुनर्वसनाबाबत शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

बाब क्रमांक 57, पृष्ठ क्रमांक 36 - राष्ट्रीय आपत्ती आकस्किमता निधी - राष्ट्रीय आपत्ती निवारण सहाय्यमार्फत आपल्याला चांगल्या प्रकारचे उपक्रम राबविता येतील त्यादृष्टीने कार्यवाही करण्यात यावी.

यानंतर श्री.पुरी..

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे...

सभापती महोदय, मी बाब क्रमांक 192 वर बोलणार आहे. यामध्ये बाल कामगारांना मुक्त करणे, पुढील पनुर्वसनापर्यंत त्यांचे रहाणे व अन्नाची व्यवस्था करणे, बाल कामगारांच्या वाहतुकीची व्यवस्था करणे, बाल कामगारांचे पुनर्वसन करण्यासाठी 10 लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. मुळात हे बाल कामगार होऊ नयेत म्हणून आपण काळजी घ्यावी व जोपर्यंत आपण बाल कामगारांच्या बाबतीत प्रतिबंधात्मक कार्यक्रम राबवित नाही तापेर्यंत ही 10 लाख रुपयांची तरतूद फारच तुटपुंजी आहे, असे मला वाटते. या रक्कमेतून या लोकांना फायदा मिळणार नाही, त्यामुळे याकडे आपण लक्ष द्यावे, ही विनंती.

सभापती महोदय, बाब क्रमांक 39 वर मी बोलणार आहे. मराठवाडा विकास कार्यक्रमांच्या अंतर्गत पर्यटनाच्या विकासासाठी आपण 8 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. विदर्भातील प्रत्येक जिल्हयामध्येही पर्यटनाचे एखादे तरी केंद्र असावे व त्यांचाही विकास होण्याची आवश्यकता असून यासाठीही तरतूद केली पाहिजे, अशी माझी मागणी आहे.

याच विभागांतर्गत माझा दुसरा मुद्दा असा आहे की, आज जवळपास 400 महिला सरपंच धरणे धरुन बसलेल्या आहेत. त्यांची अतिशय साधी मागणी असून त्यांनी बसच्या पासची मागणी केलेली आहे. त्यांनी तालुक्याला व जिल्हयाला जाण्याच्या दृष्टीने पासची मागणी केली आहे. आपण याठिकाणी सरपंचाचा उल्लेख केला असून त्यासाठी तरतूदही केली आहे. परंतु ही बाब पाहिल्यानंतर त्यामध्ये असा उल्लेख आहे की, कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी ही पैशाची सोय आहे. मग, आपण सरपंचाचे हेड कशासाठी ठेवले. यामुळे महिला सरपंचांना कसलाही फायदा होणार नाही. त्यामुळे या महिला सरपंचांच्या ज्या मागण्या आहेत, त्यांचा आपण सहानुभूतीपुर्वक विचार करावा.

सभापती महोदय, बाब क्रमांक 219 वर मी बोलणार आहे. आदर्श गाव विकास कार्यक्रमासाठी आपण निधीची तरतूद केलेली आहे. आदर्श गावांच्या बाबतीत श्री.अण्णा हजारे समितीने शिफारस केलेली 300 गावे होती, त्यामध्ये आपण नव्याने काही गांवे घेतली आहेत. परंतु त्याचे निकष काय आहेत ? आपण राज्य स्तरावर अशा समित्या केल्या, त्या माध्यमातून कार्यक्रमांचा पाठपुरावा केला जातो, त्या समित्यांना सहकार्य मिळण्याच्या दृष्टीने आपण लक्ष द्यावे. तसेच, त्यांच्यासाठी आपण चांगल्या प्रकारचा निधी उपलब्ध करुन द्यावा.

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे...

सभापती महोदय, बाब क्रमांक 248 वर मी बोलणार आहे. या बाबीन्वये आपण अपंग, मुके, बहिरे, अस्थिविकलांग, मनोविकलांग, कर्णबधिर यांच्यासाठी निधीची तरतूद केली आहे. आपल्या विधीमंडळाच्या समितीने मलकापूरला भेट देऊन पाहणी केली होती. त्याठिकाणी समितीला असे दिसून आले की, त्याठिकाणची देखरेख करण्यासाठी विभागीय स्तरावर अधिकारी नाहीत. त्यादृष्टीने आपण व्यवस्था करणे आवश्यक आहे. दर आठवडयाला 5-5 रिमांड होऊन मुले पळून जातात, विषबाधा होतात. त्यामुळे आपल्या विभागाचे सक्षमीकरण करण्याच्या दृष्टीने चांगले अधिकारी विभागीय स्तरावर नेमले पाहिजेत.

सभापती महोदय, बाब क्रमांक 231 वर मी बोलणार आहे. रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षक मंडळाच्या बाबतीत निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. सभापती महोदय, या मंडळावर मी स्वत: काम केले असून त्याठिकाणी कॉन्ट्रॉवर्सी होतात. त्यामध्ये अनेक जिल्हयामध्ये ऑर्केस्ट्रॉचे कार्यक्रम होतात, परंतु त्याची सी.डी. तयार करण्यात येत नाही. आपण ती सी.डी. जर उपलब्ध करुन दिली तर त्यांचे काम अतिशय सोपे होईल. त्यामुळे या रंगभूमती प्रयोग परिनिरीक्षक मंडळासाठी अधिकच्या पैशाची व्यवस्था करावी, ही विनंती.

सभापती महोदय, उच्च शिक्षणाच्या दृष्टीने मुंबई विद्यापीठ आणि पुणे विद्यापीठ तयार करण्यात आले, परंतु सोलापूर विद्यापीठाचे काय ? गेल्या अधिवेशनामध्ये आपण सोलापूर विद्यापीठास मान्यता दिली, आज त्या विद्यापीठाची अवस्था काय आहे ? ते एका भाडयाच्या इमारतीमध्ये चालत आहे. या विद्यापीठाचे सक्षमीकरण होणे आवश्यक आहे, ते आपण करावे, ही विनंती.

सभापती महोदय, बाब क्रमांक 111 वर मी बोलणार आहे. एसईझेडच्या चर्चेसंबंधी आम्हाला आश्वासन मिळाले होते की, गावठाणाची जमीन संरक्षित केली जाईल. परंतु आज माझ्याकडे रायगड जिल्हयातील श्री.बबन पाटील यांचे निवेदन आले आहे, ते मी माननीय मंत्रिमहोदयांकडे पाठवते.

नंतर श्री.रोझेकर...

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे.....

या निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, गावठाणातील जमिनींवर नोटीसा आलेल्या आहेत. ज्यांना नोटीसा आलेल्या आहेत त्यांना शासनाने संरक्षण द्यावे, अशा प्रकारची मी विनंती करते.

सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये या विभागाच्या मंत्र्यांच्या मागण्या उद्या म्हणजे आज चर्चेसाठी आहेत असे काल सन्माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले होते. त्यातील महत्वाचा मुद्दा असा होता की, हॉस्पिटलअंतर्गत सक्षमीकरण करणे. नागपूरमधील मेडिकल हॉस्पिटलमधील एक छोटे बालक कुत्र्याने पळविले होते ते सुरक्षा रक्षकाला रात्री 3 वाजता सापडले. त्यामुळे येथील सुरक्षा व्यवस्थेकडे अधिक लक्ष देण्याची आवश्यकता आहे. तसेच, या रुग्णालयांमध्ये लांबून येणा-या रुग्णांच्या नातेवाईकांना राहण्यासाठी धर्मशाळा झाल्या तर ग्रामीण भागातील लोकांची मोठी सोय होणार आहे. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करते. धन्यवाद.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सागर मेघे (नागपूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, पूरवणी मागण्यांवर चर्चा करताना मला नगरविकास विभागाच्या पान क्रमांक 69, बाब क्रमांक 106 संबंधी बोलावयाचे आहे. मराठवाडयातील 8 नगरपरिषदांना विशेष सहाय्य अनुदान मंजूर करण्यात आलेले आहे. माझ्या मतदारसंघात एकूण 10 नगरपरिषदा आहेत. त्यापैकी काटोल नगरपरिषदेला माननीय मुख्यमंत्र्यांनी पारितोषिक दिलेले आहे. 25 कोटी रुपयांचे सहाय्य अनुदान मराठवाडयासाठी देण्यात आलेले आहे. विदर्भातील नगरपरिषदांना देखील विशेष कामांसाठी अशा प्रकारची तरतूद करावी, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 105 मध्ये औरंगाबाद नगरपालिका क्षेत्रात सभागृहाच्या बांधकामासाठी 3 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. नागपूर शहराची लोकसंख्या आता 28 लाखाच्या वर गेली आहे. या नगरात वसंतराव देशमुख हे एकच सभागृह आहे. दिवसेंदिवस कार्यक्रमांची संख्या वाढत असून हे सभागृह उपलब्ध होत नाही. त्यामुळे नागपूर शहरासाठी आणखी एका सभागृहाची आवश्यकता असून यासाठी शासनाने भरीव तरतूद करावी, अशी विनंती करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, सन 2006-2007 च्या पुरक मागण्या सभागृहासमोर ठेवल्या असतांना अनेक सन्माननीय सदस्यांनी या मागण्यांवर आपले विचार सभागृहासमोर ठेवले आहेत. यामध्ये महसूल विभागाच्याही मागण्या आहेत. एकूण 16 बाबी महसूल विभागाच्या आहेत. यावर बोलतांना सुरुवातीला सन्माननीय सदस्य, श्री.रमेश निकोसे यांनी महसूल विभागाच्या रिक्त पदांबाबत मुद्दा उपस्थित केला. महाराष्ट्रामध्ये विदर्भ, मराठवाडा, खांदेश येथे अनेक रिक्त पदे आहेत. ही सर्व पदे भरण्यासंबंधी शासन प्रयत्नशील आहे. सन्माननीय सदस्य, श्री.जयंत पाटील यांनी पुर परिस्थितीमध्ये पनवेलमध्ये 5 गावांमध्ये जे शेतीचे नुकसान झाले आहे त्यांना नुकसान भरपाईसंबंधी मुद्दा उपस्थित केला आहे. संरक्षक भिंतीसाठी भविष्यात आर्थिक तरतूद करावी किंवा त्यासाठी वेगळे हेड तयार करावे, अशी मागणीही त्यांनी केली आहे. सन्माननीय सदस्य, श्री.धोंडीराम राठोड यांनी बाब क्रमांक 54 व 56 बाबत बोलतांना नैसर्गिक आपत्ती, पुर परिस्थिती निर्माण झाल्यानंतर अनेक सार्वजनिक मालमत्तांचे अनेक ठिकाणी नुकसान झाले आहे त्यामध्ये मोठया प्रमाणात रस्तेही आहेत.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे .....

त्या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी आणि ट्रान्सफॉर्मरच्या दुरुस्तीसाठी शासनाने पैसे उपलब्ध करुन द्यावे, अशी मागणी केली आहे. सरकार रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी पैसे उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्नशील आहे. लवकरच रस्ते दुरुस्त करण्यात येतील.

सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकार यांनी अतिवृष्टी झाली त्यावेळी ठाणे जिल्हयातील कल्याण, डोंबिवली परीसरातील काही लोकांना नुकसान भरपाई मिळाली नसल्याचे सांगितले. काही इमारतींमधील लोकांना नुसान भरपाई मिळाली तर काही इमारतींमधील लोकांना नुकसान भरपाई मिळाली नाही, असे त्यांनी सांगितले. जिल्हाधिका-यांनी जो पंचनामा केला, जो सर्व्हे कला त्याची मी माहिती घेईन. बहुतांश लोकांना नुकसान भरपाईचे पैसे मिळालेले आहेत. जुलै, 2005 च्या पूर परिस्थितीमध्ये शेतीचे नुकसान झाले होते. शेतीच्या नुकसानीसाठी 1,251 कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले आहे. त्यावेळी साडेचार कोटी रुपये फक्त नुकसान भरपाई पोटी मदत करण्यात आलेली आहे. चितळे समिती नेमण्यात आली त्यासंदर्भात त्यांनी उल्लेख केला. त्यामध्ये ठाण्याचा समावेश करण्याबाबत सरकार विचार करेल. डॉ.नीलम गो-हे म्हणाल्या की, मुंबईमध्ये बॉम्बस्फोट झ ाला त्यामध्ये अनेक लोक मृत्युमुखी पडले, काही लोक अपंग झाले. शासनातर्फे जखमींना 50 हजार रुपये मदत देण्यात येते. बॉम्बस्फोटामध्ये कोणाचा पाय गेला असेल, कोणाचा हात गेला असेल, कोणी अपंग झाला असेल तर त्याचे पुनर्वसन व्हावे, अशी त्यांनी मागणी केली आहे. सरकार या मागणीचा नक्की विचार करेल. बॉम्बस्फोटामध्ये जे अपंग होतात त्यांना भविष्यात उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध राहत नाही, यासंदर्भात देखील शासन प्रयत्न करेल. महसूल विभागाच्या मागण्यांवर अनेक सन्माननीय सदस्यांची चांगल्या सूचना केलेल्या आहेत. सर्व सन्माननीय सदस्यांनी महसूल विभागाच्या 16 मागण्यांना पाठिंबा देऊन मागण्या मंजूर कराव्यात, अशी मी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धर्मरावबाबा आत्राम (परिवहन, सामाजिक न्याय, विमुक्त, भटक्या जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण, खनिकर्म, महिला व बालविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, परिवहन विभागाच्या मागण्यांवर सन्माननीय सदस्य श्री.रणजितसिंह मोहिते पाटील यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, सोलापूर येथील आर.टी.ओ. कार्यालयासाठी निधी उपलब्ध करुन दिला पाहिजे. सोलापूर येथील आर.टी.ओ. कार्यालयासाठी आपण 1.24 कोटी रुपये निधी दिलेला आहे. पैसे शिल्लक असतील तर सरकार सोलापूर येथील आर.टी.ओ. कार्यालयासाठी निधी देण्याचा प्रयत्न करेल. विमुक्त जाती व भटक्या जमाती, सामाजिक न्याय विभागाच्या मागण्यांवर चर्चा करीत असतांना सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे व सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितले की, मागासवर्गीय शाळेतील विद्यार्थ्यांकडून फी घेण्यात येऊ नये, त्यासंदर्भात राज्य शासन योग्य विचार करेल. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी सांगितले की, कर्जतमधील अपंग शाळा अनुदानापासून वंचित आहेत. कर्जतमध्ये 10 वर्षापासून अपंग शाळा सुरु आहेत, यासंदर्भात शासन विचार करेल. सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी विद्यार्थ्यांपर्यंत स्कॉलरशीप पोहोचली पाहिजे, अशा प्रकारची सूचना केलेली आहे. यासंदर्भात राज्य सरकार योग्य तो विचार करेल. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना किंवा इतर विद्यार्थ्यांना स्कॉलरशीप मिळेल, यासाठी राज्य सरकार प्रयत्न करेल. शाळांचे दर 3 वर्षानी रिनिवल करण्यात येते, ते 5 वर्षानी झाले पाहिजे अशी आपण सूचना केलेली आहे. आमच्याकडे यासंदर्भात 10-12 डेलिगेशन आले होते. त्या डेलिगेशन बरोबर यासंदर्भात चर्चा झालेली आहे. राज्य सरकार या मागणीवर विचार करेल.

यानंतर श्री.सुंबरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आत्राम ....

दुसरे म्हणजे विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.राठोड यांनी असे विचार मांडले की, आपल्या ज्या आश्रमशाळा आहेत त्यांना वेळेवर निधी मिळत नाही. तेव्हा त्यांना लवकरात लवकर निधी मिळेल याची काळजी आम्ही घेत आहोत एवढेच याबाबत मी आपल्याला सांगू इच्छितो.

सभापती महोदय, याप्रमाणे खुलासा केल्यानंतर मी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करू इच्छितो की, सामाजिक न्याय विभाग तसेच परिवहन विभागाच्या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात.

****

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण (उद्योग व सांस्कृतिक कार्य मंत्री) : सभापती महोदय, या ठिकाणी उद्योग व सांस्कृतिक कार्य विभागाच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेऊन ज्या सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत त्याबद्दल मी त्यांचे सर्वप्रथम आभार मानतो. सभापती महोदय, आपले राज्य उद्योग क्षेत्रामध्ये आज आघाडीवर आहे. देशातील सर्व अन्य राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात सर्वात अधिक गुंतवणूक येऊ लागली आहे. साधारणत: 32 एमओयूजवर आम्ही स्वाक्षऱ्या केल्या आहेत त्यातून साधारणत: 33 हजार कोटी रूपयांची गुंतवणूक या राज्यात अपेक्षित आहे. त्यातील महत्त्वाचे उद्योग सांगावयाचे तर बजाज 2 हजार कोटी, सिंधुदुर्ग मायनिंग 2 हजार कोटी इत्यादी. अशा प्रकारे जवळपास 123-124 सामंजस्य करार झालेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.रघुवंशी यांनी उल्लेख केला की, नंदूरबार आणि धुळे जिल्ह्याला पॅकेज योजनेचा जो निधी उपलब्ध व्हायला पाहिजे होता तो बरेच दिवस दिलेला नाही. मला आपल्याला सांगितले पाहिजे की, 1997-98 ते 31.3.2005 पर्यंत जवळपास 14.85 कोटी धुळे जिल्ह्याला दिलेले आहेत आणि 1.4.2005 ते 31.12.2006 पर्यंत 4.70 कोटी देण्याचे राहिले आहेत ते देण्याची निश्चितपणे आपण व्यवस्था करू. तसेच नंदूरबार जिल्हयाला 1997-98 पासून 11 कोटी 37 लाख देण्यात आलेले असून एप्रिल 2005 ते 31.12.2006 पर्यंत 2.35 कोटी देण्याचे बाकी आहेत. तेही पैसे लवकरात लवकर देण्याचा प्रयत्न केला जाईल. सभापती महोदय, मागील काळामध्ये बर्ड फ्ल्यू मुळे पोल्ट्री व्यवसाय अडचणीमध्ये आलेला होता. त्यांच्यापुढे आर्थिक अडचणी आल्या होत्या त्यामुळे त्यांना मागील वित्तीय वर्षापर्यंत आपण सर्व निधी दिलेला आहे.

सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील तसेच श्री.जयंत प्र.पाटील यांनी एसइझेडच्या संदर्भात उल्लेख केला. जो एरिया प्रोसेसिंगसाठी आहे तो 35 टक्के आहे, ज्याला कोअर सेक्टर म्हणतो आणि नॉन कोअर सेक्टर साठी 65 टक्के एरिया आहे. हे सारे कायद्याप्रमाणेच आहे आणि हा कायदा केंद्र सरकारचा आहे. मला या ठिकाणी मुद्दाम सांगितले पाहिजे की, हे करीत असताना कोणालाही डायरेक्ट निर्णय घेता येत नाहीत. तर त्या बोर्डापुढे जाऊनच त्याला मान्यता घ्यावी लागते आणि प्रश्न मार्गी लावावा लागतो. तेव्हा रिअल इस्टेटच्या बाबतीत देखील निर्बंध ठेवण्याची भूमिका केंद्र सरकारकडून घेतली जात आहे, किंबहुना त्यावर नियंत्रण ठेवण्याचीच भूमिका केंद्र सरकारची आहे. तेव्हा 35 टक्के आणि 65 टक्के कोअर आणि नॉनकोअर करता ठेवण्याचा यामध्ये

..... 4Z 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण ....

प्रयत्न झालेला आहे.

सन्माननीय सदस्या डॉ.गोऱ्हे यांनी सांगितले की, पेण आणि पनवेल तालुक्यामध्ये ज्या जमिनी एसइझेड साठी दिलेल्या आहेत, शेतकऱ्यांच्या जमिनी यासाठी घेतल्या जातात, गावठाणे घेतली जात आहेत. सभापती महोदय, मला या ठिकाणी अत्यंत जबाबदारीने खुलासा केला पाहिजे की, ...

(यानंतर श्री. सरफरे .....4ए 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण...

या जमिनी बिगर शेतीच्या पड जमिनी आहेत. त्याठिकाणी सिंगल क्रॉप म्हणजे बारमाही एकच पिक घेतले जाते, अशा जमिनी घेण्याचे शासनाचे धोरण आहे. या योजनेमध्ये गावठाणातील कोणतेही घर विस्थापित होणार नाही. आपण जे निवेदन दिले आहे त्यामधील माहिती त्रोटक आहे. परंतु आपण जर सर्व्हेनिहाय माहिती दिली तर त्याबाबत निश्चितपणे दक्षता घेतली जाईल. ज्यांना नोटीसेस दिल्या आहेत त्याबाबत आपले काही आक्षेप असतील तर ते नोंदविण्यात यावेत. जेणेकरुन त्यामध्ये काही गैरसमज असेल तर तो दूर होईल.

सभापती महोदय, राज्यामध्ये नवीन औद्योगिक धोरण 2006 जाहीर करण्यात आले आहे. मला खात्री आहे की, शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार राज्यातील औद्योगिक क्षेत्रातील विकासाचा दर सन 2010 पर्यंत 10 टक्क्याच्या आसपास व सेवा क्षेत्रातील विकासाचा दर 12 टक्क्यापर्यंत आणण्याचा महत्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतला आहे. तेव्हा निश्चितपणे या धोरणाचा फायदा राज्याला होईल. या नवीन धोरणामुळे राज्याच्या औद्योगिक क्षेत्रामध्ये चांगले वातावरण निर्माण केले जाईल. यामुळे राज्यामध्ये मोठया उद्योगांपेक्षा लहान आणि मध्यम उद्योगांना मदत होईल अशी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, सांस्कृतिक कार्य विभागासंबंधी माननीय सदस्य श्री. रघुवंशी यांनी काही गोष्टींचा उल्लेख केला. त्यांनी सांगितले की, धुळे येथे नाटयगृहाचे काम अद्यापि सुरु झाले नाही.त्याकरीता शासनाने निर्णय घेतला असून ज्या ज्या जिल्हयांची मुख्यालये आहेत, त्याठिकाणी बंदिस्त नाटयगृहे बांधण्याची शासनाची भूमिका आहे. राज्याच्या अनेक जिल्हयांमध्ये काम चालू आहे. धुळे जिल्हयातील नाटयगृहाचे प्लॅन आणि एस्टीमेट जिल्हाधिकाऱ्यांना प्राप्त झाले नाही. त्याबाबत पाठपुरावा करुन तातडीने काम करण्याचा आम्ही प्रयत्न करु. नंदूरबार जिल्हयामध्ये नाटयगृहासाठी 2 कोटी 96 लाख रुपये खर्च झाले. उर्वरीत 1 कोटी 20 लाख रुपये ही रक्कम तातडीने देण्याचा प्रयत्न करु. त्या अनुषंगाने नंदूरबार जिल्हयातील नाटयगृह पूर्ण केले जाईल.

सभापती महोदय, राज्याच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत माननीय मुख्यमंत्र्यांनी एक नवीन उपक्रम जाहीर केला आहे. त्या अनुषंगाने राज्यातील पहिला "रंगभूमी जीवन गौरव पुरस्कार" राज्य शासनाच्या वतीने माननीय श्री. प्रभाकर पणशीकर यांना नागपूर येथे जाहीर करण्यात आला. ज्यांनी नाटय क्षेत्रामध्ये उत्कृष्ट कामगिरी बजाविली आहे, वर्षानुवर्षे नाटय क्षेत्रामध्ये उत्कृष्ट काम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केले आहे अशा कलावंतांना "लाईफ टाईम अचिव्हमेंट" "जीवन गौरव पुरस्कार" शासनाच्या वतीने जाहीर करण्यात आला. त्याचप्रमाणे शासनाने नाटयक्षेत्रासाठी आर्थिक पॅकेज देण्याची भूमिका जाहीर केली. त्यासंबंधीचा शासन निर्णय असून त्यानुसार प्रत्येक नाटय प्रयोगासाठी 15 हजार रुपयांचे अनुदान व संगीत नाटकासाठी सुध्दा 20 हजार रुपयांचे अनुदान देण्याची शासनाची भूमिका आहे. माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी पुरातत्व विभागाचा उल्लेख केला. राज्यामध्ये जी वस्तूसंग्रहालये आहेत, म्युझियम्स आहेत त्यांच्याकडे पुरातत्व विभागाचे दुर्लक्ष झाले आहे असे त्यांचे म्हणणे आहे. माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या वस्तूसंग्रहालयांकडे पुरातत्व विभागाचे अजिबात दुर्लक्ष झालेले नाही. त्याउलट त्याठिकाणी ज्या काही पुराण वस्तू आहेत त्यांचे जतन करण्याचे काम केले जाते, डॉक्युमेंट जतन करण्याचे काम केले जाते. त्याकरीता 1 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्यामधून मुंबईमध्ये अद्ययावत असे वस्तूसंग्रहालय बनविण्यात येणार आहे. त्याठिक्राणी जुने डॉक्युमेंट्स जतन करण्याची शासनाची भूमिका आहे.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी उल्लेख केला की, तमाशा क्षेत्रातील कलाकारांना सुध्दा मदत करण्याची आवश्यकता आहे. त्यासंबंधी या विभागामार्फत कार्यवाही सुरु आहे. अशाप्रकारे तमाशा क्षेत्रामध्ये जे लाखो कलावंत आहेत त्यांना आर्थिक मदत देण्यासंबंधी स्वतंत्र पॅकेज लवकरच जाहीर केले जाईल असे आश्वासन देतो. तेव्हा उद्योग, सांस्कृतिक कार्य, खनिकर्म आणि राजशिष्टाचार विभागाच्या पूरक मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील (पणन मंत्री) : सभ्ांपती महोदय, सन 2006-2007 च्या पुरवणी मागण्यांच्या संदर्भात ऊर्जा विभागाच्या वतीने सन्माननीय सदस्य श्री.धोंडीराम राठोड साहेबांनी पूर परिस्थितीमुळे विद्युत लाईन पडलेल्या आहेत, पुरामुळे ट्रान्सफॉर्मर वाहून गेलेले आहेत.त्यांनी सर्व परिसरातील एमएसईबीच्या माध्यमातून सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत मुद्दा उपस्थित केला. याबाबत निश्चितपणे विचार केला जाईल. त्यानंतर ऊर्जा विभागाच्या वतीने बाब क्रमांक 194 आणि बाब क्रमांक 202 यामध्ये कृषी ग्राहक आणि यंत्रमागधारक यांना सवलतीच्या दर लागू करण्याच्या संदर्भात नुकताच सभागृहामध्ये निर्णय घेतलेला आहे, त्याबाबतची पुरवणी मागणी केलेली आहे. केंद्रीय सार्वजनिक उपक्रमांची थकीत देणी एकाचवेळी चुकती करण्याच्या संदर्भात रक्कम उपलब्ध करावयाची आहे त्या दृष्टीने मागणी केलेली आहे. मला सभागृहाला विनंती करावयाची आहे की, ऊर्जा विभागाच्या मागण्या मंजूर कराव्यात.

--

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री बाबा सिद्दीकी (कामगार, अन्न व नागरी पुरवठा राज्य मंत्री): सभापति महोदय, अन्न व नागरी पुरवठा विभाग एवम् अन्न व औषधे प्रशासन विभागान्तर्गत वर्ष 2006-07 की पूरक मांगों के अन्तर्गत बाब क्रमांक 146 ते 291 सदन मंजूर करें, ऐसी मेरी विनती है.

राज्य उत्पादन शुल्क विभाग के संदर्भ में 9 लाख 80 हजार रुपये की पूरक मांग मंजूर करें, ऐसी विनती करता हूं.

कामगार विभाग के अन्तर्गत वर्ष 2006-07 की पूरक मांगों के संबंध में माननीय सदस्य श्री कवाड़े जी एवं श्रीमती गोरहे ने टास्क फोर्स के बारे में मुद्दा रखा है. मैं यह बताना चाहता हूं कि 2345 बाल कामगारों को मुक्त कराया गया है और संबंधित एम्पलायर को गिरफ्तार किया गया है.इन बाल कामगारों को शिक्षा सुविधा देने एवं उनका आर्थिक पुनर्वास किया जा रहा है. इन बाल कामगारों के परिवारो की भी सहायता की जा रही है. मैं माननीय सदस्यों से अनुरोध करता हूं कि कामगार विभाग की मांगों को मंजूर करें.

अन्न व नागरी पुरवठा विभाग की पूरक मांगों के अन्तर्गत माननीय सदस्य श्री रघुवंशी ने बताया कि अन्त्योदय योजना के अन्तर्गत थर्ड फेज की सूची तैयार की गई है या नहीं. मैं यह बताना चाहता हूं कि थर्ड फेज की सूची तैयार की गई है. यह केन्द्रीय सरकार की योजना है. केन्द्रीय सरकार से मंजूरी प्राप्त करने के लिए पत्रव्यवहार किया गया है. थर्ड फेज में थर्ड लीस्ट का समावेश किया जाएगा.माननीय सदस्य श्री अरविंद सावंत ने बताया कि देवगढ़ तालुके में कम मात्रा में केरोसीन दिया जा रहा है. महाराष्ट्र राज्य को दो लाख किलोलीटर केरोसीन की जरुरत है. लेकिन करीब 1 लाख 36 हजार 732 किलोलीटर केरोसीन मिल रहा है. हर जिले में 70 प्रतिशत केरोसीन दिया जा रहा है. सम्माननीय सदस्य की भावना का ख्याल रखते हुए इस सिलसिले में कलेक्टर से प्रस्ताव मंगाए जाएंगे और 8 दिन में उचित निर्णय लिया जाएगा.

अंत में, मैं यह अनुरोध करना चाहूंगा कि अन्न व नागरी पुरवठा विभाग की मांगों को मंजूर करें.इतना कह कर मैं अपना भाषण समाप्त करता हूं.

....

यानंतर श्री रणजित कांबळे यांचे भाषण.

यानंतर श्री बरवड

अशुद्धीत प्रत/ शीघ्रलेखाशी जुळणी नाही

श्री. रणजित कांबळे (ग्रामविकास, सार्वजनिक आरोग्य, कुटुंब कल्याण, पाणी पुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2006-07 च्या पुरवणी मागण्यामध्ये नियोजन विभागाच्या बाब क्रमांक 258, 259, 260 आणि 261 या पुरवणी मागण्यांना सदनाने मान्यता द्यावी अशी मी आपल्यामार्फत सदनाला विनंती करतो.

सभापती महोदय, ग्रामविकास विभागाशी संबंधित सन 2006-07 च्या पुरवणी मागण्यांच्या संदर्भात सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे तसेच सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत रघुवंशी यांनी काही सूचना केल्या. त्या सूचना आम्ही लक्षात ठेवू आणि त्याबाबतीत काही ना काही मार्ग काढू. ग्रामविकास विभागाशी संबंधित सन 2006-07 च्या बाब क्रमांक 203, 204, 205, 215, 216, 217 या पुरवणी मागण्यांना मान्याता द्यावी अशी मी आपल्यामार्फत सदनाला विनंती करतो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP

श्री. सुरेश शेट्टी (वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण, पर्यटन, विशेष सहाय्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या ज्या पुरवणी मागण्या आहेत त्यासंदर्भात पाच सन्माननीय सदस्यांनी सूचना केल्या. सन्माननीय सदस्य सर्वश्री अरविंद सावंत, जयंत पाटील, रामनाथ मोते, कपिल पाटील आणि डॉ. नीलम गोऱ्हे यांनी या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेतला. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सोलापूर विद्यापीठासंबंधीचा विषय मांडला. सोलापूर विद्यापीठाला पैसे दिलेले नाहीत असे त्यांनी सांगितले. सन 2006-07 च्या अर्थसंकल्पामध्ये 6 कोटी रुपयांची तरतूद सोलापूर विद्यापीठासाठी केली होती.

सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते साहेबांनी दोन विषय मांडले. आदिवासी भागामध्ये आपण इन्सेंटीव योजना राबवितो त्या योजनेची अंमलबजावणी करावयास पाहिजे असे त्यांनी सांगितले. त्या योजनेची अंमलबजावणी केलेली आहे. 750 लोकांना आपण पैसे देत आहोत. 200 रुपयांपासून 1500 रुपयांपर्यंत त्यांना इन्सेंटीव देतो. सन्माननीय सदस्यांनी 15 टक्केच्या संदर्भात मागणी केली. त्याबाबत विचार करु. सन्माननीय सदस्यांनी वेतनश्रेणीच्या जी. आर. च्या संदर्भात उल्लेख केला. 7450-11,500 या वेतनश्रेणीचा जी.आर. होता. 500 रुपये कमी करुन परत जी.आर. काढलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील साहेबांनी नवीन आय.टी.आय. संबंधीचा मुद्दा मांडला. यावर्षी आम्ही 9 नवीन आय.टी.आय.साठी तरतूद केलेली आहे. जे नवीन 32 तालुके झालेले आहेत त्या सर्व तालुक्यांमध्ये आय.टी.आय. काढणार आहोत. पहिल्या टप्प्यामध्ये 9 आय.टी.आय. ची तरतूद केलेली आहे.. सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या डीपीडीसीमध्ये प्रस्ताव केला तर दुसऱ्या टप्प्यामध्ये ते आय.टी.आय. घेण्याच्या बाबतीत तरतूद करुन घेऊ. सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत तसेच सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी एम.बी.ए. आणि एम.एम.एस. कॉलेज पुण्यामध्ये चालू आहेत त्यासंबंधीचा मुद्दा मांडला. त्या ठिकाणी पीजीडीबीएम चे कोर्स चालू होते. त्या ठिकाणी अखील भारतीय विद्यार्थी परिषदेच्या कार्यकर्त्यांनी आंदोलन केले. त्यामध्ये भारतीय विद्यार्थी सेनाही होती. त्यासंदर्भात पोलीस कारवाई चालू आहे. मी सांगू इच्छितो की, लवकरच महाराष्ट्रामध्ये नवीन कायदा आणत आहोत. जी नवीन विद्यापीठे असतील, संस्था असतील, शिक्षण क्षेत्रातील जी कोणतीही नवीन संस्था येईल त्यांना रजिस्ट्रेशन करावे लागेल. सिनेट निवडणुकीबाबत सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील साहेबांनी सूचना केली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : आपण जो निर्णय घेतला त्याचे स्वागत करतो परंतु जे बोगस आहेत त्यांची चौकशी करुन कारवाई करणार की नाही ?

श्री. सुरेश शेट्टी : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, त्यांच्यावर ॲक्शन घेतली असून कालच कोर्टामध्ये निकाल लागला. राज्य शासन डायरेक्ट हस्तक्षेप करु शकत नाही. याबाबतीत आपण बसून चर्चा करु. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील साहेबांनी सांगितले. सिनेट निवडणुकीसंबंधी मुंबई विद्यापीठाच्या चान्सलर साहेबांनी विद्यापीठाला आदेश दिलेले आहेत.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. सुरेश शेट्टी....)

तेव्हा ती निवडणूक पुन्हा होईल असे मला वाटते.

सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज यांच्या साहित्याचे प्रकाशन करण्यासाठी करण्यात आलेल्या तरतुदीमध्ये वाढ करावी अशी सूचना केली. शासनाने साहित्य प्रकाशनासाठी 9.18 लाखाची तरतूद केलेली आहे. तेव्हा उच्च आणि तंत्र शिक्षण विभागाच्या मागण्या सभागृहाने संमत कराव्यात अशी मी सदनाला विनंती करतो.

सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षण विभागाच्या मागण्यांवर सन्माननीय सदस्य श्री. रमेश निकोस, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत आणि सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत.

(यानंतर हिंदी भाषण...)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सुरेश शेट्टी ..

सभापति महोदय, वैद्यकीय विभाग के लिए धनराशि मुहैया कराने के लिए माननीय मुख्यमंत्री जी ने जो कोशिश की है, उसके लिए मैं उनका अभिनंदन करता हूं. पिछड़े वर्ग के विद्यार्थी और आर्थिक रुप से पिछडे वर्ग के विद्यार्थी को नान एडड कॉलेज में भी मेडिकल की शिक्षा के लिए आर्थिक सहायता दी जाएगी. यह सहायता 60 हजार से बढ़ाकर 1 लाख रुपये की है. इसके लिए बजट में प्रोवीजन भी की गई है. माननीय सदस्य श्री दीपक सावंत ने बताया कि ओबीसी, एस.सी और एस.टी. के विद्यार्थियों की फीस वक्त पर भरी नहीं जाती है. इस संबंध में समाज कल्याण विभाग और हमारा विभाग मिलकर समय पर पैसा पहुंचाने के बारे में कोशिश करेगा. नागपूर मेडीकल कॉलेज के संबंध में माननीय सदस्य श्री दीपक सावंत और श्रीमती गोरहे ने कुछ समस्या रखी. कल ही इसी विषय पर लक्षवेधी सूचना यहां पर चर्चा के लिए आई थी. मुंबई में मेडीकल कॉलेज के लिए केन्द्रीय सरकार की तरफ से 120 करोड़ रुपये आ रहे हैं. नागपुर के भी दो कॉलेजों के लिए, सुपर स्पेशालिस्ट कॉलेज और गवर्नमेंट मेडीकल कॉलेज के लिए अधिक से अधिक पैसा जमा किया जाएगा और इन कॉलेजों को अपग्रेड किया जाएगा. कल ही नागपुर के मेडीकल कॉलेज में एक कोबाल्ट यूनिट का उद्घाटन किया गया. किसी तरह से इस काम के लिए पैसा मिल सके इसके लिए हमारी कोशिश चल रही है. इस संबंध में बहुत सारे लोगों से बात हुई है. केन्द्रीय मंत्री माननीय मुरली देवरा से भी बात हुई है. आईल कंपनी को भी मदद करने के लिए कहा है. ओएनजीसी ने मुंबई के अस्पताल के लिए सीटी स्कॅन और एमआरआय मशीन के लिए स्वीकृति दे दी है. इसके अलावा आईल कंपनी के चेयरमैन से भी विनती की है कि जिस प्रकार से मुंबई के अस्पतालों के लिए सहायता दी है, उसी प्रकार से नागपुर के अस्पतालों को अपग्रेड करने के लिए भी सहायता करें. हमने उन्हें बताया कि नागपुर के दो अस्पतालों को अपग्रेड करना है. माननीय मंत्री श्री मुरली देवरा जी ने प्रामिस किया है कि आने वाले दिनों में नागपुर के अस्पतालों के लिए साधन-सामग्री देने के बारे में विचार किया जाएगा. हम उन्हें नागपुर के अस्पतालों में जिन साधन-सामग्री की आवश्यकता है, उसकी सूची देंगे. माननीय मंत्री श्री मुरली देवरा जी ने आश्वासन दिया है कि सहायता देने के बारे में जरुर विचार किया जाएगा. मैं इस सिलसिले में पर्सनली फालोअप करुंगा. हम नागपुर के अस्पतालों के लिए ज्यादा से ज्यादा सहायता लाने की कोशिश करेंगे. मराठवाड़ा के लिए जो पॅकेज घोषित

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सुरेश शेट्टी ..

किया गया है, उसके अन्तर्गत युनानी और आयुर्वेदिक कॉलेज, आंबेजोगाई कॉलेज के लिए प्रावधान किया गया है. वहां पर नई इमारत बनाई जाएगी और नये साधन स्थापित किए जाएंगे. मराठवाड़ा में घाटी नाम का सबसे बड़ा अस्पताल है. यह अस्पताल अपग्रेड किया जाएगा. माननीय श्री राजेन्द्र दर्डा भी इस सिलसिले में कोशिश कर रहे हैं कि बाहर से फंड जमा करके इस अस्पताल को अपग्रेड किया जाए. युनानी और आयुर्वेदिक कॉलेज की ग्रांट 85 प्रतिशत से बढ़ाकर 100 प्रतिशत की है. आयुर्वेदिक कॉलेज और युनानी कॉलेज के बारे में सरकार की तरफ से स्टेटस रिपोर्ट मंगाई जाएगी. जिन संस्थाओं के बारे में रिपोर्ट अच्छी नहीं होगी, उनके खिलाफ कार्रवाई की जाएगी.

सभापति महोदय, पर्यटन विभाग के संबंध में भी कुछ मुद्दे रखे गए हैं. माननीय सदस्य श्री जयंत पाटील ने कोस्टल पर्यटन के विकास के बारे में कहा है. मैं यह बताना चाहता हूं कि पहली बार 5 वें वित्त आयोग ने कोस्टल पर्यटन के विकास के लिए 280 करोड़ रुपये का प्रावधान किया है. इनमें से इस साल 62 करोड़ रुपये खर्च करने वाले हैं. कुछ दिनों पहले महाराष्ट्र सरकार ने पर्यटन नीति घोषित की है. नई पर्यटन नीति के अन्तर्गत कोस्टल एरिया का भी समावेश किया गया है. नई पर्यटन नीति में इको टूरिझम का भी उल्लेख है.माननीय सदस्य श्री जयंत पाटील ने कहा कि अलीबाग और श्रीवर्धन में पर्यटन के विकास के लिए ज्यादा पैसा दिया जाना चाहिए. मैं बताना चाहता हूं कि सरकार 100 प्रतिशत सबसीडी दे रही है. जो मुंबई क्षेत्र में 1 हजार करोड़ रुपये लगाएगा उन्हें 50 प्रतिशत और मुंबई के बाहर के क्षेत्र में जो इनवेस्टमेंट करेंगे उन्हें 100 प्रतिशत सबसीडी अगले 10 साल तक दी जाएगी. मैं माननीय सदस्य को यह भी बताना चाहता हूं कि जो सदस्य कोस्टल एरिया के हैं, रत्नागिरी, रायगढ़ जिले के हैं, वे हमारे पास आएंगे तो हम उन्हें नई पर्यटन नीति के बारे में सारी जानकारी देंगे. जिस प्रकार से सिंगापुर में जू पार्क बनाया गया है, वैसा ही जू पार्क सिंधुदुर्ग में बनाया जा सकता है या नहीं, यह देखने के लिए सर्वे किया गया है. माननीय मंत्री श्री राणे साहब भी इस बारे में जानकारी दे सकते है. वे इसके बारे में अच्छी जानकारी रखते है. मैं आपको यह बताना चाहता हूं कि दो तीन साल में Maharashtra will be destination for tourism in this country. माथेरान में ट्रेन चलाने के बारे में भारतीय रेल विभाग से चर्चा कर रहे हैं. वे जल्द से जल्द वहां पर ट्रेन शुरु करने के बारे में

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सुरेश शेट्टी ..

कोशिश कर रहे हैं. नागभीड में भी ट्रेन चलाने का प्रस्ताव है. दो तीन महीने के भीतर नागभीड़ में ट्रेंन चलायी जाएगी. यह ट्रेन नागपुर से नागभीड़ तक चलाई जाएगी. इको टुरीझम के लिए नई कमेटी बनाने का प्रस्ताव है. इस कमेटी के अध्यक्ष वन मंत्री रहेंगे. वन विभाग को कहा है कि महाराष्ट्र के लिए इको टुरिझम पॉलिसी फ्रेम की जाए.

सभापति महोदय, अंत में मैं यह कहना चाहता हूं कि वैद्यकीय शिक्षा, उच्च व तंत्र शिक्षा, पर्यटन विभाग की मांगों को मंजूर करें. इतना कह कर मैं अपना भाषण समाप्त करता हूं.

...

इसके बारे श्री शेगांवकर का भाषण.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.प्रीतमकुमार शेगावकर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, गृहनिर्माण विभागाच्या पूरक मागण्यांवर ज्या सन्माननीय सदस्यांनी चर्चा केलेली आहे व आपले विचार व्यक्त केलेले आहेत त्यांचे मी सर्वप्रथम आभार मानतो. राज्यातील ग्रामीण विभागामध्ये इंदिरा आवास योजना व पंतप्रधान गृहनिर्माण योजना आहेत. शहरातील झोपडपट्टीवासियांना 225 चौरसफुटाची सदनिका मोफत मिळते. त्याचप्रमाणे राज्यातील ग्रामीण भागातील ज्या गरीब कुटुंबांना या योजनेचा फायदा मिळत नाही त्यांना या योजनोचा फायदा देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने एक निर्णय घेतला आहे. ग्रामीण भागामध्ये राजीव गांधी योजना राबवून 50 हजार घरे दुर्बल घटकांसाठी आणि 50 हजार घरे बी.पी.एल. योजनेसाठी तयार करावीत, अशी एकूण एक लाख घरे बांधण्याची योजना आहे. या योजनेमध्ये 33 कोटी रुपये आणि दुसऱ्या योजनेमध्ये 2 कोटी रुपयांची पुरवणी मागणी केलेली आहे. या मागण्या मंजूर करण्यासाठी मी आपल्याला विनंती करीत आहे.

सभापती महोदय, गृहनिर्माण राज्यमंत्री म्हणून दोन महिन्यापूर्वी मी कार्यभार स्वीकारला आहे. या दोन महिन्याच्या कालावधीत म्हाडातील सर्व अधिकाऱ्यांची बैठक घेतली आहे, मुंबईतील आमदारांची, बिल्डर्सची बैठक घेतली आहे. मुंबईतील समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न केले आहेत. येथे सन्माननीय सदस्य श्री.मधु चव्हाण हे म्हाडाबद्दल बोलले आहेत. ट्रॅन्झीट कँपबद्दल व दलालांबद्दल त्यांची तक्रार आहे, हया तक्रारी निवारणाचे काम मी लवकरच करणार आहे. एक खिडकी योजना राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, त्याप्रमाणे ती राबविण्यात येत आहे, मी जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न केला आहे व करणार आहे. माझी इच्छा आहे की, त्या त्या भागातील आमदारांनी मला याबाबत सहकार्य करावे. मी झोपडपट्टीवासियांचा प्रश्न किंवा इतर सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी योग्य त्या सवलती गृहनिर्माण विभागातर्फे देण्याचा प्रयत्न करणार आहे. आपण सर्वांनी सहकार्य करावे आणि या पुरवणी मागण्या मंजूर कराव्यात अशी मी विनंती करतो.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ KGS/ MHM/ MAP/

श्री.विलासराव देशमुख (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभाग, नगरविकास विभाग, विधी व न्याय विभाग या तीन विभागाच्या मागण्या सदनासमोर मांडण्यात आल्या आहेत, त्यामध्ये सामान्य प्रशासन विभागाच्या 18 मागण्या आहेत. नगरविकास विभागाच्या 7 मागण्या आहेत, विधी व न्याय विभागाच्या 10 मागण्या आहेत.

सभापती महोदय, मध्यंतरीच्या काळात बंद पडलेला नागपूर येथील शासकीय उड्डाण क्लब (फलॉईंग क्लब) सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. नवनवीन एअरलाईन्स येत असल्याने सध्या पायलटची आवश्यकता आहे. पुरेसे पायलट सध्या उपलब्ध नाहीत. फार मोठी संधी तरुणांना या व्यवसायात मिळणार आहे. नागपूर फलाईंग क्लब सुरु झाल्यानंतर विदर्भातील अनेक तरुणांना रोजगाराची एक नवी संधी उपलब्ध होणार आहे. नव्या एम.आय.डी.सी. मध्ये उद्योग ट्रान्सफर होणार आहेत. नव्या एस.ई.झेड. मध्ये 1000 कोटींची गुंतवणूक करुन बोईंग कंपनीचे मेंटेनन्स युनीट सुरु होणार आहे. तसेच नवीन कार्गो हब आणि ॲव्हीशन हब सुरु होणार आहे. कारण आज अडीच लाख रुपये पगार दिला तरी पायलट मिळत नाहीत. एवढया मोठया प्रमाणावर संधी येथे उपलब्ध होणार आहेत. विमान प्रवास ही बाब चैनीची राहिली नसून आवश्यक झालेली दिसत आहे, म्हणून नागपूर येथील फलाईंग क्लब नव्याने सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

..... यानंतर श्री.जुन्नरे

अशुद्धीरित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री. विलासराव देशमुख .....

जलदगतीने तसेच सुरक्षित प्रवास करणे हे शेवटी महत्वाचे आहे. त्यामुळे या दोन्ही गोष्टींचा विचार करुन यासंदर्भात राज्यशासनाने हा निर्णय घेतलेला आहे. या मागण्यांना सभागृहाने मान्यता द्यावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय, नगरविकासामध्ये प्रामुख्याने मराठवाडयाच्या विकासाच्या कार्यक्रमासंदर्भात चर्चा करण्यात आलेली आहे. नागपूरला जेव्हा मंत्रिमंडळाची बैठक झाली होती त्यावेळेला मराठवाडयाच्या विकास कार्यक्रमावर चर्चा झाली होती. त्यावेळेस माननीय मेघेसाहेब म्हणाले होते की, आपल्याला केवळ मराठवाडाच दिसतो, विदर्भ मात्र दिसत नाही. मुंबईमध्ये जेव्हा अधिवेशन होते तेव्हा अधिवेशनात विदर्भाच्या मागण्याच्या संदर्भात, विदर्भाच्या पॅकेजच्या संदर्भात मोठया प्रमाणात मागच्या अधिवेशनाच चर्चा झाली होती. मराठवाडा आणि विदर्भ हे दोन्ही मागासलेले विभाग आहेत, त्यामुळे मराठवाडयातील मागण्यांचे सुध्दा स्वागतच केले पाहिजे. तुम्ही आणि आम्ही मागासलेले आहोत. त्यामुळे दोन्ही मिळून आपण आपल्या मागण्या मान्य करु या. नगरपालिका आणि महानगरपालिकेला अनुदान द्यावे लागते यासाठीच पूरक मागण्यांमध्ये तरतूद करण्यात आलेली आहे. सभापती महोदय, विधी व न्याय विभागाच्या संदर्भात उच्च न्यायालयाच्या बाबतीत जादा कोर्ट निर्माण करणे, फर्निचरची व्यवस्था करणे यांसदर्भात मागण्या आहेत त्यामुळे सर्व मागण्या मान्य कराव्यात अशी माझी सदनाला विनंती आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मुंबईमध्ये 40 वर्षाच्या पूर्वीच्या इमारतींच्या बांधकामांना कोर्टाने सरसकट स्टे दिलेला आहे. यासंदर्भात शासनाचे धोरण चांगले आहे. या निर्णयामुळे 1.5 कोटी लोकांना फटका बसणार आहे त्यामुळे संदर्भात शासनाने अपिलात जाणे अत्यंत आवश्यक आहे.

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, यासंदर्भात उच्च न्ययालयाचा जो आदेश आलेला आहे तो निश्चितपणे तपासून घेतला जाईल. यासंदर्भात राज्यसरकारच्या दृष्टीने योग्य ती पाऊले उचलले जाईल. आवश्यकता पडली तर सर्वोच्च न्यायालयात सुध्दा सरकार जाईल आणि या प्रश्नाच्या संदर्भात दाद मागेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, उच्च शिक्षणाच्या संदर्भात मी पुरवणी मागण्याच्यावेळी दोन महत्वाचे मुद्दे मांडले होते त्यामुळे या दोन मुद्यांच्या संदर्भात उत्तर मिळणे अपेक्षित होते. मी एक मुद्दा उपस्थित केला होता की, ग्रामीण भागामध्ये ज्या तालुक्यात एकही अनुदानित महाविद्यालय नाही त्या महाविद्यालयाला अनुदान देण्याचा शासनाचा धोरणात्मक निर्णय आहे. मी यासंदर्भात स्पष्टपणे उदाहरण दिले होते की, कल्याण तालुक्यातील गोवेली गावामध्ये 1200 विद्यार्थ्यांचे महाविद्यालय आहे. या ठिकाणी शेतक-यांची मुले शिक्षण घेत आहेत त्यामुळे याचा विचार होईल काय? 17 जानेवारी 2004 च्या निर्णयानुसार आपण कर्मचा-यांना थकबाकी देण्यासाठी पुरवणी मागणी केलेली आहे. 17 जानेवारी, 2004 च्या निर्णयामध्ये तंत्र विभागातील निदेशकाना निवड श्रेणी 7450/- ची दिली होती. यामध्ये दुरुस्ती करण्याचा निर्णय घेतला आणि त्याप्रमाणे 20 मार्च ला दुरुस्ती केली. 7500 ची निवड श्रेणी देण्याचा निर्णय घेतला आणि 9 ऑगस्टला परत तो निर्णय आपण रद्द केला त्यामुळे यासंदर्भातील भूमिका शासनाने स्पष्ट करावी अशी विनंती आहे.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी कॉलेज संबंधी पहिला जो प्रश्न मांडला आहे तो तपासून घेण्यात येईल. पहिल्यांदा आपण 7500 ते 12000 असे पे स्केल घोषित केले होते ते रेक्टीफाय करुन 7450 ते 11500 अशी दुरुस्ती केलेली आहे.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, ऑगस्ट 2005 मध्ये पार्लमेंटमध्ये कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांना संरक्षण देणारा कायदा झाला. यासंदर्भात 26 ऑक्टोबर रोजी केंद्रशासनाने जी.आर.काढून सर्व राज्यामध्ये हा कायदा अंमलात आलेला आहे असे जाहीर केलेले आहे. या कायद्यानुसार महाराष्ट्रात अंमलबजावणी सुरु झालेली आहे असे आपण कागदपत्रावरुन मानतो. त्यामुळे संरक्षण अधिकारी, मॅजिस्टेट यांच्या मदतीसाठी नेमावयाचे आहेत. जेणेकरुन स्त्रीला राहत्या घरात संरक्षण मिळणार आहे. हा ऐतिहासिक कायदा आहे. माध्यमांनी या कायद्याच्या संदर्भात चांगल्या प्रकारे दखल घेतलेली आहे. यासंदर्भात मी आपल्याला निवेदन दिलेले आहे तसेच आपल्याकडे विधी व न्याय विभाग आहे त्यामुळे संरक्षण अधिकारी नेमण्याच्या संदर्भात आपल्याकडून सकारात्मक भूमिका कळावी अशी विनंती आहे.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, केंद्र सरकारचा हा कायदा सर्व राज्यांना लागू झालेला आहे. या कायद्याची यशस्वीपणे अंमलबजावणी विधी व न्याय विभागामार्फत केली जाईल. त्या संदर्भात राज्य शासनाने पावले उचचली आहेत.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, परळ आणि दादर येथे संत गाडगेमहाराज धर्मशाळा उभी केलेली आहे. त्याच धर्तीवर सेंट जॉर्ज हॉस्पीटल येथे गाडगे महाराज धर्मशाळा उभी करण्यासाठी जागा उपलब्ध करुन दिली, त्याच्या बांधकामास सुरुवात देखील झाली. परंतु रेल्वे मंत्रालयाकडून काही बंधने आल्यामुळे आता ते बांधकाम थांबविण्यात आलेले आहे. तेव्हा या संदर्भात शासनाने लक्ष घालावे.

श्री.सुरेश शेट्टी : सजेशन फॉर ॲक्शन.

सभापती : सन 2006-2007 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावरील चर्चा आता संपली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सन 1998-99 व 1999-2000 च्या अधिक खर्चाच्या विवरणपत्रावर चर्चा.

सभापती : सन 1999-2000 च्या अधिक खर्चाच्या मागण्यांवर लोकलेखा समितीने सविस्तर चर्चा केलेली आहे. तेव्हा पुन्हा येथे चर्चा करण्याची जरुरी वाटत नाही. सभागृहाने मागण्या विचारात घेतल्या आहेत.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विधानसभा विधेयक क्रमांक 89 बाबत.

सभापती : आता आपण विधानसभेने संमत केलेले वि.स.वि.क्र. 89- महाराष्ट्र जादूटोणा आणि अनिष्ट व अधोरी प्रथा यांचे समूळ उच्चाटन विधेयक 2005 वर चर्चा करु या.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय,आज सभागृहाची बैठक सकाळी 10.30 वाजल्यापासून सुरु आहे. काल सुध्दा सभागृहाची बैठक सकाळी 11.00 ते रात्रौ 10.00 पर्यंत होती. तेव्हा माझी आपणास विनंती आहे की, आपण हे विधेयक उद्या घ्यावे.

सभापती : मला वाटते आपण या विधेयकावर चर्चा सुरु करावी. वाटल्यास चर्चा पुढे सुरु ठेवावी किंवा कसे याबाबत विचार करु.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, जर कामकाजपत्रिकेवर महत्वाचा कार्यक्रम असेल तर रात्रौ उशीरापर्यंत बसण्याची या सभागृहाची प्रथा आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांना सांगू इच्छितो की, एखाद्या दिवशी सकाळी लवकर व रात्रौ उशिरापर्यंत कामकाज चालविणे ठीक आहे. परंतु असे रोजच होत आहे.

सभापती : हे अत्यंत महत्वाचे विधेयक आहे. अनेक दिवसांपासून हे विधेयक विधानपरिषदेमध्ये प्रलंबित आहे. तेव्हा आपण या विधेयकावर चर्चा सुरु करु नंतर चर्चा पुढे सुरु ठेवावी किंवा कसे याबाबत विचार करु.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, आपण या विधेयकावर चर्चा सुरु केलेली आहे. सन्माननी सदस्य श्री.दिवाकर रावते हे ऑनलेग आहेत.....

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, जादूटोणा आणि अनिष्ट व अघोरी प्रथा यांचे समूळ उच्चाटन हे विधेयक सातत्याने पुढे ढकलले जात आहे. हे बिल अतिशय महत्वाचे आहे. आपला महाराष्ट्र पुरोगामी मानला जातो. प्रबोधनकार ठाकरे यांनी अंधश्रध्देच्या विरोधात फार मोठे काम केलेले असून याबाबतीत त्यांनी सातत्याने आघाडी घेतलेली आहे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात)

सभापती : कृपया सन्माननीय सदस्यांनी शांत रहावे. मी सन्माननीय सदस्यांस बोलण्यास परवानगी दिलेली आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी प्रबोधनकार ठाकरे यांचे नांव घेत नाही. परंतु ज्या स्वातंत्र्यवीर सावरकरांनी अंधश्रध्देच्या विरोधात सातत्याने आघाडी घेतली...(अडथळा) हे बिल अतिशय महत्वाचे असून ते आपण तातडीने घेतले पाहिजे. या बिलावर चर्चा सुरु झालेली आहे. माननीय दिवाकर रावते साहेब हे ऑन लेग आहेत...(अडथळा) या बिलावर चर्चा घेण्याच्या दृष्टीने आम्ही थांबण्यास तयार आहोत. या सभागृहाची उशिरापर्यंत थांबून कामकाज करण्याची प्रथा आहे. त्यामुळे हे बिल आपण घ्यावे.

सभापती : विधेयक क्रमांक 89-महाराष्ट्र जादूटोणा आणि अनिष्ट व अघोरी प्रथा यांचे समूळ उच्चाटन हे विधेयक दिनांक 20 जुलै,2006 रोजी त्या विभागाच्या मंत्र्यांनी या सभागृहामध्ये मांडले आहे. या विधेयकावर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे विधेयकाच्या वैधानिक क्षमतेबाबत त्यांचे भाषण करीत होते, त्यामुळे ते ऑन लेग असून त्यांनी आपल्या भाषणास आता सुरुवात करावी.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात.)

सभापती : कृपया सन्माननीय सदस्यांनी शांत रहावे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी चर्चेस सुरुवात करावी.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, माननीय विरोधी पक्षनेत्यांचे सहकार्य आम्हाला मिळते. माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या भावना लक्षात घेऊन व हे बिल महत्वाचे असल्यामुळे या बिलावरील चर्चेसाठी आपण स्पेशल सिटींग घ्यावे.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष बैठकीमध्ये सन्माननीय सदस्यांना जे मुद्दे मांडावयाचे असतील ते त्यांनी मांडावेत. प्रत्येक अधिवेशनामध्ये आपण हे बिल मांडतो आणि ते पूर्ण होत नाही. सन्माननीय सदस्यांच्या भावनांशी आम्ही सहमत आहोत. परंतु हे बिल याच अधिवेशनामध्ये चर्चा करुन पूर्ण करावयाचे आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, शासनाला एवढीच तातडी असेल तर उद्या केवळ याच बिलावर चर्चा घ्यावी इतर कामकाज ठेवू नये.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय संसदीय कार्यमंत्र्यांनी सांगितले आणि आपणही सांगितले की हे बिल महत्वाचे आहे, घेतले पाहिजे, आम्हालाही मान्य आहे. परंतु, या बिलावर पूर्ण चर्चा झाली पाहिजे. स्पेशल सिटिंग ठेवण्यापेक्षा संपूर्ण दिवसभर याच विधेयकावर चर्चा करा. माझ्या दृष्टीनेही हे बिल अतिशय महत्वाचे असल्यामुळे मी उभा आहे. मी ॲकॅडेमिक चर्चा करण्यासाठी उभा आहे. बिलावर चर्चा व्हावयास हवी. त्यामुळे उद्या दिवसभर या बिलावर चर्चा ठेवावी किंवा याबाबत आपण आपल्या दालनात एक बैठक बोलवावी.

सभापती : कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये या बिलावर सविस्तर चर्चा करण्याचा निर्णय आपण घेतला होता. त्यामुळे मी उद्या, बुधवार, दिनांक 13/12/2006 रोजी सकाळी 9.30 ते 11.45 वाजता सभागृहाची विशेष बैठक घेऊन यामध्ये अर्धातास चर्चा घेण्यात येतील आणि सभागृहाची नियमित बैठक 12.00 वाजता घेऊ त्यामध्ये हे बिल प्राथम्याने दाखवून या बिलावर कामकाज सल्लागार समितीमध्ये निर्णय झाल्याप्रमाणे सविस्तर चर्चा करु.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, विशेष बैठक आपण बोलावित आहात त्याबद्दल आमचे दुमत नाही. तथापि, विधानसभेमध्ये नगरपरिषदेसंबंधी एक बिल मंजूर करण्यात आले आहे. या राज्यामध्ये नगराध्यक्षांच्या निवडणुकीसंदर्भात कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्यामुळे मेजर ॲमेंडमेंड करुन बिल विधानसभेमध्ये मंजूर करण्यात आले आहे ते बिल देखील उद्या या सभागृहात मंजूर करणे आवश्यक आहे. माझी विनंती आहे की, ते बिल या ठिकाणी घेऊ आणि त्यानंतर अंधश्रद्धेसंबंधीचे बिल घेऊ.

सभापती : उद्या प्रश्नोत्तरे होतील, लक्षवेधी सूचना आहेत त्या पुढे ढकलल्या जातील आणि या बिलावर सविस्तर चर्चा होईल. कामकाज सल्लागार समितीमध्ये या बिलावर प्रामुख्याने चर्चा करण्याचा निर्णय आपण घेतला आहे.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आपण 4 दिवसाच्या कामकाजाचा आलेख तपासला तर सदस्य सकाळी 10.00 वाजेपासून सभागृहामध्ये येतात आणि रात्री 10.00 वाजेपर्यंत उपस्थित असतात. आपल्याकडून अशी सूचना आली की, उद्या प्रश्नोत्तरे आणि लेईंग झाल्यानंतर या विधेयकावर चर्चा सुरु होईल. विधेयके ठेवावयाची असतील तर इतर कामकाज ठेऊ नका, अशी माझ ी विनती आहे.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी केलेली सूचना मी ऐकलेली आहे. आता मी माझा निर्णय देतो. दिनांक 13.12.2006 रोजी सकाळी 9.30 ते 11.45 वाजता विशेष बैठक होईल. त्या बैठकीमध्ये आजच्या कार्यक्रमपत्रिकेवर दाखविण्यात आलेल्या अर्धा तास चर्चा जेवढया पूर्ण होतील तेवढया घेण्यात येतील. त्यानंतर सकाळी 12.00 वाजता सभागृहाचे नियमित कामकाज सुरु होईल. एक तास प्रश्नोत्तरे झाल्यानंतर वि.स.वि. क्रमांक-89 वर चर्चा होईल. त्यानंतर म्युनिसिपल कौन्सिलच्या विधेयकावर चर्चा होईल. ही दोन्ही विधेयके झाल्यानंतर लक्षवेधी सूचना आणि कार्यक्रमपत्रिकेवरील अन्य कामकाज होईल.

आता सभागृहाची बैठक स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक उद्या बुधवार, दिनांक 13 डिसेंबर, 2006 रोजी सकाळी 9 वाजून 30 मिनिटांनी पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 6 वाजून 22 मिनिटांनी, बुधवार, दिनांक 13 डिसेंबर, 2006 च्या सकाळी 9 वाजून 30 मिनिटापर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही